# 'हाकारा'



वर्ष बारावे : अंक - पहिला - दुसरा

जानेवारी - जून १९९१



सौ. संघजा मेश्राम
( कवयित्री )



मारुती कुळमेथे ( जि. मा. अ. )
गडचिरोली. (कवी, विचारवत)



भुजंग मेश्राम
( कवी, संशोधक, नाटककार )



कुंडलीक केदारी ( कवी, नाटककार )



प्रा. विनायक तुमराम (कवी, समीक्षक, )



वाहरु सोनवणे
( कवी, विचारवत )



चामुलाल राठवा
( कवी, संशोधक )



रवि कुरसंगे
(कलावंत व कवी)

कष्टकरी जनता, भूषण भारता, वंदन करितो पददलिता !

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक

# हाकारा

## आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक

अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) | संपादकीय | |
| २) | काळुराम धोदडे यांचे भाषण | ५ |
| ३) | वाहरु सोनवणे यांचे भाषण | ७ |
| ४) | पाचव्या आदिवासी साहित्य संमेलनाचा वृत्तांत : प्रा. विनायक तुमराम. | ११ |
| ५) | मानव मुक्तीचा संदेश देणारे आदिवासी साहित्य संमेलन : ॲड. विजय साठे | ३० |
| ६) | पाचव्या आदिवासी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने : विक्रम कान्हेरे | ३३ |
| ७) | आदिवासी साहित्य - आदिवासींचे प्रेरणास्त्रोत : प्रा. वामन शेळमाके | ३५ |
| ८) | आदिवासी साहित्याचा आदिवासी चळवळीशी समन्वय : काळुराम धांगडा | ३९ |
| ९) | स्त्री-मुक्ती व आदिवासी साहित्य : सौ. संघजा मेश्राम | ४४ |
| १०) | मराठी साहित्यात आदिवासी स्त्रीचे चित्रण : सौ. संघजा मेश्राम | ४६ |
| ११) | आदिवासी कर्मचाऱ्यांची सामाजिक बांधिलकी : बळवंत दळवी | ४८ |
| १२) | आदिवासी संस्कृतीचे दमन नि ब्राम्हणी विकृतीचे भ्रमण : कृष्णकुमार चांदेकर | ५१ |
| १३) | आदिवासी साहित्याची वाटचाल - शोध आणि बोध : ग. शां. पंडित | ५४ |
| १४) | रवि कुरसंगे - स्वतंत्र प्रज्ञेचा आदिवासी कलावंत : भुजंग मेश्राम | ५९ |
| १५) | आदिवासी सायबाची बायकू (कथा) : कुंडलिक केदारी | ६२ |
| १६) | जान्याकाका (कथा) : शेख सलिम अहमद | ६६ |
| १७) | होऱ्या रे होऱ्या (कथा) : जीवन गेडाम | ७२ |
| १८) | 'गोंडवन पेटले आहे' - पुस्तक परीक्षण : प्रा. वामन शेळमाके | ७५ |
| १९) | 'रानातली माणसं' चे लेखक शेख सलिम अहमद यांची मुलाखत : ग. शां. पंडित | ७८ |
| २०) | आदिवासी जीवनावरील पुस्तके : संकलन - भुजंग मेश्राम | ८२ |
| २१) | कविता : विनायक तुमराम, रावसाहेब चोले, सुधाकर सरवदे, उषाकिरण आत्राम, बा. ध. गायकवाड, कृष्णकुमार चांदेकर, कांचन बोंबले, जीवन गेडाम. | ८४ |
| २२) | 'हाकारा'चा १२ वर्धापनदिन व प्रा. सरदार स्मृति अंक प्रकाशन सोहळा | ९२ |
| २३) | संवाद : सुधीर जोग, समीर पेंदाम. | ९५ |


वर्ष - बारावे : अंक - पहिला-दुसरा
जानेवारी-जून १९९१
पत्रव्यवहाराचा पत्ता:
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे-४११००७

संपादक
रामचंद्र मुटाटकर
कार्यकारी संपादक
ग. शां. पंडित

प्रकाशक- रा. के. मुटाटकर
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान
परिषद यांच्यासाठी
संजीव मुद्रणालय
४६९, सदाशिव पेठ
पुणे-४११०३० फोन-४४५०८२
येथे छापून प्रसिध्द केले.

'हाकारा'स महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ व भारतीय सामाजिक शास्त्र अनुसंधान परिषद, पश्चिम विभागीय केंद्र यांजकडून अनुदान प्राप्त झाले आहे.

# संपादकीय

पालघर जिल्हा ठाणे येथे दिनांक २३, २४, २५ डिसेंबर १९९० रोजी पाचवे आदिवासी साहित्य संमेलन संपन्न झाले. त्या निमित्त हाकाराचा विशेषांक निघावा अशी योजना होती. परंतु साहित्याची जुळवाजुळव न झाल्याने आता तो अंक प्रकाशित होत आहे. हा अंक काढण्यात श्री. भुजंग मेश्राम यांनी पुढाकार घेतला व मोलाचे सहाय्य केले.

साहित्य हे प्रबोधनाचे प्रभावी साधन आहे, संस्कृतीचे वाहक आहे. साहित्य संस्कृती परिवर्तनाचा आरसा आहे. साहित्य सांस्कृतिक मूल्यांची जपणूक करते, तसेच अस्मिता टिकविते, वाढवते. यावरून आदिवासी साहित्याची वाटचाल व प्रगती दलित साहित्यापेक्षा कांही अंशी वेगळी असणे स्वाभाविक आहे. हाकाराच्या १९८० सालच्या पहिल्याच अंकाच्या संपादकीय मध्ये हा मुद्दा चर्चिला आहे. दलित व आदिवासी दोन्ही शोषित समाज असले तरी ऐतिहासिक पार्श्वभूमीवर त्यांच्या शोषणात फरक आहे. दलित हिंदू जातीव्यवस्थेचा निरस्कृत भाग आहे तर आदिवासी या व्यवस्थेच्या बाहेर आहे. त्याचा स्वतःचा इतिहास, भूगोल, तत्त्वज्ञान, पुराणं आहेत. निसर्गाशी नातं आहे, देवदेवता वेगळ्या आहेत. संमेलनाचे अध्यक्ष श्री वाहरु सोनावणे यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात समर्थपणे या विषयांची चर्चा केली आहे.

आदिवासी कसा निर्माण झाला हा संशोधनाचा जटिल विषय आहे. कांही गट पूर्वापार दऱ्याखोऱ्यातून राहात आले, ते बाहेर पडलेच नाही. इतर कांही गट हल्लेखोरांपासून बचाव करण्यासाठी जंगलात लपण्यास आले असावे. ते आदिवासी बनले. काही आदिवासींना शेतीत रस आहे. काहींना जंगलात अन्न गोळा करणे, पशुपालन, मासेमारी, शिकार यांत जास्त रस आहे. जमिनीची भूक अलीकडे वाढावयास लागली आहे. एकलव्याचा अंगठा जरी स्वतःचे स्वत्व विकलेल्या द्रोणाचार्यांनी घेतला तरी त्याचा द्रोणाचार्याच्या मुलास, अश्वत्थाम्यास ( अस्तंबा ? ) धुळ्यातील अक्राणीतील आदिवासींनी आसरा दिला, तो आजतागायत चालू आहे. ब्रिटीशांच्या विरुद्ध स्वातंत्र्यलढ्यात पडलेल्या आदिवासी स्वातंत्र्यवीरांचा नामनिर्देश इतिहासात नाही ही वस्तुस्थिती आहे. स्थानिक इतिहासाचे साहित्य निर्माण होण्याची गरज यावरुन उघड होते.

आमचे मित्र श्री वाहरु सोनावणे यांनी आदिवासींना प्रस्थापित समाज राक्षस समजून त्यांची अवहेलना करतो असे म्हटले आहे ते पटण्यासारखे नाही. राक्षस ही जमात नसून ती वृत्ती आहे. राक्षसांचा राजा रावण हा जातीने ब्राम्हण होता हे बऱ्याच लोकांना माहीत नसावे. रामाच्या बाजूने लढणारे वानर हे आदिवासींच असले पाहिजेत. कांही तज्ज्ञांच्या मते रावणाची लंका ही बस्तरमधील दंडकारण्यात होती. बस्तरमधे आजही मोठ्या प्रमाणावर जंगलात आदिवासींची वस्ती आहे. अध्यक्षीय भाषणात आदिवासी संस्कृति व इतर संस्कृति यांचे परस्पर संबंध, आदिवासी संस्कृतिची वैशिष्ट्ये याबद्दल सविस्तर चर्चा आहे. आदिवासी समाजातील वैगुण्यांचाही उल्लेख आहे. स्त्री-पुरुष संबंधांबद्दल वाहरुने म्हटले आहे, ''आदिवासींमध्ये घराण्यांची लग्ने होत नाहीत, स्त्री-पुरुषांची होतात.'' हा फरक मालमत्ता वाढविणाऱ्या समाजप्रणाली व सामायिक मालमत्तेचा वापर करणाऱ्या आदिवासी समाजप्रणालींतील आहे. आदिवासी समाजात मालमत्तेकरिता खून होत नाहीत. हुंडाबळीचा प्रश्नच नाही.

महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे साहित्य विषयक धोरण श्री वाहरु सोनावणे यांनी या शब्दात मांडले आहे : ''समानतेवर आधारलेली आदिवासींची संस्कृती शाबूत ठेवून जतन करण्याचा विचार आणि आदिवासी मुक्ती, मानव मुक्तीचा विचार ज्या ज्या साहित्य चळवळीत आहे त्या त्या साहित्य चळवळीशी आमचे नाते मैत्रीचे राहील.''

आदिवासी-बिगर आदिवासी हा वाद निरर्थक आहे असे आम्हास वाटते. आदिवासी संस्कृतिची अनुभूती आदिवासींना व बाहेरच्यांना वेगवेगळी असणार हे उघडच आहे. मानवविज्ञानात ज्या संस्कृतीचा अभ्यास करावयाचा त्यांच्या चष्म्यातून ती संस्कृती समजावून घ्यावयाची याचे प्रशिक्षण देण्यात येते. स्वत:च्या चष्म्यातून संस्कृति बघावयाची नसते. प्रा. सरदारांनी साहित्य-विश्लेषणात त्या काळच्या परिस्थितीतून साहित्य निर्मिती कशी व कां झाली हे समजण्याचा प्रयत्न केला. आतून पाहणे व बाहेरुन पाहणे यात फरक आहे व तो विचारात घेतला जावा, प्रत्येकाचा संदर्भ वेगळा असतो. प्रश्न आहे सहानुभूतीचा, प्रेमाचा, सहानुभूतीच्या अभावी संस्कृतीची मूल्ये समजू शकत नाही. स्थिरतेचा विचार केला, भूतकाळाला आलिंगन दिले तर परिवर्तन होणार नाही. अलिकडे पर्यावरणावर प्रेम करणाऱ्या व्यक्तींना आदिवासी संस्कृतीबद्दल प्रेम निर्माण झाले आहे. त्या प्रेमापोटी आदिवासी समाज स्थिर राहावा कारण, त्यांत त्यांचे हित आहे व पर्यावरणाचे रक्षण होईल असाही सूर निघतो. आदिवासी साहित्याला कितीतरी विषयांना हात घालावयाचा आहे. साहित्य कोण निर्माण करतो यापेक्षा साहित्याची जास्त निर्मिती ही आजची गरज आहे. चित्रण करणे आवश्यक आहे. चांगलं-वाईट याची छाननी यथावकाश होईल.

महाराष्ट्र मानव-विज्ञान परिषदेने ऑक्टोबर १९८३ पुणे येथे सदाशिव पेठेत (ब्राम्हणी अड्ड्यात) प्रा. सरदारांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील आदिवासींचे एक चर्चासत्र आयोजले होते. त्यावेळी काही प्रथितयश आदिवासींना प्रस्थापित साहित्यिकांनी हजेरी लावली नाही म्हणून खंत वाटली. प्रस्थापित साहित्यिकांना आदिवासी संस्कृतीचा गंधही नसताना त्यांच्या हजेरीत काहीच अर्थ नव्हता. स्वत: प्रा. सरदार असताना इतरांची तशी गरजही नव्हती. आम्ही प्रस्थापितांचे आशिर्वादाची अपेक्षा का करावी ? त्यांची काय गरज ?

हाकाराच्या या अंकात श्री काळुराम धांगडा यांचे भाषण व श्री विजय साठे यांचे लेखही छापले आहेत. ते मननीय आहेत. आदिवासी चळवळी, आदिवासींचे मूलभूत प्रश्न यांच्याशी साहित्याने जवळीक साधली नाहीं तर ते साहित्य प्रस्थापितांचे अंधानुकरण करेल हा धोका संभवतो.

सुशिक्षित आदिवासी, शहरवासी, नोकरीपेशा करणारा मध्यमवर्गीय आदिवासी यांनी जर आपल्या सर्वसामान्य जनतेशी, त्यांच्या प्रश्नांशी संबंध ठेवले नाहीत तर त्यांच्या साहित्यात कशाचे प्रतिबिंब पडेल ? शोषण हा महत्वाचा प्रश्न आहे. तसेच विज्ञान व तंत्रज्ञानाचा उपयोग करून आर्थिक उत्पादन, बाजारपेठा व त्याद्वारे विभागीय व राष्ट्रीय अर्थव्यवस्थेशी संबंध प्रस्थापित करणे आवश्यक आहे. एरवी भांडवलशाही अर्थव्यवस्था आदिवासींना मजूर म्हणूनच वापरणार. परंतु आता जंगलातील एकटेपण संपले आहे. संघर्ष व आर्थिक, शैक्षणिक उन्नति याला पर्याय नाही. त्याकरिता साहित्याचे माध्यम वापरले गेले पाहिजे. १९७१ ते १९८१ या दहा वर्षात आदिवासींची लोकसंख्या हजारोपटीने वाढली आहे. सर्व आदिवासी स्त्रीया गांधाऱ्या झाल्या का ? यावरुन तोतये आदिवासी किती वाढले याचा संख्यात्मक पुरावा पुढे आला आहे,

खरा आदिवासी कोण ? त्याला न्याय का मिळत नाही ? आरक्षण हे वरदान आहे की त्याची ढाल वापरुन इतरांनी आरक्षणाचे फायदे लुटावयाचे अशी ही तरतूद आहे. यापुढे आदिवासींकरिता भांडणारे पुढारी तोतये आदिवासी असतील. आमदार, खासदारही तोतये आदिवासी असतील. शासकीय अधिकारी, शिक्षक, डॉक्टर, न्यायाधीश हे तोतये आदिवासी असतील. याला वाचा कोणी फोडावयाची ? साहित्य-संमेलनातून या प्रश्नांचा सर्वांगीण विचार झाला पाहिजे. या विचारांचा पाठपुरावा हाकारामार्फत करण्याचा प्रयत्न होत असतो. त्याला साथ पाहिजे, जोडीदार पाहिजेत. आदिवासी संस्कृती धोक्यात आहे, आदिवासी मानव धोक्यात आहे. साहित्याचे काय ?

या अंकासाठी पाचव्या आदिवासी साहित्य संमेलनाचे प्रा. विनायक तुमराम व सौ. संघजा मेश्राम यांचे दोन वृत्तांत आले. परंतु श्री तुमराम यांचा संमेलन वृत्तांत सविस्तर असल्यामुळे व त्यात सर्व तपशील मुद्देसूद असल्याने तोच वृत्तांत या अंकात दिला आहे. सौ. मेश्राम यांचा वृत्तांत अंकात जाऊ शकला नाही याबद्दल दिलगीर आहोत. 'हाकारा' च्या परंपरेप्रमाणे हा अंकही दर्जेदार, आकर्षक व संग्राह्य असाच आहे. तरीही वाचकांच्या काही सूचना आम्हाला स्वागतार्ह आहेत. अभिप्राय जरुर कळवावेत.

– रा. के. मुटाटकर.

# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

## स्फूर्तिस्थान / प्रेरणा : कै. प्रा. गं. बा. सरदार

### कार्यकारी मंडळ

| | | | |
|---|---|---|---|
| अध्यक्ष | : जनार्दन पोहऱ्या वळवी | सदस्य | : श्रीमती मीराबाई तडवी |
| उपाध्यक्ष | : शरद कुलकर्णी | | : श. गो. देवगावकर |
| सचिव | : रा. के. मुटाटकर | | : विजय साठे |
| सहसचिव | : मिलिंद बोकील | | : पद्माकर वळवी |
| खजिनदार | : वि. श्री. कुलकर्णी | | : सुधीर जोग |
| | | | : जॉन गायकवाड |

### हार्दिक अभिनंदन

दि. ९ मार्च १९९१ रोजी महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेच्या त्रैवार्षिक निवडणुकीत वरील सदस्यांची निवड करण्यात आली. सर्वांचे हार्दिक अभिनंदन !

# ५ व्या आदिवासी साहित्य संमेलनाचे स्वागताध्यक्ष श्री. काळूराम धोदडे यांचे भाषण

माझ्या भावा-बहिणींनो

५ व्या आदिवासी साहित्य संमेलनासाठी मोठ्या उत्साहाने नेल्सन मंडेला नगरात जमलेल्या सर्व निमंत्रित, अतिथी व प्रतिनिधींचे मी स्वागत करतो.

तळकोकणात रत्नागिरी येथे मराठी साहित्य संमेलन चालू असताना ठाणे जिल्ह्यात कोकणमाथ्यावर पालघरला आज आदिवासी साहित्य संमेलनास सुरूवात होत आहे. आपल्या आदिवासी साहित्य संमेलनाचे वैशिष्ट्य म्हणजे एखाद्या भाषेच्या साहित्याशी नाते सांगण्याऐवजी निसर्गाशी गेल्या असंख्य पिढ्यांपासून समरस झालेल्या आदिवासी संस्कृतीशी हे संमेलन नाते सांगत आहे. बहुसंख्येने आदिवासी समाज असलेल्या व आदिवासींच्या व्यापक आंदोलनाची पार्श्वभूमी असलेल्या ठाणे जिल्ह्यात हे संमेलन भरत आहे. आदिवासी समाज हा परंपरेने निसर्गाशी समरसं होऊन दऱ्याखोऱ्यात बसलेला आहे व त्याची जीवनपद्धतीही जंगले, नद्या, डोंगरदऱ्यांशी एकरूप अशी समरस झालेली आहे. आदिवासी संस्कृती ही समानतेवर व सामूहिक सहकार्यावर आधारित असून ज्या समानतेच्या तत्वांचा-भूमिकेचा आजची भारतीय राज्यघटना आग्रह धरते ती मुळात आदिवासी समाजात परंपरेने रुजलेली आहे. त्यांची जीवन पद्धती, चालीरिती, रुढी, परंपरा या ह्या समानतेच्या तत्त्वावरच आधारित असल्यामुळे या समाजात शोषण प्रक्रिया कोठेही नाही. त्यामुळे आदिवासी हा स्वत:च्या गरजेपुरते शेती उत्पन्न घेतो व निसर्ग धन वापरतो. अशा संस्कृतीत जगणाऱ्या आदिवासींकडे कोठेही संपत्ती दिसत नसली तरी त्यांचेकडे परंपरेने विकसित झालेला व स्वत:चे अनुभुतीतून निर्माण झालेला कलांचा ठेवा आहे. लग्न, मोसमी उत्सव आदी वेळी ऊत्स्फूर्तपणे म्हटली जाणारी कवनं, परंपरागत 'बात' सांगणाऱ्यांकडून रात्र रात्र चालणाऱ्या कथा व लयबद्ध पण बेहोषीत चालणारी समूहनृत्ये, असंख्य वाद्य प्रकार, सोंग हे प्रकार या संस्कृतीची अनमोल ठेव आहे.

या पैकी कवनं आणि कथा हा मौखिक साहित्याचा अभिजात अविष्कार आहे. परंतु हा आजपर्यंत जतन व विकसित करण्याचा कोणीही प्रयत्न केल्याचे दिसत नाही. किंबहुना शहरीकरणाच्या विकासाच्या प्रक्रियेत अशा विविध कला अस्तंगत होऊ लागल्या आहेत. या कलांना योग्य तो वाव देऊन विकसित करण्याचा व जतन करण्याची गरज आदिवासी संस्कृती टिकविण्यासाठी आवश्यक आहे.

औद्योगिक व विकासाच्या आजच्या कल्पनांमुळे आज जंगलाचा नाश होऊ लागला असून आदिवासींच्या उदरनिर्वाहाचे साधन असलेली शेतीही उध्वस्त होत आहे. आधुनिक राज्याच्या कल्पनेमुळे आदिवासी संस्कृतीवरच घाला येत असून संपूर्ण आदिवासी समाजच नष्ट होण्याची प्रक्रिया सुरु झालेली आहे. नव्या समाज रचनेत आदिवासींच्या शोषणाची प्रक्रिया वेगाने सुरु होत आहे. याची प्रतिक्रिया म्हणून स्वत:च्या अस्तित्वाचा व अस्मितेचा प्रश्न म्हणूनच देशभर आदिवासींची विविध आंदोलने, चळवळी संघटित होत आहेत. नर्मदा बचाओ किंवा बालियापाल

येथील क्षेपणास्त्र तळ विरोधी आंदोलन तसेच वेठ बिगारी, सावकारी, पालमोडीविरुद्ध लढे किमान वेतनाचे प्रश्न, विस्थापन व वंशविच्छेदनाविरोधी लढा हे सर्व लढे आहेत.

या प्रक्रियांची दखल आजच्या साहित्यिकांनी आपली साहित्य निर्मिती करताना घेतली पाहिजे. या सर्व लढ्यामागे आदिवासींच्या अस्तित्वाचा व अस्मितेचा प्रश्न निर्माण झाला असून याची जाण बिगर आदिवासींना करून देण्याची साहित्यिकांकडून मोठी अपेक्षा आहे. आज अशा साहित्याची आत्यंतिक गरज आहे की जे या व्यवस्थेविरुद्ध बुलंद आवाज उठवेल, आदिवासी समाजाची दु:खे प्रकट करील व त्यांच्या प्रश्नांची खरीखुरी जाण लोकांना करून देईल. विकासाच्या व औद्योगिकीकरणाच्या प्रक्रियेने आदिवासी समाजाची होणारी कुचंबणा दूर करण्यास व त्या विरुद्ध आवाज उठविणाऱ्या साहित्य निर्मितीसाठी या संमेलनाने गांभीर्याने विचार करावा. आज देशभर स्वत:च्या अस्तित्वासाठी झगडणाऱ्या आदिवासींच्या लढ्यात अशा जाणीवपूर्वक निर्माण केलेल्या साहित्याने मोठे पाठबळ मिळेल.

साहित्यामध्ये समाजपरिवर्तनाची प्रचंड ताकद आहे. विकास व औद्योगिकरणाच्या योजनांमुळे स्वत:चे अस्तित्व संपुष्टात येण्याची शक्यता असलेल्या आदिवासी समाजाचा आक्रोश आदिवासी साहित्यात प्रकट व्हायला हवा. या आघाताला तोंड देण्याची ताकद आदिवासी समाजात निर्माण करुन आदिवासींची अस्मिता जागवणाऱ्या साहित्य प्रकाराला या संमेलनातून गती मिळावी-चैतन्य मिळावे ही माझ्यासारख्या चळवळीत असणाऱ्या कार्यकर्त्यांची किमान अपेक्षा आहे.

## वनपर्व -

हवेच असेल तुम्हाला
या प्रश्नाचे उत्तर की, 'आदिवासी कोण ?'
तर तपासावी लागेल
आर्यकौर्याने बळी घेतलेल्या
सिंधु संस्कृतीच्या निर्मात्यांची जातकुळी
अन् शोधावा लागेल
अनार्यरक्ताने माखलेल्या मोहेंजोदडो-हडप्पाच्या
अबोल मातीत -
आदिम संस्कृतीचा संदर्भ
येथील क्रूर-कठोर सांस्कृतिक संघर्षानंतरच तर
सुरु झाले आहे वनपर्व-आदिम भारताचे
पसंत केले जंगलजिव्हाऱ्यातील
संदर्भशुन्य जगणे आम्ही
पण झालो नाही कधी आर्यशरण
तेच आम्ही....

- प्रा. विनायक तुमराम

## विषमता

गर्व करणाऱ्या संस्कृतीत
आम्ही जगत आहोत
त्यांच्याच मर्जीने मरत आहो
परंतु
जोशी बाईची मांडी दिसली
तर ती अब्रू ठरते
आणि
मडावी बाईची मांडी दिसली
तर ती संस्कृती ठरते
असे का ?

- कृष्णकुमार चांदेकर
अमरावती

# ५ व्या आदिवासी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष
# श्री. वाहरु सोनवणे यांचे अध्यक्षीय भाषण

आदिवासी साहित्य प्रेमी बंधु-भगिनींनो,

ठाणे जिल्हा, आदिवासी जिल्हा आहे. न्याय हक्कासाठी संघर्षाचा इतिहास सांगणारा जिल्हा आहे. अशा ह्या लढाऊ जिल्हातील पालघर तालुक्यात हे आपले ५ वे आदिवासी साहित्य संमेलन होत आहे, ही स्वाभिमानाची आणि आनंदाची गोष्ट आहे.

आमची अस्मिता शोधून चळवळीची एक दिशा शोधत असताना, मित्र हो! आपल्याला या संमेलनाच्या आवश्यकतेबद्दल अनेक प्रश्न विचारले जात आहेत. त्यांच्याकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही.

दलित आदिवासी ग्रामिण संयुक्त साहित्य संमेलनाचे व्यासपीठ असताना स्वतंत्र वेगळ्या आदिवासी साहित्य संमेलनाची गरज का? आदिवासी साहित्य आणि आदिवासी साहित्यिक संख्येने इतके कमी असताना स्वतंत्र आदिवासी साहित्य संमेलन घेण्याचा आग्रह का?

या प्रश्नांची उत्तरं द्यायची असतील तर साहित्याबरोबरच आपल्याला इतिहासात जावे लागेल. आदिवासी व बिगर आदिवासी तथाकथित सुसंस्कृत, सभ्य समाज यांचे इतिहासातील नाते काय? आदिवासींची वैशिष्ट्यपूर्ण जीवन पद्धती व संस्कृतीचे स्थान यांचे साहित्यात कसे चित्र उभे राहते ह्याच्यावर विचार करावा लागेल आणि यातूनच स्वतंत्र अशा वेगळ्या आदिवासी साहित्य संमेलनाची गरज काय ते स्पष्ट होईल.

अखिल भारतीय पातळीवर, राज्याच्या पातळीवर वेगवेगळे समाजगट आपआपले वेगळे साहित्य संमेलन भरवीत आहेत. मराठी साहित्य संमेलन, दलित साहित्य संमेलन, दलित आदिवासी ग्रामिण संयुक्त साहित्य संमेलन, जन साहित्य संमेलन अशा तऱ्हेने ही वेगवेगळी साहित्य चळवळीची व्यासपीठं उभी राहत आहेत. आपली अस्मिता जोपासत आहेत. आपली संस्कृती मांडत आहेत आणि साहित्य चळवळीवर आपआपला ठसा उमटवत आहेत. ही एक चांगली आणि आनंदाची गोष्ट आहे.

या व्यासपीठांपैकी दलित व बहुजन समाजाच्या साहित्याची जी व्यासपीठं आहेत त्यांच्या कडून आम्हाला स्फूर्ती मिळाली. पण या साहित्यामध्ये देखील आम्हाला आमचा ठसा उमवटताना दिसत नाही. आणि आमची म्हणून जी वैशिष्ट्यं आहेत ती नीट जपली गेली नाहीत तर हा ठसा उमटणेही कठिण आहे अशी जाणीव होत गेलीय.

आदिवासी दुःखाचे संदर्भ वेगळे आहेत, त्यांचे प्रश्न वेगळे राहणार आहेत. त्यांची उत्तरं सुद्धा वेगळ्या पद्धतीने शोधावी लागतील. वेगळा आशय घेऊन येणारे शब्द शोधावे लागतील. म्हणून आदिवासी साहित्याचा प्रवाह हा वेगळा ठरतो. आणि हे साहित्य म्हणजे आमच्या वैशिष्ट्यांचा शोध देखिल ठरतो. फक्त साहित्याचा नव्हे तर आदिवासी समूहाचा आणि जीवनाचा शोध!

मानव जातीचा जन्म मुळात झाला तो आफ्रिकेत. तिथून पुढे १०,००० वर्षांपूर्वीपर्यंत सर्वच मानव जात आदिवासी जीवन जगत होती. म्हणजे त्यांचे जीवन हे जंगल व निसर्ग यांच्यावर अवलंबून होते. या अवस्थेत मानवजात जवळ जवळ जगाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात पोचली. तिची विविधता फुलली. आजच्या मानवी संस्कृतीच्या विविधतेचा पाया या आदिवासी अवस्थेत घातला गेला.

त्यानंतर सुमारे १०,००० वर्षापूर्वी शेतीचा शोध लागल्या नंतर काही टोळ्यांनी शेतीला सुरवात केली. मानव जातीच्या या विविध आदिवासी जमातींपैकी अगदी कमी जमातींनी ही शेतीची पद्धत स्वीकारली. ज्यांनी स्वीकारली त्यांची संख्या वाढत मात्र गेली. आज आपल्या समोर तेच बहुसंख्य उभे राहतात. तरी ही या सर्व घडामोडीमध्ये मानवजातीच्या विविध परंपरापैकी फार थोड्या परंपरा सामावलेल्या आहेत हे लक्षात घेतले पाहिजे. मानवी संस्कृतीच्या, परंपरांच्या विविधतेचा मुख्य ठेवा शेतीबाहेर जपला गेलेला आहे. तो ठेवा आदिवासींनी जोपासलेला आहे. स्वातंत्र्यातही जपलेला आहे, गुलामगिरीतूनही जपलेला आहे, शोषणातूनही जपलेला आहे. जंगलात आणि शेतीवर उतरल्यावरही जपलेला आहे. कारण या आदिवासी परंपरामध्ये कांही जपण्यासारखी वैशिष्ट्ये आहेत.

भारतापुरतं बोलायचं झालं तर आदिवासींबद्दलचं चित्र हे हिन्दू संस्कृतीतून आलेले आहे. ते चित्र कोणते? कसं तयार झालं? याचा काही इतिहास आहे.

आदिवासी जीवनाखेरीज शेतीवर उतरलेली इथली पहिली संस्कृती म्हणजे सिंधू संस्कृती! सिंधू नदीच्या खोऱ्यात आणि सध्याच्या पंजाब, राजस्थान, गुजराथ, पाकिस्तान, अफगानिस्तान पर्यंत स्थिर शेती करणारी, शहर बांधून राहणारी ही माणसे होती. या सिंधू संस्कृतीमध्ये काही प्रमाणावर स्त्री प्रधानता होती असे दिसते. कांही प्रकारची विषमता असावी असेही दिसते. हे लोक समुद्रामार्गे दूरच्या मेसोपोटेमिया नावाच्या संस्कृतीशी वस्तूंची देवाण-घेवाण सुद्धा करीत होते. इथल्या आदिवासी समूहाशी त्यांचा समतोल व देवाण-घेवाण होती असे दिसते.

सिंधू संस्कृती त्या नंतर नष्ट झाली, ती काळाच्या आणि जमिनीच्या पोटात गाडली गेली. त्याच्यावर फिरत्या लढावू पुरुषप्रधान आर्य टोळ्यांनी हल्ले केले. या हल्ल्यांच्या खूणा वेदात सापडतात. मध्यपूर्वेतले आर्य खैबरखिंडीतून भारतात आले तेव्हा ते आदिवासींपासून फार वेगळे नव्हते. गुरे पाळणे, फळे-कंदमुळे गोळा करुन खाणे, काठीने टोचे घेऊन केलेली फिरती शेती करणे असे ते जगत होते. एवढेच नव्हे तर गायीचे मांस खाणे, दारु पिणे, हे सगळे तेव्हाच्या आर्यांना चालत होते. गायींवरुन इतरांशी भांडत होते, आपसातही भांडत होते. खान्देश मध्ये अजूनही काठियावाडी शेकडों गायी घेऊन येतात आणि आजही आहेत.

सुरुवातीच्या वेदावरुन असेही दिसते की, त्यांच्यामध्ये फार मोठी उतरंड नव्हती पण त्यांच्या टोळ्यांमध्ये पुरुषप्रधान संस्कृती प्रामुख्याने होती.

या काळात भारताच्या इतर सर्व भागात कमी अधिक स्त्री प्रधान असलेल्या, विषमता कमी असणाऱ्या मुक्त आदिवासी टोळ्या राहत होत्या. आर्य टोळ्या जशा गंगा यमुनेच्या खोऱ्याकडे सरकत आल्या तशा बऱ्याच गोष्टी घडत गेल्या.

मूळ आदिवासी, सिंधू संस्कृतीच्या परंपरा आणि आर्यभाषीयांच्या परंपरा यांच्यातील संघर्ष, समन्वयाकडे एक स्थित्यंतर सुरु झाले, बुद्ध, जैन धर्म या स्थित्यंतराचा भाग होते.

अल्पसंख्य ब्राम्हण आणि तयार झालेले मूठभर राजे यांच्या मजबूत आघाडीने हिंसेच्या, आक्रमणाच्या जोरावर एका पाठोपाठ एक अशा मुक्त आदिवासी टोळ्या टाचेखाली घेतल्या त्यांना दास-दासी आणि राजांना कर देणारे, निशस्त्र असे राबणारे शेतकरी बनवले, आणि त्यांची खेडी, स्थिर शेती; वाढवून राज्य वाढवण्यासाठी वसवली. इसवीसनपूर्व सहाव्या शतकापासून म्हणजेच बुद्धकाळापासून ते इसवीसनाच्या ५ व्या, ६ व्या शतकांपर्यंत पक्की बलुतेदार जातीय उतरंड उभी राहिली. बहुतेक मुक्त आदिवासी टोळ्या एकमेकांना कमी लेखणाऱ्या अवस्थेत राजा ब्राम्हणांना वरकड देणाऱ्या श्रमिक जाती बनल्या. ६ व्या, ७ व्या शतकांपर्यंत या घुसळणीत एक ढाचा स्थिर झालेला होता. तो म्हणजे सामंतप्रधान, ब्राम्हणी वर्चस्वाखालील समाजाचा! आदिवासी टोळ्यांचे, समूहाचे हळू हळू जातीत

रुपांतर करुन आपल्या उतरंडीत पण खालच्या पायरीवर सामावून घेण्याची या समाजाची क्षमता होती. या सर्वाला तोंड देत त्यातून बाहेर राहिलो 'ते' आम्ही! आमचे चित्र आज या समाजात कसे आहे?

आजही जर कोणाला भयानकतेची क्रूरतेची उपमा द्यायची असेल, तर राक्षसाची उपमा दिली जाते. साहित्यातही हीच उपमा बऱ्याच ठिकाणी अनुभवाला येते. किड्या मुंग्यांवर, पशु-पक्षांवर प्रेम करणारे साहित्यातही दिसतात पण ह्या प्रेम करणाऱ्यांपैकी कोणी राक्षसावर प्रेम केले का? नाही. राक्षसांना ही मुलं-बाळं होती, बायका होत्या, नवरे होते; त्यांचा एक संसार होता. त्यांचेही सुखदु:खाचे एक जीवन होते.

हे राक्षस म्हणजे त्यावेळचे आदिवासीच होते. भारताच्या घनदाट जंगलात, पहाड पर्वतात, दऱ्याखोऱ्यांमध्ये आदिवासी आपले जीवन जगत होता. त्या जंगलावर, त्या विभागावर आदिवासींचाच अधिकार होता. सत्ता होती. फळे-फुले, लाकूड, शिकार इत्यादि बाबत कोणाच्या परवानगीची गरज पण नव्हती. जंगलावर आदिवासींचाच अधिकार होता. खैबरखिंडीतून आर्य भारतात आले. रथ, बरशी, कुऱ्हाडी, गाई, घोडे, गुरंढोरांचा फौजफाटा घेऊन आले आणि पहिला हल्ला त्यांनी आदिवासींवर केला.

शेती करण्यासाठी, गुराढोरांना चारायला मोकळे रान मिळावे म्हणून आपल्या जवळ असलेल्या घोडे, आणि शस्त्राच्या बळावर आदिवासींचे जंगल, जमिनीवर आर्य लोक अतिक्रमण करु लागले. आर्य लोक यज्ञ (होम) करायचे आणि 'हा विभाग आमचा झाला' अशी घोषणा करायचे तेव्हा त्या वेळचे आदिवासी आपल्यावर होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार करु लागले. तेव्हा आर्य लोक हैराण झाले, तेव्हा आर्य लोक त्या वेळचे सत्ताधारी, त्यांचा राजा श्री रामचंद्र यांच्याकडे गेले आणि ''राक्षसांपासून आमचे संरक्षण करा, आमच्या गुराढोरांना मोकळे रान हवे'' अशी मागणी करुन आर्य लोकांनी स्वत: श्री रामचंद्राची मदत मागितली. रामाने वचन दिले. रामचंद्रजींच्या नेतृत्वाने त्या वेळच्या आदिवासींची 'राक्षस' म्हणून कत्तल केली, त्यांना चिरडून काढले.

आज सिनेमा किंवा टी. व्ही. बघतांना देखील आजचा आदिवासी माणूस 'सिनेमामध्ये राक्षसाला मारले तर टाळ्या वाजवतो, आनंद व्यक्त करतो; इतकी खोल 'राम संस्कृती आदिवासी मध्ये मुरवली जात आहे. आणि मानवीमूल्यांसकट आदिवासी संस्कृती आणि तिचा इतिहास पुसला जात आहे.

इतिहासाची पाने उलटवून बाकीचे चित्र पाहिले तर काय दिसते? आदिवासींच्या मुलाला शिक्षणाचा अधिकार नाही. जिद्दीला पेटून एकलव्याने मातीचा पुतळा करुन त्याचा गुरु केला आणि धनुष्यबाण चालवण्यात अर्जुनापेक्षाही हुशार ठरला! आदिवासींचे हुशार होणे कसे परवडणार हे द्रोणाचार्यालाही खपले नाही. गुरु दक्षिणेच्या कपटी डावानी एकलव्याचा अंगठा तोडून त्या पिढीतल्या आदिवासींना दडपून टाकले. आदिवासींचा इतिहास रक्ताने रंगून गेला. तेव्हा द्रोणाचार्य खलनायक होता असे साहित्यात दिसत नाही. इतिहासात कुठं सापडत नाही.

गुलाम भारताच्या इतिहासात स्वातंत्र्याच्या लढाईत खाज्या नाईक, तंट्या भील, रामदास महाराज, भागोजी नाईक, बिरसा मुंडा, राणी दुर्गावती इ. अशा अनेक आदिवासी क्रांतीवीरांनी ब्रिटीश राज्याविरुद्ध झुंज दिली. अनेक आदिवासींनी स्वातंत्र्यासाठी रक्त सांडले. पण प्रस्थापित इतिहासकारांनी इतिहासाच्या पानावर आदिवासी वीरांची दखल घेतली नाही. कोणी आदिवासी स्वातंत्र्य सैनिक आहेत असे ही ऐकीवात नाही.

आज असे सांगण्यात येते की, आदिवासींनी आता मुख्य प्रवाहात यायला हवे, मला इथं प्रश्न पडतो की, हा मुख्य प्रवाह कोणाचा आहे? कोणी बनवला? कोणीतरी प्रवाह तयार करायचा आणि त्यात आदिवासींनी सहभागी

व्हायचे हे जमायचे नाही. ज्या प्रवाह निर्मितीत आमचा सहभाग असेल आणि त्या प्रवाहात आदिवासींना न्याय मिळत नसेल त्यात सहभागी होणार नाही. आदिवासींना न्याय मिळेल असा प्रवाह आज तरी दिसत नाही.

आपल्याकडे एक विचित्र गोष्ट आहे. संस्कृती म्हणजे धर्म असा कांही तरी समज आहे. त्यामुळे आम्हाला मुख्य प्रवाहात खेचायचा; सर्वजण आपल्या धर्मात खेचायचा प्रयत्न करतात.

आदिवासींना शिक्षण द्यायचे, हुशार करायचे असा हेतू सांगून खिश्चनांचे आदिवासीत काम चालू आहे. आदिवासी भागात, दूर जंगलात, अवघड ठिकाणी सुद्धा मोठ्या प्रमाणात शाळा काढल्या आणि आदिवासी मुलांना शिकवले, हुशार केलेत ही चांगली गोष्ट! पण त्यांच्या या चांगल्या गोष्टीच्या पडद्याआड त्यांनी आदिवासींना खिश्चन धर्म शिकवण्याचे ही काम केले. आदिवासींना त्यांचे जीवन, त्यांच्या संस्कृतीकडे पाठ फिरवून खिश्चन धर्म आणि संस्कृती आत्मसात करण्यास भाग पाडली जाते आणि बहुसंख्य आदिवासींना खिश्चन धर्मात ओढून घेतले जाते.

कोणालाही कोणत्याही धर्माचा प्रचार करायला आणि कोणत्याही धर्मात जायला अधिकार आहे पण फसवून धर्मात घेणे म्हणजे लोकशाहीला सोडून आहे.

कल्याणाचे, विकासाचे, प्रश्न सोडवण्याचे गाजर दाखवून धर्मात घेण्याचा प्रश्न थांबलेला नाही. "आमच्या धर्मात या; आम्ही तुमचे प्रश्न सोडवतो." असे प्रत्येक धर्मवाले म्हणतात आणि आपल्याला आदिवासींचा मोठा हिस्सा (वाटा) मिळावा अशा प्रकारची जणू त्यांच्यात स्पर्धा सुरु झाली आहे, तेव्हा, आदिवासी हिस्से वाटे पाडून घेण्यासारखी चीजवस्तू झाले आहेत का?

संस्कृती नष्ट करण्याचा हा प्रकार वेगवेगळ्या मार्गाने केलेला आहे. प्रेमाने, धर्माने, संरक्षणाच्या, विकासाच्या किंवा एखाद्या प्रलोभनाच्या नावाने किंवा सरळ दादागिरीच्या जोरावर हिन्दू संस्कृती आदिवासीत मुरवण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या प्रकारे हा प्रयत्न झालेला आहे, असे दिसून येईल. कांही भागात आदिवासींनी फारसा विरोध केला नाही, पण जिथं जिथं विरोध केलेला आहे, तिथं तिथं आजही आदिवासी संस्कृती टिकून आहे. असे आपल्याला दिसून येते. आज वर्तमानात उभे राहून नजर फिरवली आणि आदिवासी देवतांचा शोध घेतला तर आदिवासी देवता कुठं आहेत? असा प्रश्न पडतो. आदिवासी देवता धूळ खात पडली आहेत असे दिसते. याचे कारण असे की, धर्मांध लोक मुद्दामहून, जाणीवपूर्वक हिन्दू, खिश्चन, मुसलमान इ. धर्माचे देवीदेवतांचे आकर्षण आदिवासींमध्ये वाढवत गेले आहेत. म्हणून आज आदिवासींच्या घरात आदिवासी देवता ऐवजी हिन्दू, राम कृष्ण इ, मुसलमानांचे पीर इ, खिश्चनांचे येशू इ. सापडतील पण वाघ देव, डोंगऱ्या देव, राजापानठा, राणी काजल या बरोबरच भारतभरच्या वेगवेगळ्या विभागातील जमातींचे त्यांच्या देवी देवतांचे फोटो सापडणार नाहीत.

याचे कारण आदिवासी देवी, देवता पुसून काढण्याचा व्यवस्थित प्रयत्न चाललेला आहे, मधला हिन्दू धर्म वाल्यांच्या चाललेल्या गुप्त प्रयत्नाच्या उदाहरणावरुन हे लक्षात येईल.

धुळे जिल्हा खान्देश मधला! आदिवासींचा सर्वात मोठा देव म्हणजे राजापानठा, गांडा ठाकूर आणि राणी काजळ! पण या बाबतीत आदिवासींची दिशाभूल करण्याचे प्रकार चालेले आहेत. "राजा पानठा म्हणजे अर्जून, राणी काजळ म्हणजे द्रौपदी आणि गांडा ठाकूर म्हणजे कृष्ण" अशा तऱ्हेने खुलासा दिला जातो. तेव्हा आदिवासींनाही पटल्या सारखे वाटते. एवढेच नाहीतर त्यांना मनोमनी बरेही वाटते. सुखावतात, कारण ते तसं वर्णन करुन फुलवून सांगत असतात. पण इथं हे लक्षात ठेवायला पाहिजे की, आदिवासींचा देवता राजापानठा ह्याने

जळणांची लाकडी संपली म्हणून स्वतः पाय चूलीत घालून दारु गाळली, अशी राजा पानठाची गोष्ट सांगते; तशी दारु अर्जुनाने गाळली अशी गोष्ट नाही. हा फरक सोयीस्करपणे विसरला जातो. दुर्लक्ष केला जातो आणि समजा राजा पानठा आणि अर्जुन एकच आहेत असे गृहीत धरले तर राजा पानठाची संस्कृती पुढे आणण्यापेक्षा अर्जुनाच्या संस्कृतीचाच आग्रह कां धरला जातो ?

आणखीन अशाच प्रकारे आदिवासींचा इंदीराजा ! इंदीराजाला दारु, बकरे चालते. पण इंदीराजाबद्दलही असंच कांहीबाही बोलले जाते. इंदिराजा आणि कृष्ण एकच आहे म्हणे ! इथंही नीट लक्षात घ्यायला पाहिजे की, आदिवासींचा देव इंदीराजा हा कुवारा ( लग्न न झालेला ) देव होता. आणि कृष्ण ? कृष्णाचे कृष्ण कृत्य विचारु नका.

आदिवासींच्या देवी ' याहामोगी ' या देवीचे हिन्दूकरण होतांना दिसत आहे. अशा तऱ्हेने आदिवासी देवांचे नांव पुसून हिंन्दूचे देव तेच आदिवासींचे देव ' हीच ' शिकवण दिली जात आहे.

आदिवासी हिन्दू नाहीत. ' हिन्दूकोड बील ' आदिवासींना लागू नाही, हे इथं लक्षात घ्यायला हवे.

पूर्वीचे आदिवासी आमने सामने भेटल्यावर ' हाजाके/वार्लासके ' असा नमस्कार करायचे, आणि कांही आदिवासी अजून करतात. बिहारमध्ये कांही जमातीत आज ही ' जोहार ' करतात. पण असे अनेक विभागातील अनेक जमातीमधील त्यांचा स्वतंत्र असा ' नमस्कार ' मुद्दाम पुसण्यात येत आहे आणि त्या जागी ' राम-राम ' हा नमस्कार रुजवण्यात येत आहे. रुजवत आहेत.

१९४० च्या आसपास खान्देशात ( धुळे जिल्ह्यात ) आदिवासींमध्ये गुलाम महाराज नावाचा एक संत होऊन गेला. संत गुलाम महाराज यांनी आपल्या भक्तांना ' राम-राम ' करा म्हणून कधीच सांगितले नाही. एकदुसऱ्याला भेटल्यावर ' आपकी जय ' नमस्काराची ही नविन परंपरा सुरू केली. त्या भागात अजूनही ही परंपरा आहे.

आज आदिवासीतल्या शिकलेल्या तरूणांना प्रतिष्ठेचं प्रलोभन देवून सांगतात, अरे, तुम्ही शिकलेली, सवरलेली आहात, तुम्ही तुमच्या ' त्या ' मागासलेल्या पद्धतीने लग्न करणार ? तुम्ही प्रतिष्ठित आहात, लग्नात ब्राम्हण बोलवा, ब्राम्हणांकडून लग्न लावून घ्या. अशा तऱ्हेने प्रोत्साहन दिले जाते.

आदिवासींच्या लग्नात ' ब्राम्हण ' लग्न लावत नाही. ब्राम्हणांना दारू चालत नाही ( ? ) आदिवासींचे लग्न आदिवासींमधलाच प्रधान किंवा पुजारा लावतो. लग्न लावणाऱ्याला वेगवेगळ्या विभागात वेगवेगळ्या नावाने ओळखला जातो. पण आता काही आदिवासी तरुण आपल्या लग्नात ब्राम्हण बोलावणे आपली प्रतिष्ठा समजतात, ही मूल्ये जाणीवपूर्वक रुजवली जात आहेत म्हणून आज ठाणे जिल्ह्यात आदिवासी लग्नात ब्राम्हण आणून लग्न लावताना दिसते.

' माणूस तिथून एक आहे ' असे आदिवासी मानतो आणि म्हणून तो धर्माचे बंधन कडक मानत नाही. म्हणून आदिवासींच्या मुलींनी, हिन्दू, मूसलमान, ख्रिश्चन धर्माच्या लोकांशी लग्न केलेले आहे असे दिसते. पण त्यांना हे पटत नाही हे उघड आहे. धर्मांध लोक त्या मुलींना त्याचा धर्म स्वीकारायला लावतात.

ब्राम्हणी हिन्दू धर्माची तर ही जुनीच चाल आहे. या पद्धतीने त्यांनी आता पर्यंत शेकडो आदिवासी टोळ्यांना आपल्यात सामील करून घेतल्या आहेत. पण परतंत्र जातीच्या स्वरूपात त्याच्या वर्चस्वाखाली !

मी स्वतः धर्म मानत नाही. देवही मानत नाही. ( दोघांनी मला न्याय दिलेला नाही, देऊ शकत नाही. ) भूतेखेतेही मानीत नाही. पण कुणी धर्म मानायचाच झाला तर तो आदिवासींच्या धर्मासारखा असावा असे मला वाटते. सर्व प्रथम म्हणजे आदिवासी धर्म इतर धर्मां बद्दल तेवढा द्वेष कधीच बाळगत नाही.

आदिवासी देवांना देवळे लागत नाही. ते आमच्या बरोबर असतात. आमचे मित्र असतात, पूर्वज असतात, आमच्यासारखीच पूर्वी होऊन गेलेली ती मनस्वी माणसं असतात. आम्ही असंच सणांमध्ये देवांच्या पायावर डोकं ठेवल्याचं समाधान नसतं. ते सण म्हणजे आम्ही एकत्र येऊन जगण्याचा आनंद लुटण्याचा मोका असतो. आमचा देव आम्हाला जगापासून पाठ फिरवायला सांगत नाही. आमचं जीवनावर प्रेम वाढवतात. एकमेकांच्या सहकार्याने जगण्याचा आनंद वाढवतात.

आम्हाला मागासलेल्या समजणाऱ्यांनी केवढे प्रश्न निर्माण करुन ठेवलेत. आज भारतात हिन्दू राष्ट्राच्या, हिन्दू धर्माच्या नावाखाली परधर्मियांविरुद्ध द्वेषाची धार तीव्र केली जात आहे. ह्या संकुचित वादाला, धर्मांधतेला विरोध करणे मानवतावादी दृष्टिकोनातून महत्वाचे आहे. तसे पाहिले तर कोणताही समाज आपली संस्कृती, आपला धर्म दुसऱ्यावर लादू लागला तर ते मानवतावादाच्या विरोधीच कृत्य आहे. पण भारताच्या संदर्भात त्या संकुचित धर्मांधतेत एक मोठं धोरण आहे. भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य आहेकी, कांही प्रमाणात तरी तिच्या पोटात अनेक बहुरंगी बहुढंगी संस्कृती, धर्मकल्पना जिवंत राहिल्या, आज हिन्दू धर्माच्या नावाने ब्राम्हणी धर्मांधता, भयानक रुप धारण करत आहे. त्यापासून परधर्मियांना नव्हे तर भारतीय समाजातील ह्या विविध संस्कृतीला देखिल धोका आहे. स्वाभिमानाला दुराभिमानाचे स्वरुप आले की, संकुचिततेची भावना वाढत जाते. आणि तिचे स्वरुप नेहमीच आत्मघातकी असते.

आज जर आदिवासींचे देव फक्त असते तर रामजन्मभूमि-बाबरी मस्जिद सारखे प्रश्नच उभे राहिले नसते. कारण सगळा निसर्ग हाच आमचे देऊळ डोंगऱ्या देवाला कां देवळात बंदिस्त करता येईल ?

हे आमचे वेगळेपणच धोक्यात येतेय. वेगळेपणच कशाला आमचं सर्व जीवनच धोक्यात आहे.

सरकार आणि ठेकेदारांनी जंगल नष्ट केल्यामुळे जंगलात, दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या आदिवासींचे जीवन विस्कळीत झालेले आहे. फुले-फळं नाहीत. औषधीही नाहीत. कंद नाही, मुळं नही, शिकार नाही. जीवनाचा आधार नष्ट झाल्यामुळे आदिवासींना गांव सोडून शहराकडे धाव घ्यावी लागत आहे. जंगल सोडल्यामुळे आदिवासी जीवनातील मानवीमूल्य, संस्कृती सोडून जातीय उतरंड, शोषण असलेल्या अशा संस्कृतीत प्रवेश करुन आपले जीवन जगण्यासाठी जगावे लागते.

प्रत्येक आदिवासी भागात हा प्रश्न मोठ्या प्रमाणावर उभा राहत आहे. एवढेच नाही तर काही ठिकाणी तर 'पर्यावरण आणि फॉरेस्ट बील'चा धाक दाखवून आदिवासी वस्तींना, बेकायदेशीर ठरवून त्यांना बंदुकीच्या जोरावर हुसकावून लावत आहेत. हुसकावून लावण्याचा प्रयत्न चालू आहे. धुळे जिल्ह्यांचंच उदाहरण जिवंत आहे.

आदिवासींचे जीवन स्थायी ठेवून त्यांची जीवनमूल्ये जपणे आवश्यक आहे. आदिवासींना जीवनातून उध्वस्त न करता, आदिवासींना जीवनात प्रगती विकास आवश्यक आहे. शिक्षण, आरोग्य आणि विकासाची सोय, सवलती ह्यांचा लाभ मिळालाच पाहिजे.

तसं आमच्या संस्कृती बद्दल आज अनेकांना प्रेम उफाळून आलेय. शनिवार रविवार आमच्यात येऊन आमच्या संस्कृतीचं कौतुक करणं ही एक फॅशन बनत चाललीय. आमच्यातल्या भगत-मांत्रिकांना ते जपायचा प्रयत्न करतात. आमच्या टोपल्या दोरांना, मंत्रांना जपायचा प्रयत्न करतात, आमची संस्कृती म्हणजे तेवढेच नाही. आणि म्हणूनच हे स्पष्ट केले पाहिजे की, आम्हाला आमच्या संस्कृतीतलं काय जपायचे आणि काय नाही.

या गोष्टीतली पहिली म्हणजे आमची सामुहिकता. समूह जीवन हा आदिवासी संस्कृतीचा गाभा आहे. शेती नांगरायची असेल किंवा

घर बांधायचे असेल आणि ते काम एकट्याने शक्य नसेल तर सामुहिक मदत नावाची 'लाहे' ही मदत परंपरा आदिवासीत अजून आहे. मदतीला गेलेल्यांना लाहे बोलवणाऱ्यांनी जेवण देण्याची दारु देण्याची परंपरा आहे.

गांवातील एखाद्याचे भांडण दुसऱ्या गांववाल्या बरोबर झाले असेल तर ते भांडण त्या एकट्याचे नसून गांववाल्यांचे समजले जाते. आणि गावांत भांडण झाले तर सर्व गांव बसून पंचांमार्फत न्याय करण्याचा रिवाज अजून आहे. कोर्टात केस करण्याच्या भानगडीत आदिवासी पडत नाही. पटत नाही. त्याच्या मानसिकतेला धरुन नाही.

अर्थात आज 'मुख्य प्रवाहाच्या' दबावा खाली हे सर्व मोडकळीला येऊ लागलंय, आमची पंच मंडळी दारू आणि पैशांनी पोखरली जायला लागलीयत. पण प्रश्न आहे तो या सामुहिकतेचा. हे मूल्य आम्ही जपायचे की नाही ?

इथं हे ही लक्षात घेतले पाहिजे की, बहुजन जातीमध्ये देखिल ही सामूहिकता कमी अधिक प्रमाणावर शिल्लक होती, शिल्लक आहे, पण तिच्यावर जातीव्यवस्थेची छाप मात्र फार खोल आहे. पिढीजात धंद्याबद्दल जी ब्राम्हणी संस्कृतीची मूल्ये आहेत ती ही त्यांनी आत्मसात केली आहेत. मास्तराची नोकरी पंचायतीनी कित्येकांना कडवा विरोध केला आहे. ब्राम्हणी संस्कृतीनी जातपंचायतीला थोडीफार स्वायत्ता दिलेली होती. पण त्याच्या बदल्यात त्यांना जातीची उतरंड मान्य करायला लावली होती.

आणि हे ही लक्षात घ्यायला पाहिजे, बहुजन समाजातल्या जातपंचायतींनाही थोडीफार स्वायत्तता देणे ब्राम्हणी संस्कृतीला भाग पडले होते. त्याच्या आदिवासी भूमिकेमुळे आणि बाहेर आमच्यासारखे शेकडो स्वतंत्र आदिवासी समुह होते म्हणून त्यांना ही स्वायत्तता देणे भाग होते. आमची सामुहिकता आणि तिचे समाजाचे पूर्ण स्वातंत्र्य आम्ही जपले नसते तर, ब्राम्हणी जमीनदारी वर्चस्वाला पायबंद राहिला नसता. आमचे स्वातंत्र्य आमचे वेगळेपण जपणे त्यासाठी ही अत्यंत महत्वाचे आहे.

मी जेव्हा बिगर आदिवासी समाजामध्ये प्रेमविवाहाचा इतका बाऊ केलेला पाहतो तेव्हा मला हसू येते. कारण आमच्यामध्ये प्रेमविवाह ही एक सहज गोष्ट आहे. स्त्री पुरुषांचे प्रेम हे एक सहज प्रेम असते. महत्वाचे हे की, आदिवासींमध्ये तो सहजपणा हा अगदी सहज जीवनाचा बनलेला आहे. आदिवासींमध्ये घराण्यांची लग्नं होत नाही. स्त्री-पुरुषांची होतात. आणि या सहज प्रेमाभोवती किती तरी मोठे साहित्य रोडाल्यामध्ये, स्त्रियांच्या गाण्यामध्ये आज उपलब्ध आहे.

या सामूहिकतेबरोबरच आणि सहजते बरोबर एक समतेची सार्वजनिक परंपरा आदिवासींमध्ये आहे. ''आपण !; तुम्ही ! अहो ! अशी बहुमानाचे स्तोम माजवणारी विशेषणे आदिवासी भाषेमध्ये नाहीत. आदिवासी एकमेकांकडे पाहत असतांना ते मूळात मैत्रीच्या नात्याने पहातात मग तो म्हातारा असो की, लहान मुलगा असो, बाप असो की आजा असो, आदिवासींमध्ये भीक मागण्याची परंपरा नाही, कारण शरिराने पंगु, लुळा असणाऱ्या माणसाला सांभाळून घेण्याची, मित्रत्वाची भावना इथं नक्कीच आहे. प्रत्येक माणसाच्या वेगळेपणाचे, वैशिष्ट्याचे भाग आदिवासींमध्ये आहे. व्यक्तीव्यक्तींमधली विविधता हा समाज मुळात जपतो, प्रत्येकांनी आपल्या रीतीने फुलावे अशीच मुळात दृष्टि असते. म्हणूनच आत्महत्येचे प्रमाण आदिवासीत जवळ-जवळ नाहीत.

या संदर्भात लिखित तेच साहित्य ही व्याख्याच आदिवासींच्या दृष्टिने अपुरी ठरते. साहित्य आणि कला, साहित्य आणि जीवन यामध्ये ज्या भिंती इतर समाजामध्ये उभ्या केल्या जातात त्या भिंतीना आदिवासी समाजात स्थान नाही. या व्याख्याच बदलल्या पाहिजेत. आज आदिवासी समाजात अशी अनेक गाणी, गोष्टी, नाटकं आणि कला कृती आहेत. पण ते शब्दबद्ध

केलेले नाहीत. पण हजारों वर्षांपासून चालत आलेल्या परंपरा ज्या कधी थकल्या नाहीत त्या परंपरा मौखिक स्वरुपात आजही आदिवासी जनजीवनात साठवलेल्या आहेत. वास्तवात आहेत. मग ह्याला साहित्य नाही असे म्हणायचे का ? तर मुळीच नाही. जी कलाकृती ह्यदयात झिरपते आणि ह्दयापर्यंत पोहचते, आणि मानवी जीवन फुलवते, सजवते आणि सुंदर करते. मग ती कलाकृती लिखित असो, नसो, त्याला साहित्य म्हणायला हवे.

आज आदिवासी साहित्याचे, लिखित आणि अलिखित असे दोन भाग करावे. शिकलेला आदिवासी लेखणीतून किंवा आपल्या कलाकृतीतून आदिवासी जीवनाचा, जीवनमूल्याचा ठसा उमटवत असतो, तर अलिखित साहित्यातून आपल्याला आदिवासी जीवन संस्कृतीचे दर्शन होते.

आदिवासी जीवनात दोन्ही प्रकारच्या साहित्याची अत्यंत आवश्यकता आहे. दोन्ही भाग हातात हात घालून कसे पुढे जातील असे जागरुकपणे पाहिले गेले पाहिजे. अन्यथा आदिवासी साहित्य चळवळीची निकोप वाटचाल होऊ शकणार नाही.

परन्तु आदिवासीमध्ये जे अलिखित साहित्य आहे, ते लोक-कलांमध्ये सामावलेले आहे, त्यांची जोड घेऊन येणार आहे, ढोल आणि इतर वाद्यांशिवाय नुसती कागदावर लिहिणारी रोडाली किती फिकी पडेल ? आदिवासी समाजात लोककलेचे स्थान महत्वाचे आहे. जाणीवपूर्वक त्या लोककलांना जपले पाहिजे. आदिवासी लोककला म्हणजे आदिवासी जीवन जिवंत असण्याची खूण आहे. ढोल, तूर, बीरी, मांदळ, तूतड्या, पावा, मोरी पावा, तारपा, गोष्टी म्हणण्याचा सूर, इत्यादी वाद्य कला आहेत. शिवाय नाटक, गोष्टी म्हणणारी कला इत्यादि कला संस्कृतीचे भांडार आहे. ते नष्ट होता कामा नये. साहित्याची ही व्याप्ती, ही जोड, जीवनातले हे स्थान, इतर व्यासपीठांवरून या सर्व वैशिष्ट्यांना पुरेसा न्याय मिळत नाही.

आणि म्हणून स्वतंत्र आदिवासी साहित्य संमेलनाची गरज आपल्या इतिहासातून निर्माण झाली आहे. इथं सांगण्याची गरज अशी की, तुम्ही साहित्यिक आहात, कलाकृतीचे निर्मिक आहात, समीक्षक आहात आणि म्हणून तुमच्यावर समाजाने सोपवलेली एक जबाबदारी आहे हे विसरुन चालणार नाही. तुमची कलाकृती अगर समिक्षा आदिवासी देखील असणे गरजेचे आहे.

हे आदिवासीपण नेमके काय आहे याचे झटक्यात उत्तर देऊन मला-ही मोकळे व्हायचे नाही. तुम्हीही होऊ नका, तो त्या निर्मितीतलाच एक शोध आहे, इतके नक्की की, आदिवासी संस्कृती ही खालच्या दर्जाची, मागासलेली अंधश्रद्धा वगैरे समजली जाते. अशा कल्पनांचे जोखड झुगारून देणे हा या आदिवासीपणाचा नक्की भाग आहे. आदिवासींनीच सुधारले पाहिजे या कल्पनेची हकालपट्टी करणे जरुरीचे आहे. आज आदिवासी साहित्यिकांवर एक मोठी जबाबदारी आहे. ती समाज प्रबोधनाची ! आपल्या कलाकृतींचा किंवा समिक्षणाचा उपयोग समाजजीवन फुलवण्यासाठी व्हावा असा विचार प्रत्येकांनी करावा.

माझ्या आतापर्यंतच्या भाषणावरून कुणाला वाटेल की, जे जे आदिवासींमध्ये आहे त्याचा गौरव करावा, असे नाही. कलाकृतीतून आदिवासी संस्कृतीतील चांगल्या गोष्टींचा गौरव झालाच पाहिजे. पण त्याच वेळी वाईट गोष्टींवर बोट ठेवून त्याला फेकून देण्यासाठी समाजाला प्रवृत्त केले पाहिजे ही जबाबदारी विसरता कामा नये. पण ते करताना न्यूनगंडामधून, आदिवासी अस्मितेवर घाला घालून ते होऊ नये. हे पाहिले पाहिजे.

आज स्वतःला सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या समाजात मात्र हुंड्याच्या प्रश्नावरुन जिवंत जीवाचा छळ केला जातो. छळून-छळून आत्महत्या करण्यास भाग पाडले जाते, एवढेच नव्हे तर त्या जिवंत स्त्रीची इच्छा नसतांना बळजबरीने धरुन बांधून अंगावर रॉकेल ओतून आग लावण्यात

येते. त्या जीवाच्या किंकाळ्या प्रस्थापित समाजाला ऐकू येत नाही. अशा ह्या समाजाला प्रगतीशील समाज म्हणायचे? ह्याच समाजात अजून-ही रूपकुंवर सारख्या स्त्रीला सती जाणे भाग पाडले जाते. अशा जीवघेण्या प्रथा आदिवासीत नाहीत.

आदिवासी स्त्री नवऱ्याला देव मानत नाही. ही मूल्ये नाहीत. देव मानून किंवा धनाच्या लोभाने सर्व छळ सहन करावा अशी परंपरा आदिवासीत नाही. नवऱ्याचा छळ आणि सासू सासऱ्याच्या त्रासात झिजून झिजून मरण्यापेक्षा त्या नवऱ्याला सोडणे आणि दुसरा जोडीदार (नवरा) निवडणे, पसंतीच्या नवऱ्या बरोबर जीवन जगणे आदिवासी स्त्रीला अधिक पसंत पडते. ह्या व्यवहाराला आदिवासी समाज मान्यता देते, बहिष्कार टाकत नाही.

याचा अर्थ असा नव्हे की, आदिवासी स्त्रीचे दुःख नाहीच किंवा आदिवासी स्त्री पूर्ण स्वतंत्र आहे. असाही अर्थ नव्हे. आदिवासी स्त्रीयांचा प्रश्न हा आदिवासींच्या मागासलेपणाचा भाग नाही. स्त्रियांच्या बाबतीत सर्वच समाज मागासलेले आहेत. हिन्दू, मुसलमान धर्म तर या बाबत फारच मागासलेले आहेत. प्रश्न आहे तो पुरुषप्रधान संबंधाचा! आदिवासी समाज देखिल बहुतेक सर्व ठिकाणी पुरुषप्रधानच आहे. तो प्रश्न आमचाच आहे. आणि आम्हाला त्याला सामोरे गेलेच पाहिजे.

स्त्रिया या आदिवासी समाजाच्या अर्धा भाग आहेत. त्यांच्यामध्ये सुद्धा साहित्य, कला-कौशल्याचे गुणधर्म आहेत. आदिवासी स्त्री ही एक प्रतिभावान साहित्यिक, कलावंत होऊ शकते पण आदिवासी समाजात अशा ज्या परंपरागत समज, रुढी आहेत त्या आदिवासी स्त्रीच्या प्रतिभा-विकासाला अडथळा बनतात, पुरुषप्रधान व्यवस्थेच्या दबावाखाली तिच्या अंगात असणाऱ्या, फुलणाऱ्या सर्व कलागुणांना दाबले जाते. नाश केले जाते.

आदिवासी समाजात स्त्रीला माणूस खाणारी डाकीण (चेटकीण) म्हणनू दाबले जाते, बिनडोक्याची बडबड करणारी स्त्री म्हणून आदिवासी स्त्रीला पंचायतीत होऊ शकणारा सहभाग नाकारले जाते. देहज देऊन आदिवासी स्त्रीला विकत घेतले अशा समजाखाली स्त्रीला वस्तुप्रमाणे आणि गुलामाप्रमाणे वागवण्यात येते. एकापेक्षा अधिक बायका करण्याची प्रथा असल्यामुळे आणि ह्याच्यातून होणाऱ्या भांडणाला 'स्त्री विरुद्ध स्त्री' चे स्वरुप देऊन स्त्रीला दडपून टाकण्यात येते. दारु पिऊन आदिवासी स्त्रीला बेदम मारहाण करण्यात येते.

अशा तऱ्हेने आदिवासी स्त्रीला वेगवेगळ्या अंगाने, वेगवेगळ्या प्रकारे दडपण्यात येते. आज आदिवासी साहित्य, लिखित साहित्यात आदिवासी स्त्रियांचा आवाज फारसा नाही. साहित्यातून आदिवासी पुरुषांचे प्रबोधन करुनही ते व्हायलाच हवे. फार मोठे साधले जाणार नाही. पण आधारभूत वातावरण तयार होईल. जे साध्य होईल ते आदिवासी स्त्रियांच्या एकत्र येण्यातूनच! त्यांची स्वतंत्र शक्ति उभी राहिल, स्वतंत्र आवाज उभा राहिल तेव्हा! असा आवाज उभा राहिल्यावर त्यात काय सामर्थ्य असते ते आज अमेरिकेतल्या आदिवासी काळ्या स्त्रियांच्या लिखाणावरुन सहज लक्षात येऊ शकेल. तेवढे भान आम्हाला, विशेषतः आदिवासी पुरुषांना असायला हवे.

आम्हाला इतरही भान आहे, जगात एक स्थित्यंतर घडते आहे त्याचे आहे. आधुनिक जग किती पुढे आहे याचेही आहे. आणि किती मागे गेले आहे याचे ही आहे. आमची संस्कृती जपण्याच्या नावाखाली आम्हाला टोपल्या विणत ठेवणार असाल तर ते आम्ही खपवून घेणार नाही. आम्ही शिकणार आहोत. आम्ही इंजिनियर होणार आहोत, वैमानिक होणार आहोत साहित्यिकही! त्यामुळे आमची संस्कृती नष्ट होते असे नव्हे. आम्हाला एक विश्वास आहे, तो महत्वाचा आहे, आम्ही जी मूल्ये जपायचा प्रयत्न करतोय ती याही परिस्थितीत महत्वाची आहेत. शिकताना, इंजिनियर, कामगार बनताना आम्ही ती टाकून देणार नाही. नव्या परिस्थितीत

ती कशी राबवता येईल त्याचा आमचा शोध थांबणार नाही. कारण ती मूल्ये एक मुक्त मानवी समाजाचं भविष्य घडवायला मदत करणारी आहेत. ते आमचं एकट्याचे काम नाही. सर्व दलित शोषित, श्रमिक, स्त्रियांनी मिळून उभं करायचे आहे. आम्हाला फक्त आमच्या इतिहासाचं गुणगाण करायचे नाही. आम्हाला भविष्य घडवायचंय. आम्हाला वेगळी चूल मांडायला नव्हे, तर आमच्या अस्मितेसकट, सर्वांच्या खांद्याला खांदा लावून ताठ चालता यावे म्हणून !

कुणा विरुद्ध, कुणा बरोबर, कसं व कशासाठी जायचं ते ही नक्की आहे. सर्व प्रथम आम्ही आमचे सांस्कृतिक आस्तित्व धोक्यात आणणाऱ्या तशा अनेक संस्कृत्या आहेत, पण त्यातील ब्राह्मणी संस्कृती ही अत्यंत धोकेबाज संस्कृती आहे. आयीतखाऊच्या व्यवहाराला तात्त्विक समर्थन देणारी ह्या विचार पद्धतीने राबणाऱ्या जाती-जमातींना गुलाम बनवणे व जे गुलाम बनले त्याला सुद्धा दुय्यम दर्जाचे समजणे. या ब्राह्मणी विचारसरणीपासून आपण सावध असायला हवे. या आधी जाती निहाय उच्चनीचता, हुंडा इ. उदाहरणे ती सर्व या संस्कृतीची देण आहे. अगदी अलिकडच्या काळापर्यंत बहुजन समाजामध्येसुद्धा या अनिष्ट रुढी नव्हत्या पण हा समाज ब्राह्मणी वर्चस्वाखाली गेल्यामुळे त्यांच्या मध्ये या गोष्टी मुरत चालल्या आहेत व ही मंडळी स्वतःची संस्कृती, रिती भाती विसरत चालली आहेत. आपली लढाई ब्राह्मणी वर्चस्व व ब्राह्मणी संस्कृती नाकारल्यापासून सुरु होते. आणि जे ब्राह्मणी वर्चस्वाखाली दबलेले आहेत त्यांना सर्वांना बरोबर घेऊनच ती लढावी लागेल. अन्यथा केवळ आदिवासी म्हणून एकांगीपणे ही लढाई लढणे कठीण जाईल. या दृष्टिने सामाजिकदृष्ट्या दबलेल्या समाजगटांसाठी ज्या मंडल आयोगाच्या शिफारसी आहेत. त्यांना आपला पूर्ण पाठिंबा असला पाहिजे.


व्यापक दृष्टिने विचार करता या समाजावर काही थोड्याच लोकांचे सामाजिक, आर्थिक, वर्चस्व आहे. म्हणून त्यांचे राजकीय वर्चस्वही निर्माण झालेले आहे. इतिहासामध्ये आणि बारकाईने विचार केला तर आताही काही जाती आयीतखाऊच राहिलेल्या आहेत आणि इतर जाती-जमाती राबणाऱ्यांच्या, काम करणाऱ्यांच्या झाल्या आहेत.

साहित्यामध्ये पण समाजातल्या या वास्तवाचा प्रभाव पडणे अपरिहार्य आहे. तो तसा जाणवतोही ! आपल्या जवळच्या मराठी भाषेतील साहित्याचा जरी विचार केला तरी आपल्याला काही गोष्टी स्पष्ट होतात. आतापर्यंत ज्यांना लिहिण्यावाचण्याची सवलत होती त्यांनी जो साहित्य प्रकार बाहेर आणला तो त्यांच्या विचाराचे हितसंबंध आबाधित ठेवणारा होता आणि आहे. पण शिक्षण, लिहीणे वाचणे जसे समाजात खाली-खाली येत चालले आहे तसे खालच्या समाजातून त्यांचे सामाजिक वास्तव बाहेर आणणारे साहित्य यायला लागले. त्यातून एक प्रकारच्या सामाजिक बंडाची झलक दिसायला लागली. ती दिसणे अपरिहार्य होते. त्या बरोबरच त्या साहित्याला साहित्याची मान्यताच नाकारण्याची धडपड प्रस्थापितांनी केली पण या बंडाला रोकू शकले नाहीत. रोकणे शक्य नाही. त्यामुळे साहित्याचे वेगळेपण, प्रकार जसे आले तसे साहित्याचे अनेक निकष पण बदलले.

प्रस्थापितांच्या साहित्यनिकषातून या राबणाऱ्या जाती-जमातींचे साहित्य हे साहित्यच नव्हे अशी भूमिका असल्याने राबणाऱ्या जाती-जमातीच्या साहित्यिकांनी नवे निकष निर्माण करण्यासाठी दलित, आदिवासी, ग्रामिण, स्त्री, जन संयुक्त साहित्य संमेलनाच्या व्यासपीठाची निर्मिती केली.

ब्राह्मणी संस्कृतीच्या विरोधातला प्रत्येक लढा हा आपण आपला मानायला हवा. प्रस्थापितांचे साहित्य हे शोषण व्यवस्थेला पोषकच असते. म्हणून त्याला बाजूला करुन चाललेले 'दलित आदिवासी, ग्रामिण, स्त्री, जन साहित्य संमेलन आपण आपलेच मानून ( आपले स्वतंत्र





THE MAHARASHTRA ASSOCIATION OF ANTHROPOLOGICAL SCIENCES

# इंद्रावतीच्या काठावरून

डोंगराच्या कडेकडेने वाहणारी इंद्रावती सळसळत
कोणत्याही आधुनिक युद्धाचा थांग नसलेले
स्वत:च्याच जीवन मरणाच्या युद्धात सामील झालेले
घनदाट अरण्याच्या सावलीत स्थिरावलेले
खदखदणारे असंख्य मन
आता पुकारतेय एल्गार
तुमचे आधुनिक जीवन हादरतेय
त्यांच्या येणाऱ्या जथ्याने
आता ते येत आहे
इंद्रावतीचे 'जीतम' रुप घेऊन
लयबद्ध हाकारा करीत -
असू द्या तुमच्या पर्यावरणाच्या / संस्कृती संरक्षणाच्या
नपुंसक चर्चा बंदिस्त
हात उंचावून, मुठी आवळून येत आहोत आम्ही
बिरसा / बाबुरावशेडमेक / वीर बाबुराव राजगोंडची
किंबहुना सर्वच शहीद, माझ्यासाठी झालेल्यांची याद घेऊन
तुमची तथाकथीत न्यायाची पद्धती माझे करतेय शोषण !
मुक्तीचा मार्ग माझा मीच शोधणार
कधी आलाच ह्या वाटेवर तर,
माझा उल्लेख ''वनवासी'' करू नका
मला सांगू नका तत्त्वज्ञान मानवतेचे
मुळात मीच एक तत्त्वज्ञान गुढरम्य मानुषता,
तुमच्या म्युझियमच्या भिंती फोडून निघणारा
सारा आसमंत भेदून जाणारा
तुमच्या हिरवळीच्या सर्व तकलादू कल्पना फेकून द्या
माझ्याभोवती दाटलेल्या घनघोर अंधारातून
येत आहेत मशाली पेटत्या
त्या प्रकाशात दिसतेय तुमचे बेगडी चेहरे
आणि आरोळी उठतेय आमच्यातून
नी पोराल बताल ! नी पोराल बताल !

प्रभू राजगडकर, प्रकल्प आधिकारी
पंचायत समिती निवासस्थान
बी डी ओ क्वार्टर समोर
अहेरी / 442705

MAHARASHTRA ASSOCIATION OF ANTHROPOLOGICAL SCIENCES

अस्तित्व कायम ठेवून ) आपण सर्वांनी त्यामध्ये सहभागी व्हायला हवे.

दु:खाची, समाजाची आणि सामाजिक जीवनातील व्यवहाराची रचना, व अस्तित्व तीव्रता ही वेगळी आहे. त्यामुळे निर्माण होणारे साहित्यपण निश्चितच वेगळे असणार त्याचे निकष आईतखाऊंच्या किंवा ब्राह्मणी साहित्याच्या निकषापेक्षा निश्चितच वेगळे असावे लागतील. त्यामुळे आदिवासींच्या वेगळ्या साहित्यप्रवाहाची आवश्यकता आहे. पण त्याच वेळी त्याची नाळ व्यापक दृष्टिने इतर राबणाऱ्या जाती साहित्यिकांशी व साहित्यप्रवाहाशी जोडावीच लागेल.

'अरेरे बिचारे आदिवासी !' असा जो व्यवहार आदिवासींबरोबर झालेला आहे, तो व्यवहार असा सांगतो की, आदिवासींवर दया करायची, त्यांना कुरवाळायचे आणि आपल्या मर्जीप्रमाणे त्यांना वागायला लावायचे आणि आदिवासी 'त्यांच्या' मर्जीप्रमाणे वागले तर त्यांचे तोंड भरुन कौतुक करायचे, आदिवासींना शाबासकी द्यायची आणि जर समजा आदिवासींनी 'त्यांचे' ऐकले नाही तर मग त्यांना कोणता तरी शिक्का मारायचा, बदनाम करायचे आणि जुन्याच शिव्या नव्याने द्यायच्या. त्यांच्या शिव्यांना वागण्याला आदिवासींनी विरोध केला तर त्या आदिवासींना चिरडण्यासाठी मागेपुढे बघितले जायचे नाही. हाच व्यवहार अजूनही आदिवासींच्या वाटयाला येत आहे. राजकीय क्षेत्रात असो की, एखाद्या आदिवासी चळवळीच्या क्षेत्रात असो, कमी अधिक प्रमाणात हाच अनुभव येतो.

याचा अर्थ असा नाही की, आदिवासीत काम करणारे सर्व फसवणारे आहेत असे नाही. त्यांनी प्रामाणिकपणे आदिवासींचे प्रश्न सोडविण्यासाठी जिवाची बाजी लावलेली असणार हे मान्य करुनसुद्धा आदिवासींचे मूळ प्रश्न राहतातच. स्वाभिमानाची भावना जागवण्यापेक्षा 'अवलंबत्वांची' भावना निर्माण करुन आपले वर्चस्व प्रस्थापित करत असतात.

भारतीय इतिहासात आदिवासींवर अनेक प्रकारचे अनेक अन्याय झालेले आहेत आणि वर्तमान परिस्थितीत तर आधुनिकतेबरोबर आधुनिक धोरणे निर्माण झालेले आहेत. एकलव्याचा आंगठा कापून घेतला. कोऱ्या कागदावर आदिवासींचा आंगठा उमटवला, त्यांच्या जमिनी काढून घेतल्या. धर्मांतर आणि संस्कृती नष्ट करण्याच्या प्रयत्नाच्या पलिकडे, ''आदिवासींची नजरच काढली जाण्याचा'' असा हा आजच्या आदिवासींच्या समोर एक प्रचंड मोठा धोका निर्माण झाला आहे. आदिवासींची नजरच काढली जाणार नाही ना ? आपली नजर काढून दुसऱ्याच्या नजरेने बघावे, आपला डोळा काढून ( कलम करुन ) दुसऱ्याच्या डोळ्यांनी बघावे असे होणेसुद्धा आदिवासींची फसगत आणि धोका सिद्ध होणार आहे. म्हणून आपल्या अस्मितेचा शोध घेणारा आदिवासी इथंच सावध झाला पाहिजे.

आतापर्यंत आदिवासींबद्दल बरंच साहित्य प्रकाशित झालेले आहे. त्यात दुर्गा भागवत, नाडगौंड, सुदाम जाधव, गोदूताई परुळेकर, अनुताई वाघ, दिनानाथ मनोहर, जगदिश गोडबोले, शरद पाटील, गेल ऑमवेट, इ. हे बिगर आदिवासी साहित्यिकांचा समावेश आहे. यातले काही साहित्यिक सामाजिक चळवळ पुढे जाण्यासाठी संशोधक, तर काही डिग्रया मिळवण्यासाठी संशोधन, तर काही पैसा मिळवण्यासाठी पुस्तकं, तर काही निव्वळ साहित्य निर्मितीसाठी साहित्य असे झालेले आहे. हे साहित्यिक अदिवासी नसल्यामुळे त्यांच्या साहित्यात आदिवासी जीवनातले ताण तणाव, भावना, मानसिक संघर्ष, आनंद, मोह इत्यादिंना न्याय मिळणे शक्य नाही. आणि म्हणून जरी काही शिकलेले आदिवासी तरुण नोकरीतच रमून समाजाबाबत उदासिनता दाखवत असले तरी काही तरुण त्याच्यापलिकडे जाऊन समाजाबद्दल गांभिर्याने विचार करु लागले आहेत. भारतीय

साहित्यात आपले प्रतिबिंब कुठे दिसते कां ? शिकलेल्या आदिवासी साहित्यात नायकत्वाची आपली भूमिका शोधू लागला आहे. साहित्यात आदिवासींचे उमटलेले जे प्रतिबिंब आहे ते आदिवासीला न्याय देणारे आहे का ? अशा प्रकारची नजर ठेवून नव्या पिढीचा शिकलेला आदिवासी तरुण आपली अस्मिता शोधत स्वत:च आपल्या हातात लेखणी घेऊन लिहू लागला आहे. आणि आपल्या दु:खांना विद्रोहांना तो लिपीबद्ध करतो आहे.

डॉ. गोविंद गारे, ऋषी मसराम, भुजंग मेश्राम, नेताजी राजगडकर, रवि कुरसंगे, उषाकिरण आत्राम, राजाभाऊ राजगडकर, प्रभू राजगडकर, सूर्यभान नागभिडे, कुंडलिक केदारी, चामुलाला राठवा, विश्राम वळवी, सोबजी गावीत, किरणसिंग वसावे, बाबुराव मडावी, लक्ष्मण टोपले, ज. बी. सेलार, डॉ. एम्. आर. डगला, संघजा मेश्राम, दशरथ मडावी, विनायक तुमराम, छाया सुरतवंती, नजुबाई गावित, राजेंद्र गावित, सोपान कुलसुंगे, सुभाष मांडे, रायसिंग ठाकरे असे अनेक आदिवासी साहित्यिक, कलावंत समिक्षक या आदिवासी साहित्य चळवळीत एका निर्धाराने उतरली आहेत.

समानतेवर आधारलेली आदिवासींची संस्कृती शाबूत ठेवून जतन करण्याचा विचार आणि आदिवासी मुक्ती, मानव मुक्तीचा विचार ज्या ज्या साहित्य चळवळीत आहे त्या त्या साहित्य चळवळीशी आमचे नाते मैत्रीचे राहील.

प्रस्थापितांची मान्यता घेण्याची गरज एकलव्याला वाटली आणि त्यांनी आपला आंगठा तोडून दिला. अशा तऱ्हेने प्रस्थापितांच्या मान्यतेची गरज आहे अशी जी भावना असते, मानसिकता असते त्याच्यातून प्रथम आदिवासी साहित्यिक, कलावंत समिक्षक यांनी बाहेर पडायला पाहिजे.

आजपर्यंत आम्ही असे म्हणत आलो की, आम्हाला इतिहासात राक्षस म्हणून चिरडले, एकलव्याचा आंगठा तोडला, स्वातंत्र्याच्या लढाईत आदिवासी वीरांची प्रस्थापित इतिहासकारांनी नोंद घेतली नाही. आणि म्हणून आपली पुढची अशी जबाबदारी आहे की, आमच्या इतिहासाला न्याय मिळेल अशी साहित्य निर्मिती केली पाहिजे. आदिवासी स्वातंत्र्यवीर खाज्या नाईक, तंटया भील, भागोजी नाईक, बिरसा मुंडा, राणी दुर्गावती, रामदास महाराज, अंबरसिंग महाराज इत्यादींवर नाटक, कथा, पोवाडे, रोडाल्या, गाणी लिहिली गेली पाहिजे, गायली गेली पाहिजे, साहित्य-निर्मिती करुन आदिवासींचा इतिहास उजेडात आणला पाहिजे.

थोडक्यात आज जे मोठे स्थित्यंतर घडतंय त्यात आहोत. इतरांच्या खांद्याला खांदा लावून आमच्या अस्मितेसकट आमचं साहित्य हे त्याचंच प्रतिबिंब असायला हवं. जीवनातल्या वाटचालीचा भाग असायला हवा. त्यासाठी जो मुक्त मानव समाज आपल्याला सर्वांना प्रथम पाहिजे आहे, त्यासाठी असं साहित्य जर आपण निर्माण केलं तर आपल्याला सर्वात प्रथम दाद मिळेल ती आपल्याच समाजाकडून ! तो काय लेख लिहिणार नाही पण त्याची दाद वेगळीच असेल. त्याचा अनुभव मी घेतलाय.

''एका खेडयावर एका झोपडीच्या ओटयावर असंच १५-२० लोकं जमून बसलो होतो. त्यात काही म्हाताऱ्या बाया पण होत्या. पण ह्या लोकांना कविता हा प्रकार नविनच होता. कविताचे रसग्रहण करण्याचा त्यांचा दृष्टिकोन लक्षात घेण्यासारखा आहे. मी कवितांची वही उघडली आणि माझ्या भिलोरी कविता वाचायला लागलो तर कविता वाचल्यावर त्या आदिवासी मजुरांनी 'वाह वाह' केली नाही, तर ते स्वत:च खूप हसू लागले आणि पुन: कविता वाचायला सांगितले. मी पुन्हा तीच कविता वाचली. ते पुन्हा खूप हसले आणि शेवटी गंभीर होऊन म्हणाले 'खरा स भाऊ खरा स आपू बी काय करसूत आपना जीवनच तस्या स.'

हे सहज हसणे आणि तितक्याच सहजपणे गंभीर होऊन विचार करणे हे आपले वैशिष्टये आपल्या साहित्यिकांनी जपले पाहिजे...'

धन्यवाद !

वाहरु सोनवणे

# जंगलजिव्हाऱ्यातील वेदनेशी नाते सांगणारे पालघर येथील पाचवे आदिवासी साहित्य संमेलन ( संमेलनाचा वृत्तांत )

- प्रा. विनायक तुमराम

१० व ११ नोव्हेंबर १९७९ रोजी चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती या तहसिलीच्या गावी 'पहिले आदिवासी साहित्य संमेलन' आयोजित करण्यात आले होते. हे संमेलन होऊन आज जवळजवळ एक तप पूर्ण झाले आहे. या कालावधीत 'आदिवासी साहित्य' ही चळवळ बनली व या चळवळीने आज संपूर्ण महाराष्ट्र व्यापून टाकला आहे. पाच आदिवासी साहित्य संमेलने, दोन आदिवासी साहित्यिक मित्र-मेळावे, एक आदिवासी साहित्यिक प्रशिक्षण शिबीर व एक आदिवासी साहित्यिक व समाजकार्यकर्त्यांची परिषद (पुणे) असा हा नवशिक्षित आदिवासींचा साहित्य-प्रवास आहे. आज 'आदिवासी साहित्य' हा नवीन वाङ्मयीन प्रवाह मराठी साहित्यात जोर धरू लागला आहे. बहरू लागला आहे. ठाणे जिल्ह्यातील पालघर या तहसीलचे ठिकाणी नुकतेच (२३, २४, व २५ डिसेंबर १९९० रोजी) 'पाचवे आदिवासी साहित्य संमेलन' उत्साही वातावरणात मराठी प्राथमिक शाळेच्या प्रांगणात यशस्वीपणे पार पडले. संमेलनस्थळाला 'नेल्सन मंडेला नगर' असे नाव देण्यात आले होते. कुसुमाग्रज पारितोषिक विजेते सुप्रसिध्द आदिवासी कवी श्री वाहरू सोनावणे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या संमेलनाचे उद्घाटन सुप्रसिद्ध दलित साहित्यिक बाबुराव बागुल यांनी केले. आदिवासी साहित्य परिषदे मार्फत हे संमेलन आयोजित करण्यात आले होते. त्यानिमित्ताने हा शब्दप्रपंच.

**पहिला दिवस : २३ डिसेंबर १९९०**

संमेलनाची सुरूवात २३ डिसेंबर १९९० रोजी सकाळी नऊ वाजता, आदिवासी साहित्यिक-समाजकार्कर्ते व आदिवासी बंधु-भगिनींच्या दर्शनीय मिरवणुकीने झाली. पारंपरिक पद्धतीची वेषभूषा परिधान करून, आपल्या पारंपरिक वाद्यांच्या संगीतावर नाचत-गात शेकडो आदिवासी स्त्री-पुरूष या मिरवणुकीत सहभागी झाले होते. त्यांचा उत्साह ओसंडून वाहत होता. प्रेक्षकांच्या मनाला वेधून घेणारे ते दृश्य होते. आपली सारी दुःखे विसरुन ते आदिपुत्र मिरवणुकीत आनंदाने सामील झाले होते. गाऊ लागले होते. नाचू लागले होते. रेल्वेस्थानकापासून या मिरवणुकीला सुरुवात झाली व ती नेल्सन मंडेला नगरात येऊन पोचली. 'आदिवासी साहित्याचा विजय असो' 'आदिवासी एकता जिंन्दाबाद', 'आदिवासी साहित्य-कला व संस्कृतीचा विजय असो' अशा घोषणांनी पालघरचे वातावरण निनादून गेले होते. संमेलनाध्यक्ष वाहरू सोनावणे, भूमिसेनेचे काळुराम धोदडे, प्रा. भगवान भोईर, बाबूराव बागुल, प्रा. विनायक तुमराम, प्रा. वामन शेळमाके, दयानंद मुकणे, लक्ष्मणराव टोपले. धुरंधर मिठगावकर, मोतीलाल कश्यप, सतीश काळसेकर, भुजंग मेश्राम, मारुती कुळमेथे, वीर भारत तलवार, आनंद डोकले, इत्यादी मान्यवर या मिरवणुकीत सामील झाले होते.

नेल्सन मंडेला नगरात मिरवणूक आल्यानंतर संमेलनाला सुरुवात झाली. संमेलनाध्यक्ष कवी वाहरु सोनवणे रचित ''कुऽऽर !वाघीण-वासरा

आम्ही आदिवासी रा!'' या स्वागतगीताने संमेलनास प्रारंभ झाला. प्रभु राजगडकर यांनी आदिवासी साहित्याचे व संमेलनाचे प्रयोजन सांगितले व उपस्थित पाहुण्यांचा अल्पसा परिचय करुन दिला. भूमिसेनेचे सक्रीय कार्यकर्ते व संमेलनाचे स्वागताध्यक्ष श्री काळुराम धोदडे यांनी स्वागतपर भाषण केले. ते आपल्या भाषणात म्हणाले. ''आपल्या आदिवासी साहित्य संमेलनाचे वैशिष्ट्य म्हणजे एखाद्या भाषेच्या साहित्याशी नाते सांगण्याऐवजी निसर्गाशी गेल्या असंख्य दिवसांपासून समरस झालेल्या आदिवासी संस्कृतीशी हे संमेलन नाते सांगत आहे.''

पुढे कोणत्या साहित्याची आदिवासी समाजाला गरज आहे हे स्पष्ट करतांना ते पुढे म्हणाले, ''आज अशा आदिवासी आत्यंतिक गरज आहे की जे या व्यवस्थेविरुद्ध बुलंद आवाज उठवेल. आदिवासी समाजाची दुःखे प्रकट करील व त्याची खरीखुरी जाण लोकांना करुन देईल. विकासाच्या व औद्योगिकरणाच्या प्रक्रियेने आदिवासी समाजाची होणारी कुचंबणा दूर करण्यास व त्याविरुद्ध आवाज उठविणाऱ्या साहित्यानिर्मितीसाठी या संमेलनाने गांभीर्याने विचार करावा. आज देशभर स्वतःच्या अस्तित्वासाठी झगडणाऱ्या आदिवासींच्या लढ्यात अशा जाणिवपूर्वक निर्माण केलेल्या साहित्याने मोठे पाठबळ मिळेल.''

संमेलनाचे उद्‌घाटक बाबुराव बागुल यांनी दलित-आदिवासींच्या गतकालीन स्थिती-गतीवर भरपूर प्रकाश टाकला. ते आपल्या भाषणात म्हणाले. ''अस्पृश्यता सूड म्हणून लादली गेली. या देशाचे मूळ मालक आदिवासी आहेत. ही संस्कृतीच मूळ भारतीयांची आहे. जे गावात गेले, शरण गेले ते दलित, परंतु जे शरण गेले नाहीत, रानात गेले ते आदिवासी, म्हणून ज्या संस्कृतीने अस्पृश्यता टिकविली, माणसाला माणसापासून तोडले ती संस्कृतीच सर्वार्थाने नाकारण्याचे धैर्य दलित-आदिवासींनी दाखविले पाहिजे; तीच खरी महात्म्यांना श्रध्दांजली ठरेल.''

जातीव्यवस्थेवर व चातुर्वर्ण्यावर त्यांनी घणाघाती आघात करून ''साहित्याचे मूल्य काय असावे.'' हे सोदाहरण पटवून दिले.

या संमेलनाला उत्तर प्रदेश, गुजरात आणि बिहार राज्यातील आदिवासी साहित्यिकही उपस्थित होते हे या संमेलनाचे वैशिष्ट्य होय. दिल्ली येथील जवाहरलाल राष्ट्रीय विद्यापीठातील प्राध्यापक वीर भारत तलवार, 'हो' भाषेचे लेखक रणजित सामंत, बंगाली भाषेचे लेखक दिलीप होता आदि जेष्ठ साहित्यिक संमेलनाच्या व्यासपीठावर उपस्थित होते. त्यांनीही यावेळी आपापले विचार मांडले. वीर भारत तलवार हिंदी भाषेतून बोलले. ते आपल्या भाषणात म्हणाले, ''आदिवासी साहित्याचे लक्ष्य तेच आहे जे आदिवासी आंदोलनाचे लक्ष्य आहे. मनुष्य संघर्ष कधी सोडणार नाही. तो राजनीतीच्या नावावर, साहित्याच्या नावावर संघर्ष करीतच राहणार. परंतु आपण जे लक्ष्य साध्य करु इच्छितो त्यात अनेक अडचणी आहेत. त्या दूर केल्याशिवाय लक्षप्राप्ती होणे शक्य नाही. आपल्या अस्मितेचा प्रश्न हा राजनीतीचा व साहित्याचाही प्रश्न आहे.'' बिहार राज्यातील झारखंडवरून आलेले रणजित सामंत यांनी आदिवासी साहित्य संमेलनाच्या आयोजनाबद्दल आनंद व्यक्त करुन झारखंड परिसरातील साहित्यिक वाटचालीवर आपल्या भाषणातून प्रकाश टाकला.

''हे वर्ष डॉ. बाबासाहेब आंबेडकर जन्मशताब्दीचे व म. फुले स्मृतीशताब्दीचे आहे. या वर्षात हे साहित्य संमेलन होत आहे हा एक अपूर्व योगच म्हणावा लागेल. ग्रंथ हे आपल्याला माणूस बनवितात, सुसंस्कृत करतात असे डॉ. आंबेडकर म्हणाले होते.'' असे उद्‌गार श्री. सतीश काळसेकर यांनी या प्रसंगी आपल्या भाषणातून काढले.

संमेलनाध्यक्ष वाहरु सोनवणे यांनी आपल्या खास शैलीत अत्यंत परखड शब्दात आपले अध्यक्षीय भाषण केले. अध्यक्षांनी आपले लिखित भाषण वाचून दाखवायचे अशी सर्वसाधारण रुढ

प्रथा आहे. सोनवणेंनी मात्र आपले लिखित भाषण वाचून दाखविले नाही, तर त्यांनी उपस्थितांशी भाषणातून संवाद साधला. साध्या सरळ शब्दातून त्यांनी आदिम जीवन-संस्कृतीचे, प्रश्न-समस्यांचे, व्यथा-वेदनांचे सभ्यक दर्शन घडविले. आदिवासी साहित्याचा वेगळा प्रवाह का? याचे उत्तर देताना ते आपल्या भाषणात म्हणाले.

''आदिवासी दुःखाचे संदर्भ वेगळे आहेत. त्यांचे प्रश्न वेगळे राहणार आहेत. त्यांची उत्तरं सुद्धा वेगळ्या पद्धतीने शोधावी लागतील. वेगळा आशय घेऊन येणारे शब्द शोधावे लागतील. म्हणून आदिवासी साहित्याचा प्रवाह वेगळा ठरतो. आणि हे साहित्य म्हणजे आमच्या वैशिष्ट्यांचा शोध देखील ठरतो. फक्त साहित्याचा नव्हे तर आदिवासी समूहाचा आणि जीवनाचा शोध !''

साहित्य म्हणजे काय, याविषयी त्यांनी पुढील शब्दात आपली भूमिका विशद केली, ''साहित्य आणि कला. साहित्य आणि जीवन यामध्ये ज्या भिंती इतर समाजामध्ये उभ्या केल्या जातात त्या भिंतींना आदिवासी समाजात स्थान नाही. या व्याख्याच बदलल्या पाहिजेत. आज आदिवासी समाजात अशी अनेक गाणी, गोष्टी, नाटकं आणि कलाकृती आहेत. पण ते शब्दबद्ध केलेले नाहीत. पण हजारो वर्षांपासून चालत आलेल्या परंपरा ज्या कधी थकल्या नाहीत त्या परंपरा मौखिक स्वरूपात आजही आदिवासी जीवनात साठविलेल्या आहेत. वास्तवात आहेत. मग ह्याला साहित्य नाही असे म्हणायचे का? तर मुळीच नाही. जी कलाकृती हृदयातून झिरपते आणि हृदयापर्यंत पोहचते आणि मानवी जीवन फुलवते, सजवते आणि सुंदर करते; मग ती कलाकृती लिखित असो, नसो त्याला साहित्य म्हणायला हवे.'' आदिवासी साहित्याचे स्वरूप कसे आहे, आणि त्यासंबंधात आदिवासी साहित्यिकांनी काय करायला पाहिजे हे स्पष्ट करतांना ते म्हणाले, ''आम्ज आदिवासी साहित्याचे लिखित आणि अलिखित असे दोन भाग करावे. शिकलेल्या आदिवासी लेखणीतून किंवा आपल्या कलाकृतीतून आदिवासी जीवनाचा, जीवनमूल्याचा ठसा उमटवित असतो. तर अलिखित साहित्यातून आपल्याला आदिवासी जीवन-संस्कृतीचे दर्शन होते. आदिवासी जीवनात दोन्ही प्रकारच्या साहित्याची अत्यंत आवश्यकता आहे. दोन्ही भाग हातात हात घालून कसे पुढे जातील हे जागरूकपणे पाहिले गेले पाहिजे. अन्यथा आदिवासी साहित्य चळवळीची निकोप वाटचाल होऊ शकणार नाही.''

आदिवासी साहित्यिक-समीक्षकांना उद्देशून ते पुढे म्हणाले, ''ब्राह्मणी संस्कृतीच्या विरोधातला प्रत्येक लढा हा आपण आपला मानायला हवा. प्रस्थापितांचे साहित्य हे शोषणव्यवस्थेला पोषकच असते. म्हणून त्याला बाजूला करून चाललेले दलित, आदिवासी, ग्रामीण, स्त्री, जनसाहित्य संमेलन आपण आपलेच मानून (आपले स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवून) आपण सर्वांनी त्यामध्ये सहभागी व्हायला हवे.''

संमेलनाध्यक्ष वाहरू सोनवणे यांनी आपले स्वतंत्र अस्तित्व कायम ठेवण्यावर आपल्या भाषणातून जास्त जोर दिला. त्यांच्या कथनातील इत्यर्थ नवशिक्षित आदिवासी कवी-लेखकांनी समजून घेणे महत्वाचे आहे. अशा तऱ्हेने संमेलनाचा उद्‌घाटन सोहळा थाटामाटात आणि शब्दशक्तीने भारून गेलेल्या वातावरणात पार पडला.

थोड्या विश्रांतीनंतर पहिल्या परिसंवादाला सुरूवात झाली. परिसंवादाचा विषय होता, ''भारतीय भाषांमधील साहित्यात आदिवासींचे चित्रण'' परिसंवादाचे अध्यक्ष होते आ. नेताजी राजगडकर. सर्वश्री दिलीप होता भुजंग मेश्राम, विरभारत तलवार, ऋषी मसराम, कुंडलीक केदारी यांनी या परिसंवादात भाग घेतला. दिलीप होता यांनी बंगाली भाषेतील साहित्यात आदिवासी जीवन-संस्कृतीचे चित्रण कसे आहे हे सोदाहरण पटवून दिले. ''नोकर, पहारेकरी, पालखीवाहक एवढ्यापुरतेच मर्यादित आदिवासी जीवनाचे चित्रण बंगाली भाषेतील साहित्यात आहे.'' अशी

खंत त्यांनी व्यक्त केली. प्रसिद्ध बंगाली कादंबरी 'मृगया' मध्येही आदिम जीवन हे अस्सल वाटत नसल्याचे ते म्हणाले. बंगाली साहित्यातील आदिवासी जीवन चित्रणाबद्दल एकूण निराशाच त्यांच्या भाषणातून प्रकटली.

हो भाषेचे लेखक रणजित सामंत यांच्याही भाषणाचा रोख अशाच प्रकारचा होता. विरभारत तलवार यांनी हिंदी, बंगाली, भोजपुरी आणि उडिया भाषेतील साहित्यात आदिवासी जीवनाचे चित्रण कसे क्षीण आहे हे सोदाहरण पटवून दिले. 'उडिया' भाषेचे लेखक श्री. गोपीनाथ महंती यांनी आपल्या साहित्यात केलेल्या आदिवासी जीवनाच्या चित्रणाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. योगेन्द्रनाथ सिन्हा यांनी आपल्या उपन्यासमध्ये केलेल्या आदिवासी जीवनाच्या चित्रणाबद्दल नाराजी व्यक्त केली.

मराठी भाषेतील आदिवासी जीवनाच्या चित्रणाबद्दल आपली कडवट प्रतिक्रिया व्यक्त करतांना आदिवासी कवी श्री भुजंग मेश्राम हे आपल्या भाषणात म्हणाले, "गोदावरी परूळेकर यांचे 'जेव्हा माणूस जागा होतो' हे आत्मवृत, वा. ब. कर्णिक यांची 'वाडगीण', प्रा. रमेश कुबल यांची 'आदिलीला', गो. नि. दांडेकर यांची 'जैत रे जैत' व प्रा. सुरेश द्वादशीवार यांच्या 'हाकुमी' आणि 'तांदळा' या आदिवासी जीवनावरील कादंबऱ्या, इ. तून आदिवासींचे विकृत असे चित्रण झाले आहे. त्यातून खरे आदिवासी जीवन वजा झाले आहे." परिसंवादाचे अध्यक्ष नेताजी राजगडकर यांनी प्रस्थापित साहित्यिकांवर टीकास्त्र सोडले. ते आपल्या भाषणात म्हणाले, "स्वत:चाच शोध घेण्याचा एक प्रयत्न म्हणजे हे साहित्य संमेलन होय. कोणाशी स्पर्धा करण्याची आमची धारणा नाही. आजपर्यंत आम्हा आदिवासींना स्वत:चे व्यासपीठ नव्हते ते निर्माण करण्यासाठी हा प्रयत्न आहे. आदिवासी साहित्याचा प्रवाह दहा वर्षात चंद्रपूर येथील भद्रावतीहून निघून ठाणे जिल्ह्यातील पालघरपर्यंत येऊन पोहचला आहे."

भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीत सर्वस्व पणाला लावून शेवटी फासावर लटकलेल्या आदिवासी शूरवीरांचे कर्तृत्व अद्यापही इतिहासाला ठाऊक नसल्याचे सांगून ते म्हणाले, "भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात प्राणाची आहुती ज्यांनी दिली, मायभूमीच्या रक्षणार्थ ज्यांनी हौतात्म्य पत्करले, त्या आदिवासी शूरांच्या त्यागाचे चित्रण इतिहासात सापडत नाही. प्रस्थापितांच्या साहित्यावरही त्यांनी दिलेल्या अनेक लढ्यांचे, उभारलेल्या चळवळींचे मुळीच चित्रण नाही. १९५७ च्या स्वातंत्र्य सग्रामात लढलेल्या राणी लक्ष्मीबाईच्या शौर्याचे वर्णन प्रस्थापित साहित्यिकांनी केले आहे. परंतु राणी दुर्गावतीच्या पराक्रमाची दखल सुद्धा कुणी घेतलेली नाही."

राजगडकरांच्या अध्यक्षीय भाषणाने परिसंवादाची सांगता झाली. या परिसंवादानंतर लगेच दुसऱ्या परिसंवादाला सुरूवात झाली. परिसंवादाचा विषय होता "आदिवासी साहित्यासमोरील प्रश्न" आ. नेताजी राजगडकर हे याही परिसंवादाचे अध्यक्ष होते. हा परिसंवाद नियोजित वेळेपेक्षा उशिरा सुरू झाला व उशिराच संपला. सर्वश्री ऋषी मसराम, भुजंग मेश्राम, पशुपती जोंको, धनाजी गुरव इ.नी या परिसंवादात भाग घेतला. परिसंवादाचे सूत्रसंचालन श्री. रवि कुरसंगे यांनी केले. परिसंवादातील एक वक्ते कवी मसराम आपल्या भाषणात म्हणाले, "आदिवासी समाज हा निरक्षर आहे. फारच थोडे लोक शिकून सवरून पुढे आलेले आहेत. अशा परिस्थितीत आदिवासींनी साक्षर होणे फार महत्वाचे आहे. आदिवासी जेव्हा साक्षर होईल तेव्हा तो आपल्या व्यथा-वेदना, भावभावना, आशा-आकांशा शब्दबद्ध करू शकेल. आपल्या भावविश्वाला शब्दरूप देऊ शकेल. आदिवासी माणूस जसजसा साक्षर होत जाईल तसतसा आदिवासी साहित्याचा वाचकवर्गही वाढत जाईल."

आदिवासी साहित्याच्या प्रकाशनार्थ स्वतंत्र प्रकाशन संस्था स्थापन करण्याची गरज श्री

मसराम यांनी बोलून दाखविली. धनाजी गुरव यांनी भाषेच्या प्रश्नावर प्रकाश टाकून विविध बोलीभाषेत प्रगटलेले आदिवासी साहित्य हे संवादी कसे होईल याबाबत चर्चा केली. श्री. विरभारत तलवार व पशुपती जोंको यांनीही यावेळी आपले विचार व्यक्त केले. आदिवासी साहित्याच्या प्रकाशनार्थ स्वतंत्र प्रकाशन संस्था असायला हवी हे त्यांनीही आपापल्या भाषणात सांगितले. भुजंग मेश्राम हे ही यावेळी बोलले. ''पावरा, भिलोरी व कोकणा भाषेत लेखन करणाऱ्या जवळपास चारशे आदिवासी साहित्यिकांचा शोध नंदुरबार येथील चवथ्या आदिवासी साहित्य संमेलनात लागला होता.'' असे सांगून परिसंवादाचे अध्यक्ष आ. नेताजी राजगडकर यांनी आदिवासी साहित्यासमोरील काही महत्वाच्या प्रश्नांची चर्चा आपल्या भाषणातून केली.

रात्रौ परिसंवादानंतर आव्हान नाट्य संस्थेतर्फे मंडल आयोगावर एक पथनाटय सादर करण्यात आले. भुजंग मेश्राम लिखित 'औतान' ही एकांकिका काही कलावंतांनी यावेळी सादर केली. पथनाटय व एकांकिकेनंतर नंदुरबार येथील कलावंतांनी 'पावरा' नृत्य नाटिका सादर केली. हे सर्व सांस्कृतिक कार्यक्रम आदिवासींच्या जीवन संस्कृतीचे प्रभावी दर्शन घडविणारे होते. श्रोत्यांचा प्रतिसादही जबरदस्त होता.

यानंतर भरगच्च श्रोता-रसिकांच्या उपस्थितीत बहारदार कवीसंमेलन झाले. या कवी संमेलनाचे नियोजित अध्यक्ष सुप्रसिध्द दलित कवी श्री नामदेव ढसाळ उपस्थित न झाल्यामुळे श्री. प्रभु राजगडकर यांच्या अध्यक्षतेखाली कवी संमेलनाला सुरूवात झाली. रात्रौ बऱ्याच वेळपर्यंत हे कवी संमेलन चालले. श्री भुजंग मेश्राम यांनी या कवी संमेलनाचे सूत्र संचालन केले. सर्वश्री वाहरू सोनवणे, भगवान भोईर, भगवान निळे, प्रा. विनायक तुमराम, रवी कुरसुंगे, सी. सी. राठवा, लक्ष्मणराव टोपले, डॉ. श्रीधर पवार, प्रा. वामन शेळमाके, प्रकाश जाधव, सुभाष आडे, सौ. कुसुम आळाम आदी कवींनी उत्कृष्ट व दमदार कविता सादर करून रसिकांची मने जिंकली. थंडीचे दिवस असतांनासुध्दा रसिकांनी पूर्ण कवीसंमेलन होईपर्यंत आपली जागा सोडली नाही हे या कवीसंमेलनाचे वैशिष्टय म्हणावे लागेल. अशा रितीने अतिशय उत्साहपूर्ण वातावरणात व श्रोत्यांच्या भरगच्च उपस्थितीत संमेलनचा पहिला दिवस पार पडला.

## दुसरा दिवस : २४ डिसेंबर १९९०

संमेलनाचा दुसरा दिवस नवा उत्साह घेऊन उजाडला. या दिवशी सकाळी नऊच्या सुमारास तिसऱ्या परिसंवादाला सुरूवात झाली. 'आदिवासी स्त्री-वास्तवातील व नाटक-सिनेमातील'', हा परिसंवादाचा विषय होता. परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी होते राजाभाऊ राजगडकर. श्रीमती गीता पागी, सौ. पुष्पाताई आत्राम, सौ. कुसुम अलाम, सौ संघजा मेश्राम, व कु. उषाकिरण आत्राम इ.नी या परिसंवादात भाग घेतला. श्रीमती गीता पागी यांनी आपल्या भाषणात पुढील विचार व्यक्त केले.

''नाटक-सिनेमा प्रत्येकजण पाहत असतो. परंतु त्या चित्रपटातील आदिवासी स्त्रीचे पात्र रंगविणारी नायिका ही खऱ्या अर्थाने रंगविता येते काय ? तिचा जन्म आदिवासीमध्येच व्हायला पाहिजे. सिनेमात-नाटकात जी आदिवासी स्त्री दाखविली जाते, रंगविली जाते; तिच्यावर बलात्कार वगैरे होत असल्याचे दाखविण्यात येते. हे योग्य नाही.'' भारतीय समाजव्यवस्थेत स्त्रीचे स्थान काय आहे हे सौ. पुष्पाताई आत्राम यांनी उपस्थितांना सोदाहरण पटवून दिले. त्या आपल्या भाषणात म्हणाल्या, ''आदिवासी स्त्री ही पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून लढते आहे. परंतु मनुवाद्यांनी तिला दूर लोटले आहे. स्त्री हे केवळ उपभोगाचे साधन आहे, असा दृष्टिकोन येथे जन्माला आला आहे. आजही तिचे चित्रण विकृतरित्याच केले जाते. सिनेमातील स्त्री भुकेल्या बापाला एकवेळचे जेवण मिळवून देण्यासाठी ठेकेदाराकडे जाते व जेवण आणते.

पण त्या मोबदल्यात शरीर देते हे शक्य आहे काय ?''

आदिवासी साहित्य हे कसे आहे व हे साहित्य संमेलन कशासाठी याविषयी देखील त्यांनी आपली बोलकी प्रतिक्रिया व्यक्त केली.

आजचे दिग्दर्शन कसे सदोष आहे, हे सौ. कुसुम अलाम यांनी उपस्थितांना पटवून दिले. काही चित्रपटातील आदिवासी स्त्री-चित्रणावर प्रकाश टाकताना त्या म्हणाल्या, ''स्त्री पती सोडून जाते. तिच्या मन:स्थितीचे वर्णन दिग्दर्शकाने पाहिजे तसे दाखवायला हवे. आदिवासी स्त्रीमध्ये प्रतिकारशक्ती जास्त आहे. चित्रपटवाल्यांनी आदिवासी स्त्रीचे भांडवल करून टाकले आहे. केवळ पैसा कमविण्यासाठी.''

कु. उषाकिरण आश्राम यांनी कोणत्या चित्रपटात आदिवासी स्त्री-जीवनाचे चित्र कसे आहे हे उपस्थितांना सोदाहरण पटवून दिले. त्या चित्रिकरणात कशा व कुठे चुका आहेत हे त्या त्यांनी उपस्थितांना दाखवून दिल्या. त्या आपल्या भाषणात म्हणाल्या, ''आदिवासी स्त्री उघडी नागडी दाखविली जाते. हिरव्या नोटेला भाळून सर्वस्व देते असे दाखविले जाते, सांगितले जाते. विवाहापूर्वी तिला बंधने नसतात असे दाखविले जाते, पण ते तसे नाही. 'कसं काय पाटील बरं हाय का!'', गो. नि. दांडेकरांच्या 'जैत रे जैत' मध्ये दाखविण्यात आलेली आदिवासी स्त्री ही वास्तवातली नाही. 'लहू के फुल' या चित्रपटात अजाणपणा, स्वैरपणा दाखविला आहे. आदिवासींचे जीवन मुक्त असल्याचे दाखविले आहे; पण प्रत्यक्षात तसे नाही. जे. पी. सिंघल आदिवासी स्त्रीचे उघडे नागडे चित्रण दाखवून आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळवतो. पण त्यासाठी उघडे नागडे दाखविणेच आवश्यक होते काय ?''

सौ. संघजा मेश्राम यांनी, ''आदिवासी स्त्रियांवर होणाऱ्या बलात्काराचे आणि त्यांच्या दारिद्र्याचे चित्रण मुख्यत्वे चित्रपटातून केले जाते.'' असे आपल्या भाषणातून सांगीतले. सामाजिक बांधिलकीचा दृष्टिकोण पुढे ठेवून चित्रपट निर्माण होण्याची गरज त्यांनी बोलून दाखविली.

परिसंवादाचे अध्यक्ष राजाभाऊ राजगडकर यांनी वेळेअभावी आपले अध्यक्षीय भाषण आटोपते घेतले. प्रस्तुत विषय हा तांत्रिक व गंभीर असल्याचे ते म्हणाले. अशा रितीने संमेलनातील तिसरा परिसंवाद यशस्वीरित्या पार पडला.

यानंतर लगेच चौथ्या परिसंवादाला सुरूवात झाली. ''आदिवासी लेखक कलावंतांकडून अपेक्षा'' हा परिसंवादाचा विषय होता. श्री. सतीश काळसेकर हे परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी होते. या परिसंवादात सर्वश्री डॉ. शरद कुलकर्णी, प्रा. विनायक तुमराम, जगदिश गोडबोले, लक्ष्मण गायकवाड, काळूराम धांगडा इ. अभ्यासक-विचारवंतांनी या परिसंवादात भाग घेतला. अत्यंत अभ्यासपूर्ण असे विचार या परिसंवादात वक्त्यांनी मांडले. आजचे साहित्य हे आदिम जीवन-संस्कृतीच्या किती दूर आहे याविषयी खंत व्यक्त करून शरद कुलकर्णी म्हणाले, ''निर्वाहाची साधने हरविली आणि हा आदिवासींच्या अस्तित्वाला फार मोठा धोका आहे. हे साहित्यातून प्रतिबींबीत झाले पाहिजे. आदिवासींना मिळणाऱ्या सवलती बहुसंख्य बिगर आदिवासीच आपल्या पदरात पाडून घेत आहेत. त्यामुळे आदिवासी माणूस आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रात मागे पडत चालला आहे. त्यांच्या संस्कृतीवरती आक्रमणे होऊ लागली आहेत. त्यामुळे आदिवासी साहित्यिकांनी आणि आदिवासीत विविधप्रकारे काम करणाऱ्या कार्यकर्त्यांनी या गोष्टींची दखल घेणे आणि त्याविरूद्ध काही उपाय योजणे आवश्यक आहे.''

धरण-प्रकल्पांमुळे पर्यावरण कसे नष्ट होत आहे व त्याचा परिणाम आदिवासी जीवन संस्कृतीवर कसा होत आहे यावरही त्यांनी यावेळी प्रकाश टाकला.

आदिवासी कार्यकर्ते श्री. लक्ष्मण गायकवाड यांनी धरण-प्रकल्पांवर कडाडून हल्ला चढविला. ''धरणे म्हणजे आदिवासींची कब्रस्थाने होत''

अशा शब्दात त्यांनी आपले मत नोंदविले. साहित्यासंबंधी आपली भूमिका विशद करतांना ते म्हणाले, ''साहित्य चांगले ते चांगले; वाईट ते वाईट. मग ते कोणत्याही साहित्यिकाने लिहीलेले असो. सहानुभूती डोळ्यात पाणी आणते तर अनुभूती अंगात अंगार आणते. साहित्यात सामाजिक आशय असावा.''

प्रा. विनायक तुमराम यांनी आदिवासी साहित्य म्हणजे काय व आदिवासी साहित्यिक कोण हे स्पष्ट केले. आपल्या भाषणात ते म्हणाले, ''भूतकाळातील स्थिती-गतीचा तपशील सोबत घेऊन व वर्तमानाचे भान ठवून आदिम जीवन-संस्कृतीशी, प्रश्न-समस्यांशी, वेदना विद्रोहाशी भावभावनांशी व आशा आकांक्षाशी निगडीत जे जे काही लिहिले जाईल ते सर्व आदिवासी साहित्य ठरेल. जगाच्या पाठीवर जेथे जेथे आदिम समूह आजही टोळ्याटोळ्यांनी वावरतात त्यांच्या अस्मितेशी व दुःखाशी जाणिवपूर्वक नाते जोडणारे सर्व साहित्य हे आदिवासी साहित्यातच समाविष्ट होईल. आदिम वेदनेची झिरपण ज्यात आहे आणि आदिम भावनांचे अकृत्रिम उद्रेक ज्यात आहेत ते आदिवासी साहित्य होय. अशा साहित्याचे निर्माते जातकुळीने, धर्माने, वंशाने कोणीही असोत ते आदिवासी ठरवतील. ते सर्व आदिवासी साहित्य प्रवाहाचे प्रतिनिधी ठरतील.''

आदिवासी लेखक कलावंताकडून अपेक्षा व्यक्त करतांना ते पुढे म्हणाले, ''आदिवासी समाजानेही प्रतिभा-संपन्न कवी-लेखक आणि कलावंत जन्माला घातले आहेत. आजवरच्या साहित्य संमेलनांनी त्यांचे वाङ्मयीन कर्तृत्व व त्यांची कलाभिव्यक्ती यांचे दर्शन घडविले आहे. या सर्व आदिवासी लेखक-कलावंतांनी आपल्या प्रज्ञा-प्रतिभेने, साहित्य कृतीने व कलाकुसरीने आदिवासींमधला निद्रीस्त माणूस जागविला पाहिजे. आपल्या वेदनांना जपले पाहिजे. आदिवासी प्रतिभेने रानात हिंडून आदिम दुःखाशी संवाद साधला पाहिजे. आदिवासी लेखक कलावंतांनी आपल्या अंगभूत सामर्थ्याने स्वतंत्ररित्या लेखन केले पाहिजे. आपले शब्द कोणत्याही प्रभावाखाली येऊ न देता त्यांना वास्तवाच्या जवळ कसे नेता येईल याचाही विचार झाला पाहिजे. आपला सांस्कृतिक सूर सांभाळून आदिवासी लेखक-कलावंतांनी आदिवासींचे प्रबोधन केले पाहिजे. आपल्या शब्दांनी आदिमांच्या दुःखाचा ध्यास घ्यायला पाहिजे.''

श्री. जगदीश गोडबोले यांनी स्वानुभवकथन केले. ''एका बाजूला ज्यांचा आपण निषेध करतो त्यांचाच दुसऱ्या बाजूने पाठपुरावा करतो हे कसे?'' असा रोखठोक सवाल करत उपस्थितांना अंतर्मुख केले. ते आपल्या भाषणात म्हणाले, ''तू जो जगलास, वाढलास ते लिहिण्याचा तू प्रयत्न कर. आदिवासी जंगलात राहत आहेत हा ग्रहच आज चुकीचा आहे. कारण आज बहुतेक आदिवासी साहित्यिक आता शहरात राहतात. ते अधिकारी आहेत. प्राध्यापक आहेत. मग त्यांनी जे चित्रण केले ते मध्यमवर्गीय का मानावे?''

फार मोठ्या प्रमाणावर सुरू असलेल्या जंगलतोडीबद्दल ''जंगलांचे आज कब्रस्थान झाले आहे'' अशी दाहक प्रतिक्रियाही त्यांनी आपल्या भाषणातून कथन केले.

परिसंवादाचे अध्यक्ष सतीश काळसेकर यांनी परिसंवादातील एकूणच चर्चेवर समाधान व्यक्त केले. ते आपल्या भाषणात म्हणाले, ''आदिवासींच्या अनेक कला आहेत. त्यापैकी त्यांची चित्रकला खरोखरच प्रशंसनीय आहे. आदिम जीवनाशी संवाद साधण्याचे सामर्थ्य आदिवासी चित्रकलेतील रेषेतही आहे. आदिवासी लेखक-कलावंतांनी खूप लिहावे, पण वास्तवाचे भान ठेवून लिहावे. आदिवासी साहित्यातून जगण्याचा संदर्भ आढळला पाहिजे.''

थोड्या विश्रांतीनंतर दुपारी २ वाजता 'आदिवासी साहित्याचा आदिवासी चळवळीशी संबंध' या विषयावर अभ्यासपूर्ण परिसंवाद झाला. परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी प्रा. विरभारत तलवार

होते. परिसंवादाचे संचालन प्रा. वामन शेळमाके यांनी केले. सर्वश्री मारूती कुळमेथे, सुभाष आडे, लहू पासारे, सौ. पुष्पाताई आत्राम व डॉ. डगला इ. वक्त्यांनी या परिसंवादात भाग घेतला. आदिवासींच्या किमान गरजा सुध्दा पूर्ण होत नसल्याची खंत मारूती कुळमेथे यांनी व्यक्त केली. आदिवासींच्या दुःखावर बोलतांना ते म्हणाले, ''स्वातंत्र्यापूर्वी आणि स्वातंत्र्यानंतर आदिवासींचा उपयोग करून घेण्यात आलेला आहे. किमान गरजा पूर्ण करण्यासाठी सुध्दा त्यांना संघर्ष करावा लागतो. आदिवासींचे दुःख बोलके करून सहानुभूती मिळविता येते पण त्याने प्रश्न सुटत नाहीत.''

आपल्या अवलोकनातून जाणविलेल्या वास्तवाचे चित्रण सुभाष आडे यांनी आपल्या भाषणातून केले. वाहरू सोनवणे यांच्या 'गोधड' मधील, प्रा. विनायक तुमराम यांच्या 'गोंडवन पेटले आहे' मधील व प्रातिनिधीक काव्यसंग्रह 'मोहोळ' मधील कवितांचा आदिवासींच्या सामाजिक चळवळींशी कसा संबंध आहे हे त्यांनी सोदाहरण पटवून दिले. या कवितासंग्रहांमधील सर्व कविता सामाजिक आशयाच्या असल्याचे त्यांनी सांगितले.

श्री. लहू पासारे यांनी आदिवासींच्या लोकसाहित्याकडे उपस्थितांचे लक्ष्य वेधून घेतले. वारली लोकगीतांचे काही चटकदार नमुने सादर करून त्यात व्यक्त झालेल्या सामाजिक जाणिवेचे स्वरूप कसे आहे हे स्पष्ट केले. सौ. पुष्पाताई आत्राम यांनी ''कृतीच्या पाठीमागे यश धावत असते'' असे सांगून आदिवासी साहित्यिकांनी कृतीशील असले पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली. डॉ. डगला यांनी आपले अनुभव या प्रसंगी भाषणातून कथन केले. परिसंवादाचे अध्यक्ष वीरभारत तलवार यांनी आपल्या भाषणात सांगितले की, ''आदिवासी साहित्याचे आदिवासी चळवळीशी नाते असलेच पाहिजे. हे नाते जर नसेल तर या चळवळी मृतःप्राय झाल्याशिवाय राहणार नाहीत.'' श्री. तलवार यांनी आदिवासींच्या गतकालीन कर्तृत्वाचे अनेक दाखले देऊन वर्तमानात ते कसे प्रेरणादायी आहेत हे पटवून दिले. अशा रितीने पाचव्या परिसंवादाची सांगता झाली. सामाजिक व्यथा-वेदनांनी परिपूर्ण व आक्रस्ताळी स्वरुपाची या परिसंवादातील भाषणे असल्याचे जाणवले.

रात्रौ ८-०० वाजता आदिवासी कवींचे बहारदार कवी-संमेलन झाले. कवीसंमेलनाच्या अध्यक्षस्थानी प्रा. विनायक तुमराम होते. सूत्रसंचालन प्रभू राजगडकर यांनी केले. अनेक श्रोत्यांच्या उपस्थितीत सर्वश्री भुजंग मेश्राम, रवि कुरसुंगे, सतीश काळसेकर, वाहरू सोनवणे, सोपान कुरसुले, प्रकाश जाधव, एल. डी. कुलसंगे गुरूजी, गजानन भादीकर, प्रा. वामन शेळमाके, सुभाष आडे, प्रा. भगवान भोईर, ग्यानोबा केंगार, कुंडलिक केदारी, सुर्यभान नागभीडे, सौ. कुसुम अलाम, कु. उषाकिरण आत्राम, सौ. संघजा मेश्राम व श्रीमती विमल पटेकर इत्यादी नवकवींनी उत्कृष्ट कविता सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. कवीसंमेलन सुरू असतांना सुप्रसिद्ध दलित कवी 'गोलपीठा' कार नामदेव ढसाळ हे अचानकपणे उपस्थित झाले. त्यांनी गंभीर व आशयघन कविता सादर करून श्रोत्यांना अंतर्मुख केले. अशा तऱ्हेने संमेलनाचा दुसरा दिवस गोड आठवणी सोबत घेऊन पार पडला.

**तिसरा दिवस : २५ डिसेंबर १९९०**

संमेलनाचा तिसरा व शेवटचा दिवस उजाडला. या दिवशी सकाळी ९-०० वाजता प्रा. विनायक तुमराम यांच्या अध्यक्षतेखाली, 'कार्यकर्त्यांच्या दृष्टितून आदिवासींचे मूलभूत प्रश्न' या विषयावर उत्कृष्ट परिसंवाद संपन्न झाला. सर्वश्री डॉ. शरद कुलकर्णी, आनंद डोकले, लक्ष्मणराव टोपले, प्रा. वामन शेळमाके,

गेल आमवेट, प्रतापराव देशमुख, राजेन्द्र गावित, वाहरू सोनवणे, प्रा. डॉ. भा. व्यं गिरीधरी व ॲड. जनार्दन शेलार आदि विचारवंत-अभ्यासकांनी या परिसंवादात सहभागी होऊन अभ्यासपूर्ण भाषणे केली.

परिसंवादाच्या प्रारंभी श्री. लक्ष्मण टोपले यांनी आदिवासींच्या काही मूलभूत प्रश्नांची चर्चा करून त्यावर काही उपायही आपल्या भाषणातून सुचविले. आनंद डोकले यांनी आदिवासींना प्रबळ नेतृत्व लाभलेले नाही असे सांगून, म्हटले ''समाजाला पुढे नेण्यासाठी कार्यकर्ता नाही. समाजाच्या प्रश्नांची नीट सोडवणूक होत नाही. आदिवासींमध्ये सामाजिक अस्मितेचा अभाव आहे. कार्यात नियोजनाचा अभाव आहे.

डॉ. शरद कुलकर्णी यांनी आदिवासींवर होत असलेल्या अन्याय-अत्याचाराचे वास्तवचित्र आपल्या भाषणातून उभे केले. ते म्हणाले, ''आदिवासी विभागात आता आदिवासी राहिलेले नाहीत. तेथे बिगर आदिवासी येऊन राहू लागले आहेत. तेथे पैशांचा व्यापार सुरू झाला आहे. आदिवासींच्या जमिनी हडप करून त्यांना हुसकावून लावण्याचे प्रयत्न सुरू आहेत. बिगर आदिवासींनी आता आदिवासी होण्याचे सुरू केले आहे.''

वाहया, हिवरा व शिवऱ्या या आदिवासींच्या देवता म्हणजे हिंदू संस्कृतीतील उत्पत्ती, प्रलय व विनाशाच्या देवता होत, अशी अभिनव कल्पना त्यांनी मांडली. आदिवासींना इतर देवतांची पूजा करण्याची किंवा इतर संस्कृती आत्मसात करण्याची मुळीच गरज नाही, त्यांची स्वतःची संस्कृतीच स्वयंभू आहे असे स्पष्ट मत त्यांनी नोंदविले आणि आदिम संस्कृतीच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला.

प्रा. वामन शेळमाके यांनी, पूर्वी सर्व आदिवासी जमाती कशा एकदिलाने एकसंघ राहत होत्या, त्यांच्यात रोटी-बेटी व्यवहार कसे मुक्तपणे चालत असत आणि नंतर हिंदूंच्या संपर्क-प्रभावाने आदिम टोळ्यांमध्ये जातीयता कशी भिनत गेली हे पाश्चात्य विद्वान स्टेफन फच यांच्या विधानाच्या आधारे उपस्थितांना पटवून दिले, ''वृत्ती आणि कृती यांचा योग जुळून आल्याशिवाय आदिवासींचा विकास होणे शक्य नाही'' असे त्यांनी ठामपणे सांगितले. स्वतःचा विकास साधतांना आत्मपरीक्षणाची गरज आहे असेही ते म्हणाले.

गेली दहा वर्षे आदिवासींच्या संपर्कात राहून कार्य करित असलेल्या श्रीमती गेल ॲमवेट यांनी आदिवासींच्या मानसिकतेवर हिंदू देवदेवतांचे महात्म्य कसे लादले जात आहे हे सोदाहरण सांगितले. या कार्यात त्यांना आलेले अनेक अनुभव त्यांनी कथन केले. आदिवासी माणूस हा दुसऱ्या धर्मात कसा ओढला जात आहे हेही त्यांनी सांगितले.

''आदिवासींच्या वस्तू दुकानदार व सेठ-साहूकार कवडी-मोलाने विकत घेतो व सोने करून विकतो,'' असे उदगार प्रतापराव देशमुख यांनी आपल्या भाषणात काढले. केवळ सामाजिक आणि आर्थिक शोषणच आदिवासींचे होते असे नाही तर सांस्कृतिक शोषणही होते असे ते म्हणाले. आदिवासींनी आपला उद्धार आपणच करावा असे आवाहनही त्यांनी यावेळी केले. आदिवासी समाजातील तरूण कार्यकर्ते राजेन्द्र यावित यांनी, आदिवासींच्या मोर्च्यांवर व आंदोलनांवर कसा गोळीबार केला जातो व त्यांच्या दुःख समस्यांकडे कशी जाणिवपूर्वक डोळेझाक केली जाते हे सोदाहरण कथन केले. श्रोत्यांना गंभीर करणारे त्यांचे अनुभव होते. आदिवासी चळवळ प्रभावी व गतीमान न होण्याला आदिवासी आमदारच जबाबदार आहेत, असा जोरदार टोमणाही त्यांनी भाषणाच्या शेवटी हाणला. श्री. विठ्ठलराव कोंढार यांनी राजकारण व समाजकारण यांची गल्लत होऊ देता कामा नये असे सुचविले. संमेलनाध्यक्ष वाहरु सोनवणे यांनी देखील आपले विचार व्यक्त केले. ते आपल्या भाषणात म्हणाले, ''आदिवासींना दैनंदिन जीवनात

भेडसावणारे प्रश्न म्हणजे मजुरी, रोजगार, आरोग्य व शिक्षण हे होत. आमचा प्रश्न अस्मितेचा आहे. आमचे स्वप्न काय हा दुसरा प्रश्न आहे. दैनंदिन जीवनातील प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही कोणते माध्यम वापरणार आहोत याचाही विचार झाला पाहिजे.''

जव्हार जि. ठाणे येथील कला वाणिज्य महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भा. व्यं. गिरीधारी यांनी पुढील विचार व्यक्त केले,

''भूतकाळापेक्षा सांप्रत परिस्थितीचा विचार आदिवासींनी केला पाहिजे. उद्याचा विचार आदिवासी करीत नाही. आदिवासी विद्यार्थी उच्च शिक्षण घेण्याच्या फंदात न पडता झटपट नोकरीच्या मागे लागतात. आदिवासींमध्ये कोकणा, महादेवकोळी या आदिवासी जमाती जास्त पुढारलेल्या दिसतात. आदिवासींना समज आहे, पण उमज नाही. परिस्थिती प्रथम जाणून घ्यावी व मगच वाटचाल करावी.''

ॲड. जनार्दन शेलार यांनी परखडपणे आपले अनुभव व्यक्त केले. वकिली पेशात वावरतांना आदिवासींच्या समस्यांची गुंतागुंत कशी आहे हे त्यांनी सांगितले. आदिवासींच्या विकासाला बाधा आणणाऱ्या घटकांचा विचार मांडताना ते म्हणाले, ''आदिवासी माणूस हा वाजवीपेक्षा अधिक सहनशील आहे, आणि अल्पसंतुष्टही आहे. अन्यायही तो मुकाट्याने सहन करून टाकतो. आदिवासींची ही वाजवीपेक्षा अधिक सहनशिलता आणि अल्पसंतुष्टता त्यांच्या विकासाला मारक ठरल्या आहेत. आदिवासींनी आपल्या अंगी संघर्षक्षमता जपली पाहिजे.''

परिसंवादाचे अध्यक्ष प्रा. विनायक तुमराम यांनी आदिवासींचे दुःख, प्रश्न-समस्या व त्यांच्या व्यथा-वेदना स्पष्ट शब्दात मांडून समाजव्यवस्थेवर कडाडून हल्ला केला. ते म्हणाले, ''आदिवासी माणूस आजही जंगलजिल्ह्यात लंगोटीतले जगणे मुक्याने जगतो आहे. अनेक प्रकारच्या प्रश्न-समस्यांनी त्याच्या सभोवताली गराडा घातला आहे. तरी सांस्कृतिक वैभवाच्या नशेत तो धुंदपणे जगतो आहे. आर्य आचार्य यांच्या दीर्घकाल चाललेल्या सांस्कृतिक संघर्षानंतर आदिम टोळ्या जंगलापहाडातच बंदिस्त झाल्या; आणि तेव्हापासून दारिद्र्य त्यांच्या पाठीशी लागले. म्हणून त्यांच्या प्रश्न-समस्यांचा उगम या सांस्कृतिक संघर्षातूनच झाला आहे, असे म्हटले तरी चालेल. या प्रश्नांची सोडवणूक कशी करायची ते आदिवासी साहित्यिकांनी ठरवायचे आहे. हे सारे प्रश्न घेऊन वनवासमुक्तिचा उद्घोष करीत आदिवासी साहित्यिकांनी या शतकांचा प्रवास आरंभिला पाहिजे.''

यानंतर दुपारी श्री. वामन होवाळ यांच्या अध्यक्षतेखाली कथाकथनाचा कार्यक्रम पार पडला. सुत्रसंचालन मारुती कुळमेथे यांनी केले. श्री. लक्ष्मण टोपले यांनी 'रक्तांचा दाता', कुंडलिक केदारी यांनी 'धरणग्रस्त', रामकृष्ण कलबुरगे यांनी 'चैती', कु. उषाकिरण आत्राम यांनी 'आक्रोश' ही कथा सादर केली सौ. कुसुम अलाम व श्री. भोये यांनी देखील कार्यक्रमात भाग घेऊन कथा सादर केल्या.

सायंकाळी खुले अधिवेशन झाले. अधिवेशनास उपस्थित असलेल्यांना संबोधित करतांना संमेलनाध्यक्ष वाहरू सोनवणे म्हणाले, ''आदिवासी समाज शहरी जीवनापासून, मुख्य प्रवाहापासून कितीतरी दूर राहतो. त्यांच्या अनेक समस्या आहेत. त्या समस्यांची सोडवणूक स्वतः संघटीत होऊन केली पाहिजे. स्वर्गातून कोणी देवदूत येऊन त्या समस्या सोडविल हा भ्रम आदिवासींनी दूर सारावा. स्वतः संघटित होऊन लढण्यातच त्यांचा उत्कर्ष सामावला आहे'' संमेलनातील एकूणच कार्यक्रमांबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. संमेलनाध्यक्षांच्या पत्नी सौ. हिरकणा सोनवणे यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. यावेळी विविध आशयाचे एकूण

अकरा ठराव टाळ्यांच्या प्रचंड आवाजात एकमताने संमत करण्यात आले. भारत सरकारने मंडल आयोगाच्या शिफारशींची विनाविलंब अंमलबजावणी करावी, मराठवाडा विद्यापीठाला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव डॉ. आंबेडकर जन्म शताब्दी वर्षातच देण्यात यावे, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळावर सदस्य म्हणून आदिवासींना प्रतिनिधित्व मिळावे, नर्मदा प्रकल्पासह इतर सर्व प्रकल्पातील परिक्षेत्रातील आदिवासींच्या संरक्षणाचा प्राधान्याने विचार करूनच अशा प्रकल्पांची उभारणी करावी हे त्यातील काही महत्वाचे ठराव होत.

अशा रितीने तीन दिवसीय साहित्य संमेलन संपले. काही त्रुटी, संयोजनातील अव्यवस्थितपणा वगळता संमेलन उत्कृष्टपणे पार पडले. आदिवासींमधल्या प्रतिभासंपन्न कवी-लेखकांना या संमेलनाने एक वैचारिक दिशा दिली. आदिवासी संस्कृतीचे दर्शन नंदूरबार प्रमाणे याही संमेलनात घडले. अत्यंत शांत वातावरणात हे संमेलन यशस्वीरित्या पार पडले. या संमेलनातील एकूणच वैचारिक मंथनाने महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आलेला आदिवासी माणूस निश्चितच प्रभावी झाल्याचे निदर्शनास आले.

## काटा

अजूनही डोळ्यांसमोर
अविस्मरणीय आठवणी,
का ? ठाऊक नाही
मधाच्या गोडव्याच्या चटक्या
अजूनही
हटत नाही भिरभिरणे
पाकळ्यांचा स्पर्श
वाऱ्याच्या झुळकीचा आनंद
पाकळ्यांच्या बाहुत
आनंद, आभाळ कवटाळण्याचा
पण....
प्रिया, कल्पनाही नव्हती तुझ्या काट्याची
रुतून, आगीने सर्वांग लाल
वणव्यासारखे
मध विषाच्या रुपात,
तोल जावा, आभाळ बाहुतून निसटलं
तरीही सहनशिलता, आसू गिळून
कां ? ठाऊक नाही.
पण, इतरांना आकर्षीत करु नकोस
आवाक्याबाहेर
काट्याचा त्रास
प्रिया, भुंग्याचे एकच सांगणे
काटा काढून टाक
हा दोष तुझ्याच नशीबी
नकळत
काट्याने जीवनाचे वाटोळे,
सर्वांच्या
आणि तुझ्या सुद्धा

- जीवन गेडाम

# मानव मुक्तीचा संदेश देणारे आदिवासी साहित्य संमेलन

## ॲड. विजय साठे

भद्रावतीला जो आदिवासी साहित्याचा प्रवास सुरु झाला तो १९९० च्या अखेरीला ठाणें जिल्ह्यात येऊन धडकला. पालघर येथे डिसेंबरच्या शेवटच्या आठवड्यात आदिवासी साहित्य संमेलन संपन्न झाले. डॉ. नेल्सन मंडेला नगरात साजऱ्या झालेल्या संमेलनाने आदिवासी ग्रामिण श्रमिक जनतेसमोर अनेक प्रश्न निर्माण केलेले आहेत.

संमेलनाची सुरुवात आदिवासी लेखक कार्यकर्त्यांच्या मिरवणुकीने झाली. त्यानंतर उद्घाटन सोहळा पार पाडला. यामध्ये बाबूराव बागुल, काळूराम धोदडे, वाहरु सोनावणें आदिंची भाषणे झाली. या संमेलनात २ कवी संमेलने, भारतीय भाषांमधील साहित्यात आदिवासींचे चित्रण. आदिवासी साहित्या समोरील प्रश्न, आदिवासी स्त्री-वास्तवातली व नाटक सिनेमातली, आदिवासी लेखक कलावंतांकडून अपेक्षा, आदिवासी साहित्याचा आदिवासी चळवळींशी समन्वय, कार्यकर्त्यांच्या दृष्टीकोनातून आदिवासींचे मुलभूत प्रश्न, इ. विषयांवर चर्चा, परिसंवाद झाले.

### आदिवासी साहित्य म्हणजे काय ? :-

आदिवासींनी आदिवासींबद्दल लिहिलेले, गैर आदिवासींनी आदिवासींबद्दल लिहिलेले, अलिखित स्वरुपातले - नाच, गाणी, शिल्प, चित्र, कथा, भारुड, लोकनाट्य, रितीरिवाज, परंपरा या माध्यमातून पुढे येत असलेले अशा अनेक अंगातून आदिवासी साहित्याचा विचार करण्यात येत आहे. 'आदिवासी जीवनाचे वास्तव चित्रण कोणत्याही माध्यमातून ज्यामधे समर्थपणे उभे केले जाते.' त्यालाच आदिवासी साहित्य म्हणावे ही संकल्पना आता दृढ होत आहे. या दृष्टीकोनातून आदिवासींबद्दलचे साहित्य आदिवासी साहित्य आहे की नाही हे तपासता येईल. निरनिराळ्या भाषेतील साहित्याने आदिवासींना योग्य तो न्याय दिलेला नाही. अतिशय थोड्या प्रमाणात का होईना पण निरनिराळ्या भाषेमधे ( हिंदी, बांगला, मराठी, उडिया, इ. ) आदिवासींबद्दल काही ना काही लिहिलेले आढळते. करुणेच्या, प्रेमाच्या, कुतूहल, संताप, निव्वळ प्रसिद्धीसाठी, उपकारकर्ता अशा निरनिराळ्या दृष्टीकोनातून आदिवासींबद्दल लिहिले गेलेले आहे. या आधी जी आदिवासी साहित्याबद्दल संकल्पना मांडण्यात आलेली आहे त्याप्रमाणे आस्तित्वात असलेले ( लिखित स्वरुपातले ) साहित्य आदिवासी साहित्य मानता येणार नाही. त्यामुळे आजपर्यंतच्या झालेल्या साहित्य निर्मितीतून साहित्यकारांनी आदिवासींना न्याय दिलेला नाहीं, असे म्हणणें अतिशयोक्त होणार नाही.

### स्पर्धेच्या युगात आदिवासी साहित्य :-

आजच्या धावपळीच्या, यांत्रिक, इलेक्ट्रॉनिक युगात आदिवासी साहित्याचा, विशेषकरुन जे मोठ्या प्रमाणावर लिखित स्वरुपात आहे, त्याचा निभाव लागत नाही असे दिसते. पारंपारिक नृत्य-संगीताच्या लयी बदलत आहेत, कथाकहाण्यांना मानहानीची वागणूक मिळत आहे. मानवी शोषणावर आधारलेल्या व माणसातील माणूसपण हरवलेल्या या युगात आदिवासी साहित्याची होळी केली जात आहे. मूठभर लोक आपली सत्ता टिकवण्यासाठी आदिवासी साहित्याचा संदर्भ बदलून त्याचा वापर केला जात आहे.

लिखित स्वरुपात येणाऱ्या साहित्यामधे आदिवासी समर्थपणे उभा राहिलेला दिसत नाही किंवा जो फार या क्षेत्रात थोडाफार प्रयत्न होत आहे, त्यास आज वाव दिसत नाही.

**नाटक, सिनेमा व आदिवासी स्त्री :-**

स्वाभिमानी, स्वत:च्या कष्टावर जगणारी, निधर्मी, समानतेची वागणूक देणारी, धीर, मातीतून सोने निर्माण करणारी आदिवासी स्त्री आतापर्यंतच्या नाटक सिनेमामधे दिसत नाही.

मात्र सर्वत्र लोकप्रियता मिळवण्यासाठी, नग्न, अर्ध नग्न-प्रसिध्दीच्या धंद्यात बरकत करण्यासाठी आदिवासी स्त्रीचे अतिशय चुकीचे व विकृत असे चित्र निर्मात्यांनी घडवले आहे. अशा वृत्तींवर जिथे जिथे शक्य होईल, तेथे तेथे प्रहार करायला हवेत.

लोककला, पथनाट्य प्रभावी ठरत असली तरी एकंदरीत लोकनाट्य, लोककला यामधे अजुनही आदिवासी भारावून गेलेला दिसतो. ही एक जमेची बाजू धरुन आदिवासींना न्याय मिळण्याच्या दृष्टीने या माध्यमांचा जास्तीत जास्त व प्रभावी वापर करण्यात आला पाहिजे. लोक कलेतील जिवंतपणा कसा कायम राहील, या दृष्टीने प्रयत्न होणे आवश्यक आहेत.

**श्रमिक आदिवासींच्या आदिवासी लेखकांकडून अपेक्षा :-**

खर सांगायचं तर श्रमिक आदिवासींना आदिवासी लेखक हा प्रकारच माहित नाही. तेव्हा याबाबत आदिवासी लेखकांनी, आदिवासींमधील सुविद्य व्यक्तींनी आदिवासींना खऱ्या अर्थाने न्याय मिळण्याच्या दृष्टीने अंतर्मुख होऊन प्रामाणिकपणे समर्थ व बिनतोड साहित्य निर्माण केले पाहिजे.

**काय आदिवासी साहित्य आदिवासी चळवळींशी बांधिलकी मानते ? :-**

आदिवासींच्या चळवळीचा इतिहास नवीन नाही. निरनिराळ्या प्रकारच्या आक्रमणांविरुद्ध, अन्याय अत्याचाराविरुद्ध आपापल्या परीने आदिवासी अनेक वर्षापासून लढा देत आहे. मुद्दा एवढाच आहे की, एकंदर साहित्य व हल्लीच्या काळात लिखित स्वरुपातले मर्यादित आदिवासी साहित्य-अशा चळवळींबद्दल, संघर्षाच्या वाटचालीबद्दल काय भूमिका घेते ? आतापर्यंत काय भूमिका घेतलेली आहे ?

स्वातंत्र्याच्या लढाईतही असंख्य आदिवासींनी मरण पत्करले. पण इतिहासकारांनी घ्यावी तेवढी नोंद बिलकुल घेतलेली नाही. आदिवासींना चोर, लुटारु, माथेफिरु, दरोडेखोर, असा उल्लेख करुन आदिवासींचा त्यांनी निकाल लावला आहे. हल्लीच्या काळात पुढे येत असलेले तथाकथित साहित्य आदिवासी चळवळींपासून फारच दूर आहे. आदिवासी चळवळींशी आदिवासी साहित्याने आपले सामाजिक कर्तव्य, उत्तरदायित्व समजून आपले योगदान दिले पाहिजे. आदिवासी चळवळीशी आदिवासी साहित्याने आपला संबंध न ठेवणे म्हणजे एकाप्रकारे आदिवासींवरील घोर अन्यायच आहे.

**आजच्या काळातले आदिवासींचे मुलभूत प्रश्न :-**

एकेकाळच्या या भूमीच्या मालकांना आर्यांनी निष्प्रभ करुन सर्व बाजूने पराभूत केले तेव्हा आदिवासींना जंगल दऱ्याखोऱ्यांचा आश्रय घ्यावा लागला. नागरी संस्कृतीपासून आदिवासी दूर राहिले. शतकानुशतके ते या क्षेत्रात मुक्तपणे राहिले. पण ब्रिटिशांच्या रुपात दुसरे आक्रमण आदिवासींवर झाले. तेव्हापासून आदिवासींसाठी अनेक प्रश्न निर्माण होऊ लागले. जंगल, जमीन, पाणी हिरावून घेण्याची प्रक्रिया ब्रिटीश आमदानीपासून आजपर्यंत सुरु आहे. राजकीय स्वातंत्र्यानंतर असंख्य कायदे, योजना करण्यात आल्या पण दुसऱ्या आक्रमणाने जे प्रश्न निर्माण केले होते- अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण, संस्कृती- याबाबतच्या आदिवासींच्या अडचणी दूर झालेल्या नाहीत.

एकंदर प्रक्रियेतून जो मुलभूत प्रश्न निर्माण झाला आहे, तो आदिवासीला तो ' माणूस '

आहे हेच मुळी नाकारण्याचा. आपण त्याला माणूस म्हणून मान्य करीत नाही, त्यालाही काही अस्मिता आहे, हे पचवू शकत नाही, तो 'ढोर' म्हणूनच आपल्या दावणीला हवा आहे अशाच पद्धतीने वागतो, संबंध ठेवतो, योजना कायद्यांचा त्याचप्रमाणे अर्थ लावतो व आपल्याला सुखावण्यासाठी आदिवासींचा साधन म्हणून वापर करतो ही खरी शोकांतिका आहे. हा खरा आदिवासींचा मुलभूत प्रश्न आहे.

**आदिवासी साहित्यिकांची बामणी संस्कृतीकडे वाटचाल ? :-**

आजपर्यंत बामणी संस्कृतीवर प्रचंड टीका करण्यात आली आहे. ती योग्यच आहे, याबद्दल वाद नाही. पण नुकतेच जन्माला येऊ पहात असलेले तथाकथित (रूढ अर्थाने) विशेषकरुन स्वत:ला आदिवासी साहित्यिक म्हणवून घेणारी मंडळी कोणत्या मार्गाने जात आहे, याचा वेळीच शोध घेतला पाहिजे. आपण आदिवासींपासून कोणी वेगळे आहोत काय ? प्रस्थापितांमध्ये संघर्ष करुन स्थान मिळवणे कठीण आहे, म्हणून तर 'वेगळे आदिवासी साहित्य' निर्माण तर करीत नाही ना ? सामान्य, गरीब आदिवासींच्या जिवनाशी नाळ बांधणार की नाही ? आपली प्रतिष्ठेची मूल्ये कोणती ? आपल्याला कोणत्या प्रकारचा समाज निर्माण व्हायला हवा आहे ? आपल्यापुढील आदर्श कोणते- आदिवासी-मानव मुक्तीचे की धिक्कारल्या नाकारल्या गेलेल्या बामणी संस्कृतीचे ? श्रमिक आदिवासींमधे बसायला, त्याच्याबरोबर झोपायला, जेवायला गप्पा मारायला कोठेतरी लाज वाटत नाही ना ? आपल्या साहित्य निर्मितीचा हेतु एकंदर लोक कल्याणाचा आहे की स्वत:च्या प्रसिध्दीचा ? जनसामान्य आदिवासींपासून आपल्याला एक वेगळा गट करायचा आहे काय ? आपण सर्वजण खांद्याला खांदा लावून एका हातात लेखणी (साहित्याचे प्रतिक) घेऊन जाणार की दुसऱ्या हातात भाताचे कणीस (राबण्याचे प्रतिक) घेऊन जाणार की दुसऱ्या हातात एखादे वेगळेच मूल्य (!) घेऊन जाणार ? आदिवासी श्रमिकांची अस्मिता जागवण्याची जवाबदारी आपण मान्य करतो की नाही--- का एखादा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी आपल्याच बंधू भगिनिंना ढोरासारखे राबवून घेणार---असे असंख्य प्रश्न ५ व्या आदिवासी साहित्य संमेलनातून आताच डोकावू लागले आहेत---

**नवळे राजकिय नेतृत्व :-**

आदिवासींनी सतत केलेल्या संघर्षामुळे व डॉ. बाबासाहेबांच्या दूरदर्शीपणामुळे आदिवासींना इतर गोष्टींप्रमाणे सत्तेमधे राखीव जागा मिळाल्या. फार थोडे अपवाद वगळता आदिवासी नेत्यांना स्वत:चे काही म्हणणे आहे की नाही ? आपली काही अस्मिता आहे की नाही अशी शंका त्यांच्या कणाहीन नेतृत्वामुळे येत आहे. गांधीजी म्हणाले होते, 'प्रत्येकाने झोपण्यापूर्वी स्वत:ला विचारावे की आज दिवसभरात मी गरिबातल्या गरीब माणसासाठी नेमके काय केले ?' आज श्रमिक आदिवासी जनता आपल्या नेत्यांना हेच विचारु पहात आहे.

**मानवमुक्ती आदिवासीच करू शकतील :-**

परस्परांवर निस्सिम प्रेम, निसर्ग हीच प्रेरणा, हीच शक्ती, हेच आराध्य दैवत, परस्पर सहकार्य, माणसांवरच नव्हे तर प्राणिमात्रावर विश्वास करणारे, कोणत्याही प्रकारच्या संचयावर विश्वास नाही, माणुसकी, आपुलकी, जिव्हाळा, आदर हाच धर्म मानणारी, सत्य अहिंसेवर विश्वास असलेली आदिवासी संस्कृतीच शोषणमुक्त सामाजिक निर्मिती करील- खऱ्या अर्थाने मानव मुक्ती करील यात शंका नाही.

# पाचव्या आदिवासी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने

- विक्रम कान्हेरे, दहेल, धुळे.

श्री. म. माटे यांचा आम्हाला एक धडा होता. ''भाषाभिवृद्धीची सामाजिक दृष्टी.'' त्यात त्यांनी समाजात जे वेगवेगळे थर, विभाग जसजसे साहित्यात येतील तशी भाषेत भर पडेल, भाषा समृद्ध होईल असे विचार मांडले होते.

पण हा दृष्टीकोन मराठी साहित्यिकांनी किती जोपासला, साहित्यिक चळवळींनी याचे किती भान ठेवले हा प्रश्नच आहे.

साहित्य, कला या गोष्टी अमूर्त वाटल्या तरी त्या मानवी व्यवहाराशी संबंधीत असतात. मानवी व्यवहार घडताना उपयोगितेचा आनंद आपण मिळवतोच. पण व्यवहाराला अनेक अंगे असतात, उपांगे, पापुद्रे असतात. साहित्यिक त्यातलीच अेक किंवा अनेक अंगे रंगवून पुढे आणतो. आणि तोच अनुभव आनंदाची, जीवनाची विविध अंगे जोडणारा, प्रश्न उभे करणारा सखोल प्रत्यय देतो.

उदा. बाजाराच्या गावी चालत जाणारा शेतकरी बाजारातून वस्तू घेऊन येतो. चित्रकार त्या शेतकऱ्याच्या चालीतला डौल, दुःख असे अनेक भाव रंगवतो. कथाकार, दुकानदार, शेतकरी व इतरांचे संबंध रंगवतो. शेतकऱ्याचे दुःख रंगवतो.

साहित्यातून जीवनाचे सुखदुःखाचे, इंद्रधनुषीकरण प्रकट होते, ते लोकांना आवडते. महत्त्वाचे वाटते.

आदिवासी समाज हा शेती करणारे समाज, राजेशाही समाज. औदयोगिक समाजापासून लांब जंगलात राहिलेला. खरे म्हणजे हे विकसित समजले जाणारे समाजही पूर्वीच्या काळी आदिवासींसारखे टोळी जीवन जगत होते.

आज आदिवासींचे साहित्य जसे मौखीक आहे तसेच त्यांचे होते. लिखित नसलेले वेद तसेच होते. मात्र आज वेदांना महान म्हणणारे, त्यात चिरंतन तत्त्व शोधणारे आदिवासींना तुच्छ, मागासलेले म्हणण्यास मागेपुढे पहात नाहीत.

महाभारत हा आमचा ऐतिहासिक ठेवा म्हटले जाते, घरोघरी शाळेच्या पुस्तकात ते शिकवले जाते. भीष्माने अंबा, अंबिकांना पळवून आणले. आदिवासींच्यात हा रिवाज अलीकडे पर्यंत चालू होता. काही ठिकाणी अजूनही चालू दिसतो. म्हणून आदिवासींना, त्यांच्या संस्कृतिला तुच्छ लेखले जाते. आदिवासींना 'गांड धुवायची अक्कल नाही' म्हणून हिणवले जाते. पण आपल्या उष्ण देशात येवूनही कागदाला गांड पुसणाऱ्या इंग्रजाला आणि त्याच्या भाषेला साहित्यिक आणि उच्चभ्रू थोर म्हणून गौरवतात. या गोष्टीतला विरोध, मर्म विसरले जाते.

आम्हीच श्रेष्ठ, आमचीच संस्कृती श्रेष्ठ अशा गोष्टी आज समाजात बलवत्तर होताना दिसत आहेत. अशावेळी आदिवासी साहित्यिक, कलाकार यांना वेगळे संघटीत होणे या साहित्याच्या विकासाला मार्ग दिसला तर त्यात वाईट वाटण्यासारखे काही नाही. अर्थात याचे भान काही मान्यवर साहित्यिकांना आहे. पण वाचक वर्गातील विशेषतः विकत घेऊन वाचणाऱ्या बऱ्याच मोठ्या विभागाला शेकडो वर्षापूर्वी घडलेल्या किंवा न घडलेल्या घटनांचा बदला घ्यावासा वाटतो, किंवा त्यात समाधान ते शोधतात.

आम्ही इस्त्रायली ज्यूंसारखे, हिटलर सारखे जगात श्रेष्ठ ठरु अशी जिंकण्याची, हुकुमशाही भावना मोठ्या प्रमाणात वाढत आहे. आदिवासी धर्म, संस्कृती किंवा शिख, जैन, बुद्ध या धर्मपंथीयांचे सहकार्य घेण्याऐवजी त्यांना गिळंकृत करण्याच्या साहित्य पद्धतीचा अवलंब करणेच योग्य असल्याचा सिद्धान्त आज पसरत आहे. अशावेळी आदिवासी साहित्य संमेलन स्वतंत्र होणेच गरजेचे आहे. मात्र आदिवासी साहित्य संमेलनानेही वरील गोष्टीचा संदर्भ लक्षात ठेवला पाहिजे. गेल्यावर्षी नंदूरबार साहित्य संमेलनात अेक व्यापक व्यासपीठ असे चांगले स्वरुप दिसले. आज आदिवासी समाजापुढेही अनेक प्रश्न आहेत. त्याचे प्रतिबिंब साहित्यात, साहित्य संमेलनात उमटणे साहजिकच आहे. परिस्थितीच्या रेटच्यामुळे असेल किंवा काळाच्या गतीमुळे असेल, नविन जीवनाला सामोरे जाणे आज आदिवासींना अटळ झाले आहे. अशावेळी या सगळ्याशी कसे जुळवून घ्यायचे हा त्यांच्या जीवनातला महत्त्वाचा प्रश्न आहे.

आजचे हे विकसित म्हणवले जाणारे समाज खरोखरच विकसित आहेत काय ? विकासाची वेगळी दिशा, संतुलित दिशा, घ्यायला हवी कां, आजचीच दिशाच योग्य आहे या सारख्या भूमिकांचा सूरही आदिवासी समाजात, साहित्यात उमटणारच. तसेच आजचा विकसित समाज विकसित कसा झाला, हे आतमसाद करुन, समजून घेऊन सन्मानाने कसे, बरोबरीने कसे जगू याबाबतही वेगवेगळे सूर आहेत. उदा.

१. विकास, सवलती, दादा-पुता करुन घेऊ पण त्यांची संस्कृती श्रेष्ठ म्हणून जशीच्या तशी स्वीकारु नये. आपलीही अस्मीताही टिकवावी.

२. विकास हा आमचापण हक्क आहे, त्यासाठी कोणत्या प्रक्रिया, गुण लागतात ते हक्काने समानतेच्या पातळीवरुन आम्हाला मिळायला हवेत.

३. स्वतःला यासाठी बदलताना वाईट गोष्टी सोडू पण चांगल्या गोष्टी टिकवून धरु.

४. विकसित समाज सर्वच बाबतीत श्रेष्ठ आहेत हे आम्हाला मान्य नाही.

हे सर्व वादी-संवादी सुराचे साहित्य, साहित्यिक संमेलनात एकत्र यायला हवेत. त्यांना वाव मिळायला हवा.

आदिवासी समाजात मौखिक साहित्य परंपरा होतीच. आता लिखित साहित्याची परंपरा जोरात आणि डौलात सुरू होत आहे. ती वाढवण्यासाठी आणि टिकवण्यासाठी काही सुचवावेसे वाटते.

१. शिक्षणसंस्था, खेडी, शहरे यातील आदिवासी समाजात वाचनालये सुरु करणे.

२. शिक्षणसंस्था, संस्था, मंडळे यांत काव्यवाचनाचे, कथाकथनाचे कार्यक्रम घडवून आणणे.

३. शिक्षणाच्या प्रसारात कसा सहभाग घेता येईल याचा विचार करणे.

पालघर येथे २३, २४, २५ डिसेंबर रोजी होणारे पाचवे आदिवासी साहित्य संमेलन वादी-संवादी सूरांनी सर्वांगानी मधुर होवो हीच सदिच्छा !

# आदिवासी साहित्य : आदिवासींचे प्रेरणास्त्रोत

प्रा. वामन शेळमाके
भंडारा

**आदिवासी साहित्य चळवळीचा उगम :-**

आदिवासी साहित्य चळवळ खऱ्या अर्थाने सन १९७९ पासून सुरू झाली. पहिल्या आदिवासी साहित्य संमेलनाचे आयोजक आणि प्रणेते प्रा. विनायक तुमराम यांनी एक स्वतंत्र साहित्य व्यासपीठ निर्माण करण्याचे साहस दाखविले, आणि त्यांनी साहित्याचे नवे दालन निर्माण करुन दिले. आपणास असे दिसून येते की, आदिवासी साहित्य चळवळ मोठ्या प्रवाहाने येते आहे. ह्या प्रवाहात खरे आदिवासी जीवन पाहावयास मिळते. अनुभवातून काही तरी वेगळे असे करण्याची जिद्द आज आदिवासी साहित्य चळवळीने बाळगली आहे. स्वतःचे मूळ तत्व आणि त्याच तत्वाला अनुसरून जीवन मूल्ये शोधण्याचे कार्य अदिवासी साहित्यिकांकडून अपेक्षित आहे. आणि त्यावर आधारित लेखन कार्य सुरू आहे हे आदिवासी साहित्य निर्मिती संदर्भात अत्यंत उल्लेखनीय कार्य आहे.

**मराठी साहित्य आणि आदिवासी :-**

आजपर्यंत आदिवासीच्या सच्छील जीवनाचे वास्तविक दर्शन लेखणीतून उतरलेले दिसत नाही. खरे जीवन त्यांनीच जगलेले ! त्यांच्यात राहून भोगलेले वास्तव जगणे म्हणजे आदिवासी साहित्याचे खरे ब्रीद ठरते. आदिवासीचे जगणे म्हणजे निसर्गावर खऱ्या अर्थाने मात करणारे जगणे आहे. त्यांनी कशाचीही इर्षा मनी न बाळगता हिंमतीने सामना करण्याचे जणू व्रतच घेतले आहे, असे सहज दिसून येते. आदिवासी साहित्य चळवळीने नेमके हेच केले आहे. आदिवासी साहित्यिकांनी मूळ निवासी आदिवासींचे वास्तववादी जीवन वाचकांसमोर ठेवण्याचा प्रयत्न चालू केला आहे. फक्त त्यांच्या सत्य जीवनाचे प्रतिबिंब, वेदना आणि विद्रोह आदिवासी कवी लेखकांच्या लेखणीतून साकारलेले दिसते. म्हणूनच खऱ्या अर्थाने ही चळवळ यशाच्या शिखराचे मनोरे चढवित अवकाशाला नक्कीच जाऊन गवसनी घालील हे निर्विवाद सत्य आहे. निसर्गावर जीवापाड प्रेम करणाऱ्या आणि निसर्गनिर्मित वस्तूला दैवत मानणाऱ्या आदिम समूहातील बहुविध जमाती आजही रानोमाळी वास्तवतेचे दर्शन घडवित आहेत. हे आदिवासी साहित्याचे पुरावे कोण नाकारेल ? यातूनच आदिवासी साहित्य निर्माण होणार की नाही ? यात आदिवासी साहित्याची झलक दिसत नाही कां ? हे खऱ्या आदिवासी साहित्याचे प्रेरणास्त्रोत नाही का ?

ह्या सर्वच प्रश्नांच्या उत्तरात सत्यांश दडलेले आहे असा अनुभव आपल्याही पदरी असेलच. आदिवासीचे क्षेत्र हे मनोरंजनाचे क्षेत्र म्हणून महाराष्ट्रातील लोकांचे प्रेक्षणीय स्थळ बनले आहे. मोठ्या कुतुहलाने विचारवंत, समाजसेवक आणि अभ्यासू मंडळी त्यांच्या क्षेत्राला भेटी देऊन केवळ औपचारिक आत्मियता दर्शवितात. परंतु त्यांच्या कला गुणांचा हिरीरीने पुरस्कार करणारी मंडळी साहित्य क्षेत्रात अजूनही उतरलेली दिसत नाही. अर्थ असा, खरा आनंद ज्यामुळे उपभोगतात ते साहित्य आदिवासींचे दर्शनीय आहे असा टोम्पा मारून केवळ माध्यम म्हणून वापर करून त्यांच्या कलागुणांचा स्वत:साठी केवळ फायदा करून घेतात. परिणामी आदिवासी

माणूस अप्रत्यक्षरित्या साहित्यापासून वंचित ठेवला जातो असा त्याचा अर्थ नाही काय ?

## आदिवासी साहित्य म्हणजे काय :-

आदिवासीसाहित्य हे सत्य दर्शविते, आनंद देते, वास्तवतेचे दर्शन घडविते. वनातील हे सारे विश्व मनाला मोहक वाटते. परंतु साहित्यात त्याचे प्रतिबिंब उमटत जर नसेल तर त्यांच्यावर अन्याय होत आहे असा त्याचा अर्थ निघतो. आदिवासी साहित्य चळवळीने नेमके हेच केले आहे. भयाण अरण्यात राहणाऱ्या समस्त आदिवासी बांधवांच्या जीवनाचे वास्तव चित्रण ह्या साहित्यात आज पाहवयास मिळते. कालपर्यंत जे मराठी साहित्यात नव्हते त्यांना साहित्यिक कसोट्या न लावता व त्यांचे साहित्य वाङमयीन निष्कर्षावर न तपासता ते जोपासण्याचे व वाढविण्याचे कार्य होणे गरजेचे आहे. त्यातील वेदनांचा, व्यथांचा सर्वंकष विचार होणे आवश्यक आहे.

एकीकडे आपण म्हणतो की, साहित्यात खरेपणा किंवा जिवंतपणा असावयास पाहिजे. आज आपण उघड्या डोळ्यांनी वनातील कराल दारिद्रय पाहतो तथापि ह्या वास्तव्याकडे दुर्लक्ष का ? म्हणूनच असे म्हणावेसे वाटते की "आदिवासी साहित्य हे आदिवासी पुत्रांच्या मुक्तीचे शस्त्र ठरल्याशिवाय राहणार नाही."

## आदिवासी साहित्य आणि सामाजिक बांधिलकी :-

आदिवासी साहित्याचे भवितव्य उज्ज्वल आहे. इतर संस्कृतींना लाजवेल अशी अप्रतिम संस्कृती आदिवासी समाजाला लाभावी ही एक निसर्गाची देण आहे, आणि त्याचे संस्कृतीचा वारसा घेऊन आदिवासी साहित्याला आदिवासी कवी लेखकांनी आपल्या सामर्थ्याने स्वतंत्र व्यासपीठ व मानाचे स्थान प्राप्त करून द्यावे. ज्याची तुलना इतरांशी कधी होऊ शकणार नाही आणि होणार नाही. स्वतंत्र असे ओळखपत्र आदिवासी साहित्याच्या प्रतिकृतीतून निर्माण व्हावयास पाहिजे.

आदिवासी म्हणजे नीतीचा पुरस्कार आणि अनीतीचा उच्छेद करणारी माणसे. आदिवासी माणसांना पाखंडी माणसाचे जालिम हात अलीकडे ओळखू येऊ लागले आहे. सच्छील व प्रामाणिक जीवन जगणाऱ्या वनवासींच्या जीवनात सत्याची झलक पहावयास मिळते. हेच त्यांच्या यशाचे फलहित होय. कालपर्यंत जे नव्हते ते आज डोळ्यासमोर दिसत आहे. घरात असेल तेवढ्यावर आपला संसार थाटावा अशा स्वभावाची माणसे म्हणजे आदिवासी. स्वत:च्या संस्कृतीला जपणारी दऱ्याखोऱ्यातील आदिम जनता म्हणजे आदिवासी. शहरापासून कितीतरी दूर घोर अरण्यात, दिव्याच्या आणि चांदणाच्या प्रकाशात मौज करणारी माणसे म्हणजे आदिवासी. श्रीमंती आणि सुखसमृध्दीचे शाही जीवन ज्यांनी कधी अनुभवले नाही, फक्त गरिबी, दारिद्रय व दु:ख पचवून सुध्दा दुसऱ्यांच्या जीवनात आनंद ओतणे हाच त्यांचा स्वभाव धर्म. नाचगाण्यात रंगून ते आपली सारी दु:खं विसरुन जातात आणि आपल्या अस्तिमेची राखण करतात.

## आदिवासी साहित्याची वाटचाल :-

सामान्यत: असे दिसून येते की, दुसऱ्यांच्या जीवनात आनंद घेणारी मंडळी आज दारोदार भटकताना दिसतात, असे का व्हावे ? म्हणजेच त्यांच्या नृत्यकलेचा केवळ आस्वाद घेऊन मोकळी होऊ पाहणारी मंडळी काही कमी नाही. त्यांच्या नृत्यकलेचा केवळ प्रदर्शणीय वस्तू म्हणून स्वीकार व्हावा ? म्हणूनच ही अभिजात संस्कृती अबाधित टिकुन ( रहावी ) ठेवण्याची फार मोठी जबाबदारी साहित्यावर आहे. साहित्याची मूळे इतकी खोलवर जाऊन भिडली आहेत की, प्रत्यक्ष साहित्यरुपी वृक्षालाच उपटून काढल्या शिवाय त्याचे अस्तित्व नष्ट करणे शक्य नाही. निसर्ग-निर्मित वस्तूंना जशी चेतना मिळत असते, तशीच चेतना साहित्यरुपी वृक्षाला अनेक रसांद्वारा मिळत असते आणि ते वाढत असते. लाजाळूच्या झाडाला स्पर्श केल्यास त्याची पाने आपोआप मिटतात. आदिवासीच्या भाव भावना स्पर्शून मिटविण्याचा

प्रयत्न केला परंतु ते झाले नाही. उलट ते सतेज झाले. आदिवासी माणसांचे मन लाजाळूच्या झाडाइतके संवेदनशील नाही. त्याची दखल अगोदरच घेतली असती तर साहित्याचे नवे पर्व सुरू व्हायला इतका उशीर झाला नसता. तात्पर्य, आदिवासीचे ( वास्तविक ) वास्तव जीवन आणि प्रस्थापितांनी दाखविलेले जीवन यात फारच तफावत आहे. याची जाणीव त्यांना आदिवासी साहित्य चळवळीच्या कार्यसिध्दीवरुन होईल. याचा आम्हास विश्वास वाटतो. सत्य दर्शनासाठी असत्यांची साथ का घ्यावी ? न्यायाला अन्यायाची बाजू का दाखवावी ? असेच असते तर सृष्टीने सुद्धा आपली दिनचर्या बदलली असती. सत्य मांडताना सुद्धा त्यांचे हात थरकापतात म्हणजेच हातांना सुध्दा असत्य मांडण्याची सवय झालेली दिसते, नाही का ?

**आदिवासीच्या समस्या आणि उपाय :-**

आदिवासी माणसांचे मन मोकळे, निसर्गप्रेमी आणि निसर्गावर पूर्णतः अवलंबून असणारा आदिवासी माणूस कधी सूख समृद्धीकडे वाटचाल करतांना दिसला नाही. दैववादाला धरुन त्यांनी आपला संसार मांडला. दैववाद हा त्याचा उत्कर्षाचा मार्ग नाही किंवा ज्या वनात तो भटकत आहे तो त्यांच्या उत्क्रांतीचा मार्गही नाही. जीवनाकडे पाहण्याचा दृष्टीकोन मूलतः बदलला पाहिजे. शैक्षणिकदृष्ट्या हा समाज जोपर्यंत बलवान होणार नाही, तोपर्यंत उत्क्रांती ही होणारच नाही. त्याच्या उन्नतीचा मार्ग हा शिक्षणातच आहे. जो समाज शैक्षणिकदृष्ट्या पुढे आहे तो समाज लवकरच प्रगतशील आणि प्रगतीच्या पथावर कार्यरत असून त्याची सर्वांगीण विकासाकडे वाटचाल सुरू आहे. परंतु ज्यांच्या परिसरात अजूनही काळोख पसरला आहे. ज्यातून निघण्याचे तंत्र व मंत्र अजूनही गवसले नाहीत अशा आदिवासींच्या मुक्तीचा विसर का पडला बरे ? हीच अवस्था रहावी, असा आग्रह धरणारे लोकही आज आहेत. परंतु राष्ट्रोद्धारासाठी देशातील प्रत्येक कानाकोपऱ्यातील समाज जोपर्यंत अंधाऱ्या अवस्थेतून प्रकाशाकडे येणार नाही तोपर्यंत राष्ट्रोध्दार झाला असे म्हणणे एकांगी वाटते, नाही का ? स्व. वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची कल्पना, ग्रामोद्धारांची पुसली जाणार नाही का ?

भूक नसतानाही काहींना खूप खायला देणे व ज्याला भूक आहे त्यांना काही न देता प्रतिक्षा करावयास लावणे हेच जर संस्कृती शिकवित असेल तर तो धर्म आणि ती संस्कृती समझावी काय ? म्हणूनच आदिवासी साहित्य चळवळीच्या माध्यमातून त्याचे प्रश्न, समस्या आणि वास्तविक जीवन वाचकांच्यासमोर मांडण्याचा प्रयत्न हिरीरीने आणि मोठ्या जिज्ञासेने आदिवासी कवी लेखक करताहेत आणि ही आजची गरज आहे. असा प्रयत्न उपरोक्त चळवळीच्या माध्यमातून होत आहे ही बाब उल्लेखनीय आहे.

**आदिवासी साहित्य हेच मूळ साहित्य :-**

अलिकडे आपापल्या साहित्य चळवळीचे गुणगान करणारी आणि ती चळवळ आहे असे समजणारी मंडळी पहावयास मिळत आहे. परंतु माझ्या मते, आदिवासी म्हणजे मूळनिवासी जो अनादिकालापासून इथे नांदतो आहे. त्यांच्या जीवनावर लिहिलेले साहित्य हेच मूळसाहित्य म्हणजे ''आदिवासी साहित्य'' होय. ह्याचा अर्थ असा की, सर्वप्रथम साहित्य आदिमानव ( यावर ) लिहिले गेले असेल म्हणजेच साहित्याचे मूळ हे आदिवासी साहित्य आहे हे उघड आहे. कारण की, ''आदिवासी साहित्य हे इतर साहित्याचे अपत्य नसून मूळ आहे.'' कालानुपरत्वे आदिवासी साहित्याचा लोप होऊन आपआपल्या सोयीनुसार साहित्याची निर्मिती झाली असावी.

# आदिवासी साहित्य संमेलने

आदिवासी साहित्य संमेलनाची तपशीलवार माहिती देण्याचा हा माझा अल्पसा प्रयत्न. आदिवासी साहित्य संमेलनाची माहिती आदिवासी लेखक कार्यकर्ता परिषद, आदिवासी प्रशिक्षण शिबीर, आदिवासी साहित्यिक मित्रमेळावा इत्यादी विवरण खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | आदिवासी साहित्य संमेलनाचे वर्ष | संमेलनाचे आयोजक | साहित्य संमेलनाचे अध्यक्ष | साहित्य संमेलनाचे उद्घाटक | संमेलनाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| १ | पहिले आदिवासी साहित्य संमेलन १० व ११ नोव्हें.१९७९ | मा. प्रा. विनायक तुमराम | श्रीकृष्णमुर्ति मिरमिरा | आ. प्रा. यशवंत मनोहर | भद्रावती जि. चंद्रपूर |
| २ | दुसरे आदिवासी साहित्य संमेलन २३ व २४ मे १९८२ | श्री राजाभाऊ राजगडकर | डॉ. रावसाहेब कसबे | डॉ. यशवंत शेरेकर | वणी जि. यवतमाळ |
| ३ | तिसरे आदिवासी साहित्य संमेलन ६ व ७ जून १९८७ | श्री राम मिराशे शिक्षक | डॉ. गोविंद गारे | - | किनवट जि. नांदेड |
| ४ | चवथे आदिवासी साहित्य संमेलन २७, २८, व २९ जाने. १९८९ | आदिवासी साहित्य परिषद अंतर्गत | श्री लक्ष्मण माने | श्री लक्ष्मण गायकवाड | नंदुरबार जि. धुळे |
| ५ | पाचवे आदिवासी साहित्य संमेलन २३, २४, २५ डिसेंबर १९९० | आदिवासी साहित्य परिषद अंतर्गत | श्री वाहरू सोनावणे | श्री बाबुराव बागुल | पालघर जि. ठाणे |
| ६ | आदिवासी लेखक कार्यकर्ता परिषद १ व २ ऑक्टोबर १९८३ | महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद पुणे, अंतर्गत | - | प्रा. गं. बा. सरदार | पुणे जि. पुणे |
| ७ | आदिवासी साहित्यिक प्रशिक्षण शिबीर २६, २७, २८ व २९ फेब्रुवारी १९८८ | आदिवासी संशोधन आणि प्रशिक्षण संस्था, पुणे | ॲड. राजाराम मुकणे | डॉ शरदचंद्र गोखले संपादक दै. केसरी पुणे | जव्हार जि. ठाणे |
| ८ | पहिला आदिवासी साहित्यिक मित्र-मेळावा १८ व १९ फेब्रु. १९८९ | आदिवासी साहित्य परिषद अंतर्गत | डॉ. सुभाष सावरकर | डॉ. सुभाष सावरकर | गडचिरोली जि. गडचिरोली |
| ९ | दुसरा आदिवासी साहित्यिक मेळावा ८ मे १९८९ | आदिवासी साहित्य परिषद अंतर्गत | डॉ. भाऊ मांडवकर | डॉ. जयंतराव धावडे | पांढरकवडा जि. अमरावती |

(संकलन : प्रा. वामन शेळमाके)

# “आदिवासी साहित्याचा आदिवासी चळवळीशी समन्वय”

## काळूराम धांगडा

पाचवे आदिवासी साहित्य संमेलन, ठाणे जिल्ह्यात पालघरला भरविण्यांत येणार आहे आणि काळूराम दोधडे ह्या आदिवासीने, ज्याने आपल्या आयुष्याची २० वर्षे आदिवासी संघर्षाला वाहिली आहेत, त्याने ह्या संमेलनाचं यजमानपद सांभाळायचं आहे ह्यात काहीच आश्चर्याची बाब नाही. हे सम्मेलन ठाणे जिल्ह्यातील आदिवासींना अभिमानाचीच बाब आहे. ठाण्यातील आदिवासीच्या संघर्ष लढ्यात गेली ५० वर्षे साक्षीदार आहेत. हा संघर्ष, फक्त जगण्यासाठी, आर्थिक, राजकीय लढ्यासाठीच नव्हता आणि नाहीही आहे.

आपलं स्वतःचं केवळ स्थान, वेगळी ओळख मिळवून ती टिकवून धरण्यासाठी सुध्दा आदिवासी झगडत आहेत.

ह्या सर्व पार्श्वभूमीवर आदिवासी साहित्यातील मूळ प्रश्नांकडे बघणं जरुरीचं आहे. हे मूळ प्रश्न आदिवासीच्या रोजच्या जीवनाशी नातं सांगतात. असे असताना आदिवासी “साहित्यकार” जर ह्या संमेलनाचा उपयोग फक्त पुस्तकी ज्ञानापर्यंतच ठेवणार असतील तर अशिक्षीत, अडाणी आदिवासी बांधवावर तो अन्यायच होईल.

आदिवासी साहित्य म्हणजे नक्की काय ? एका ठराविक मंचावर जमण्याएवढं त्यांत वेगळं काय आहे ? कविता, कथा, कादंबऱ्या, कला किंवा नाट्याच्या क्षेत्रातील आदिवासी व्यक्तिचं काम म्हणजे आदिवासी साहित्य का ? की त्यांच्या कामातील वेगळी जाणीव त्याला आदिवासी साहित्याचं रुप देते ? जर तसं असेल तर ही वेगळी जाणीव येतेच कुठून ? मग आदिवासी साहित्याचं काय, जे शतकापासून जगण्याचा भाग म्हणून राहिलंय, पिढ्या-पिढ्यांनी सांभाळलंय, पण आजच्या साहित्याच्या व्याख्येत त्याला स्थान नाही ? मग आदिवासी साहित्य म्हणून मान्यता पावलेले साहित्याशी ह्या सम्मेलनाचं नक्की नातं काय ? आज अस्तित्वात असलेलं साहित्य उद्याच्या संघर्षात किती भागीदार आहे ? [ उद्याच्या संघर्षाची कितपत तयारी करत आहे ? ] ह्या मूळ प्रश्नांचा अभ्यास-शोध घेण्याची आज जरुरी आहे, हा शोध तिथपर्यंत चालला पाहिजे जिथपर्यंत ह्याची उत्तरं आपल्याला भेटत नाहीत. लोकसमूहाचं साहित्य हे त्यांच्या निर्मितीक्षमता, सर्जनशक्तिचं प्रतिक असते. एकाबाजूने ते अत्यंत वैयक्तिक, व्यक्तिनिष्ठ असते पण व्यक्त होतांना वस्तुनिष्ठ जाणीवांच्या आधारानेच जन्म घेते आणि ह्या संदर्भाची बंधनं तोडून वेगळ्या पातळीवर पोहचतं.

साहित्य एकाच वेळेला संस्कृतीची जाणीव देते आणि त्याच वेळी ते संस्कृतीचा एक भाग असते. ह्या जाणीवांना जाग आणताना आपल्या सर्जनशीलता दुसऱ्या पर्यंत पोहचवण्यासाठी ते अर्थाचा एक नविनच आकृतिबंध तयार करते. साहित्य लोकसमूहाने घडवलेले असते आणि लोकसमूहही साहित्याने घडतो.

आदिवासी साहित्याच्या वेगळेपणाच्या शोधात म्हणूनच आपले मूळ शोधण्याची गरज आहे. मुद्दाम ठरवून किंवा परिस्थितीने ठरविल्यामुळे आदिवासी हा जंगलात वाढला आहे. जंगलाशी देणं घेणं करतांना तो बाहेरचं

जग विसरला आहे, बाहेरच्या जगाने मात्र सोयीस्करपणे ह्यांच्या चुकीचा अर्थ लावून त्याला एकलकोंडा टाकला आहे. ह्या सगळ्या परिस्थितीने आदिवासी संस्कृती ही बाहेरच्या संस्कृतीपेक्षा वेगळी म्हणून जगली आहे, वाढली आहे. म्हणूनच आदिवासी साहित्य जर समजून घ्यायचं असेल तर आदिवासी संस्कृतीच्या मुळाशी जाणं अत्यंत जरुरीचं आहे. असं करताना भूतकाळाला उगाचच खोटा सोनेरी रंग देण्याचा माझा उद्देश नाही आहे. आदिवासी जीवनाचं पहिलं महत्त्वाचं गृहित-तत्व म्हणजे एकोपा.

तत्वज्ञान, माणूस, इतर जीवन आणि निसर्गाच्या एकगीत, परस्परसंबंधाचा, नात्याचा पाया. ह्या एकोप्याच्या भावनिक तत्त्वज्ञानामुळे सामूहिक जीवनाची परस्परांवर अवलंबून जगण्याच्या पद्धतीला रुप दिलं. जगायचं ते आनंदासाठी, समाधानासाठी आणि काय करायचं ते आनंदाने जगणं शक्य व्हावं म्हणून जरुरीपेक्षा लौकिक वस्तू वा प्रत्यसंचय ह्याला मान्यता नाहीच.

देण्या-घेण्याच्या सामुहिक अस्तित्वाच्या पध्दतीने जीवनच मुक्त बनवलेले आहे. निसर्गाची सर्व रुपं, देव, देवता, आत्मे माणसांमाणसांबरोबर माणसाचे सोबती होऊनच राहतात.

दुसरं गृहीत तत्त्व [ नाण्याची दुसरी बाजू ] म्हणजे वैश्विक एकात्मकता. मानवाची निसर्गाशी आणि मानवाची आपापसातही हे नेहमीच्या जगण्यात जरी तंतोतंत पाळलं नाही तरी तत्त्व म्हणून तर नक्कीच मानण्यात आलं आहे. प्रत्येक जीवाला जगण्याचा आणि निर्मितीचा नैसर्गिक हक्क आहे. माणूस ह्या साखळीचा मालक किंवा निर्मितीचा राजा नाही तर फक्त ह्या साखळीतला एक दुवा, इतर घटकांशी जाणीवांचे नाते जोडणारा एक घटक. ह्या तत्वज्ञानाने जगण्यात एक प्रामाणिकपणा आणला. शोषण करण्याच्या विरुध्द आणि दुसऱ्याचं शोषण करण्याच्या विरुध्द तितकाच सारखा प्रामाणिकपणा. ह्यातूनच सामूहिक राहाण्याची, जगण्याची, आणि जगवण्याची एक गरजच निर्माण झाली. आयुष्याचा ती एक भागच बनली. ह्याच कारणाने प्रचलित संस्कृतीने आदिवासी संस्कृतीला बदलण्याची, वळवण्याची क्रिया सुरू झाली. संस्कृती, जीवनपद्धती, आयुष्याचा मूळ पाया, तत्त्वज्ञानाच बदलू लागले, आदिवासीला, आणि मुख्यत: शिक्षीत आदिवासीला प्रचलित मानव संस्कृतीचे अनुकरण करण्याची, त्या संस्कृतीकडून आपली पाठ थोपटून घेण्याची गरज वाटू लागली. आता आदिवासी आपल्या मूळ संस्कृतीपासून दूर फेकला जात आहे. मुळापासून उखडला जात आहे आणि काहीतरी पकडून ठेवण्याच्या धडपडीमध्ये संपूर्ण वेगळ्या परक्या संस्कृतीची मूल्य, विचारधारा, आचार ह्यांचं अनुकरण करतां करतां अजाणता त्यांचा प्रसारही करत आहे.

बहुतांशी आदिवासींमध्ये अगदी अलिकडच्या काळापर्यंत लिहिण्या-वाचण्याच्या कलाचं महत्व नव्हतं. त्यांना विशेष गरजच वाटली नव्हती. अगदी आजही लिहिण्या-वाचण्याचं महत्त्व फक्त थोड्या लोकांपुरतंच मर्यादित आहे. आणि ते ही आधीच मर्यादित असलेल्या नोकरीच्या बाजारात ज्यांना पाउल टाकायचं आहे त्याच थोड्या लोकांपुरतं. आदिवासी साहित्य निर्मिती म्हणूनच एका वेगळ्याच भाषेतून झाली. शरीराच्या भाषेतून, सुरांच्या भाषेतून, तालाच्या भाषेतून, डोळ्यांच्या भाषेतून, कधी-कधी शब्दांच्या देण्याघेण्यातून. कधी उक्तीमधून तर कधी कवितेमधून ! आदिवासींचं हे साहित्य निर्माण झालं तर ते मुक्तीसाठी-- मुक्ती साहित्याची, समाजाची. आदिवासी साहित्यांचा 'प्रचलित' 'राजरस्ता' तर हाच आहे. मानवाच्या सर्जनशीलतेला मुक्त रुप देणारा.

आदिवासी साहित्याचे वेगळेपण त्यांच्या जगण्याच्या तत्त्वज्ञानाशीच बांधिलकी सांगतं. जिथे सहभाव, सामुहिकता, परस्परावलंबित्व, समानता ह्या मूल्यांचा उत्सव साजरा केला जातो. लौकिक वस्तूंच्या देण्याघेण्याने एक सामूहिक संस्कृती तयार झाली. निसर्ग आणि माणसाचे एकमेकांच्या

आधाराने जगणं आणि जगू देणे हेच आदिवासी संस्कृतीचं मूळ तत्वज्ञान आहे हे तर वेगवेगळ्या संशोधकांनी, विद्वानांनीही दाखवून दिलं आहे. आदिवासी आणि बाहेरील संस्कृतीच्या नात्यात मग शोषणच केंद्रीभूत राहिलेले आहे. आदिवासींच्या माणसावरच्या विश्वासालाच धक्का पोहचला आहे. बाहेरील समाजाने आदिवासींचे नेहमीच शोषण केलेले आहे, त्यांना वापरलं आहे आणि परावलंबी करण्याचा प्रयत्न केला आहे.

ह्या समाजाचा संघर्ष म्हणूनच फक्त शोषणापासून मुक्ती मिळविण्यापर्यंतच मर्यादित न राहता तो जगण्यासाठी चाललेला लढा आहे.

कांही संशोधकांनी दाखवून दिलं आहे की, आदिवासी ब्राम्हणी संस्कृतीपासून नेहमीच दूर राहिले. ज्याला ते शेंडीधर्म म्हणून संबोधतात. पाचव्या पायरीवर त्यांना स्थान देणारा त्यांचा धर्म त्यांच्या संस्कृतीशी नाते जोडू शकला नाही. आदिवासींनि हिन्दू संस्कृतीच्या पकडीपासून लांब राहण्यासाठी सातत्याने झगडा दिला आहे आणि तरीही, किंबहुना म्हणूनच आज त्यांचं सामाजिक स्थान जातीव्यवस्थेच्या बाहेरील सर्वात नीच जातीपेक्षाही खालच्या दर्जाचं होऊन राहिलेलं आहे.

पण स्वातंत्रोत्तर काळात मात्र निवडून परके, बाहेरील लोक उघड उघड शोषणकर्ते म्हणून ओळखू येईनासे झाले. परिणाम हा झाला की स्व-रक्षणाची नैसर्गिक जाणिव आणि गरज जरा बदलली गेली. आदिवासी बेसावध झाला आणि नेमक्या ह्या मुद्याच्या स्पष्टीकरणासाठी माझ्या वारली समाजाच्या साहित्यातील घटकांकडे बघण्याची मला गरज वाटते. नाच आणि संगीत हे वारलीचंच नाही, तर इतर आदिवासींच्या जगण्याचा एक अविभाज्य भाग आहे. वारल्यांना तर तारपा, असो की देव असो की कामडी असो नाच म्हणजे सामुहीक क्रिया आहे;

जिथे आदिवासी वस्ती एकसंच ठेक्यावर नाचण्यांत मग्न होते. बाई-पुरुष, लहान-थोर ह्यांत भेदभाव नाही. आणि नाचाच्या पद्धतीही जणू पूर्ण गटासाठी बनवलेल्या असतात. ह्यांच्या उलट 'कोकण्यांचे' नांच (आदिवासी ह्या बाजूला येण्यापूर्वी आणि त्यांचं आदिवासीकरण होण्यापूर्वी त्यांचं पुरेस संस्कृतीकरण झालं होतं) मुद्दाम बसविलेले, कलाकुसर केलेले जास्त सुशोभित असतात आणि त्यांत फक्त पुरुषच भाग घेतात. बायका फक्त बघण्याचं काम करतात.

आज वारली नृत्यावर व्हिडीओ आणि डिस्कोडान्सची सावली पडली आहे. हा नाच आवडीने नाचणारी आताची मधली पिढी कदाचित शेवटचीच असेल. कारण त्यांची तरुण मुलं-बाळं डिस्कोच्या गुंगीत हुरळून चालली आहेत.

वारली चित्रकला ही चौकापासूनच सुरु होते. आज मात्र चित्रकलेस व्यावसायिक रुप देण्यात आले आहे आणि ती पुरुषांच्या हातात गेली आहे. चौक (लग्नाच्या पालखीचं प्रतिक) हा सुवासिनींनी 'ढावलेरीणीच्या (ज्या स्त्रिया लग्न लावतात) मदतीने काढायचा असतो.

वारल्यांमध्ये 'झोळी' (मुलाचं बारसं-ज्याने मूल कुटुंबाचा, समाजाचा भाग होतं) आणि लगीन (ज्याने स्त्री पुरुष प्रौढ जबाबदार नागरिक होतात) ही दोन्ही महत्वाची कार्य स्त्रियांच्या हातूनच होतात. समाजाच्या ह्या दोन टप्प्यामधील बायकांना दिलेले हे स्थान पूर्वीच्या सामाजिक समतेच्या लैंगिक समतेच्या काळाची आठवण करुन देतं. बाईचे हे स्थान आर्थिक आणि सामाजिक प्रक्रियेतील तिच्या महत्वाच्या कार्यांना मान्यता देणारे आहे. पण आजच्या 'सुधारलेल्या' पिढीला मात्र 'भट' आणि त्याच्या मंत्राची गरज वाटते.

वारली धर्माकडे नजर टाकता तर डोळे खाडकन उघडतात. (मी स्वत: नास्तिक आहे) आत्मे आणि देव माणसाच्या, समाजाच्या, बरोबरीनेंच राहतात आणि जेव्हा माणूस त्यांच्याशी फटकून वागतो, त्यांचा अपमान करतो तेंव्हा मात्र ते रागावतात आणि शिक्षा करतात. पूर्वजालाही आपल्या टोळीबरोबरच रहायचं असतं. त्याची

आठवण म्हणून एक दगड जरी उभा केला तरी त्याचं समाधान होतं 'धार्मिक' सण सुद्धा एकत्रितपणे श्रमाच्या आणि वस्तूंच्या सामुहिक हातभारानेच साजरे होतात, सर्वांना दिला जाणारा हिस्सा पण सारखाच असतो. माणसां-माणसांतच नव्हे तर देवांसाठी सुद्धा-ताडी, दारु, जेवण, मटण सगळ्यांना सारखंच! भगताला (पुरोहित) सुद्धा वेगळे विशिष्ट स्थान असून हिस्सा मात्र सर्वांबरोबर, सर्वांच्या इतकाच मिळतो. देवाच्या नावावर, धर्माच्या आधाराने ते काही कमाई करत नाहीत. समाजासाठी केलेल्या कर्तव्या-व्यतिरिक्त त्यांच्याकडे पूजाही इतरांपेक्षा जास्त नसते. (इतरांप्रमाणेच ते गरीब शेतकरी किंवा शेतमजूर असतात) रितीभाती, नीतिनियम हे फक्त सामाजिक मान्यतेचा भाग असतात. आत्मे, देव ब्राम्हण-पुरोहीत ह्यांचा दबाव चालत नाही. धर्मसुद्धा सहकार्य, सहचर्य, समभाव सारखेपण ह्यांचाच उत्सव असतो.

आदिवासी साहित्यांचा चौथा भाग म्हणजे कथा, कहाणी, आख्यायिकेला जीवनांत असलेलं स्थान. निर्मितीच्या धार्मिक कहाण्यांना जरा बाजूला ठेवून जरा सामाजिक-राजकीय कहाण्यांकडे पाहूया. ह्या कहाण्यांची आदिवासी आयुष्यांत एक महत्वाची जागा आहे. कांही कहाण्या आपला इतिहास सांगतात. आपल्या दृष्टीकोणातून कहाणी सांगणारा ती अशा साध्या-सुध्या मनोरंजक तऱ्हेने अशा भाषेत सांगतो की लहान पोराला समजायला सुद्धा अडचण येवू नये. पण अगदी बारीक-सारीक आर्थिक-राजकीय उलाढालींचं ज्ञान ही व्हावं. 'उंदराच्या कहाणीत' कहाणी सांगणारा गोट्या गेल्या १०० वर्षांचा इतिहास किती सोप्या मजेदार तऱ्हेने सांगतो. आधी वरकमाईच गेली. मग कवटकऱ्यांचं शोषण सुरु झालं. मग काम करायला आवश्यक अशी वस्तू गेली, आणि शेवटी तर कष्टकऱ्यांचं शरीरही शोषणकर्त्याने लुटलं.

यम आणि पारश्यांच्या कहाणीमध्ये कहाणी सांगणारा पारश्याला (दारु विकणारा) मृत्यूचा दूत म्हणून उभा करतो. जवळ जवळ शतकापूर्वीच्या ह्या कहाण्या पूर्ण अर्थगर्भ आणि मर्मभेदक आहेत.

काही कहाण्या पुरुष प्रधान समाज व्यवस्था आणि भांडवलशाही समाजव्यवस्थेच्या विरुद्ध उठाव करणाऱ्या आहेत. काही कहाण्या माणूस आणि निसर्गाच्या त्या त्या अर्थ लावू पाहणाऱ्या तर कांही पक्षांच्या, झाडांच्या- ज्याला ओढ आहे. तो त्यांचा अर्थ लावावा अशी साहित्य संपत्ती जी नंतर जन्म घेतलेल्या साहित्यापेक्षा कित्येक पटीने उजवी आहे. कहाणीवाला (थाळीवाला) वस्तीच्या बरोबरीने बसून मजेने, आनंदाने गोष्ट रंगवतो पण जर 'ऐकणारे नसतील तर तोंडातून शब्द काढणार नाही.

मला वाटतं आदिवासी आणि त्याच्या साहित्याचं वेगळेपण पटवून देण्यासाठी एवढे मुद्दे भरपूर आहेत. आदिवासींनी जपलेल्या मूल्यांची कधी कधी झलक दिसते, ती जिवंत होतात. पण सध्या तरी ती झाकाळलेली आहेत.

काही वैकल्पिक, पर्यायी विचारवंताशिवाय त्यांचा पुरेसा आभासही केला गेलेला नाही की आतापर्यंत अस्तित्वांत असलेल्या साहित्य संपत्तीचं आपल्याला पूर्ण ज्ञान ही नाही.

आपल्या पिढीसमोर ह्या संपन्न परंपरेशी नातं जोडण्यांचे चांगलं तेच जतन करण्यास आपल्या साहित्याला त्याचा आधार देणारं एक आव्हानच उभं आहे.

आज गरज आहे आपल्या साहित्यांचे मूळ शोधण्याची,त्यांना मजबूत करण्याची आणि त्याच्या आधाराने इतर समाजाशी नातं जोडण्याची, जे नातं समानतेचं, समजुतीचं असेल, मानवतेचं प्रतीक असेल.

ह्या सगळ्या प्रश्नांची वाट आपल्याला साहित्य आणि सामाजिक संघर्षाकडे घेऊन जाते. आदिवासी जनसाहित्य आणि जन-संघर्ष असं म्हणणंच जास्त उचित होईल.

गृहीत तत्व हेच की-चळवळ, संघर्ष हा सामाजिक अस्तित्व आणि जाणीवेंचं मूळ

आहे. सामाजिक जाणीवांचं ज्ञान होण्यासाठी चिंतनातून प्रगट झालेला संघर्ष अस्तित्वाची ओळख करुन देतो आणि इतिहास घडवतो.

संघर्ष-श्रमजिवींचा माणूस म्हणून जगण्याचा हक्क ठासून सांगणारा, इतिहासाशी जबाबदारीचं नातं सांगणारा, समानतेच्या तत्त्वावर सामाजिक उभारणी करु पाहणारा, जिथे जीवन समानतेचं आहे, बरोबरीचं आहे. उद्याच्या समाजाची विचारांती ठरवलेली स्वप्न ह्या संघर्षाचा आधार आहेत. आदिवासी संस्कृतीकडे बारकाईने पाहिल्यास ह्या सर्व विचारांचा एकसंध धागा सापडतो. निसर्ग आणि मानवाच्या एकगीत समायोजनाने तयार झालेला उद्याचा समाज शोषणाने नष्ट होत चाललेला पूर्वीला पुनरुज्जीवन देईल. हव्यास, शोषण आणि स्पर्धा द्रव्य ह्यावर मात करुन माणुसकीने एका समजुतदार समाजाची उभारणी तेव्हा होईल. मग ह्या संघर्षाला आदिवासींयांच्या अस्तित्वाच्या आणि जडणघडणीच्या विशिष्ट दृष्टीकोणाचा विकसित होणाऱ्या जाणीवांना रुप देईल.

नवीनच सापडलेल्या ह्या भूमिकेमध्ये साहित्य स्वत:च्याच मुळाशी जातं, आपल्या प्रतिमांची जाणीव करून देतं आणि देवाण-घेवाणीची दारं उघडतं.

भूतकाळ आणि भविष्यकाळामधील सातत्याचा संवाद साधण्याची, परंपरा आणि इतिहासापासून जाणीवांना सचेतन करण्याची भूमिका करतं.

त्याच इतिहासाला आणि परंपरेला बदलत्या प्रगल्भ जाणिवांच्या दगडांवर घासून तल्लख करण्यांचं त्यातून पाहण्यांचे कामही करतं.

एका नव्या जाणिवेने नव्या जगण्याला जन्म देतं.

'साहित्य ! व्यक्ती आणि समाजाच्या जाणिवांची मुक्ती !
मर्यादित-उच्चभ्रु जाणिवांना आवाहन देणारा संघर्षशील समाजाचा आवाज !

## लाचारी

भूक ! कितीतरी प्रकारची
समाजात वाढणारी
समाजच वाढवतो
पण नकळत
पोटाची भूक, शरीराची भूक
जमीन-अस्मानचे अंतर
तरीही हवी असणारी
वासनेचे डोंब उसळतात
आगीसारखे
बळी पडतात निष्पाप जीवांचे
जाळ्यात अडकणाऱ्या कोळ्यासारखे
सारा समाज पोखरलाय्
वाळवी लागलेल्या लाकडासारखा
पैसा बोटावर खेळवतो
वासनेने वळवळणाऱ्या जंतूसारखा
भुकेने अत्याचार होताहेत
अत्याचारातून अनाचार
कारण पोटाच्या टीचभर खळगीसाठी
प्रत्येकजण लाचार

- सौ. कांचन बोंबले
गडचिरोली

THE MAHARASHTRA ASSOCIATION OF ANTHROPOLOGICAL SCIENCES

# स्त्री मुक्ती व आदिवासी साहित्य

## सौ. संघजा मेश्राम

'स्त्री मुक्ती' आणि 'साहित्य' हे दोन्ही जिव्हाळ्याचे शब्द व विषय तसे मोठे आहेत. आणि त्यांच्या तुलनेचा, संबंधाचा व परिणामांचाही परीघ मोठाच आहे. तेव्हा माझ्या सोयीसाठी दलित व आदिवासी स्त्रिच्या संदर्भातून या विषयावरील माझे छोटेसे टिपण आहे.

मराठी साहित्यात काही वर्षांपासून 'सामाजिक बांधीलकी' या विषयावर आग्रही प्रतिपादन करण्यात येते. दलित, ग्रामीण व आदिवासी साहित्याने तर या सामाजिक बांधिलकीची क्षितिजे रुंदावण्यास पुढाकार घेतला आहे. मात्र 'स्त्री-मुक्ती' वर या तिन्ही प्रवाहात पुरेशी चर्चा होतांना दिसत नाही असे वाटते. त्याची कारणेही असतील, परंतु या तिन्ही प्रवाहातून नव्या दमाच्या लेखिका व कवियत्रींच्या उगमाने या विषयाशी संबंधित प्रश्नांना वाव मिळण्यास जागा आहे. याचा अर्थ केवळ स्त्री लेखिकांनीच स्त्रीमुक्तीचा विचार आपल्या कलाकृतीतून मांडला, असे नव्हे. परंतु दलित साहित्याला समृद्ध करण्यासाठी दलित लेखकांनी जसे जास्त मेहनत घेतली, तसेच स्त्री लेखिकांनी आपापल्या माध्यमातूनही अभिव्यक्ती मांडली आहे. त्यात जशा विद्या बाळ, पुष्पा भावे, नलिनी पंडित आहेत तशा कुमुद पावडे, मल्लीका अमरशेख, मीना गजभिये ही आहेत. या सोबत सीमाताईंचा दरारा, विद्युत भागवतांचा व्यासंग, नजूबाई गावीतांचे नेतृत्व अशा बाबीही आहेत. यांची यादी अशी बरीच वाढेल आणि म्हणून व्यापक अर्थाने स्त्रीमुक्तीच्या संदर्भात स्त्री लेखिकांचे सोईनुसार वर्गीकरण अनावश्यक वाटते. आज एखादा इझम किंवा वाद कथा, कविता किंवा कादंबरीतून कसा मांडावा हा प्रश्नच आहे. कारण त्यातून कलाकृतींचा पोत बिघडण्याची शक्यता वाटते. एखादा इझम हा वैचारीक लिखाणापुरता मर्यादित ठेवून कथा, कवितांतून तो शिथिल करुन त्यात युनिव्हर्सल टच यावा असे आमच्या-सारख्यांना वाटते. हे सांगण्याचे कारण 'स्त्री मुक्ती' हाही साहित्यातून केवळ प्रचाराचा विषय किंवा इझम होऊ नये हे माझे आग्रहाचे सांगणे आहे. दलित आणि आदिवासी 'स्त्री' चे चित्रण बलात्कार, आणि दारिद्रय यात होतांना दिसते. त्यात तेच सातत्य येणे अटळ असेल तर स्त्रिच्या सूक्ष्म व गुंतागुंतीच्या भावविश्वाकडे व तणावाकडे दुर्लक्ष होईल. ढोबळ चित्रणातून दलित/आदिवासी स्त्री असहाय्य व लाचार साकार होतेय.

जाहिरातीसाठी जसा स्त्रियांचा उपयोग केला जातो. तसा विवक्षित प्रश्न मांडण्यासाठी स्त्रियांच्या अशा चित्रणाला ही प्रचार चिकटतो. प्रा. जनार्दन वाघमारे म्हणतात 'दलित लेखकांनी फिजिकल पातळीवर स्थिर न राहता, मेटा-फिजिकल पातळीवर जाऊन चित्रण केले पाहिजे'. मला वाटते वाघमारे सरांचा हा संदेश मराठी साहित्यिकांना अंतर्मुख करणारा आहे. स्त्रीमुक्तीचे साहित्यात प्रतिबिंब मांडताना 'मेटा-फिजिकल' अथवा त्याही पुढचे टप्पे मांडायला हवेत.

आजची व्यवहारातली आदिवासी स्त्री अडाणी असेल पण ती धीट आहे. आदिवासींत आजही मातृसत्ताक पद्धतीचे अवशेष आहेत. त्यांच्या देवदेवतांही स्त्रीलिंगी आहेत. पुरुषांनी

कष्ट करायचे, स्त्रियांनी व्यवहार करायचा ही रीतच आहे. वरील कारणांमुळे आदिवासी-दलितांत स्त्रीमुक्तीची चळवळ लवकर वेग धरु शकेल. आदिवासी कवयित्री उषकिरण आत्राम म्हणते -

'कखत्या थंडीत केस धुवून लुगडं नेसल्यावर
डोक्यातली फणी खोवत
गळ्यातली बंदी-गुंजा शिंपल्यांची माळ ती निरखू लागली आरसा :
तेव्हा नवरा कडाडला ढोलासारखा
'राणे, एवढा शिणगार करु नको
रानीनं फुलावं काट्यात
बाजारातल्या डोयाले आग लावणं बरं नोहो !'
होआचं असलंच त
पयसाची लाल आग हो
बिब्याची फुलं हो
अंगाअंगातून शिकव पोराबाराले अंगार
तोच तुहा शिणगार !'

दलित-आदिवासी स्त्रीला आता केवळ फेर धरुन नाचणारी, किंवा अंग गोंदूण घेणारी मूर्ती म्हणून म्युझिअममध्ये ठेवायची नसून तिला अधिक सुसंस्कृत व धीट करायची आहे. म्हणून या साहित्य प्रकारात संस्कारक्षम अभिव्यक्ती अधिक सबळ ठरते. आज तसेही बाल साहित्य चांदोबा, इसापनिती, पंचतंत्र वगैरे भोवती फिरते आहे. स्त्रिमुक्तीच्या व बांधिलकीच्या संदर्भात आज दलित, ग्रामीण व आदिवासी साहित्यात बालसाहित्याचा नव्याने विचार होण्याचीही गरज आहे.

आमचे दलित लेखक सामाजिक समता मांडायला निघालेत खरे. परंतु "स्त्री-मुक्ती" ही संकल्पना त्यांना उपरी वाटत असावी असे दिसते. कारण एकदा निव्वळ प्रश्न मांडायचे म्हटल्यावर माणूस त्यांचा क्रम लावतो. त्यात "स्त्री-मुक्ती" चा प्रश्न किती वरचा हे चित्र स्पष्ट नाही, असे वाटते.

हिरा बनसोडे म्हणतात,

"यशोधरे !"
तू विरहाचे विष प्यालीस
राहुलला वाढवलेस, किती खस्ता खाल्ल्यास,
आज,
विहारात पाहते मी तथागताला-- बुद्धाला,
तू मात्र कुठेच दिसत नाहीस !"

मला वाटते, स्त्रिच्या नाजूक वेदनेचं हे किती बोलकं चित्रण आहे ?

मीना गजभियेच्या या ओळी बघा, प्रत्येक स्त्रीमनाला मुक्ती बद्दल असेच वाटत असेल का ?

"मी आपल्याच समाधानात
बीजं पेरून ठेवल्याच्या.
इथे तर आधीच प्रतिकाराची तयारी सुरु
मी साशंक,
एका तरी बी-पासून
तयार होईल का पिंपळवृक्ष ?"

किंवा मल्लीका अमरशेखच्या खालील ओळी त्या स्त्री मुक्तीच्या किल्ला नेटाने लढवतांना दिसतात

"संभावित सूर्यासारखे तुम्ही नेहमीच निर्विकार असता नित्यनेमाने पाठ फिरवून चालायला लागणारे, तुमचे विचार मुरलेल्या लोणच्यासारखे बंद बरणीत. सारं पंचतंत्र तोंडपाठ असतंय तुम्हाला. तुम्ही हुकुमाचे पत्ते हातात ठेवूनच नेहमी खेळता"

दलित साहित्य हे प्रस्थापितांविरुद्ध, हिंदू संस्कृतीविरोधी व व्यवस्थेविरोधी अटळ होते. मात्र स्त्री मुक्ती किंवा सामाजिक समतेला आपल्या कलाकृतीतून मांडताना आपला स्त्रीमुक्तीचा लढा आपल्यासकट इथल्या विषम-व्यवस्थे विरुद्ध असून तो वस्तुनिष्ठ राहिला पाहिजे याचे भान संबंधित लेखक/लेखिकांना ठेवावे लागणार आहे. तरच साहित्यात आदिवासी स्त्री-मनाचे किंवा स्त्री-मुक्तीचे क्षितीज अधिक फुलत जाणार आहे.

# मराठी साहित्यातील आदिवासी स्त्रीचे चित्रण

## सौ. संघजा मेश्राम

आदिवासी साहित्याचा उगम झाल्यावर, आदिवासी लेखक व विचारवंतांकडून आदिवासींवर लिहिल्या गेलेल्या ग्रंथांची किंवा संशोधनाची चिकित्सा होऊ लागलेली आहे. काहींनी विस्कळीत पण नव्याने, आदिवासींचा काही इतिहासाचा भाग मांडण्याचा प्रयत्न केला. यामुळे आदिवासींवरील लिखाणाचे पूर्वसुरींचे व नवीन असे भेद उघड दिसू लागले.

मराठी साहित्यात आदिवासींचे प्रतिबिंब जरुर पडले आहे. पण हे लेखन भूतदयावादी दृष्टीतून आले, असा त्यावर आरोप आहे. आणि त्यात तथ्य आहे.

आज स्त्री-मुक्तीच्या चळवळी मध्यमवर्गात व शहरांत आहेत. आदिवासी स्त्री अजून वरील अनेक संदर्भापासून दूर आहे. आणि तिला दूर ठेवण्यातही आले आहे. मराठी साहित्यात व चित्रकलेच्या प्रांतात आदिवासी स्त्रिचे चित्रण आले आहे. त्याच स्वास्थ काय, त्याने साहित्यात कोणते प्रश्न निर्माण केले ह्यांचे विवेचन करणे हा माझ्या या टिपणाचा उद्देश आहे.

मराठी साहित्यात आदिवासी स्त्रिचे चित्रण असंस्कृत, लाचार, बलात्कारित, परित्यक्ता अशा प्रकारचे दिसते तर चित्रकलेतील आदिवासी स्त्री ही उत्तान, अर्धनग्न, स्वैर किंवा मुक्त अशी दाखवली गेली, हा एक फरक साहित्य व चित्रकलेच्या संदर्भात असला तरी दोन्ही प्रकार मी अत्याचारी असेच समजते.

जे. पी. सिंघल नावाचे चित्रकार व फोटोग्राफर बस्तर मध्ये जातात, तेथील अर्धनग्न स्त्रियांचे पोझेस काढतात व ती चित्रे महागड्या भावाने विकली जातात किंवा भिंतीवर कॅलेंडर म्हणून लावली जातात. जे. पी. सिंघल लक्षाधिश होतात. आदिवासी स्त्रिला वस्त्रही नेसायला मिळत नाही. आता असे सिंघल निर्माण होऊ नये म्हणून तुम्ही काय करणार आहात ?

आदिवासी स्त्रियांना बुरखे वाटणार ? की बस्तरसारखे भाग प्रोहिबिटेड एरिया म्हणून घोषित करणार ? की आदिवासींना आणखी आतल्या दाट जंगलात हलवणार ? माझ्या मते आदिवासींना जंगलाचा त्याग करुन अधिक सुसंस्कृत होण्यासाठी प्रयत्न करणे हाच त्यावर उपाय आहे. ज्याला 'वनवासी' आणि 'जंगलाचे राजे' म्हणायचे त्यांना म्हणू द्यात ! आपण आपले अंतर्बाह्य बदलाचा प्रयत्न केला तरच चित्रकलेतील आदिवासी स्त्रिच्या विकृत प्रदर्शनाला आळा बसेल.

मराठी साहित्यात 'बळी' या कादंबरीत आदिवासींचे चित्रण प्रथम आले असे मला वाटते. विभावरी शिरुरकरांनी टोळीजीवन जगणाऱ्या गुन्हेगार जमातींचे चित्रण त्यात केले असून हा समाजच कसा इथल्या संस्कृतीचा शिकार झाला. हे त्यातील अप्पा आणि शांता इ. पात्रांच्या वरुन दिसले. बळी मध्ये स्त्रियांची अनेक रुपे आहेत.

पोटच्या गोळ्यासाठी चोरी करणारी, निपुत्रिक असून अण्णाला जीव लावणारी, गुन्हेगारी जगतापासून अण्णाला दूर नेऊ पाहणारी शांता पाहिल्यावर आदिवासी स्त्रीची असुरक्षितता लक्षात येते.

दुसरे पुस्तक आहे "माणूस जेव्हा जागा होतो." यात गोदावरी परुळेकरांनी वारली समुहाला कसे जागृत केले याची हकीकत आहे. परंतु आदिवासी समाजाचे अर्धे चित्रण, अर्धे गोदाताईचे आत्मचरित्र झाले आहे. यातही चळवळ

करणाऱ्या अनेक वारली स्त्रिया भेटतात. परंतु या पुस्तकात गोदावरीबाईचा 'मी पणा' सावलीसारखा त्यांच्या लिखाणात दिसतो. उलट, आदिवासी स्त्रियांचे भावविश्व व मानसिकता तपासायला त्यांना स्वत: स्त्री असल्याने भरपूर वाव होता. परंतु ते त्यांचे कडून झाले नाही. उलट आपण कसे भूमिगत झालो, वारल्यांचा चहा कसा प्यालो इ. व्यक्तीगत तपशील पुन्हा पुन्हा येत राहतात. गोदावरीबाईच्या लेखणीत बेछूट उपकारिक प्रवृत्ति दिसते. बरे, वारल्यांमध्ये काम करतांना कातकरी, ठाकूर या समाजाचे व स्त्रिचे चित्रण त्यांना करता आले असते, परंतु ते सुद्धा त्यांनी नाही केले. कातकऱ्यांना आजही 'कातोडी' म्हणून कशी शिंवी दिली जाते हे माझ्या बांधवांना माहीत असेल. असे असताना वारली व कातकरी समाजात त्यांनी सुसंवाद साधला असता व त्याचे चित्रण झाले असते तर कातकरी स्त्रिचेही चित्रण झाले असते. परंतु गोदुताईच्या वर्गलढ्याच्या चौकटीत हा प्रश्न येत नसावा. मराठी लेखकांच्या मर्यादांना असे आणखी काही रंग आहेत. 'जैत रे जैत' कादंबरी गो. नी. दांडेकरांनी लिहिली. ठाकर समाजातील अंधश्रद्धा दिग्दर्शित करणे हा त्यांचा हेतू. दांडेकरांनी नायिकेला रांगडी, पुरुषी आणि बंडखोर वृत्तीची दाखविली. परंतु कादंबरी राणी माशीच्या निमित्ताने मोक्ष, पाप-पुण्य, नियतीवाद इ. संदर्भाभोवती दांडेकर फिरवतात. त्यांच्या अध्यात्म्याच्या भूमिकेला हे साजेशेच आहे. चिंधी ही नायिका मरतानाही नाग्याला म्हणते, 'अरेमाज्या नाग्या, तूजा जैत झाला, तू जिंकलास!' अंधश्रद्धेचे उदत्तीकरण झाल्यामुळे चिंधी ही स्त्री ओढून ताणून रेखाटलेली स्त्री वाटते.

याशिवाय 'जंगलचे राजे', 'कोसबाडच्या टेकडीवरुन', 'भामरायगडची भ्रमणगाथा' अशी काही पुस्तके केवळ कुतुहल वाढवू शकतात. यथार्थ दर्शन नाही. आदिवासींच्या जीवनाचे स्थूल चित्रण करुन ते एखाद्या नियमांत बांधण्याचा प्रयत्न काहींनी केला.

'लोककथा ७८' नाटकामध्ये महादेव कोळी समाजाच्या बंडखोर नेतृत्वाचे चित्रण रत्नाकर मतकरींनी केले आहे. हे नाटक विलक्षण प्रभावी असून, दलित आदिवासींचा सुसंगत विचार केल्याने वास्तववादी नाटक वाटून ते मनाला सरळ भिडते.

महाश्वेता देवींची 'अरण्येर अधिकार' ही बिरसा मुंडावरची कादंबरी मराठीत अनुभवादित झाली असून ती विलक्षण गाजते आहे.

या कादंबरीतल्या स्त्रिची जी रुपे महाश्वतादेवींनी उभी केली त्याला तोड नाही. प्रथम जबाबदारीची अपेक्षा करणारी व नंतर बिरसाच्या पाठीशी राहणारी आई, धानि, चळवळीत उडी घेणारी शाली, अशा अनेक.

शिबनची आई म्हणते, 'मला थंडी वाजत नाही. कारण माझ्या छातीत बोरी फाट्याची आग पेटवून गेला तुझा बाप, तुझा दादा, तुझा लहान भाऊ!'

इंदरवल्लीला ज्या स्त्रियांनी छातीवर गोळ्या झेलल्या, याच स्त्रिया आता आदिवासी साहित्याचे विषय होऊ शकतात. कलाकृतीला कलामूल्ये असली पाहिजे. परंतु आदिवासी साहित्याची मनोभूमिका ही मनाचा वेध घेणारी हवी.

माधवी गेडाम सारखी आदिवासी स्त्री-चित्रकार आदिवासी स्त्रिच्या वेदनेला रंग देतेय. तर उषाकिरण आत्राम सारखी लेखिका आदिवासी स्त्रिचे बंडखोर मन मांडतेय. मराठी साहित्यात आदिवासी स्त्रिचे चित्रण 'आदिलीला', 'आसाचा फेरा'' 'औतान', अशा नाटकांमधून येत असून, कवितेद्वारा हा भाग तर सुपरिचित झाला आहे.

आदिवासी स्त्रिचे प्रश्न हा वेगळा विषय आहे. परंतु ती वन्य, ग्रामीण व नागर अशा पातळ्यांवर वावरत असल्याने व चळवळीतही भाग घेत असल्याने मराठी साहित्यातील तिचे प्रतिबिंब भुतदयेने किंवा विकृतीने रेखाटले जाणार नाही अशी मला आशा वाटते. आदिवासी स्त्रिचे विविधांगी दर्शन घडवणे आदिवासी लेखकांच्या हाती असल्याने त्यांनी या संदर्भात अंतर्मुख होणं आवश्यक आहे.

# आदिवासी कर्मचाऱ्यांची सामाजिक बांधिलकी

## लेखक: बळवंत दळवी, नंदूरबार

या देशातला कोणताही युवक निमशासकीय खाजगी व अथवा शासकीय सार्वजनिक क्षेत्रामध्ये नोकरीच्या निमित्ताने प्रवेश करतो. तेव्हा तेव्हा तो या देशाच्या एकूण विकास प्रक्रियेत पूर्णपणे सहभागी झालेला आहे. ती जबाबदारी त्याने स्वीकारली आहे. असे गृहीत धरलेले असते. भारतीय घटनेतील स्वातंत्र्य व नियम त्याने स्वीकारलेले असतात.

स्वांतत्र्योत्तर चाळीस वर्षातील अनेक लहान-मोठे विकास प्रकल्प भारतीय नोकरशाहीच्या माध्यमातून सरकारने यशस्वीपणे पूर्ण केलेले आहे. असेही आपणास आढळून येते आणि आदिवासी कर्मचारी हा एकूण भारतीय कर्मचारी वर्गापैकीच असल्यामुळे कर्मचाऱ्याने देखील आपली राष्ट्रीय निष्ठा आणि राष्ट्रविकासातील आपली सामाजिक बांधिलकी ही सांभाळाली आहे असे म्हणावे लागते. परंतु असे असूनही आदिवासींच्या शिवाय पर्याय नाही असे लक्षात राहत नाही.

७ पंचवार्षिक योजना व जिल्हा पातळीवरील जिल्हा नियोजनाच्या असंख्य योजना पार पाडून, आदिवासींसाठी चोहोबाजूंनी प्रयत्न करुनही आदिवासींमध्ये सामाजिक, आर्थिक क्षेत्रात अपेक्षित बदल घडून आला नाही. हे कटु पण उघड सत्य आहे. हे लोकप्रतिनिधी आणि सरकारही मान्य करते. त्यामुळे सरकार दरवर्षी गणिक आदिवासी आणि गरिबांच्या उत्थानासाठी अनेक नवनव्या योजना कार्यान्वीत करते आहे, हे आदिवासी कर्मचाऱ्याला मान्य व्हावे आणि ही जर वस्तुस्थिती आहे तर आदिवासींच्या भल्यासाठी केवळ सरकार वरच अवलंबून रहावे, की आदिवासींनी स्वत: देखील स्वबळावर सामाजिक आर्थिक क्षेत्रात उभे राहण्याचा प्रयत्न करावा याचाही निर्णय एकदा घ्यावा लागेल. आता आदिवासी समाजाने सामाजिक, आर्थिक क्रांतिप्रवाहाच्या काठावर मूढपणे उभे राहून कायापलट करण्यापेक्षा त्या क्रांतिप्रवाहाचा त्याला भाग बनावे लागेल. त्यात एकरुप व्हावे लागेल. कारण या घटकेपर्यंत या देशातला लाखोलाख आदिवासी दारिद्र्यात जन्मला, दारिद्र्यात वाढला व दारिद्र्यात त्याचा अंत झाला. या कठोर वास्तवाचे भान ठेवून या समाजातील कर्मचाऱ्याने आपली नेहमीची कर्तव्य सांभाळून दारिद्र्याच्या, अज्ञानाच्या, अंधश्रद्धेच्या, हेव्यादाव्यांच्या, व्यसनाच्या, तकलादू राजकारणाच्या अंधारकोठडीत चाचपडणाऱ्या आपल्याच बंधू भगिनींना उजेड दाखविण्यासाठी स्वत: मिळविलेल्या ज्ञानाच्या दिव्याचा उपयोग करावा लागेल. नव्हे तो करावाच लागेल. नाहीतर स्वत:च्या ज्ञानाच्या केवळ स्वार्थासाठी वापर करुन समाजाचा विश्वासघात केल्याच्या पापाचे धनी व्हावे लागेल. काळ कोणासाठी थांबत नाही. आदिवासीसाठी तो कसा थांबेल? स्वातंत्र्याच्या ४२ वर्षांचा काळ तसा पाहिला तर फार मोठा नाही. परंतु पाहता-पाहता एका पिढीची तरुणाई संपली. या दरम्यान जगात आणि आपल्या अवती भोवती किती परिवर्तने झाली? जग किती बदलले? आणि आदिवासी? आदिवासींमध्ये किती शास्त्रज्ञ निर्माण झालेत? किती विचारवंत पैदा झाले? आणि किती प्रभावी राजकीय शास्ते उत्पन्न झाले? उद्या सवलती बंद झाल्या तर? आज

दिसणारा कृत्रिम डोलाराही सारा कोसळून पडेल मग! सवलती शिवाय देखील आपण उभे राहू शकू, शिकू राज्य करु, काही निमिर्तीक्षम होऊ यासाठी प्रयत्न करणार आहोत की नाही? आणि याची सर्वात जास्त जबाबदारी आदिवासी कर्मचाऱ्यावर आहे हे स्वयंसिध्द आहे! कसे ते आपण पाहू या.

शिक्षणाने माणसाच्या अंगी विचारक्षमता येतो हे उघड आहे. आदिवासीमध्ये साक्षरतेचे प्रमाण १२% आहे आणि ८८% आदिवासी अज्ञान आहे. सन १९७१ च्या जनगणनेप्रमाणे महाराष्ट्रातील आदिवासी लोकसंख्या २९५४२४९ होती आता ती ३५ लाखापर्यंत पोहचली आहे. त्यातील केवळ ४२०००० साक्षर आहेत असे आपल्याला म्हणता येईल. सरकारी नोंदी प्रमाणे असलेली तात्विक साक्षरता व वास्तव साक्षरता यात काही सूक्ष्म तफावत असावी असे वाटते. उदाहरणाने हे आपल्याला पडताळून पाहता येईल.

महाराष्ट्रातील जामदा हे एक गाव आहे. तेथील प्राथमिक शाळेत एका वर्षी १०० आदिवासी विद्यार्थी (मुले + मुली मिळून) पहिलीच्या वर्गात शिकत होती त्यातील ५०% मुले ७ वीपर्यंत गेलीत. त्यापैकी २५ मुले एस. एस. सी. पर्यंत गेलीत. २५ पैकी फक्त ५ मुले एस. एस. सी. उत्तीर्ण झालेत. ६५ मुलं-मुली एस. एस. सी पर्यंत पोहचली नाही. एस. एस. सी. उत्तीर्ण ५ विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात प्रवेश घेतला. त्यातील केवळ २% पदवीपर्यंत शिक्षण घेतात व एखादा पदवी संपादन करतो. या १% पदवीधरापैकी ९९ १/२% आदिवासी पदवीधर तरुण जर कर्मचारी झाला आहे हे सत्य आहे तर मग ओघानेच आदिवासी सामाजिक उद्धाराची महान ऐतिहासिक (आणि नैतिक) जबाबदारी या आदिवासी कर्मचाऱ्यांवर नाही का? इतरांच्या आणि शासकीय योजनांच्य कडेवर बसून आपण ४२ वर्षे वाटचाल केली आहे ही काही कमी नाही. योजनांचा पुरेसा लाभ आदिवासींना अजून पर्यंत करुन घेता आला नाही हे जरी खरे असले तरी इतरांचा हात धरुन शासकीय सवलतींची मदत घेऊन वाटचाल करणारा आदिवासी वैचारिक गुलामीच्या आहारी जाऊन दुबळा होतो की काय असा एक विचार प्रवाह सुरू झाला आहे. आणि दुसऱ्या बाजूने सवलती बंद व्हाव्यात यासाठी सरकारवर प्रचंड दडपण येत आहे. या दृष्टीने विचार केला तर सुशिक्षित आदिवासी कर्मचाऱ्यावर विद्यमान परिस्थितीत किती महत्त्वाची जबाबदारी येऊन पडली आहे हे लक्षात येते आणि ही जबाबदारी पेलवण्याइतका आदिवासी कर्मचारी समर्थ आहे हे त्याने ४२ वर्षातील आपल्या सेवा काळात सिद्ध केले आहे. प्रशासनात अनेक प्रकारच्या लहान मोठ्या हुद्यावर आदिवासी कर्मचारी यशस्वीपणे काम करीत आहे. पण याच आदिवासी कर्मचाऱ्याला आज पूर्वीपेक्षा जास्त प्रमाणात दुहेरी जबाबदारी पार पाडायची आहे त्याची ही कसोटीची वेळ आहे.

याचे कारण सवलती बंद व्हाव्यात या दृष्टीने चळवळी सुरू झालेल्या आहे. सरकारवर चोहोबाजूने दडपणे येत आहेत. हे वर आलेच आहे. पण विज्ञान युगाने आज इतका प्रचंड वेग घेतला आहे की त्याच्याशी जूळवून घ्यायचे असेल तर आदिवासीलाही प्रगतीत स्वत:ला वेग घ्यावा लागेल. हे आदिवासी कर्मचारी करु शकेल; नव्हे ते त्याला करावे लागेल. कारण सर्वच पदवीधर आदिवासी युवक हा नोकरी मध्येच प्रवेश करतो. त्यामुळे याच आदिवासी कर्मचाऱ्याचे ते अटळ असे पदसिद्ध कर्तव्य ठरते. याला तो पात्रही आहे. आणि तो त्यासाठी वेळही काढू शकतो.

नोकरीत कमाल प्रामाणिकता दाखवूनही रोज १/२ तास आदिवासी कर्मचारी समाजासाठी देऊ शकतो हे खालील तपशीलावरुन आपणास दिसून येईल.

वर्षाचे दोन महिने ( ६० दिवस ) दीर्घ तजा, लग्नकार्य, साखरपुडा, आजारी नातेवाईकांना भेटी इ. साठी राखून ठेवू व १० महिन्याचा विचार करु.

| क्रमांक | दिवसाचे एकूण तास | कोणत्या कामासाठी | किती तास |
|---|---|---|---|
| १ ) | २४ | शासकीय कामाचे तास नोकरी, मिटींग, चर्चा | १० |
| | | नोकरीसाठी प्रवास | ४ |
| | | भाजीपाला, किराणा, मुलांना शाळेत सोडणे इ. साठी | २ |
| | | झोप व विश्रांतीसाठी | ६ |
| एकूण २४ तासांपैकी कामाचे २२ तास खर्च होतात. १० महिन्यात त्याला ६०० तास कामासाठी मिळतात. | | | २२ |

उरलेल्या दोन तासांचा उपयोग आदिवासी कर्मचारी मनात ठरवले तर आदिवासींसाठी करु शकतो. निदान एक तास जरी आदिवासी कर्मचाऱ्याने आपल्या बांधवासाठी प्रामाणिकपणे खर्च केला तरी या आदिवासी उत्थापनाच्या तो क्रांतिपर्वातला शूर अग्रदूत ठरेल यात शंकाच नाही.

आजच्या वैशिष्ट्यपूर्ण सामाजिक परिस्थितिमुळे आपण एकमेकांविषयीचा विश्वास गमावत चाललो आहे की काय अशी शंका काही वेळा येते. एखाद्या आदिवासी कार्यकर्त्याने एखादे कार्य सुरू केले की त्यावर आपण शंकेचे आणि टीकेचे बाण सोडतो. त्याला घायाळ करतो. कित्येकदा एखाद्या कार्याला सुरूवात करतो आणि पहिलीच ठेच लागली की माघार घेतो आदिवासीमध्ये आरंभ शूर फार आहे. असे म्हटले जाते. यातही सुधारणा करावी लागेल.

महाराष्ट्रातील अंदाजे सुमारे २०,००० आदिवासी कर्मचाऱ्यांनी फक्त १ तास स्वबांधवांसाठी देण्याचे ठरविले तरी खूप करता येईल.

ब्रायन अेडवर्डस् नावाच्या समाज शास्त्रज्ञाने असे म्हटले आहे की ''क्रांती घडण्यासाठी कमीत-कमी तीन पिढ्या लागतात, 'पहिली पिढी शरणागतीच्या वातावरणात जगते. दुसरी पिढी निषेध व्यक्त करते व विरोध करण्याची कुवत जमवते. तिसरी पिढी प्रत्यक्ष कृती करते !''

जवळ-जवळ ९८% दारिद्र्यात, अज्ञानात जीवन कंठणाऱ्या आदिवासींसाठी आजची सुशिक्षित पदवीधर तरुण आदिवासी कर्मचारी आज काय भूमिका घेईल ?

# आदिवासी संस्कृतीचे दमन आणि ब्राह्मणी विकृतीचे भ्रमण

## कृष्णकुमार चांदेकर

भारतीय बहुजनांच्या संपूर्ण अधोगतीस कारण येथील ब्राह्मणवाद असतांना त्यापासून आदिवासी माणूस कसा बरे मुक्त असणार! किबंहुना मी असा म्हणेल की, ब्राह्मण्यवादातून आदिवासींना वगळणे म्हणजे त्यांचे भारतीयत्व (राष्ट्रीयत्व) नाकारण्याच्या बरोबरीचे ठरेल. नव्हे तर त्यांचे माणूसपण नाकारणे होय. परंतु काही बुध्दीवंताच्या मते आदिवासी माणूस ब्राह्मणवादाच्या मगरमीठीत अल्पशा पछाडलेला असल्याने आंबेडकरवाद काहीसा पूरक असला तरी निव्वळ आंबडेकरवाद त्यासाठी सक्षम नाही (अर्थात थोडासा चालेले). पुढे ते पुन्हा सांगत सुटतात 'खऱ्या अर्थाने आदिवासींचा विकास साधायचा असेल तर आदिवासी समाजाला कोणत्याही प्रवाहात न मिसळवता स्वतंत्र चळवळी उभारल्या गेल्या पाहिजे' ह्या महाशयांच्या बुद्धीमत्तेची कीव करावी की काय प्रश्न आहे? मी म्हणतो हे सगळे बुद्धीवंत आंबेडकरवादावर दया करीत आहे की काय? की बाहेरून पाठिंबा देवून राहीले? की लोकांनी पुरोगामी म्हणावे यासाठीच आंबेडकरांचे नाव घेतात? तसे नसते तर विनाकारणाच्या उचापती करीत कशाला बसले असते! आंबेडकरवाद काहीसा पूरक आहे असे म्हणणे म्हणजे ब्राह्मणी टि. बी. वर खोकल्याच्या गोळ्या देण्याचाच एक प्रकार झाला. नव्हे तर आदिवासींना जगूही द्यायचे नाही आणि मरुही द्यायचे नाही. अशातला हा भटाळलेला युक्तीवाद होय. एक गोष्ट मान्य केली पाहिजे ती ही की, बाबासाहेबांनंतरच्या कालावधीत आदिवासींना परिणामक्षम अशा चळवळी उभारल्या गेल्या नाहीत. त्यावेळच्या परिस्थितीत असा भटाळलेला युक्तीवाद ठीक होता. खरे तर या पुढेही जावून मी असा म्हणेन, 'जर आदिवासींचा विकास आंबेडकरवादच आहे असं ज्यांना वाटत होतं, त्यांनीच आपल्या खांद्यावर आंबेडककरवादाची धुरा घेवून परिवर्तन का घडवून आणले नाही? असो, अजूनही वेळ गेलेली नाही. परिस्थिती झपाटयाने बदलत आहे. बाबासाहेबांचाच मुक्ती संग्राम जोर धरत आहे. मा. काशीरामजीच्या मदतीने मात्र त्यांच्या आजच्या भारतव्यापी परिवर्तन लढ्यातून आदिवासींना अलिप्त ठेवू नये. नाहीतर धरुन गाडी पकडण्याच्या आशेत, राहून गाडी सुटल्याची निराशा झाल्यासारखी होईल. आंबेडकरांच्या वेळेस नेमके हेच घडले. आजही कित्येक बुद्धीवंत त्याबाबत दुःख व्यक्त करतात. ज्या महामानवाने अखिल शोषितांच्या मुक्तीचे लढे उभारले, त्या उत्कर्षातून आदिवासींना अलिप्त ठेवण्याचे कुटिल कारस्थान ब्राह्मणवादी मंडळीने त्यावेळी देखील केले होते. आदिवासींचे नेते (हृदयसम्राट) म्हणविणाऱ्या ठक्कर बाप्पा सारखे लोक त्यावेळी ब्राह्मणवादाचे हस्तक बनून स्वार्थासाठी त्यांचेच मस्तक चोळत बसले. परिणामी आंबेडकरांची चळवळ ही परकीय माणसांची चळवळ समजून आदिवासी माणूस त्यापासून दूर सरकला. त्यामुळे आदिवासी समाजाची फार मोठी हानी झाली आहे. आजचे चित्र त्याचेच द्योतक आहे. तरी देखील डॉ. आंबेडकरांनी केलेले कार्य आदिवासींना गौरवास्पद असेच आहे.

'माझा आदिवासी समाज त्याचवेळी बाबासाहेबांच्या मुक्ती लढ्यात सामील झाला असता तर आदिवासींचे आजचे चित्र वेगळेच दिसले असते' असल्या प्रकारची खंत मा. व्यंकटेश आत्रामांनी अनेकवेळा आपल्या भावनातून व्यक्त केली. परंतु तरूण पिढीला ते पुढे आव्हान करीत असत. 'मित्रहो! तूर्त सावध व्हा, काळ वैऱ्याचा आहे. आज आपल्याला बाबासाहेबानंतर काही दशकांनी त्याच मुक्तीचे रणशिंग फुंकण्यासाठी मा. कांशीरामजी पुढे आले आहेत. तेव्हा त्यांना तन-मन-धनाने सहकार्य करा. त्यांच्या चळवळीत मोठ्या संख्येने सामील व्हा. त्यातूनच तुमचा उत्कर्ष निश्चित आहे. तिथूनच तुमच्या आत्मसन्मानाने जगण्याला सुरूवात होणार आहे. तेव्हा मित्रहो, आंबेडकरवादाशिवाय आजच्या आदिवासींना पर्याय नाही.

आज ज्या काही आदिवासींच्या छोट्या मोठ्या चळवळी आहेत, त्या मूलतः दिशाहीन आहेत. मी, या ठिकाणी दिशाहीन यासाठीच म्हणतो ते असे की, आदिवासींच्या कुठल्याही चळवळीला सैद्धांतिक आधार नाही. वैचारिक बैठक नाही. बऱ्याच चळवळी ह्या ब्राह्मणवाद्यांनी उचकावून दिलेल्या चळवळी आहेत. आणि व्यवस्थितपणे आपले पितळ झाकून ठेवीत आहेत. चळवळीच्या संदर्भात कवडीचाही फायदा नसताना विनाकारण आदिवासी भूमिगत होत आहे. ज्या काही चळवळी फोफावलेल्या दिसतात त्या केवळ भावनिक आधारावर जगत आहेत. आणि भावना कधीही कायम टिकणारी नसते. अर्थात विकासाच्या मार्गावर त्या कुचकामी ठरतात. कोणत्याही चळवळीचे नेतृत्व कसे असायला पाहिजे. यावर भाष्य करतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात 'ज्या चळवळीचे नेतृत्व हे परिवर्तनवादी असते त्याच समाजाचे परिवर्तन घडवू शकतात. अन्यथा चळवळ ही कधीही विकावू ठरते.' ह्या भाष्याचा पाठपुरावा केला तर असे दिसून येईल की, आज पर्यंत असे कोणतेही नेतृत्व आदिवासींना लाभलेले नाही याला अपवाद म्हणून मा. व्यंकटेश आत्राम ठरतात. ज्या क्रांतीकाराने आंबेडकरी विचार धारेची कास धरून आदिवासींमध्ये एक प्रकारचे वैचारिक वादळ निर्माण केले. आणि समग्र उत्क्रांतीचा मार्ग दाखविला. आदिवासींमध्ये वैचारिक पहाटेची जाग देवून ते अल्पवधितच अस्त पावले. त्यामुळे आदिवासींची योग्य मार्गाने वाटचाल करण्याऱ्या नावेस जबरदस्त धक्का बसला. तिला सावरण्यासाठी अनेक आदिवासी कार्यकर्ते जागृतीने कार्य करीत आहेत. त्यात सौ. पुष्पाताई आत्राम, दशरथ मडावी, प्रा. घासले, वसंत कनाके, गंगाधर महाराज, प्रा. पवार यांच्या नावाचा उल्लेख करण्यात मला गर्व वाटतो. आदिवासींनी यात सामील होवून आत्मसन्मानी बनावे असे पोटतिडकीने सांगावेसे वाटते. तरी देखील विचार करावा. आणि ही आपल्या समाजाची गरज आहे का? याचा निकष लावून पुढील वाटचाल करावी.

## विचाराचे दोनच प्रवाह

एकसंघ समाज गुण्या-गोविंदाने नांदत असतांना भारतात आर्य (ब्राह्मण) आगमनानंतर तो दुभागला गेला. तेव्हापासूनच खऱ्या अर्थाने येथील मूळनिवासी यांच्या दमन प्रक्रियेस सुरुवात झाली. आर्य-द्रविडामधील झालेला वैचारिक मतभेद शिगेस पोहचला. कपटी आर्य-ब्राह्मणांच्या कुटिल नीतीने अनेक द्रविड मारले गेले अशाप्रकारे द्रविड संस्कृतीची हानी झाली. आर्य-द्रविडांचा संघर्ष म्हणजे आस्तीक-नास्तीकांचा संघर्ष, सुरा-असुरांचा संघर्ष. आर्य-द्रविडांचा संघर्ष म्हणजे दैववाद-विज्ञानवादाचा संघर्ष, प्रतिगामी-पुरोगामी लोकांचा संघर्ष होय. ज्यांनी दैववाद-ईश्वरवाद नाकारला त्यांनाच असूर-राक्षस, दैत्य वगैरे नांवानी अपमानीत करण्यात आले. नेमकी तीच परिस्थिती आजही मूळ धरुन आहे. हजारो वर्षापासून

तर आजपर्यंत दोनच प्रवाहाचे माणसं संत-महात्मे झाले. तेव्हा सुज्ञ मंडळींनी कोणी कोणत्या मार्गाने जायचे ते ज्याचे त्यानींच ठरवायचे आहे.

प्रतिगामी विचारसरणी म्हणजे दैववाद, ईश्वरवाद जोपासून विज्ञानाला नाकारणारे. होमयज्ञ, ज्योतिष्यशास्त्र, भूत-खेत, अवतार यांना माननारी विचारसरणी होय या मालिकतील संतांपैकी (अलिकडील) संत ज्ञानेश्वर, एकनाथ, रामदास, विनोबा भावे इत्यादी. लो. टिळक, म. गांधी, सावरकर, गोळवळकर इत्यादी मंडळी ही सगळी अस्सल मनूवादी मंडळी. याउलट पुरोगामी विचारसरणी म्हणजे दैववाद नाकारुन विज्ञानवाद जोपासणारी अर्थशास्त्र भूगर्भशास्त्र इत्यादी शास्त्रे विज्ञानावर आधारालेल्या गोष्टीचा पुरस्कार करणारी विचारसरणी या मालिकेतील संतांपैकी (अलिकडील) संत तुकाराम महाराज (वाणी समाज), नामदेव (शिंपी), संत गाडगे महाराज इत्यादी मंडळी. म. फुले, छत्रपती शाहू, डॉ. आंबेडकर, पेरियार रामास्वामी नायकर इत्यादी पुरोगामी मंडळी ही सगळी बहुजन समाजातील मंडळी आहे. तेव्हा आपणास चटकन लक्षात यायला पाहिजे की, दैववादाची गरज कुणाला आहे! ते विज्ञानवाद का नाकारतात? मंदिरे का बनवितात? पुजारी कोण असतात? असल्या प्रकारच्या प्रश्नाचे उत्तर तुम्हीच दिलेले बरे!

दैववाद माणसाला दुबळा बनवितो. तर विज्ञानवाद माणसाला कृतीशील बनवितो. तेव्हा आपणच ठरवायला हवे की, आपण कोणत्या दिशेने गेले पाहिजे. कोणत्या दिशेने आपला विकास साधता येतो. यासाठी उकल आपणच करायला पाहिजे.

## संस्कृति दमण नि विकृति

आमटे बाबा (संघवाले बाबा) यांना आदिवासींच्या संस्कृतिबद्दल आजकाल अधिकच उत्कटता निर्माण झालेली दिसते. नर्मदा धरण विरोधी आंदोलनात काही मुद्यापैकी एक महत्वाचा मुद्दा म्हणून आदिवासी संस्कृतीचा उल्लेख केला आहे. त्यांना आदिवासींची कोणती संस्कृती अभिप्रेत आहे हे कळायला मार्ग नाही. लंगोटी नेसणे, रानोरान भटकणे, कंदमुळे खाणे, आणि झाडाचा पाला पाचोळ्याच्या घरात वास्तव्य करणे म्हणजे आदिवासी संस्कृती म्हणायचे की काय अशी शंका आल्यावाचून रहात नाही. जर का 'बाबा' यालाच संस्कृती म्हणत असतील तर आमटे बाबा समाज सेवक नव्हे तर समाज द्रोही ठरतील. खरे तर आम्ही संघप्रणीत कोणतीही व्याख्या नाकारतो. आम्हाला संस्कृतीची व्याख्या कळली आहे. आता संघवाल्यांनी आम्हाला अक्कल देण्याची गरज नाही. आम्ही पुरोगामी तरुण संस्कृती व्याख्या अशी करतो, 'ज्या समाजाचा सर्वांगीण विकास झाला असेल ती त्याची संस्कृती, त्या समाजाचा विकास व त्या दृष्टीने विलोभनीय वाटते व अनुकरणीय वाटते तिलाच आम्ही संस्कृती म्हणतो. असा विकास ज्या देशात जास्तीत जास्त रुढ झाला असेल तोच देश संस्कृती अपेक्षित आहे. हा संशोधनाचा विषय झाला. आम्ही तर म्हणतो बाबांना आमच्या आदिवासी संस्कृतीची चिंता करण्याची काहीच गरज नाही.

वर्तमान स्थितीत जीवन जगणाऱ्या आदिवासींची नीतीमत्ता वजा केल्यास बाकी असे काहीच घेण्याजोगे नाही. आणि जर का यालाच ब्राह्मणनीती संस्कृती म्हणत असेल तर निश्चितच ब्राह्मण्यांची तिरपी चाल ओळखली पाहिजे. खऱ्या आदिवासी संस्कृतीचे दमण करणारी ब्राह्मणनिती कसे काय भले करणार आहे. उलट टी. व्ही. वृत्तपत्रे या सारख्या प्रसार-प्रचार माध्यमांनी संस्कृतीचे, विकृतीकरण करुन त्याचेच दमन करणे सुरू आहे. तेव्हा आदिवासी बांधवांनी सावध असायला पाहिजे. आदिवासींना 'वनवासी' म्हणणे ही विकृतिच नव्हे काय?

# आदिवासी साहित्याची वाटचाल - शोध आणि बोध

ग. शां. पंडित

गेली कित्येक वर्षे समाजात एका विशिष्ट वर्गाची मिरासदारी चालू होती. वाङ्मयाचे क्षेत्रही याच एका वर्गाने काबीज केले होते. अगदी १९६० पर्यंत साहित्य म्हणजे 'कलेसाठी कला' होती. परंतु महाराष्ट्रात गेल्या २५-३० वर्षांत अनेक साहित्य चळवळी उदयास येऊ लागल्या व या चळवळींचा संबंध सामाजिक पर्यावरणाशी असल्याने त्या सतत वादाचा विषय बनत गेल्या. निरनिराळ्या व्यासपीठांवर दलित, ग्रामीण, ख्रिस्ती, कामगार, स्त्री, बाल, आदिवासी अशी वेगवेगळी साहित्य संमेलने होऊ लागली. त्यामुळे प्रस्थापितांच्या मराठी साहित्याला धक्के बसू लागले. या वेगवेगळ्या साहित्य संमेलनांवर जातियतेचे, प्रांतियतेचे, गटबाजीचे आक्षेप घेतले जाऊ लागले. परंतु जसजशा या साहित्य चळवळी विकसित होत गेल्या तसतसे प्रस्थापितांमधल्या काहींना पटू लागले की, 'ही सारी मंडळी लिहिताहेत ते मराठी साहित्यच आहे. यामुळे मराठी साहित्य अधिक व्यापक, सर्वस्पर्शी व दूरदर्शी होत आहे. साहित्यातले हे नवे प्रवाह मराठी साहित्याच्या सर्वंकष अभिवृध्दीला पोषक आहेत.' आखिल भारतीय पातळीवर होणारे मराठी साहित्य संमेलन, शारदेचे उपासक असलेल्या सर्वांना एकाच मांडवात समान न्याय देऊ शकत नाही. त्यामुळे वेगवेगळी साहित्य संमेलने ही आता काळाची गरज बनली आहे.

मराठी साहित्यात दलित व ग्रामीण साहित्याचे प्रवाह गेल्या २०-२५ वर्षांतच पुढे आले व विकसित होत आहेत. या पाठोपाठच आदिवासी साहित्याचेही अस्तित्व या १०-१२ वर्षांत प्रकर्षाने जाणवू लागले आहे. तसे पाहिले तर दलित-ग्रामिण-आदिवासी हे तिन्हीही ग्रामीण जीवनाचेच घटक. परंतु तरीही त्यांच्यात विलक्षण फरक जाणवतो. दलित व ग्रामीणांचा नागर जीवनाशी सतत संबंध आला. तसा आदिवासींचा आलेला नाही. दलितांप्रमाणे वर्णव्यवस्थेचा बळी ठरुन स्पृश्यास्पृश्यतेचा तिरस्कार आदिवासींना सहन करावा लागला नाही. दलित व आदिवासी भोवतालची सांस्कृतिक चौकट व वातावरण वेगळे आहे. आदिवासी हा गावापासून दूर जंगलात स्वच्छंदीपणे जीवन जगणारा. आदिवासींना समृध्द संस्कृतीची चौकट आहे. त्यांच्या संस्कृतीला मातीचा सुगंध आहे. दलित-ग्रामीण-आदिवासी यांच्या दु:खाची कारणेही वेगळी आहेत. ग्रामीण मजुरांचं दु:ख हे आर्थिक स्वरुपाचं आहे, अस्पृश्यतेचं नाही. दलिताचं दु:ख अस्पृश्यतेचं तसंच आर्थिक स्वरुपाचंही आहे. आदिवासींचं दु:ख हे आदिम मानवाचं दु:ख आहे. त्याला अजून माणुसकीच्या प्रवाहापासून वंचित ठेवलं आहे. त्यामुळे आदिवासींना मुख्य प्रवाहामध्ये आणावयाचे असेल व त्यांच्या जीवनामध्ये आत्मप्रत्ययाची जाणीव जागृत करावयाची असेल तर त्यासाठी वेगळा आशय घेऊन येणारे शब्द शोधावे लागतील. आदिवासी साहित्य ही दलित साहित्याची नक्कल नसून त्याला स्वत:चं असं वळण व शैली आहे. आणि म्हणूनच आदिवासी साहित्याचा प्रवाह हा वेगळा ठरतो. सुरुवातीला दलित व ग्रामीण साहित्याकडून आदिवासींच्या खूप अपेक्षा होत्या परंतु ते साहित्य त्या पूर्ण करु शकले नाही. त्यामुळे १० व ११ नोव्हेंबर १९७९ साली प्रा. विनायक तुमराम यांच्या पुढाकाराने व 'राणी दुर्गावती' वाचनालयाच्या' वतीने पहिले आदिवासी साहित्य संमेलन चंद्रपूर जिल्ह्यात 'भद्रावती' या गावी भरविण्यात आले

व या निमित्ताने आदिवासी साहित्याचे स्वतंत्र दालन मराठी साहित्यात उघडले गेले. प्रसिध्द दलित साहित्यिक प्रा. यशवंत मनोहर यांनी उद्‌घाटन केलेल्या या संमेलनाचे अध्यक्ष होते श्रीकृष्णमूर्ती मिरमिरा. हे संमेलन म्हणजे मराठी साहित्यातील एक क्रांतीकारी घटनाच म्हणावी लागेल. कारण येथूनच आदिमांच्या साहित्याचा व पर्यायाने मुक्तीचा प्रवास सुरु झाला. शतकानुशतके अंधारात चाचपडत बसलेल्या, समाजापासून अलग पडलेल्या आदिपुत्रांना एका स्वतंत्र, स्वतःच्या व्यासपीठावर बसून आपल्या वेदना, समाज, संस्कृती, धर्म, पूर्वेतिहास इत्यादी विषयांवर चिंतन करण्याची, आपले अनुभव, भाव-भावना व्यक्त करण्याची संधी पहिल्यांदाच ह्या संमेलनाने प्राप्त झाली.

बिगर आदिवासी मराठी साहित्यिकांनी आदिवासी जीवनाची दखल घेतलीच नाही, असे मात्र म्हणता येणार नाही. गोदावरी परुळेकर, दुर्गा भागवत, तारा भवाळकर, सरोजिनी बाबर, नलिनी सहस्त्रबुद्धे, गो. नि. दांडेकर, भाऊ मांडवकर, बाबा आमटे, वामनराव चोरघडे, विजय तेंडुलकर, श. गो. देवगांवकर, शैलजा देवगावकर इत्यादी बिगर आदिवासी साहित्यिक व अभ्यासकांनी आदिवासी जनजीवनाचे व लोकसंस्कृतीचे दर्शन आपल्या साहित्यातून घडविले आहे. यांपैकी काहींनी आदिवासी जीवनाला खरोखरच सामाजिक न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे. आणि ही जाणीव आदिवासींनी सुद्धा ठेवली आहे. परंतु यातल्या बहुतेक लेखकांनी आदिवासींच्या जीवनाचे उदात्तीकरण बऱ्याचशा रोमँटीक पध्दतीने केलेले दिसून येते. त्यांच्या साहित्यातून आदिवासी जीवनाचा काही तपशील हाती लागत असला तरी त्यात अंतरीच्या जिव्हाळ्यापेक्षा आत्मप्रौढीचा आणि प्रस्थापित होण्याच्या आकांक्षेचाच भाग अधिक दिसून येतो. त्यामुळे आदिवासी जीवनावर साहित्यकृती लिहावयाची झाल्यास त्या जीवनाचा अस्सल अनुभव असणाऱ्यांनी लिहिणेच योग्य ठरते. आदिवासींच्या सानिध्यात राहून त्यांची संस्कृती, समस्या, श्रद्धा, अंधश्रद्धा, विचारसरणी, राहणीमान, भाषा वगैरे बाबींचे निरीक्षण न करता किंवा त्याचा अनुभव न घेता घरी आरामखूर्चीत, पंख्याखाली बसून काल्पनिक चित्रण करणारे लेखक वास्तववादी कलाकृती कसे निर्माण करु शकतील ? आणि म्हणूनच आदिवासींमधून सृजनशील साहित्यिक निर्माण व्हावा व त्याने आपल्या व्यक्तिगत व सामूहिक अनुभूतीचे वास्तव रुप कलात्मक पातळीवर अभिव्यक्त करण्यासाठी सिध्द व्हावे, यासाठी आदिवासींच्या स्वतंत्र व्यासपीठाची गरज भासली. भद्रावतीचे पहिले आदिवासी साहित्य संमेलन हे त्यातील पहिले पाऊल आहे.

दुसरे आदिवासी साहित्य संमेलन श्री राजाभाऊ राजगडकर यांच्या पुढाकाराने २३, २४ मे १९८२ रोजी यवतमाळ जिल्ह्यातील 'वणी' या गावी घेण्यात आले. या संमेलनाचे उद्‌घाटन आ. यशवंतराव शेरेकर यांनी केले तर संमेलनाध्यक्ष होते प्रसिध्द दलित साहित्यिक व समीक्षक प्रा. रावसाहेब कसबे. त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात आदिवासी बोलीभाषेचा मुद्दा उपस्थित केला. ते म्हणाले, ''सध्याच्या अस्तित्वात असलेल्या आदिवासींच्या बोलीभाषेत वाङ्.मय निर्माण झाले पाहिजे. मराठी भाषेच्या समृध्दीमध्ये भर घालण्यासाठी मराठी भाषेतील शब्दांचा ह्या बोलीभाषेतील बलदंड शब्दांशी संकर होणे जरूरीचे आहे. त्यासाठी साहित्यिक समीक्षेचे मापदंड बदलण्याची पाळी आली तरी हरकत नाही.'' प्रा. कसबेंचे हे मत विचारार्ह आहे. आदिवासींच्या बोली भाषा अतिशय समृद्ध आहेत व या बोलीभाषेंमुळे मराठी भाषाच अधिक समृद्ध व व्यापक होणार आहे. त्यासाठी आदिवासी संस्कृती कोश व आदिवासी बोलीभाषा कोश तयार करण्याचे कार्य शासन व विद्यापीठांनी मनावर घेणे जरूरीचे आहे. याच संमेलनात एका आदिवासी युवक कवीने म्हटलेली कविता

बोलीभाषेबाबतची मनोवेदना अचूकपणे व्यक्त करते -

चक्रव्यूहात शिरलेले
आमचे अवघे दिवस
अवसेने बेडीबंद केलेल्या अवघ्या रात्री
अजून संपायच्या आहेत
यापुढची घटना आम्हीही लिहू
अजून आमची भाषा
लिपीबद्धच व्हायची आहे....

या साहित्य संमेलनानंतर पुढच्या संमेलनाला मध्यंतरी बराच काळ गेला. या मधल्या काळात १ व २ ऑक्टोबर १९८३ रोजी प्रा. गं. बा. सरदारांच्या अमृतमहोत्सवी समारंभानिमित्त महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेने आदिवासी साहित्यिक कार्यकर्त्यांचे एक शिबीर आयोजित केले होते. या शिबिराला सुमारे ६० आदिवासी साहित्यिक व कार्यकर्ते महाराष्ट्राच्या सर्व आदिवासी भागातून आले होते. डॉ. बाबा आढाव, प्रा. देवदत्त दाभोळकर, प्रा. गं. बा. सरदार ही बुजुर्ग व सुप्रतिष्ठित मंडळी शिबिराला मार्गदर्शक म्हणून लाभली होती. प्रा. सरदारांनी मराठी साहित्यातील नव्या आदिवासी साहित्य प्रवाहाचे स्वागत करुन आदिवासी साहित्यिकांना मार्गदर्शन करताना सांगितले. ''दलित साहित्याने विद्रोहाचे जे निशाण उभारले ते आदिवासी साहित्यिकांनाही मार्गदर्शक ठरणार आहे. केशवसुतांनंतर मराठी साहित्यात फडके-खांडेकरांचे युग आले. 'रंगाखातर रंगू नच रिझवाया नच खिजवाया' असा प्रकार चालू होता. त्याला दलित साहित्याने जबरदस्त धक्का दिला. त्याच्या पुढचा धक्का आदिवासी साहित्याने दिला पाहिजे. संघर्षाशिवाय गत्यंतर नाही. दलितांनी तो केला. आदिवासींनी सुरु केलेला आहे. तो त्यांना तडीस न्यावयाचा आहे. शोषितांच्या सर्व शक्ती एकवटल्याशिवाय हे प्रश्न सुटणार नाहीत.''

पुण्यातील या चर्चासत्रानंतर थोडयाच अवधीत आदिवासींचे एक मुखपत्र 'आदिवासी भारत' या त्रैमासिकाचा पहिला अंक प्रसिद्ध झाला. ही घटना आदिवासींच्या साहित्य चळवळीला नवा हुरूप व दिलासा देणारी ठरली.

६ व ७ जून १९८७ साली म्हणजे बरोबर पाच वर्षांनी तिसरे आदिवासी साहित्य संमेलन नांदेड जिल्ह्यात 'किनवट' या गावी श्री. राम भिराशे (शिक्षक) यांनी आयोजित केले होते. डॉ. गोविंद गारे हे आदिवासींमधील ज्येष्ठ साहित्यिक-अभ्यासक व आय. ए. एस. अधिकारी या संमेलनाचे अध्यक्ष होते. पहिल्या दोन संमेलनाप्रमाणे हेही संमेलन दोन दिवसांचे होते.

या संमेलनानंतर पुन्हा एक आदिवासी साहित्यिक प्रशिक्षण शिबीर ठाणे जिल्ह्यातील 'जव्हार' या गावी २६ ते २९ फेब्रुवारी १९८८ असे चार दिवस पुण्यातील आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्थेने भरविले होते. या शिबिराला उद्घाटक म्हणून दै. केसरी (पुणे) चे संपादक डॉ. शरदचंद्र गोखले उपस्थित होते तर अध्यक्षस्थानी ॲड. राजाराम मुकणे होते. डॉ. गोविंद गारे हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित होते. आदिवासी साहित्यिकांना मार्गदर्शन करताना डॉ. गारे म्हणाले की, ''आदिवासी साहित्यिकांनी वैयक्तिक दुःखे व वेदना यापेक्षा आदिवासी समाजाची दुःखे व वेदना यांना आदिवासी साहित्यात प्राधान्य द्यावे.'' आजच्या दलित आत्मकथनांच्या पार्श्वभूमीवर डॉ. गारे यांचे विचार मोलाचे ठरतात. या शिबिरात परिसंवाद, कथाकथन, एकांकिका, कविसंमेलन आदि कार्यक्रम आयोजित केले होते. आतापर्यंतच्या आदिवासी साहित्याच्या वाटचालीत हे चार दिवसांचे मोठे शिबीर म्हणजे संमेलनच ठरावे असे बहारदार व उद्बोधक झाले.

प्रस्थापित व्यवस्थेने उपेक्षिलेल्या दलित-आदिवासी-ग्रामीण या त्रिविध धारांना संयुक्त साहित्य संमेलनाद्वारे एकत्र आणण्याची कल्पना 'दलित-अदिवासी-ग्रामीण संयुक्त महासभेने आखली व त्याप्रमाणे पहिले द.

आ. ग्रा. संयुक्त साहित्य संमेलन धुळे जिल्ह्यातील 'साक्री' या गावी २८ ते ३० नोव्हेंबर १९८७ रोजी प्रसिद्ध ग्रामीण साहित्यिक प्रा. डॉ. आनंद यादव यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. शूद्रातिशूद्रांच्या व उपेक्षितांच्या साहित्याचा एकत्रित विचार करण्याच्या दृष्टीने व या तिन्ही वर्गातील साहित्यिकांच्या जाणिवांमध्ये एक व्यापकता व एकात्मता येण्याच्या दृष्टीने संयुक्त साहित्य संमेलनाची ही कल्पना स्वागतार्ह आहे. परंतु अपेक्षित असलेल्या आदिवासी साहित्य जाणिवांची बूज या व्यासपीठावर कितपत प्रामाणिकपणे राखली जाईल, अशी शंका आदिवासी साहित्यिकांमध्ये निर्माण झाली व या संयुक्त महासभेला विरोध न करता त्यांनी स्वत:ची अस्मिता जपण्यासाठी 'आदिवासी साहित्य परिषदे'ची स्थापना केली.

चौथे आदिवासी साहित्य संमेलन 'आदिवासी साहित्य परिषदेने' २७ ते २९ जानेवारी १९८९ रोजी धुळे जिल्ह्यात 'नंदूरबार' येथे भरविले होते. या संमेलनाला उद्‌घाटक म्हणून 'उचल्या'कार लक्ष्मण गायकवाड व अध्यक्ष म्हणून लक्ष्मण माने असे दोन लक्ष्मण उपस्थित होते. या संमेलनापासून दोन वैशिष्ट्यपूर्ण गोष्टींची परंपरा सुरू झाली. एक म्हणजे या संमेलनात 'स्वागताध्यक्ष'पद निर्माण झाले व या संमेलनाचे स्वागताध्यक्ष होते डॉ. अमृतसिंग वसावे. दुसरे असे की, या संमेलनापासून ३ दिवसांचे साहित्य संमेलन सुरू झाले. प्रा. शरद पाटील, प्रा. अरूण कांबळे, श्री. बाबूराव मडावी, आ. इंद्रजितसिंग वसावे, डॉ. गोविंद गारे, जनार्दन महाराज इत्यादी मान्यवर या संमेलनाला उपस्थित होते. या संमेलनात आदिवासींचे पुढारी व माजी आमदार बाबुरावजी मडावी यांनी 'आपले साहित्य कसे असावे ?' याविषयी अतिशय प्रभावी विचार मांडले. ते म्हणाले, ''साहित्य हे जीवनाचे पैलू प्रतिबिंबित करणारा आरसा आहे. आम्ही कोण आहोत, कुठे आहोत आणि कसे आहोत ह्याची वेळोवेळी आपणास अनुभूती व्हावी याकरता आपण हे दालन चालू केले आहे. त्यामुळे साहित्य क्षेत्रातील कथा, कादंबऱ्या, काव्य, नाट्य, लेखनासारख्या परंपरागत लेखनाबरोबरच आदिवासी विकास, आदिम जनजागृती, त्यांच्या समस्या, त्यांचे सामाजिक अभिसरण, आर्थिक स्थिती, शैक्षणिक दर्जा, क्षेत्रविकास, कृषी आणि वनसंवर्धन तसेच अनेक समस्यांतून मुक्ती मिळविण्याचे उपाय सुचविणारे साहित्य निर्माण केल्यास ते जास्त उपकारक ठरेल.'' मडावींचे हे विचार आदिवासी साहित्यिकांना मार्गदर्शक ठरणारे आहेत.

या चौथ्या संमेलनानंतर आदिवासी साहित्य परिषदेने १९८९ यावर्षीच आदिवासी साहित्यिकांचे दोन मेळावे आयोजित केले होते. पैकी पहिला मेळावा गडचिरोली येथे डॉ. सुभाष सावरकर यांचे अध्यक्षतेखाली १८ व १९ फेब्रुवारी १९८९ रोजी भरविला होता तर दुसरा मेळावा पांढरकवडा येथे ८ मे १९८९ रोजी 'आदिम' चे लेखक डॉ. भाऊ मांडवकर यांचे अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या दोन्ही मेळाव्यांचे अध्यक्ष बिगर आदिवासी साहित्यिक व अभ्यासक होते. दुसऱ्या मेळाव्याचे उद्‌घाटकही डॉ. जयंतराव धावडे हे बिगर आदिवासीच होते.

आदिवासी साहित्य संमेलनाची सुरूवात विदर्भापासून झाली. पहिली तीनही साहित्य संमेलने विदर्भ व मराठवाड्यात झाली. चौथे आ. सा. संमेलन मात्र खानदेशात झाले. पाचव्या आ. सा. संमेलनाचा मोर्चा पश्चिम महाराष्ट्राकडे वळला. ठाणे जिल्ह्यात पालघर या तालुक्याच्या ठिकाणी पाचवे आदिवासी साहित्य संमेलन २३ ते २५ डिसेंबर १९९० रोजी संपन्न झाले. या संमेलनाचे वैशिष्ट्य असे की, या संमेलनाला वाहरू सोनवणे सारखा हाडाचा आदिवासी साहित्यिक अध्यक्ष म्हणून लाभला. वाहरु हा खऱ्या अर्थाने आदिवासी जाणीवेच्या कविता

करतो. 'गोधड' हा त्याचा काव्यसंग्रह 'कुसुमाग्रज' व 'यशवंतराव चव्हाण' या पुरस्कारांचा मानकरी ठरला. आदिवासी कार्यकर्ता व कवी असा दुहेरी मिलाप वाहरूच्या व्यक्तिमत्वात आढळतो. त्यामुळे साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद वाहरूला देण्यात आले ही आदिवासींच्या दृष्टीने खरोखरच अभिमानाची गोष्ट आहे. प्रसिद्ध दलित साहित्यिक बाबूराव बागूल हे संमेलनाचे उद्घाटक होते, तर स्वागताध्यक्ष होते काळूराम धोदडे. रत्नागिरी येथे २१ ते २३ डिसेंबर ९० रोजी ६४ वे अखिल भारतीय साहित्य संमेलन चालू असताना आदिवासींचे हे वेगळे व वैशिष्टचपूर्ण साहित्य संमेलन यशास्वीरित्या पार पडले ही अविस्मरणीय घटना म्हणावी लागेल.

आदिवासींना आता आत्मभान आले असल्याची जाणीव या संमेलनाच्या निमित्ताने झाली. शिकलेल्या आदिवासी पिढीकडून आता साहित्य निर्मिती होऊ लागली आहे. वाहरू सोनवणे ('गोधड' काव्यसंग्रह), विनायक तुमराम ('गोंडवन पेटले आहे' काव्यसंग्रह व 'क्रांतीवीर नारायणसिंह उईके' चरित्र) रवि कुरसंगे ('इंद्रियारण्य' काव्यसंग्रह), भुजंग मेश्राम ('उलगुलान' काव्यसंग्रह) त्याचप्रमाणे कुंडलिक केदारी, प्रभु राजगडकर, वामन शेळमाके, सोपान सुरकुले, मारूती कुळमेथे, उषाकिरण आश्राम, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. गोविंद गारे, कै. व्यंकटेश आश्राम, ऋषी मसराम इत्यादींचे साहित्य पाहिले की, त्यांच्या प्रगल्भ अनुभव विश्वाचे, त्यांच्या विशिष्ट भाषिक मांडणीचे, व अभिव्यक्तिच्या आगळ्या-वेगळ्या लकबीचे विशेष त्यांच्या लेखनात अवतरल्याचे जाणवते. तसेच काही वर्षांपूर्वी 'आदिवासी लेखक किती आहेत व आदिवासी साहित्य काय आहे?' असे प्रश्न विचारले जात, त्या प्रश्नांना या साहित्यनिर्मितीने उत्तर मिळाले आहे.

आदिवासी साहित्याची चळवळ सुरू होऊन १२ वर्षे म्हणजे एक तप पूर्ण झाले. या कालखंडात पाच आदिवासी साहित्य संमेलने, आदिवासी साहित्य परिषदेची स्थापना व ४ मेळावे अशी या चळवळीची वाटचाल आहे याशिवाय अनेक आदिवासी शिक्षित साहित्य निर्मितीच्या क्षेत्रात उतरले आहेत. परंतु या शिक्षितांमध्ये एक गोष्ट प्रकर्षाने जाणवली की, यांचे साहित्य कुठेतरी अनुकरणातून आल्यासारखे वाटते. त्यात आंतरिक तळमळ म्हणावी तितकी दिसून येत नाही. याचे कारण आदिवासींमध्येही दलितांप्रमाणे नवा सुशिक्षित मध्यमवर्ग निर्माण होत आहे. तो मनाने पांढरपेशा बनतो आहे. हे नव-शिक्षित उच्चवर्णियांच्या आकांक्षा व राहणीमान यांचा आदर्श समोर ठेवून प्रस्थापितांशी जवळीक साधण्याचा प्रयत्न करताहेत. त्यामुळे साहजिकच आपल्या सामान्य बांधवांपासून ते दूर चालले आहेत. आणि हेच पुढे साहित्य चळवळीला घातक ठरणारे आहे.

सुशिक्षित आदिवासींनी मध्यम-उच्चवर्णीय संस्कृतीच्या आदर्शाचे अंधानुकरण न करता सतत आपल्या सामान्य जनतेशी जवळीक ठेवली तरच आदिवासी साहित्याला वास्तवतेची धार चढेल. स्वतःच्या भाषेत, स्वतःच्या शैलीत समाज-वास्तवाची सहज सुलभ मांडणी करून आदिवासी संस्कृतीशी एकनिष्ठ असलेले साहित्य जेव्हा निर्माण होईल. तेव्हाच आदिवासी साहित्याला स्वतःचा वेगळा चेहरा लाभेल व आदिवासी साहित्याची चळवळ खऱ्या अर्थाने यशस्वी वाटचाल करू शकेल.

# रवि कुरसंगे : स्वतंत्र प्रज्ञेचा आदिवासी कलावंत

## भुजंग मेश्राम

आदिवासी साहित्याचा उदय गेल्या दशकाच्या उत्तरार्धात झाला. आदिवासी साहित्य म्हणजे मराठी साहित्य संदर्भातली प्रतिक्रिया नाही, हे प्रथम नमूद केले पाहिजे. आदिवासी लेखकांवर आंबेडकरी प्रेरणेचा व दलित साहित्याचा प्रभाव असूनही आज आदिवासी लेखक आपले वेगळेपण सिद्ध करत आहेत. यात जसे कवी, नाटककार तसे चित्रकार ही आहेत. वाहरु सोनावणे, विनायक तुमराम, संघजा मेश्राम, निलकांत कुलसंगे, सुभाष आडे, सोपान सुरकूले, उषाकिरण आत्राम, ही काही महत्वाची नावे. यातील कुणालाही नवोदित म्हणणे म्हणजे अन्याय कारक होईल. रवि कुरसंगे तर गेल्या १० वर्षापासून मराठी रंगभूमीवर काम करतोय. त्याच्या कार्याचा आढावा घेणे म्हणून आवश्यक ठरते.

रवि कुरसंगेचा जन्म १०-७-१९४९ रोजी सांताक्रूज मुंबईच्या कालीना झोपडपट्टीत झाला. त्याचे आजोबा पोटाची खळगी भरण्यासाठी मुंबईत आले. तेथेच त्याचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण आणि बी. ए. झाले. वडील पूर्वी ढंढार, ढेमसा करणारे. त्यामुळे घरातच गायन, वादन, अभिनय या कलाप्रकारांना वाव मिळायचा. कालीना मध्ये त्यावेळी परधानांनी ढंढारीचा जलसा सुरु केला होता. ( आज तो ऑर्केस्ट्राच्या रुपात शिल्लक आहे ) तर अशा गजबजलेल्या वातावरणात त्यांचे बालपण गेले. त्या बालपणावर त्याने 'चिन्ह' वार्षिकांत आत्मकथनपर लेखन केले आहे.

चित्रकलेची आवड पूर्वीपासूनच. कोणी गुरु भेटला नाही. कोळसा, खडू, ज्याने जमेल तशी चित्रे त्याने काढली. १९७२ साली डिप्लोमा इन ड्रॅमॅटिक आर्ट हे विशेष शिक्षण पूर्ण केले.

दरम्यान रवि कविता लिहू लागला. पुढे याच माध्यमातून भाऊ पाध्ये व दिलिप चित्रेशी परिचय झाला. 'अभिरुची' 'पूर्वा', 'हाकारा' मधून त्याच्या कविता येऊ लागल्या. लघुनियतकालिकांच्या चळवळीतही रवि सोबत होताच. त्याच्या परधानी कवितांना प्रचंड प्रतिसाद मिळाला. मराठी बोली भाषेत जे मोजके कवि लिहितात, त्यात रवि महत्वाचा कवि आहे.

'आंधरे सात पिढ्यातले;' या कवितेतील त्याचे काही शब्द बघा-

कापसाच्या बोंडावर आले  
पैस्याचे सोरा गंडे  
नासरीचे चार गंडे  
आन् टोलीचे दोन गंडे  
आठ कवड्याच्या हिसाबातले  
आमी आंधरे सातपिढ्यातले-  
महा बाप पोंगा फोडला, रिक्षा ओढला  
महा मामा चपराशाच्या वर्दीत मेला  
महा काका नोकरी लावाले मांगते पैसे  
मावसा तिन रुपयाची फनी बांधते  
महा भाऊ झाला बाबू ओरकत नाही मले  
आमी आंधरे सातपिढ्यातले- '

रविच्या कवितेत दाहकता प्रखर आहे. ती आदिम समाजाच्या स्थित्यंतराचे संदर्भ घेउन उभे राहते. ही कविता वादळाचे सोंग घेऊन येत नाही.

झाकटीच्या अंदारात तरालेल्या कन्या  
हारा मासातून आंबून जातेत  
झाल् पल्ल्यावर !  
गुआसंग गुबांत, काड्यासंग चुलीत  
मनातल्या विच्च्या जरुन जातेत  
झाल, पल्ल्यावर ! '

आपल्या पूर्वजांची ही सांस्कृतिक समीक्षा जितकी कळकळीची तेवढ्याच पोटतिडकीची. या टोळ्यांच्या आयुष्यात अंधार आहे. परंतु संध्याकाळ झाल्यावर ते अपंग बनतात. राखेत स्वत:ला शोधतात.

आदिवासी नेतृत्वावर एका कवितेतले भाष्य बघा-

'थो आला न आमचे तोंडचे पोंगे हिरला
तोंडचा घास हिरतेत तसा!
जीव देईन मनाला
आमी त्याले आमचा जीव समजलो
आमचे दुकासुकाचे दिवोस
थ्याच्या पाठीवर बांधलो, थो
टोंगऱ्यावर टोंगरा ठेवून
एका हाती पुस्तक घेऊन
डोऱ्याले झापड लावून
एका फोटोत जाऊन बसला!'

-तर ही काही रविच्या शब्दांची रुपं. त्याचा संग्रह मात्र अजून आला नाही. यावर्षी तो येतोय. रवि क्युबीझम या प्रकारातून आपली अभिव्यक्ती अधिक करतो. आपल्या व्यवस्थेतील ठोकळेबाजपणा आणि विसंगती यावर भाष्य करतांना त्याला क्युबीझम जवळचा वाटतो. त्याच्या चित्रांची प्रदर्शनें गेली ४ वेळा जहांगिर आर्ट गॅलरी मध्ये भरली आहेत.

'लाल चौकातला मार्क्सवाद' या शिषर्कांचे चित्र अधिक गाजले. भौमित्तिक ठोकळ्यांच्या आकारात पोलादी पुरुष दाखवला असून त्याचा एक डोळा तिरळा तर दुसरा पुंगळिसारखा. (त्यात रविला बहुतेक पोथिनिष्ठता रंगवायची असेल.) हा पुरूष बहुधा खुर्चीवर बसलेला दाखवला आहे. अशी निरनिराळ्या विषयांवर रवि अभिव्यक्त होतो. लोकांपर्यंत पोचतो.

'आर्टिस्ट डिरेक्टरी ऑफ इंडिया' व 'हूज हू इन आशिया १९८४' या मान्यवरांच्या संग्रहात रविला स्थान मिळाले आहे. ज्ञानेश्वर नाडकर्णी सारख्या समिक्षाने रविच्या चित्रांची नोंद आवर्जून घेतली आहे. १९८१ साली त्याला ललित कला अकादमीच्या चित्रासाठी पुरस्कार मिळाला आहे.

नंदूरबार येथे भरलेल्या आदिवासी साहित्य संमेलनात रविच्या चित्रांचे भले मोठे प्रदर्शन भरले होते. त्याच संमेलनात आदिवासी वारलींच्या चौक चित्रांचे प्रदर्शन तर त्याला लागून रविची चित्रे. आदिवासी चित्रकलेचा चढता आलेख समीक्षकांना पाहता आला. आदिवासी साहित्यासोबत आदिवासी चित्रकलाही विकसित होते आहे. याचेच ते प्रत्यंतर होते.

आदिवासी स्त्रियांची अर्धनग्न चित्रे काढणारे सिंघल आणि इतर मंडळींना आदिवासी स्त्रिचे शरीरच दाखवायचे असते. रवि कुरसंगे आदिवासींचे मानसिक आंदोलन त्याच्या चित्रातून उभे करतो. रवि सोबत आणखी कांही आदिवासी चित्रकार होते/ आहेत. त्यांची नावे दिवंगत अमित गिरडकर व सुर्यभान नागभिडे. आणखी ही असतील.

रवि कुरसंगे मराठीतील प्रायोगिक रंगभूमिशी निगडीत आहे. 'बोल बाबी बोल' 'मरण हप्त्याचे' 'झुलवा' अशा कितीतरी नाटकांचे नेपथ्य त्याने केले आहे. कांही एकांकिका लिहिल्या आहेत. त्याचे स्वत:चे एक नाटक आता रंगभूमीवर येत आहे. त्याला नेपथ्याबद्दल नाट्यदर्पण पुरस्कार सुद्धा मिळाला आहे. हे सर्व लिहिताना एका उत्कट घटनेचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

मुंबईत १३-१४ डिसेंबर रोजी 'महाभारताचे विश्वविख्यात नाट्य दिग्दर्शक पिटर ब्रुक यांची कार्यशाळा होती. त्या कार्यशाळेत अभिनयाचे प्रात्यक्षिक ज्यांनी पिटर ब्रुक समोर करुन दाखवले त्यात होते प्रख्यात सिने कलावंत नसिरुद्दीन शहा व आमचा आदिवासी कलावंत रवी कुरसंगे!

प्रख्यात कलासमिक्षक ज्ञानेश्वर नाडकर्णींनी लिहिले आहे. After a few more exercises we reach the high point of force when Bruce Myers and other actors parti-cipate in a routine the climex of this is an

impromptu entry by backstage worker Ravi Kursunge into the stage area wildly gesticulating and ultering the same sort of Italianate- gibberish being Mouthed by Myers and Benichou. He did so well that I thought it had been all rehearsed! (The independent, 16-12-89)

असा हा स्वतःच संधी मिळवणारा हा आदिवासी कलावंत वामन केंद्रे, भारत तांडेल, चेतन दातार सोबत काम करतो.

भविष्याबाबत काहीही संकल्प न सोडता रवि कविता लिहितो, चित्र काढतो, नेपथ्य करतो, दिग्दर्शन करीत असतो.

पश्चिम रेल्वेच्या कॅटरींग विभागात निरीक्षक म्हणून चर्चगेटला नोकरी करणारा हा कलावंत खाजगी जीवनातही बंडखोर आहे. गोंडांमधील राजगोंड-परधान हा अंतर्गत वाद तीव्र होत असतानाच आदिवासी समाज ही या उतरंडीवर लंगडत असतानाच रवीचा प्रेमविवाह गोंड तरुणीशी झाला. पत्नीही कविता लेखन करते.

रवी कुरसंगेची चित्रे, त्याच्या कविता आणि त्याची नाटके व नेपथ्य आदिवासी समाजाला व आदिवासी साहित्याला मानदंड ठरणाऱ्या आहेत. आदिवासींच्या चळवळींना अनुकूल ठरणाऱ्या आहेत.

रवि कुरसंगेचा पत्ता :
कॅटरींग विभाग
खान पान सेवा,
१ ला माळा,
चर्चगेट स्टेशन इमारत,
चर्चगेट, मुंबई,

## सैनिक

आमच्या वस्त्रहीन संस्कृतिला
नेसवू नका राजेहो, पुन्हा-
विषमतावादयांचे भाडोत्री वस्त्र
कारण
कालच्या अलंकारित संस्कृतिचे
वस्त्र फेडणारे हेचं ते
जे आज तुम्हाला व्हिस्कीच्या घोटात
राजेशाहीचे खोटे समाधान
मानायला लावीत आहे
आणि दुसरीकडे
जंगल माणसांचे सीमेवरच
रस्ते रोखल्या जात आहे
राजेहो ! नेतेही बनवितात तुम्हाला
गाई-बकरीच्या कपडा सारखे
पण लक्षात ठेवा
जेव्हा त्यांचा स्वार्थ निघेल
तेव्हा तुमचा कळप कसई-खाटकांचा असेल
त्याअगोदरच दोस्त हो !
तुम्हाला बाबांच्या समता लढयाचे
सैनिक होणे पुरेल
जगणे होईल सिंहाचे; मरणे होईल सिंहाचे
नाहीतर उद्याचीही संस्कृती असेल आजच्या वस्त्रहीन
संस्कृती सारखी...अखवी नंगी

- कृष्णकुमार चांदेकर

# आदिवासी सायबाची बायकू

## - कुंडलिक केदारी -

ऑफिसची कामं उरकून आज मी जरा लवकरच घरी निघालो. नेहमी यायला होणारा उशीर ही तिची नेहमीचीच तक्रार एकदा खोडून काढायची ही एक नामी संधी आहे म्हणून मी मनोमन खूष होतो. 'आज तिला सरप्राईज करायचं' मी मनाशी ठरवलं होतं. नेहमी जायला-यायला उशीर, ह्याचं तिला फारसं काही वाटत नाही. आज मी ऑफिस सुटल्यावर सरळ घरी आणि तेही जरा लवकर पाहून तिचा चेहरा फुलेल. त्या खुषीत सुदैवानं घरी शेजारची कोणी तिची मैत्रिण नसेल किंवा छोटू (मुलगा) खेळायला बाहेर गेला असल्यास गोड मिठी आणि जरा चावटपणा करायला मिळेल या रोमँटिक कल्पनेने ऑफिसची बॅग घेवून घरी आलो. ड्रायव्हरला परस्पर तेथूनच पाठवून दिले. नेहमीच फ्लॅट सोसायटीतले बंद दरवाजे असताना माझ्या घरचा दरवाजा चक्क उघडा! बेलची सुद्धा तकलीफ झाली नाही. मी सरळ आत आलो. बैठकीच्या खोलीत कोणीच नव्हते. मी मुद्दाम गुणगुणत बूट-मोजे काढण्याचा आवाज केला. परंतु किचनमधून काहीच प्रतिसाद नाही. मी किचनकडे वळणार तोच टेबलावर तोडक्या-मोडक्या अक्षरात पोस्टकार्डने मात्र दर्शन दिले. परिचित अक्षर आणि गावाकडचे पत्र म्हणून मी उचललं. तेवढ्यात संथ गतीने पत्नीचे किचनमधून आगमन झाले. कोरा चेहरा, कोणताही भाव डोळ्यात नाही. मी एकवेळ तिच्याकडे पाहून पुन्हा पत्रात डोकावलो. तिची दृष्टी मात्र माझ्यावर खिळली होती. माझा चेहरा उजळू लागला तसा तिचा चेहरा काळा पडू लागला अगदी विरूद्ध प्रतिक्रिया..!

'पीडा येणार!'

'सुनिता तोंड आवर!'

तोंडात आलेली अस्सल आदिवासी शिवी ओठातच रीचवून जरा समजुतीनं सांगीतले.

'माझी आई तुझी सासू ही तुला पीडा वाटते? काय सासुरवास केला तुला?

'मी कशाला सासुरवास काढू? एक दिवस सुद्धा घरी राहिली नसते!' क्षणभर मी स्तब्ध झालो. शब्दाब्दातून उमटणारी ही प्रतिक्रिया म्हणजे आधुनिक मुलीची होती. नवरा आणि आपण ह्यापेक्षा सासरकडील कोणीही नको अशीच त्यांची भावना झाली आहे. त्याला आमच्या आदिवासी मुली-सुना देखील अपवाद नाहीत. आणि त्याला आमची पत्नी म्हणजे त्या प्रवृत्तीचा कळसच.

'सुनीता किती दिवसांनी आई भेटायला येतेय?'

'म्हणून काय झालं तुम्ही वरचेवर जाताच ना? दरमहिन्याला कोणीतरी आहेच नसती कटकट मेली'

'तू काय त्यांना पंचपक्वान्न करुन घालते की काय?'

'कशाला घालू, खायला काय कमी लागतं?'

'खायला काय तुझ्या बापाच्या घरचे घालते की काय?'

'पण करावं मलाच लागतं. राबराब स्वयंपाक घरात राबाव लागतं, पाहुणे आले की मोलकरीण हमखास दांडी मारते, धुणी-भांडी मलाच करावी लागतात. तुम्ही बसता पाहुण्यांबरोबर गुलूगुलू गप्पा मारत आणि माझा इकडे कामाखाली

जीव जातो. घराबाहेर पडायला देखील वेळ होत नाही.'

'ते काय तुला नको म्हणतात ?'

'ते कशाला म्हणतील, मलाच तोंड दाखवायची लाज वाटते.. गावाकडून आलेल्या माणसाकडे पाहून, सोसायटीतील बायका नाकं मुरडतात. मलाच चारचौघीत खाली पहाव लागतं. आदिवासी ते मेले आदिवासीच.'

'तू काय वाण्या बामणाची आहेस काय ?'

'नसेना का पण दिसतेच तशी. काय हो तुम्हाला शिकलेली शहरातली मुलगी हवी होती म्हणून तर शोधकाढीत माझ्या बापाघरी आलात'

'तिथं तर माझी चूक झाली !'

'करायची होती खेड्यातलीच, लुगड्याचा काष्टा घालून फिरणारी आणि मिसरीच्या पिचकाऱ्या मारणारी. कशाला आला माझ्या बापाच्या दारी ?'

'ती माझी चूक दुरुस्त करायची म्हणतो'

'म्हणजे तुम्हाला म्हणायचं तरी काय ? चूक दुरुस्त करणार म्हणजे काय ?'

'तूच तर म्हणतेस आणायची होती खेड्यातून...'

आणि वरच्या सुरात भांडणारी सुनीता एकदम खालच्या सुरावर आली. भोकाड पसरून रडायला लागली, तिने पूर्वजांचा केलेला उद्धार ऐकून कथा कादंबऱ्यातील आदिवासी लोकजीवनापेक्षा साक्षात आदिवासी जीवनाची कहाणी ऐकविली. सुधारण्याच्या हव्यासापोटी माझीच धर्मपत्नी माझ्याशी अशी वागते पहा. मग इतर लोकांबद्दल आम्ही का ओरडावं, माझ्याच जात बांधवांबद्दल माझ्या कुटुंबियांत किती जिव्हाळा आहे ? मी माझ्या बांधवांसाठी काय करतो याची गणितं शून्य आहेत.

थोड्यावेळाने धुसपुस संपल्यावर समजावण्याच्या सुरात पुन्हा तिनं तक्रारी मांडायला सुरुवात केली.

'मागल्या महिन्यात तुमची बहीण आली. घरात शिरतानी दरवाजा बाहेर चक्क पिचकारी मारली. काळ्याकुट्ट मिसरीची. शेजारच्या जोशांचं दार उघडंच होतं. 'हे' पाहताच दरवाजा खाडकन बंद केला. त्या गेल्यानंतर एक दिवस जोशी बाईंनी चारचौघीत बसलो असताना चक्क मला विचारलं 'काय हो घरात शिरताना दरवाज्या बाहेर थुंकण्याची तुमच्यात पध्दत आहे का ?' गप्प बसाव लागलं आणि विषयांतर केलं मी'

'हे बघ सुनीता माझे आईवडील खेड्यातले आहेत त्यांची काय तुझ्या बापासारखी पिढी शहरात गेली नाही. परंतु त्यांना नीट समजावून सांगितलं तर शहरातील शहाण्यांपेक्षा चांगले वागतात. तू सुशिक्षित आहेस, नागरी शिष्टाचाराचा अतिरेक करणारी आहेस. तू समजावून सागितलं असतं तर नसते वागले तसे ?'

'लय झालं कौतुक ?' म्हणत तिनं किचनकडे मोर्चा वळवला. थोड्याच वेळात गरम कॉफी आणून पुढ्यात ठेवली कर्तव्यापोटी प्रेमाने दिलेली गोड कॉफी सुद्धा कडवटपणे घशाखाली लोटली. चार दिवसांनी पत्राने कळविल्याप्रमाणे आईच्या ऐवजी बाबा पुण्यात माझ्याकडे आले. माझा मुलगा तेव्हा पहिली इयत्तेत जावू लागला होता. नातवाला मोठा झाल्यावर पाहण्याचा हा त्यांचा पहिलाच प्रसंग. घरात आल्यावर प्रेमानं त्यांनी त्याला जवळ बोलावलं. वयोवृद्ध, डोक्याला तांबड्या रंगाचं जुनं पागोटं असलेले माझे वडील वेगळे वाटले आणि तो जवळ गेला. तोपर्यंत पाणी पिऊन झाल्यावर त्यांनी जुन्या हातपिशवीतून खाऊचा पुडा बाहेर काढला. तांबड्या गोडशेवचा त्या खाऊनं त्याला मोहच घातला. एक शेवचा तुकडा उचलून नातवाच्या तोंडात घालणार तोच सुनीता ओरडली,

'धीरज उघड्यावरचा खाऊ खावून आजारी पडायचं आहे का ? तू खाशील आणि आजारी पडल्यावर आम्हाला निस्तरावं लागेल'

त्या आवाजानं आणि आईच्या धाकानं मुलानं आजोबांकडून सोडवणूक करुन तसाच किचनकडे पळायचा प्रयत्न करु लागला. वडिलांनी त्याला समजावून प्रेमाने आणलेला खाऊचा पुडा

तसाच हातात कोंबला. घ्यावं का नको असाच विचार करीत मुलगा किचनमध्ये आला. तो पर्यंत सुनिताचा पारा शंभर डिग्री चढलेला. तिने तो पुडा त्याकडून घेतला आणि चक्क कचऱ्याच्या डब्यात टाकला. तिचा तो दुर्गावतार पाहून बिचारा धीरज रडू लागला. वडिलांनी तिची पुष्कळ समजूत काढण्याचा व चांगला खाऊ असल्याचा दाखला दिला; परंतु तिनं काही जुमानलं नाही. मुलाची समजूत काढण्यासाठी फ्रीजमधुन आईस्क्रीमचा मोठा कप काढून त्याच्या हाती ठेवला. खावून होईपर्यंत मुलगा काही बाहेर आला नाही. वडिलांना मात्र कससंच झालं. त्यानंतर चार दिवस रहायला आलेले वडील दुसरेच दिवशी निघून गेले. एस्टी स्टॅन्डवर पोहचवायला मी गेलो तेव्हा त्यांनी घडलेला प्रसंग सांगितला आणि मोठ्या नाराजीने ते गाडीत शिरले. गाडी सुरु झाली. मी त्यांना निरोप दिला, म्हणण्यापेक्षा त्यांनीच आमचा निरोप घेतला. मीही गाडीला किक् मारली आणि घरी आलो. घडलेल्या प्रसंगाबद्दल माफी कशी मागावी हे सुचलंही नाही. सुनीतानी दिलेल्या वागणुकीवर संतापून मी जड परंतु आवेषानं पावलं टाकीत जिना चढलो तो दरवाजा बंद. बेल वाजवून झाल्यावर बऱ्याच उशीरानं दरवाजा उघडला आणि पाहतो तर सुनीता दिवाणखान्यातील एक एक कपडा मेलेला उंदीर उचलून टाकावा तसा तिरस्काराने बाथरुममध्ये टाकीत होती. उशाची कव्हरं, चादर, सतरंज्या जिथं जिथं वडिलांचा स्पर्श झाला असेल ती सारी कपडे बाथरुम मध्ये जमा झाली. का तर म्हणे कपड्यांचा वास येतो म्हणून. तिची ती आवरा आवरी पाहून माझा संताप विरुन गेला. परंतु खोल कोठेतरी दडून बसला; योग्य वेळी बाहेर पडण्यासाठी. त्या दिवशी आमची मोलकरीण आली आणि पडलेली भांडी तिनं घासली, कुठलीही तक्रार न करता. सुनितालाही तिच्या सहनशीलतेचे आश्चर्य वाटलं असेल. पुन्हा भांडीकुंडी घासून येते म्हणून ती गेली, ती पुन्हा दुपारपर्यंत फिरकलीच नाही. सुनीताचा जीव नुसता कासावीस झाला होता. मोलकरीण यायची कळेना झाल्यावर वरच्या ब्लॉक मधील कुलकर्ण्यांकडे चौकशी करुन आली. मोलकरीण त्यांची धुणी करुन निघून गेली होती. सुनीतानं आमच्या जेवणाकडे लक्ष न देता साडी वर खोचली. रिन साबणाची वडी घेतली आणि काही न बोलता बाथरूममध्ये गेली. नळ सोडून कपडे भिजवू लागली. आणि मग मोलकरीण, मी आणि माझे वडील ह्यांच्या नावाने आरडा ओरडा, शिव्या हासडीत कपडे धुवू लागली. एक तासाभराने चांगली तिच्यामनासारखी स्वच्छ कपडे धुवून बाहेर आली. काय बोलावं हे मला कळेना. तिनं रागारागाने कपडे सुकायला टाकले आणि बेडरूममध्ये पलंगावर पडली ती आजारीच झाली. रात्री तिला थंडी आणि ताप भरून आला. त्या रात्री ब्रेड-दूध खावूनं आम्ही राहिलो आणि तिच्यावर राग काढण्या ऐवजी तिचीच शुश्रूषा करण्यात सारा संताप मावळला. मी या प्लॉट सोसायटीत रहायला आल्यापासून एकएक शिष्टाचार पाळताना नाकी नऊ येत होते. कधी कधी बोलण्याच्या ओघात माझ्या शब्दातून आदिवासी वळणाच्या शब्दांचा सहज वापर होतो. परंतु त्यातला एखादा शब्द माझा मुलगा धीरज पटकन उचलतो आणि म्हणतो 'गावाकडल्या माणसांसारखे काय बोलता ? जरा नीट बोला !' आणि मला आणखी शरमल्यासारखे होते. यावेळी मला इसापनितीतल्या निळ्या कोल्हाची गोष्ट आठवते. बाह्यकारणामुळे निळाई आली म्हणून तो जंगलातील सर्व प्राण्यांना थक्क करतो व आपले अधिपत्य दाखवितो परंतु त्याच्या ज्ञात बांधवांची 'कोल्हेकुई' ऐकल्यावर त्याच्याही तोंडातून 'कुईपुई' नकळत आवाज बाहेर पडतो आणि सर्व पितळ उघड पडतं. आज जे काही

असेल ते झाकायचे कशासाठी हा प्रश्न मला पडतो. परंतु माझ्या कुटुंबियांकडून मात्र तसा प्रयत्न केला जातो आणि मलाही ते जबरदस्तीने अंगवळणी पाडून घ्याव लागतं. खरं तर ह्यामुळे माझ्या कर्तृत्वाची छाप कोठे कमी पडते असं काही होत नाही. सर्वत्र जबाबदार अधिकारी म्हणून मी सराईतपणे वावरतो. परंतु कधी शिष्टाचारांची मला उबग येते. अंतर्मुख होवून मी विचार करु लागतो. तेव्हा वाटतं मी 'आदिवासी' कुटुंबात जन्माला येणे ही त्या समाजाची पुण्याई की ज्या शासकीय सवलतीचा आधार सामान्य ज्ञान आणि विदक्ता असूनही मी या उच्च पदस्थ जागी पोहोचलो. परंतु मी माझ्या गावाकडील कुटुंबियांसाठी काय केलं ? त्यांना मी जवळचा वाटतो का ? आपलं म्हणण्यासाठी मी त्यांच्यासाठी काय केलं आहे. त्यांना मी किंवा माझ्या कुटुंबियांकडून चांगली वागणूक मिळते का ? आणि असंच घडत असेल आणि घडणार असेल तर इतर सवर्ण समाजाने त्यांना दूर लोटले तर आम्हाला वाईट का वाटावे ? आदिवासींची सुधारणा करण्यास सुशिक्षित आणि पदस्थ आदिवासी सेवकांचा सहभाग नसेल तर काय त्यांची सुधारणा इंपोर्टेड समाज सुधारकांकडून करून घ्यायची ? आज मी समाजाच्या नजरेतून 'नालाईक' ठरलो आहे. आमचे युवक आणि पुढारी आम्हाला 'आदिवासीतील बामण' म्हणून जाहीर हिणवतात. आणि मी ते मान्यही केले आहे. या सर्व घटनेला प्रभावी वळण देणाऱ्या माझ्याच धर्मपत्नीला सांष्टांग दंडवत घालाव वाटतं की खरच तुझ्यासारखी तूच 'आदिवासी सायबाची बायकू' आणि पर्यायाने मी...

## होळी

मुकपणे जुलूम सहन करुन
आज गिळताहेत
कधीतरी,
आग ओकावी लागेल,
तुटून पडू द्या मर्यादा
सहनशिलतेच्या,
शांतताच भंग पावू द्या,
हातात दिवटी घेऊन
अन्याय अत्याचाराविरुद्धची,
होळी पेटूच द्या
होळीच्या चटक्याने
सर्वांग होरपळून निघेल
उडणाऱ्या ठिणग्या अंगावर पडतील
तरीही थांबण्यासाठी हे करावेच लागेल.
महान लाकडांचा बळी द्यावा लागेल
ढकलावे लागेल वडे भाकरींना
हे बघवणे होणार नाही
त्याशिवाय
मुक्तता मिळणार नाही
एकत्रितपणे तयारी करावी लागेल
एकटयाला शक्य नाही,
होळी पेटवणे

- जीवन गेडाम

THE MAHARASHTRA ASSOCIATION OF ANTHROPOLOGICAL SCIENCES

# जान्या काका

## ले. :- शेख सलिम अहमद

आमगाव -गावाचे नाव तर अर्धमराठी वाटते. कदाचित गुजराथच्या सरहद्दीवर वसल्यामुळे तसे असावे. पूर्वी या ठिकाणी वाणीसावकारांच्या आंबराया असाव्यात. कारण काही तुरळक ठिकाणी हापूस, पायरी, मानकूर या जातींच्या आंब्याची जीर्ण झाडे उभी आहेत.

सहा-सात पाड्यांचे मिळून आमगांव वसले आहे. या प्रत्येक पाड्यात पंधरा-वीस गवती झोपड्या व त्यात राहणारे वारली, घोडी या आदिवासी जमातीचे लोक. ही झाली आमगावची वस्ती.

जवळच्याच गुजराथ हद्दीतील चाणाक्ष वाण्यांनी पन्नास पाऊणशे वर्षांपूर्वी या भागात प्रवेश करून सावकारी केली होती. अज्ञानी व गरीब आदिवासींच्या जमिनी बळकावल्या. शेतीच्या जोडीला आंबराया लावल्या व त्या गतकाळचे साक्षीदार म्हणून काही ठिकाणी जीर्ण आम्रवृक्ष उभे आहेत.

वाणी सावकारांनी आदिवासींची शेतजमीन बळकावली व ते शेती करु लागले. काहींनी कुळाकडे जमिनी करण्यासाठी दिल्या त्या पुढे कूळ कायद्याने कसणाऱ्यांना मिळाल्या पण गवती जमिनी सावकारांकडेच राहिल्या. गवताचा व्यापार याच वाणी मंडळीकडे आहे.

आदिवासी जरी कायद्याने जमीन मालक झाला तरी सर्व शेती कसण्याची त्याची आर्थिक कुवत नाही. पोटापुरती जमीन करुन बाकीची जमीन ओस पडू लागली व त्या ओस पडणाऱ्या जमिनीत गवत होऊ लागले हे. गवत विकत घेण्यास सावकार तयार होताच. आदिवासींचा सावकाराशी संबंध सुटला नव्हता. अशी थोड्याफार प्रमाणात सावकारी आदिवासी भागात मूळ धरुन आहे.

फिरस्तीच्या नोकरीमुळे या आमगावला भेट देण्याची वेळ आली. आमगांवला जावयाचे म्हणजे मुंबई-अहमदाबाद रस्त्याने तलासरी येथून जाऊन आमगाव फाट्यामधून पश्चिमकडें यावयाचे. हे अंतर बारा-पंधरा कि. मीटरचे आहे.

आमगांवला निघायचे म्हणून सकाळीच घरातून बाहेर पडलो व पायी पायी निघालो. दुपारच्या रखरखत्या उन्हात मी आमगांवला पोहचलो. घामाने सर्व शरीर चिकट झाले होते. ग्रामपंचायत कचेरी शोधून काढली व ग्राम सेवकांची वाट पहात तेथे थांबलो. या कचेरीच्या पुढे दोन-चार आदिवासी विड्या वळत बसले होते. त्याच्यातला एकजण सोंगट्यात आग पाडायचा प्रयत्न करीत होता. इतक्यात त्याचे लक्ष माझ्याकडे गेले व त्याने आपला प्रयत्न थांबविला व तो उठून माझ्याजवळ आला. पुरा उंच माणूस वृद्धत्वाची झांक त्याच्या शरिरावर होती. कमरेला फक्त वितभर लंगोटी व अंगात बंडी, डोक्यावर फटकूर गुन्डाळलेले व कानात ओबड धोबड पण चांदीच्या बाळ्या, हातात चांदीचे कडे, असा या व्यक्तिचा वेश होता. त्याचे वय ऐंशी-पंच्याऐंशी असावे असा मी अंदाज केला.

'पाहना कोठून आला' या उंच व्यक्तिने विचारणा केली.

'तलासरीहून ग्रामसेवकास भेटावयाचे आहे' मी उत्तरलो.

मी मनात विचार केला की, या गृहस्थाला या नुसत्या चौकशा कशा करता? इतक्यात

ग्रामसेवक येऊन पोहोचला त्याने माझी ओळख करुन दिली, 'हे जान्याकाका, आमगावचेच राहणारे आहेत. येथे येतात अधूनमधून गप्पा मारायला.'

जान्याकाकाची व माझी पहिली ओळख झाली. त्याने मला माझी माहिती विचारली. मी त्याला ती दिली. त्यानंतर इकडतिकडच्या गप्पा झाल्या व म्हातारा घराकडे निघून गेला. त्यानंतर जेव्हा जेव्हा माझे जाणे आमगावला होई त्या त्या वेळी म्हातारा जान्याकाका हटकून माझ्या भेटीसाठी येई; अशा प्रकारे त्याचा माझा परिचय वाढत राहिला वास्ताविक जान्याकाका माझा आजोबा शोभला असता! पण आमची दोस्ती जमली व आम्ही दोघेही मैतर झालो. मी मैतर म्हणतो पण जान्याकाकाच्या दृष्टीने मी त्याचा मैतर नव्हतो तर जान्याकाकाचे माझ्यावर प्रेम होते व त्याला माझ्याविषयी आपलेपणा होता असे म्हणणे जास्त वाजवी ठरेल.

माझी भेट झाली की जान्याकाका विचारायचा, 'काय कवॉ आला' तो मला अरे तुरे करायचा. त्याच्या भाषेत बोलायचा. त्याला कृत्रिम अदबीची भाषा माहीत नव्हती! साधा सरळ रांगडा माणूस होता तो!

मी आमगावला गेलो व त्याची भेट झाली तर जान्याकाका म्हणायचा 'तू भुकेला असशील' त्यावर मी म्हणायचो, 'नाही मी जेवण करून आलो आहे' परन्तु जान्याकाकाला माहित असायचे की, ज्या अर्थी मी अवेळी आलो आहे, त्याअर्थी जेवण झालेले नाही. तो उठून घरी जाई व पावशेर तांदूळ, वाटीभर तूरडाळ आणि सोबत कोंबडा घेऊन येई व मला म्हणे 'हा घे तुझा शिधा'

एकदोन वेळा हे ठीक होते परन्तु प्रत्येक भेटीच्या वेळी जान्याकाकाने माझ्यासाठी त्रास सोसावा हे माझ्या बुद्धीला पटत नव्हते. एकदा मी त्याला म्हणालो, जान्याकाका, शिधाबिधा काही नको, म्हाताऱ्याचा चेहरा उतरला तो म्हणाला, 'तू माझा माणूस हाय. मी भात रांधला तर तुला आवडणार नाही म्हणून मी तुझा शिधा येथे आणतो. तू जेवलास तर मला वाटते माझ्याकडेच जेवलास,'' या खुलाशावर तरी काय म्हणणार?

मी स्वत:शी विचार करीत होतो. या माणसाचे माझ्याशी काही काम नाही, देणे घेणे नाही. मग हा म्हातारा माझ्यासाठी येवढी उठाठेव का बरे करीत असावा. पण त्याचे उत्तर सापडत नव्हते. फक्त त्याला माझी ओढ होती व मी सुद्धा त्याच्या अगदी जवळ जाऊन पोहोचलो होतो.

मी आमगांवला फेरी लांबवली की जान्याकाका तलासरीला यायचा माझी खुशाली घेण्यासाठी! जान्याकाका आला तर मी विचारायचो, काय जान्याकाका आज कुणीकडे?

''नाही, येरोच तुला भेटायला आलो'' जान्याकाकाचे उत्तर यावयाचे. तास अर्धातास जान्याकाका माझ्या जवळ बसायचा व मग म्हणायचा 'मी जातो. तू कवा येशील आमगांवा?' ''फिरती निघाली की मी येईन पण नक्की सांगत नाही'', मी म्हणालो ''तू पुढच्या हफ्त्यात ये. मला भेटल्याबिगर जाऊ नको.'' जान्याकाका ''बरे मी येईन,'' मी आश्वासन दिले की तो समाधानी मनाने गेला. तो गेल्यावर मी विचार करु लागलो जान्याकाका आमन्त्रण द्यायला आला होता का? काय बरे काम काढले असेल?

योगायोगाने लवकरच माझी फिरती आमगांव भागात लागली. जान्याकाकाला वास लागला. तो भेटीला आला त्याला समाधान वाटले होते. मी केलेल्या वायद्याप्रमाणे मी आलो होतो. त्याच्या चेहऱ्यावर हास्य उमटले व बोळक्या तोंडातले ओठ हंसतांना थरथरत होते.

'चल आपल्या भोंग्यावर,' जान्याकाका म्हणाला ही भोंग्याची काय भानगड? मी मनात विचार करु लागलो. जान्याकाका पुढे होवून मला आपल्या शेताच्या मार्गाकडे नेत होता.

मी काही न बोलता मुकाट्याने त्याच्यामागे चालू लागलो.

भोंगा म्हणजे शेतावर तात्पुरती उभारलेली झोपडी. शिन्दीच्या झावळ्यांनी शाकारलेली व चार खुंटावर उभी केलेली ! असे भोंग्याचे स्वरूप होते.

भोंग्यावर पोहचल्यावर पाहिले की दोन माणसे स्वयंपाकाची तयारी करीत आहेत. जान्याकाकाने त्यांना हुकूम सोडला ''घाय करा'' नंतर तो माझ्याकडे वळून म्हणाला, 'तू बस घोंगडीवर मी ह्यो आलो.' तो झटकन तेथून निघून गेला व अर्धाएक तासात परत आला. येताना त्याच्या हातात घागरीसारखे मडके होते व त्या मडक्याचे तोंडावर पांढराशुभ्र फेस दरदरुन उफाळत होता,

''हे काय आणले जान्याकाका ?'' मी विचारले. ''दोन शिंद्या ठेवल्या आहेत नंबरवाल्याकडून. तुला आज गोडीसूर पाजायची आहे,'' जान्याकाकाने खुलासा केला. त्याने बाहेरून मोठाली हिरवी पाने तोडून आणली व त्यातले एक माझ्या हातात देत म्हणाला, 'या खालचं पी'

आता काय करायच ? मी तर पुरा गोंधळून गेलो. जान्याकाकाने पानाची दोन्ही टोके चिमटचात धरली व त्याची आडवी पानं करुन मधली पोकळी तोंडाकडे नेली. तो मला प्रात्यक्षिक दाखवत होता. नंतर ते पान माझ्या हाती देत म्हणाला, असा धर मी वाढतो, त्याच्या म्हणण्याप्रमाणे मी पान धरले व तोंडाजवळ नेले व जान्याकाका वाढू लागला. उन्हाचे वेळी ताजी ताडी गोडमधूर वाटत होती माझा रोखलेला श्वास सुटला मी पान दूर केले व पुरे म्हणालो

''तू कच्चा गडी हायेस,'' जान्याकाका हांसत हांसत म्हणाला, मी जवान होतो ते वखत एका दमात एक बांडी ताडी पियायचा.

जान्या काकाला फक्त ताडीचा शोक होता. पूर्वी तो कधीकधी सणावारी दारु प्यायचा पण ती सुरंगी दारु फिरंगी हद्दीतील असायची. पण आता दारुडचा माणूस पाहिला की त्याच्या कपाळावर आठ्या चढायच्या. ताडी ही आदिवासींच्या कष्टमय जीवनातली विरंगुळ्याची बाब आहे. त्याला जर ताडी मिळाली तर दारुकडे तो ढुंकूनही पाहात नाही. ताडीने त्याची भूक शमते. तो दुःख विसरतो ताडीची नशा दारुच्या नशेसारखी प्रबळ नसते. मंदमंद गतीची नशा ताडीमुळे येते.

पूर्वी आदिवासी भागातले पारशी सावकार आदिवासी शेतमजूरांना एक आणा मजुरी व एक ताडीची बाटली देऊन शेतकापणी व झोडणीची कामे करुन घ्यावयाचे. ताडीचे आकर्षण आदिवासींना इतके आहे की, घोटभर ताडीसाठी ते सहज चार पाच मैल चालत जाऊन ती पिऊन परत येतात.

एक दिवस जान्याकाका मला भेटायला आला. तो थोडा विचारात आहे असे मला वाटले! काय जान्याकाका कसली फिकीर करतोय ? मी येरिच थोडा काम होता'' असे म्हणून तो स्वस्थ बसून राहिला. मी त्याला घरी घेऊन आलो. घरी आल्यावर तो फरशीवर बसत होता पण मी त्याला तसे करु दिले नाही. माझ्याजवळ खूर्चीवर बसविले. घरात दोन कप चहा ठेवण्यास सांगितले.

एक निव्वळ लंगोटीवाला म्हातारा आदिवासी माझ्याजवळ खूर्चीवर बसून बोलतो आहे व मीही त्याच्याकडे आस्थेने पहात असल्याचे पाहून घरातील मंडळी आश्चर्य व्यक्त करीत होती. त्यांना काय माहित माझे व जान्याकाकाचे जिव्हाळ्याचे संबंध ?

चहा आला मी फराळाचे मागविले आम्ही दोघांनी चहा घेतला. त्यानंतर मी जान्याकाकाला त्याच्या कामाबद्दल विचारले. तो अडखळत होता. सांगू की सांगू नये अशा द्विधा मनःस्थितीत होता. मी खोदून खोदून विचारले, त्याने सांगितले ''एक शंभर रुपये दे अडचण आहे. भात पिकल्यावर भात देईन,'' त्यावर मी म्हणालो, ''जान्याकाका मला भातबित काही नको तू पैसे घेऊन जा.''

भातावर पैसे सवाईने देतात हे मला माहित होते पण असे सवाईवर पैसे देणे माझ्या बुद्धीला पटत नव्हते म्हणून पैसे देताना मी सांगितले 'हे पैसे उसने दिले आहेत सवड झाली तर परत कर' जान्याकाका समाधानाने गेला.

पावसाळा सुरु झाला फिरतीचे प्रमाण कमी झाले. त्यामुळे आमगावाकडे माझे जाणे झाले नाही. जान्याकाकाही शेतीच्या कामात गुंतलेल्यामुळे त्याची चक्कर झाली नाही.

अश्विन महिना संपत आला. शेते पिकून पिवळी पडली आणि एक दिवस जान्याकाका आपल्या बैलगाडीत दीडदोन पोती भात भरून माझेघरी दत्त म्हणून उभा राहिला!

'कायरे जान्याकाका आज हाटाला आला होता काय? मी विचारले "नाही तुझा भात आणला आहे," जान्याकाकाने उत्तर दिले.

"मी भातावर कोठे पैसे दिले होते, तू भात कशाला आणलेस?" मी विचारणा केली. 'तर मग मी पैसे कोठचे आणू? पहिला भात झोडला अन तुला आणला. जान्याकाकाने खुलासा केला. 'अरे पण देवबिव केलास की नाही?' मी विचारले. 'देव मगारून करीन' जान्याकाका शांतपणे बोलला.

खळ्याचा देव केल्याशिवाय आदिवासी भात अथवा इतर धान्याच्या झोडणीला हात घालीत नाहीत हे मला माहित होते. मी जान्याकाकाला भातावर पैसे दिले नव्हते. त्याची अडचण दूर करण्याच्या उद्देशाने ते दिले होते. म्हणून मी म्हणालो, "जान्याकाका मी पैशाची घाई केली नव्हती मग तू ही घाई का केली?"

"मिहयॉन तुला शब्द दिला होता भात पिकल्यावर भात देईन म्हणून," तो निग्रही आवाजात म्हणाला व त्याने भाताची पोती घरात उतरवून ठेवली. मला त्याच्या कृतीचे वाईट वाटले. कारण देव केल्याशिवाय त्याने भात आणले. भात तर आणावयास नकोच होते परंतु त्याच्यापुढे बोलण्यात काहीच अर्थ नव्हता. त्याने दिलेला शब्द मोलाचा होता व शब्दाला त्याने अग्रक्रम देऊन देवाच्या सोपस्कराला दुय्यम स्थान दिले होते.

नाहीतरी देव माणसातच असतो असे म्हणतात. तो देव जान्याकाकात होता. जान्याकाकाला तो सापडत होता.

पावसाळा संपून आमची भ्रमंती पुन्हा सुरु झाली. आमगांव झरी या रोजगार हमी योजनेच्या रस्त्याचे काम सुरु झाले. या रस्त्याची आमगांव बाजू-कडील आखणी जान्याकाकाच्या भारी शेत जमिनीतून घेतली होती. जान्याकाका या गोष्टीमुळे नाराज होता, पण त्याचे म्हणणें कोणीच ऐकून घेत नव्हते शेवटी त्याने निरोप पाठविला की, 'तू येऊन पाय व निकाल कर'

त्याच्या निरोपाप्रमाणे मी आमगावला गेलो. पोलिस पाटील, सरपंच ओव्हरसिअर व प्रमुखमंडळी जमली होती. सर्वांनी रस्त्याची आखणी पाहिली. त्यानंतर मी जान्याकाकाला विचारले, 'तुझे म्हणणे काय आहे, जान्याकाका?'

जान्याकाका गंभीर झाला व म्हणाला, 'रस्ता झाला पाहिजे पण माझ्याशेताचे मधोमधीने रस्ता आखला बाजूने रस्ता काढीत नाही, गावकरी म्हणतात हीच लाईन बरोबर आहे. त्यांचे काय जायाचे आहे.'

त्याचे म्हणणे बरोबर होते. रस्ता शेताच्यामधून आखला होता व त्यामुळे त्याच्या भातशेतीचे दोन भाग पडत होते जमिनीवर जान्याकाकाची माया होती. रस्त्याची आखणी शेताचे कडे घेतल्यास काही बिघडत नव्हते.

परंतु ओव्हरसिअर रस्ता सरळ असावा ही दृष्टी ठेवून आखणी केली होती. पाहणी पूर्ण झाल्यावर मी जान्याकाकाला म्हटले, 'रस्ता गावाच्या सोईसाठी आहे तुझ्यासारख्या जाणत्या माणसाला मी काय सांगू? काय निकाल देऊ?'

"तू देशील तो निकाल बरोबर," तो शांतपणे म्हणाला.

रस्ता शेताच्या कडेने घेण्याचे ठरले. या बदललेल्या आखणीतही जान्याकाकाची दोन डेरेदार आंब्याची झाडे व त्याच्याच मुलीची झोपडी मध्ये येऊ लागली. झाडे व झोपडी मोडावी लागणार होती पण त्याला त्याची हरकत नव्हती. 'गावासाठी शक्ति परमान मळ सोशीन' जान्याकाका म्हणाला त्याचे म्हणणे वाजवी होते.

मे महिन्यातली गोष्ट. आंबा म्हणावा तसा फुटला नव्हता. अगदी क्वचित ठिकाणी अगदी तुरळक आंबा बाजला होता, कलमी आंब्याचा भाव डझनास बारा-पंधरा रुपये होता. या भावात आंबे खाणे मला पत्करण्यासारखे नव्हते! आंब्याचे नाव घरात कोणीच काढीत नव्हते.

एकदिवस सिमेंटच्या रिकाम्या गोणीत काहीतरी भरून ती खांद्यावर टाकून जान्याकाका माझ्याकडे आला.

'काय आणले जान्याकाका?' मी विचारले.

पोतडी खाली ठेवीत जान्याकाका म्हणाला, 'तुझा वाटा आणला,' मी उत्सुकतेन काय असावा माझा वाटा म्हणून पोतडी उघडून पाहिली, त्या पोतडीत चांगले गोलगोल मानकूरचे आंबे होते, सुमारे पाऊण शेकडा!

''एकच आंबा बाजला होता,'' त्याचे स्पष्टीकरण सुरु झाले, बहिनीसचा वाटा, पोरीचा वाटा व तुझा वाटा काढला.

जान्याकाका मला परका समजत नव्हता, इतर नात्यांच्या माणसांबरोबर त्याने माझा वाटाही काढून स्वतः पोहोचता केला होता.

एकदा त्याच्या फऱ्यांवर खरचले व जखम झाली. ही जखम त्याच्या गावठी ओखदाणे बरी होत नव्हती. चिघळत होती, त्यामुळे तो वैतागला होता व एक दिवस उठून माझ्याकडे आला व दुखणे दाखवित म्हणाला''या पाय घाव बेस ओखद केला पन गुन नाय'' व्यथित होऊन तो बोलत होता.

मी फऱ्यावरची जखम पाहिली त्याजागी गावठी औषधांची काळी पूड त्याने लावली होती. त्याला जंगली औषधांची माहिती होती पण या जखमेपुढे त्याने हात टेकले होते. मला शंका आली याला मधुमेह तर नसेल? मी त्याला डॉक्टरांकडे घेऊन गेलो व माझी शंका त्यांना सांगितली. त्यांनी लघवी तपासली. माझी शंका बरोबर होती. डॉक्टरने औषधे लिहून दिली व पथ्य सांगितले डॉक्टरने दिलेली औषधाची चिठ्ठी व त्या औषधास लागणारे पैसे मी जान्या काकाला देण्याचा प्रयत्न केला. पैसे पाहून तो चिठ्ठी व पैसे घेईना मी जबरदस्तीने पैसे हातात कोंबले.

''सजाणला जाऊन औषधे खरेदीकर तुझी जखम बरी होईल.'' मी म्हणालो त्याचे डोळे पाणावले. निरोप झेऊन तो गेला.

त्याची जखम भरत आली व तो चांगला हिंडूफिरु लागला. पुन्हा त्याची तलासरीला फेरी झाली. ''आया घव बेस भरुन आला'' फऱ्याकडे बोट दाखवित तो म्हणाला, मी म्हटले ''तरीपण पथ्य पाळले पाहिजे''

''तू कवा येशील?'' जातांना तो म्हणाला

''काय काम आहे कां?'' मी विचारले.

''घरा ये, येरिच गोठी करू,'' असे म्हणून निघून गेला.

सवड काढून मी आमगांवला गेलो. जान्याकाकाचा मुक्काम अलिकडे भोंग्यावरच असावचा. मी भोंग्याकडे गेलो. मला पाहताच तो लगबगीने उठला, 'तू आला, बस असे म्हणून त्याने कांबळा अंथरला, मी बसलो, त्याने नातवाला जाब दिला व विचारले, बांडी कोठ ठेवली रे? त्या पोराने शिंदीचा भरलेला मटका दोघांचे मध्ये आणून ठेवला. पिणीला पाने आणली. जान्याकाका त्याच्या परंपरेनुसार माझे आदरातिथ्य करीत होता.

''कशीक हाय,'' वाढता वाढता त्याने विचारले.

''गोड आहे पण, उन्हाची कडक झाल्यागत वाटते,'' मी अभिप्राय दिला.

" तुला गोडीची सवय अेरिच पोटफुगी ! " त्यानं गोड्या ताडीबद्दल नापसंती व्यक्त केली.

आमचे शिंदी प्राशनाचे काम सुरू होते. जान्याकाका आज जास्त उल्हासित दिसत होता. त्याच्या बटबटीत डोळ्यात वेगळाच भाव दिसत होता. मी कित्येक वर्षातून त्याला भेटलो आहे असे समजून तो सारखा बोलत होता.

जान्याकाका साठसत्तर वर्षापूर्वीचा जंगलचा इतिहास माझ्यापुढे शब्दांनी उभा करीत होता.

तुला नाही माहित अच्छाडच्या चढणी किती रान मोठे होते, मी बारिकला होतो तवां वाघांचा फार सुकाळ होता, रानात एकट्या माणसांची हिम्मत नव्हती हिंडायची.

त्याने आपट्याच्या पानाची विडी वाळली व पुढे सुरुवात केली, " मी जुवान झालो तवां माझ्या डवऱ्याने गाडी करून दिली मला. माझी बैलजोडी वंजाऱ्याची सवाई होती. पार खाडकड, रुईघर, बोपदरीच्या जंगलातून मी सागली लागडाचे भारी नग बैलजोडी खाल वाहून सावटा सरावली बंदरात न्यायचा. महिनामहिना ही एक फेरी व्हावयाची, जंगलातून अवघड जागीचे नग ओढून बाहेर काढून गाडीत चढवायचे काम साधे नाही. माणूस दांडगट पाहिजे व बैलही दांडगट नाहीतर मेला गाडीवाला रानांत. "

बोपदरीच्या जंगलात रात्री गाड्या सोडल्यावर पटाईत वाघाने बैलावर कशी झडप घातली व त्याने त्या वाघास कसे पळविले तो प्रसंग तर तो हावभावासहित वर्णन करून सांगत होता व माझ्या अंगावर उगाचच काटा उभा होता !

जान्याकाका सांगत होता, " आथापन नांग जोस माझी बैल, कशी दणगट तो उठून बांधलेल्या बैलाकडे गेला यो नांग चारदांरी होता तवां धेदेल आथा सप्तदाती हाय, जनावर कसा हाय. "

खरोखर जान्याकाकाची बैलजोडी धिप्पाड होती तो जवळ गेल्यावर बैलांनी कान टवकारले व हुंकार दिला त्याचे कृष हात बैल चाटीत होते ! जनावरांवर त्याची माया होती व जनावरांना त्याची माया.

जान्याकाका बैलांच्या पाठीवर हात फिरवून परत आला. पुन्हा माझेसमोर बसला. त्याने गोठी पुढे सुरु केल्या, " सावकारांनी फार जुलूम केला आमावर. माझ्या डबऱ्याची आख्खी जमिन खाल्ली ही जमिन तर मी ह्या सोडविली कर्ज फेडून फार जुलूम झाला, तवां आम्ही सावकार लुटले. माझेवर पकड वॉरंट काढला सरकारने. पण मी पार रानात पळालो. सहा महिन्यांनी घरी परत आलो. " जान्याकाका वारल्यांच्या उठावावेळची माहिती सांगत होता.

जान्याकाकाचे बोलणे सुरूच होते सूर्यास्ताची वेळ झाली होती. मला घरी परतायचे होते. म्हणून त्याचा निरोप घेऊन उठलो, " जातो मी जान्याकाका, " मी म्हणालो तो राहण्याचा आग्रह करीत होता निरोप देतांना त्याचे डोळे पाणावले होते. एक-दोन अश्रूंचे थेंब कृश गालावरुन खाली पडले !

माझी बदली झाली होती. ते जान्याकाकाला कळले होते. त्या वियोगाच्या कल्पनेने तो दुःखी होता. मी बदलीच्या ठिकाणी गेलो व वर्षभरात कळले की जान्याकाका वारला !

माझ्या डोळ्यापुढे ती उंचीपुरी कृश मूर्ती उभी राहिली. जी मला आपुलकी दाखवित होती. आपल्या नात्यातलाच मानीत होती.

जान्याकाकाला मुलगा नव्हता फक्त एक मुलगी होती ती लग्नघरी होती. मला राहून राहून वाटते की, जान्याकाका मला पुत्रवत मानीत होता काय ? नाहीतर त्याचा माझा दूरचा किंवा जवळचा, जातीचा, धर्माचा काही संबंध नसून तो एवढी आपुलकी, येवढे निर्व्याज प्रेम का करीत होता माझ्यावर ? त्याच्या माझ्या विषयीच्या निश्चित भावना मला कळाल्या नाहीत. पण त्याचे प्रेम, त्याची माणुसकी यांचे सदैव स्मरण होते हे निश्चित.

' जान्याकाका वारल्यातील सद्गुणांचा प्रतिक होता. '

# होऱ्या रे होऱ्या

## जीवन गेडाम

मी फायनल वर्षाला शिकत असतानाची गोष्ट. त्यावेळेस थंडीचे दिवस होते. तहसिलीत काही काम असल्यामुळे मी गावाकडे गेलो होतो. घरी पोचलो तेव्हा सकाळचे ११ वाजले होते. घरी जाताच आवाज दिला, ''आई''

आई घरातच होती. माझीच वाट पाहत बसली होती.

''बाप्पा आलास'' आई म्हणाली. ''आमी कालस तुझी वाट पाहालो, काल तुझ्यासाठी तांदूरही मांडून ठेवलो होतो.''

''मी कालच येणार होतो. पण तिकडेच थोडं काम निघालं म्हणून थांबलो होतो.'' मी सुटकेस खाली ठेवत म्हणालो. आईने सुटकेस घरात ठेवली.

''तू हातपाय धुऊन टाक. मग वाळून देतो. जेवशील''

नाही आई. पहिले मी आंघोळ करतो. सगळं अंग प्रवासानं खराब झालंय''

''मग पाणी गरम करू''

''नको. मला थंडच चालेल.''

''मग थांब. टाक्यातला पाणी पक्का ठंडा आहे. मी विहिरीचा पाणी आणून देतो.'' असे म्हणत आई विहिरीकडे निघाली.

मी आंघोळ केली. जेवलो आणि लगेच तहसिलिच्या गावी निघून गेलो. आई शेतावर निघून गेली.

संध्याकाळी परतलो तर सव्वासात वाजले होते. बाबा घरी नव्हते. ते बाहेर गावी धान्याची विक्री करण्यासाठी गेले होते. आई घरी स्वयंपाक करीत होती. मी हातपाय धुऊन घेतले.

''आई तू स्वयंपाक कर. तोपर्यंत मी गावातून फिरून येतो''

''लवकर ये. जास्त वेळ नोको लावू.'' आई टमाटे चिरता चिरता म्हणाली.

रात्री जेवण झालं. फिरून येऊन मी अंथरुणावर येऊन पडलो होतो. दिवसभराच्या आठवणींचा आढावा घेत होतो. तहसिलितील काम न झाल्यामुळे थोडा त्रासलेला होतो.

''बाबा, वावराकडं जाणा गा. होरे सपा ठांडा न ठांडा टोचून टाकले.'' आईचे शब्द ऐकताच माझं लक्ष तिकडे गेलं.

''ऊँ ऽऽऽ मी नाही जात. मला खूप त्रास होतो.''

''असा कसा म्हणतोस गा. चार जोंदरे झालेत तं आधार नाही होर.'' आई

मी गप्प राहिलो. काही बोलावसं वाटलंही नाही. वावरात ज्वारी पेरली होती. पूर्णत्वाच्या मार्गावर होती. पाखरे ज्वारीची कणसं न कणसं खाऊन टाकायची. पाखरांना यावेळेस आमच्याकडे होरे म्हणतात. बाबा सुद्धा घरी नव्हते. त्यामुळे वावराकडे जाणे आवश्यक होते.

''बरं ठीक आहे. जातो उद्या''

''हो जा.'' आई दुसऱ्या कामाकडे लक्ष वेधीत म्हणाली, ''माले जवळच्या दंडाकड लाक खंदाची आहे. नाही तं, मीस गेलो असतो.''

मी तोच विचार करीत पडून राहिलो. ह्या विचारात रात्री केव्हा झोप लागली काही कळलंच नाही. सकाळी उठलो. पांघरून काढून बघितले. थंडी फारच वाटात होती. म्हणून

मुद्दाम पडून राहिलो. पण आईने आवाज दिला. ''बाबा, ऊठ न गा, वावराकडं जाशीन''

''हो'' असे म्हणत मी आणखीच पांघरून ओढले.

''जा बाबा जा. लवकर जा. नाही तं होरे सपा खाऊन टाकतेत.''

''हो जातो घेणं व घाई कसली'' असे म्हणत मनात नसतांनाही मी उठलो. तोंडावरून पाणी घेतलं, पण थंडी पाहून माझा जीव काही बाहेर निघे ना. थोड गरम व्हावं म्हणून चुलीजवळ बसलो. निखाऱ्यासमोर हात धरला. थोडं बरं वाटलं. आई कामात गर्क झाली होती. पण मधून मधून मला जाण्याविषयी सांगत होती.

मी उठलो. कपडे घातले. तसं विशेष ठिकाणी जायचं नव्हतं. पण सवयीप्रमाणे इन करुन घेतली. थंडी लागू नये म्हणून अंगावर टरकीश टॉवेल होता तो घेतला. हातात G. K.चं पुस्तक होतं ते घेतलं. वाटलं तिथे वाचायला होईल.

वावराकडील रस्त्याला निघालो. जिकडे तिकडे एकच आवाज येत होता. ''होऱ्या रे होऱ्या'' वर आकाशात पाखरे थव्या-थव्याने उडत होती. जणू आढावा घेत होती की, कोण माणूस बेसावध आहे. आजूबाजूला पाहिलं. ज्वारीची कणसं मिशीला ताण मारीत ताठ उभी होती. पूर्वेकडे बघितलं. सूर्य हळूच डोकावून पहात होता. जणू तो मला चिडवत होता की, सर्वजण आले पण तुलाच उशीर झाला म्हणून. चालता-चालता लहानपण आठवलं. लहान असतांना असाच मी सकाळी वावराकडे जायचा. लहानसा होतो. कानाला बाबांच्या धोतराचा कापड असायचा. अंगावर थंडीसाठी धोतर घ्यायचा. त्यावेळेस पायात चप्पल नसायची. थंडीमुळे हातपाय थरथरायचे. पायाला बधीरपण यायचा. पण तसं आता काहीच झालेलं नव्हतं.

वावरात पोहचलो. मी जाईपर्यंत आमच्या काकीने दोन्ही वावराचा कारभार सांभाळला. मी दिसल्याबरोबर काकी उद्गारली, 'एवढा वेळ काहाले केलास गा ?'

'हो थोडा उशीर झाला.' असे म्हणत मी वावरात शिरलो. काकीने एकदा वर्दी दिली.

'होऱ्या रे होऱ्या' आणि आपल्या वावरात निघून गेली. मी थांबलो. सगळीकडील एकच आवाज ऐकत होतो 'होऱ्या रे होऱ्या' मी पण तसाच ओरडण्याचा विचार करीत होतो. पण ओरडावं कसं हाही एक विचार येत होता. मनातल्या मनात हसत होतो. प्रथम 'होऱ्या रे होऱ्या' म्हणायला कसतरी वाटले, पण ज्वारी राखण्यासाठी गेलो होतो. होऱ्या रे होऱ्या बोलणं आवश्यक होतं. ओरडल्याशिवाय पाखरे काही ऐकत नव्हती. एवढ्यात पाखरांचा थवा आला. तसाच मी ओरडलो. 'होऱ्या रे होऱ्या' पण सूर काही जमला नाही. माझं मलाच हसू आलं. सगळ्यांचा वेगळाच आवाज यायचा आणि माझा वेगळाच आला. लहानपणी बरोबर ओरडायचा. काही का असेना पण ओरडणं आवश्यक होतं. जशी जशी पाखरे यायची तसा-तसा ओरडत गेलो. 'होऱ्या रे होऱ्या' काही वेळ तसाच ओरडलो, सूर गवसला. इतरांच्या सारखाच माझा आवाज आला. मी सगळ्यांचा आवाज ऐकला. त्या आवाजावरुन त्याच्या बाजूला पाखरे आहेत की नाही हे कळत होतं. काही जण आवेशानं म्हणायची, 'होऱ्या रे होऱ्या.' याचा अर्थ त्यांच्या बाजूला पाखरे असायची. पण काहीजण मुद्दाम ओरडायचं म्हणून ओरडायची. त्यांच्या बाजूला पाखरे नसायची, असतील तरी उडून जावं असा त्यांचा अंदाज.

असं करता-करता ४-५ तास निघून गेले तरी काही कळलचं नाही. G. K.चं पुस्तक तसंच हातात राहीलं. सूर्य बराच वरती आला

होता. पाखरेही थंडावलीच होती. पण घराकडे जायची वेळ झाली किंवा नाही हे मला समजेना. डावीकडे बघितलं. काकी माझ्याच दिशेने येत होती. ' लटाऱ्या, चल ना गा घराकडं. ' काकी म्हणाली, ' थांबत असशील तर थांब थोड्या वेळ ' मला घराकडे जायची घाई होतीच, म्हणालो, ' काकी, थांब मी आत्ताच येतो '

घरी निघायच्या अगोदर वावराच्या चारही बाजूला नजर टाकली. चारही बाजूची बुजगावणं जणू सांगत होती की, आम्ही आहोत तुम्ही काही काळजी करु नका. सूर जमला की नाही म्हणून शेवटी ओरडलो, ' होऱ्या रे होऱ्या ' आवाजात काहीच चूक वाटली नाही आणि मी घराची वाट धरली.

जीवन गेडाम
मु. पो. मुरखळा
ता. चार्मोशी
जि. गडचिरोली

## दोन कविता

१.

नागवे होवून जंगल फिरले
तेव्हा कॅमेरे आमच्या पाठीशी होते
अस्मितेचे बंड पुकारले
तेव्हा पोलिस आमच्या पाठीशी होते

२.

त्या दिवशी आमचे मतदान
नाकारले होते यासाठी की,
लोकं अन्न खावून गु हागत होते
आणि आम्ही झाडपत्ती खावून शेण
हागत होतो म्हणून... ?

- कृष्णकुमार चांदेकर.
अमरावती

## मोहरकी

सखी मला एक सांग
आपण कुठवर असे लाजायचे ग ?
चौकाचौकात चोरवाटेवर
शस्त्र उगारुन मक्तेदार वाट पाहाताहेत
त्यांची उगारलेली शस्त्रे आपण हिसकावून घेवू
तो पेटता सूर्य कुणासाठी तरी थांबतो काय ?
पूर्वेकडून पश्चिमेकडे जायला रडला आहे काय ?
मग आपण तरी का रडायचे ?
आपणच मग का नडायचे ?
आपण भरचौकांत मशाली लावू
त्यांच्या डोळ्यांत झणझणीत अंजन घालू
मी साऱ्या सख्यांना मोर्चात आणते
सगळ्यांच्या पदरात सूर्याचे वाण देते
सख्यांनो ! सावध व्हा ग पोरींनो
मी तुमची मोहरकी आहे
फेकून द्या ते फाटक्या पदराचे बुजगावणे
सोडून फेका-बंदिस्त माळाचे जोखाडणे
नजरेतील भिंती टाकून द्या !
ही घ्या पेटती मशाल
मी निघाले-पाठीमागून तुम्ही या !

- उषाकिरण आत्राम

## पुस्तक समीक्षा :-

# ' गोंडवन पेटले आहे ' - सामाजिक क्रांतीचा उद्घोष !


## समीक्षा : प्रा. वामन शेळमाके
## भंडारा


प्रा. विनायक तुमराम यांचे नांव महाराष्ट्राला सुपरिचीत आहे. आदिवासी युवकांचे प्रेरणास्थान, आदिवासी साहित्या संमेलनाचे पहिले प्रवर्तक आणि जनक, चंद्रपुर आणि गडचिरोली जिल्हातील आदिवासी साहित्य चळवळीचे प्रणेते. आजपर्यंत सभा संमेलने आयोजित करून आदिवासी समाजामध्ये तुमराम यांनी जनजागृतीचे कार्य केले आहे आणि आजतागायत कार्य चालू आहे. समाजावर आत्यंतिक प्रेम करणारे आणि त्यांच्या समस्यांकडे बारकाईने लक्ष पुरवून सतत समाज कार्यात व्यस्त असणारे तुमराम यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून लेखाधिकारी या पदासाठी निवड झाली असतांना देखील त्या पदाचा राजीनामा दिला आणि लगेच आदिवासींचे लढाऊ नेते क्रां. नारायणसिंह उईके यांचे चरित्र लिहून प्रकाशन केले. प्राध्यापकीचा पेशा पत्करला. काही कालावधी नंतर दुसरे पुस्तक काव्यसंग्रहाच्या रूपाने प्रकाशित केले.

प्रा. विनायक तुमराम यांचा ' गोंडवन पेटले आहे ' हा पहिला काव्य संग्रह. आदिवासींची सेवा करताना आणि त्यांना प्रत्यक्ष अनुभवातून तोलतांना कवीने कोणत्याच प्रकारची कसर सोडलेली दिसत नाही. त्यांचा हा स्वत:चा अनुभव. वर्तमान काळात चालत असताना भूतकाळाचा विसर पडावयास नको. त्यांतून निर्माण होणाऱ्या काव्यात एक जिवंतपणा दिसून येतो, व तो जिवंतपण सतत टिकून राहावा म्हणून कवीने आदिवासींचे वास्तविक जीवन, सद्य:परिस्थिती यांचा समन्वय साधला आहे. म्हणूनच उपरोक्त काव्य हे फक्त काव्य नसून चिंतनकाव्य आहे. समाजाला एक नवीन दिशा देणारे मोलाचे विचार आहेत. प्रत्येकाने संग्रही ठेवावा असा हा काव्य संग्रह आहे.

' वर्ण बळी सूर्यपुत्र ' या कवितेत प्राचीन युगात बळी पडलेले कर्णासारखे योध्ये आणि गुरूनिष्ठ एकलव्य हा कवीच्या मनाचा एक चिंतनाचा विषय झालेला आहे. हे अनुभवताना कवी म्हणतो-

' वर्णवादी वीरता तेव्हाही अजिंक्यच ठरली कर्णा !
तुझ्या आयुष्यातील वर्णवादाची काळरात्र मला
तितकीच भयानक भासते आहे. '

तेव्हा त्यांच्यातील कवीमन जागे होते. शतकानुशतके चालू असलेला अन्याय पाहवला जात नाही. तो ' विषमतेच्या चक्रव्युही ' या कवितेतून मांडला आहे. गोंडवनाची झालेली हानी, सावत्रपणाची वागणूक, आर्यशाहीने केलेला वर्णपात आणि काळाने केलेली आदिम संस्कृतीची क्रूर थट्टा कविमनाला विच्छेदून जाते. पेटलेले मन जागृत होते आणि शपथेवर कवी सांगतो.

' तुझी शपथ घेऊन सांगतो आहे. गोंडवना,
ते सर्व येत्या क्रांती युगात शत्रू असतील '

वनवास मुक्ती हे कवीचे स्वप्न नसून, ते खऱ्या अर्थाने मुक्त करण्यासाठी ठाम निर्धार करून प्रतिक्षा करताहेत, योग्य सुवर्णक्षणांची ! हे आपणास ' ढगाळलेले आकाश ' या कवितेत दिसून येईल.

समस्त जखडलेल्या आदिवासी माणसांच्या व्यथा वेदना शब्द बद्ध न झाल्याची खंत व्यक्त करताना-

'शब्दांनीही साऱ्याच जरी साक्षी नाकारल्या
तरी तो रक्तपात माझ्या गावातला आहे.'

कवीने योग्य ती दखल घेतली आहे.

'वनवासच भोगत आलो आहे मी, कधीतरी
सुखाचे क्षितिज गवसेल म्हणून'

यावरुन वनवासीयांचा वनवास संपून पुन्हा आत्मविश्वासाने स्वयंप्रेरणेने वाटचाल करण्याची जिद्द जोपासणाऱ्या या कविमनाची आशा व्यक्त होते. 'माझ्या आक्रोशावर' या कवितेत आदिवासींचे प्रामाणिक मत मांडताना कवीचे अनुभव विश्व किती विशाल आहे याचा प्रत्यय खालील ओळींवरून येतो-

'कारण चिघळलेल्या आयुष्याचे अनुभव
ज्यांच्या वाट्याला येतात
त्यांची आसवेही तितकीच प्रामाणिक असतात-'

आदिवासींच्या भावभावनांचा आदर करण्यात कुठेतरी सावत्रपणांचे अनुभव कविमनात आले आणि त्यांच्या वेदनांच्या ज्वाला एकदम उफाळून निघतात. त्यांची प्रचिती-

''उरात सामावून असलेल्या माझ्या अबोल
रात्रींना शब्दांच्या चांदण्यात कधी हसताच आले
नाही.''

या ओळी वरून येते.

जळजळीत अनुभव डोळ्यादेखत अनुभवतांना कवी म्हणतो-

'सवाच्या वैराण वस्त्यात, उजेडाचे पाषाणी
आयुष्य,
कधी वितळलेच नाही, ही युगांची साक्ष आहे.'

ज्यांनी आदिवासींचे जगणे बेचैन केले, कपटाने झळ केला, विश्वासघात केला, अशांच्या विरोधात कवी त्यांच्या केलेल्या कृत्यांची नोंद घेताना म्हणतात.

'अन् तुमच्या नात्यातल्या साऱ्याच लुटारू
आदर्शांना
गतकाळाचा हिशोब मागण्यात शोधू लागले आहे.'

'जात' या शब्दाने कवीमनाची खंत सहज दिसून येते. अलिकडे जातीवरून माणसाची मूल्ये ठरविली जातात असा आरोप करतांना कवी जात विचारणाऱ्यांना उद्देशून म्हणता-

'जेव्हा कुणी माझी विचारतात जात, तेव्हा
सांगतो
मी माणूस म्हणूनच त्यांना'

तेथूनच पुढे आदिवासी माणसातला माणूस जागा होतो आणि नव्या युगाच्या मित्रत्वासाठी उदार अंतःकरणाने आव्हान करताना 'मी माणूस आहे' या कवितेतून ओळख करून देतो-

'म्हणूनच तर जीवावर उदार होऊन, नव्या
युगाच्या
मैत्रीसाठी मी धजलो आहे.'

काळावर विश्वास ठेवणारा आणि वर्णवाद्यांवर, दास्यत्वावर, शोषितांवर अंकुश उचलणारा कवी आदिपुत्रांच्या मुक्तीची स्वप्ने भविष्यात पाहावयास मिळेल या आशेवर जगतो आहे.

'दिसू लागेल उद्याच्या प्रकाशात
कारण उद्याचा सूर्य आमचा आहे.' (उद्याचा
सूर्य ५२)

माझ्या जखमांवर मलमपट्टी लावण्याचे काम आजपर्यंत बरेच झाले. तद्वतच मीठ चोळताना कोणत्याच प्रकारची कसर सोडली नाही, हे मी कसा विसरू?

म्हणून कवी उद्विग्न होऊन सांगतो आहे-

'माझ्या जाणिवेत दाटलेला अंधार पेटून उठतो
जगण्याचे अर्थच जळाल्या सारखे वाटतात
सारे जग परके वाटते-'

वनवासीयांचे दुःख अनंत आहे. दैववादावर अवलंबून असणारी माणसे आता पेटून उठणार आहेत. शोषकांविरूद्ध आम्हास तुमच्या दयेची भीक नको. उद्धस्त झालोय तरी पण लढू लढाया मुक्तीच्या, असा महान संदेश कवी तुमराम 'वनपुत्राची वेदना' या कवितेतून देत आहेत-

'उध्वस्त होईस्तोवरी तरी
आम्ही लढूच युद्ध हे मुक्तीचे.'

अन्यायाने पेटून कवी वनवासी मुक्तीच्या गर्जना करताहेत-

'वनवास मुक्तीच्या करारे गर्जना
जय गोंडवाना बोला सारे'

दारिद्र्याच्या विळख्यात सापडलेली आदिमसंस्कृती फितुरांच्या बाजारात दलालाकडून कशी लिलाव होत चालली हे आवर्जून सांगताना कवी म्हणतो-

'भर चौकात आपल्या संस्कृतीचा
लिलाव करणारे दलालीचे भाषाशास्त्र
दारिद्र्यानेही अश्रू ढाळावेत
अशा फितुरांच्या कृतिकथा
आदिमांच्या पिढ्या पिढ्यांतून
मी झिरपत ठेवणार आहे.
आणि मेंढरांनी गायीलेल्या मुक्तीच्या प्रार्थना
माझ्या वेदनांच्या कैवारी होऊ शकत नाहीत
हे मी भावी पिढ्यांना ओरडून ओरडून सांगणार आहे.'

(पा. नं. ६७ संस्कृतीचे दलाल) -

बिहारचा क्रांतीसूर्य, बिरसा भगवान, गढमंडल्याची महाराणी दुर्गावती, गोंडवनातील क्रांतीवीर बाबुराव सेडमाके, क्रांतीवर नारायणसिंह उईके इत्यादी आदर्श पुरूष आणि त्याचा वारसा म्हणून समाज सुधारकाची फार मोठी धुरा, त्यांच्या जीवनाशी समरस होऊन समग्र क्रांतीच्या दिशेनी वाटचाल करताना कवीमन अगदी एकताल, एकसूर झालेले दिसते.

रानावनात आदिम लेकरांची झालेली अवहेलना, आणि दु:खात डुंबून गेलेल्या आयुष्याचे अनुभव कवी सांगताहेत-

'विरहाचा अग्नि विझतो पण
जखमांचे व्रण मात्र
कायम असतात- !'

आदिमांचे रक्त सळसळून उठलंय्, पेटणारी आग काय पेटवील यांचा अंदाज लावता येत नाही. परंतु कवी तुमराम यांच्या वेदनांचे रक्तनाते, माझे आयुष्य एक रणभूमी, अवशेष, युगांयुगांचा अनुभव अंधारलेल्या झोपड्यातून पाहताना अनेक प्रसंग उपरोक्त कवितातून बोलके केले आहे. सत्य तेच समोर आले. सत्य फक्त सत्याची भाषा बोलते. म्हणून सत्य साकारताना, परंपरांच्या निर्णयांशी झुंज देणाऱ्या कवीचा निर्णय अटळ आहे. म्हणून कवी स्वयंप्रेरणेने इशारा देत आहेत-

'नेहमीच तुमच्या आयुष्याने इमान राखले आहे. धजणारच नाही ते कधी आमच्या वनवास मुक्तीसाठी'

आदिवासी हा या भूमीचा धनी, लंगोटी लावून निसर्गाच्या सानिध्यात स्वत:चे अस्तित्व टिकवून ठेवणारा, अनार्यकुळाचा आदिवासी माणूस गोंडवनातून पेटून निघाला आहे.

खऱ्या अर्थाने 'इन्साफ किंवा न्याय' उपरोक्त समाजाला देण्याचा मान प्रा. तुमराम यांना नकळत जातो. आधुनिक युगात आदिवासी माणसाला न्याय मिळाला की नाही हे गौण आहे. परंतु 'गोंडवन पेटले आहे' या काव्यसंग्रहानी वनवासींना योग्य न्याय मिळाला ते म्हणणे अतिशयोक्तीचे होणार नाही. यामुळे आदिवासींना नव्या युगप्रवर्तनाची दिशा निश्चित ठरवून दिली असे होय. येणारे युग तुमराम यांचे स्वागत केल्याशिवाय राहणार नाही. कवीची काव्यशैली, प्रभावी आणि चिंतनीय आहे. काव्यसंग्रहाचे मुखपृष्ठ आकर्षक असून वास्तविकतेला वाचा फोडेल असे आहे. मुखपृष्ठ सजावट चंद्रपुरचे श्री चंदु पाठक यांनी केले असून पुस्तकाचे सुबक मुद्रण म. पां. बनहट्टी, नारायण मुद्रणालय, धंतोली, नागपूर, यांनी अतिशय परिश्रम घेऊन केलेले आहे. आदिवासी कवितेतून सामाजिक क्रांतीचा उद्घोष होऊ लागला आहे. हे काळासही अमान्य करता येणार नाही. हाच उद्घोष आदिमांच्या मुक्तीचा आणि उत्कर्षाचा वळणबिंदू ठरल्याशिवाय राहणार नाही.

साहित्य शारदेच्या मंदिरात यापूर्वी कधी न प्रगट झालेली आदिम साहित्याची ज्योत अशीच अखंड प्रज्वलीत होत राहो हीच सदिच्छा !

# ‘रानातली माणसं’ चे लेखक शेख सलिम अहमद यांची मुलाखत

## मुलाखत : ग. शां. पंडित

आदिवासी जीवनावर लेखन करणारे श्री. सलिम अहमद शेख हे ६० वर्षांचे गृहस्थ काही वर्षांपूर्वी शासकीय सेवेतून निवृत्त झाले व त्यांनी आदिवासींच्या जीवनातील सत्य घटनांवर आधारित ‘रानातील माणसं’ हे पुस्तक (कथासंग्रह) लिहिले. पालघर येथे ५ व्या आदिवासी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने त्यांची भेट झाली. या संमेलनाविषयी व एकंदर आदिवासी साहित्याविषयी त्यांचे परखड विचार येथे देत आहे.

**प्रश्न** : आपण आदिवासी साहित्यिक आहात का ?

**शेख** : अदिवासी साहित्यिकाची आपली व्याख्या कळली नाही. मी बिगर आदिवासी असून ठाणे जिल्ह्यातील आदिवासी जीवनावर, त्यांच्या खऱ्याखुऱ्या सुख-दुःखावर कथालेखन केले आहे. आदिवासी साहित्यिक अद्याप निर्माण झालेला नाही असे माझे मत आहे. व तो भविष्यात निर्माण व्हावा अशी मनोमन सदिच्छा आहे.

**प्रश्न** : आतापर्यंत आपले कोणते साहित्य प्रकाशित झाले आहे ?

**शेख** : रानातली माणसं हा कथासंग्रह १९८३ मध्ये प्रकाशित झाला. परंतु त्यास जिल्हा पातळीवरच प्रसिद्धी मिळाली. कारण प्रसिद्धी माध्यमांकडे जाण्याची माहिती मला नव्हती व मार्गदर्शनही कोणी केले नाही. साहित्य संस्कृती मंडळाकडे ४० प्रती पाठविल्या, त्या कोठे धूळ खात पडल्या आहेत ते त्यांनाच माहीत !

**प्रश्न** : आपण लेखनाकडे कसे वळलात ?

**शेख** : मी ठाणे जिल्हा परिषदेमध्ये विस्तार अधिकारी, सहाय्यक गटविकास अधिकारी, काही वेळा प्रभारी गटविकास अधिकारी म्हणून काम केले व सन १९८३ मध्ये सेवानिवृत्त झालो. माझी सेवा मुख्यत्वे करून वन्य जमाती गटात झाली. ठाणे जिल्ह्यातील मोरवाडा, तलासरी, मनोर इ. ठिकाणी मी विस्तारक्षेत्रात काम केले व त्यामुळे आदिवासींच्या निरनिराळ्या जमातींचे मी जवळून निरीक्षण केले. परिणामी ‘रानातली माणसं’ पुस्तक लिहिले. त्यात आदिवासीचे सुख व दुःख दोहोंचा समावेश आहे. पुस्तक लिहिण्याचा हेतू की त्यांचे सुख-दुःख इतर पुढारलेल्या लोकांना कळावे व वन्या विभागातील शासकीय, निमशासकीय कर्मचाऱ्यांनी आदिवासींच्या दुःखांची जाणीव ठेऊन तेथे आपली सेवा करावी. तो माझा हेतू काही प्रमाणात साध्य झाला, याचे मानसिक लाभले आहे. ठाणे जिल्ह्यातील आदिवासी जीवनावर यापूर्वी फक्त ३ पुस्तके प्रसिद्ध झालीत, व माझे पुस्तक चौथे. परंतु कॉ. गोदावरी परुळेकरांचे ‘जेव्हा माणूस जागा झाला’ हे पुस्तक वगळता इतर पुस्तकांमध्ये कोठेही खरा आदिवासी चित्रित झाला नाही. म्हणूनच खऱ्या आदिवासींचे दुःख, त्यांचे सुख यांच्या एकुण ११ कथा लिहिल्या. त्या सर्व सत्य घटनांवर आधारित असून त्यांचे शब्दांकन मी केले आहे.

**प्रश्न** : ही सेवाभावी वृत्ती तुमच्यात कशी निर्माण झाली ?

**शेख :** सेवाभावीवृत्तीचे संस्कार विद्यार्थी दशेपासूनच राष्ट्रसेवा दलात माझ्यावर झाल्याने तो पिंड निर्माण झाला व पुढे निमशासकीय सेवा पत्करल्यावर त्याच वृत्तीने सर्व सेवा पूर्ण केली. त्यामुळे आजही आदिवासींचे व माझे नाते अतूट आहे. विकास गटातील आदिवासी संबंधींच्या योजना राबविण्याचे भाग्य मला लाभले. त्यामुळे मानवतेची काही सेवा मी करु शकलो याबद्दल स्वत:ला धन्य समजतो.

**प्रश्न :** आदिवासी साहित्याची व्याख्या आपण कशी कराल ?

**शेख :** मला वाटते अद्यापही आदिवासी साहित्याचा जन्म व्हावयाचा आहे. नुकतेच कोठे डोहाळे लागले आहे. अशा स्थितीत आदिवासी साहित्याचा डांगोरा पिटण्यात काय हाशिल ?

**प्रश्न :** आदिवासी साहित्यिक कोणाला म्हणावे ?

**शेख :** पालघरच्या ५ व्या अधिवेशनात जी साहित्यिक म्हणविणारांची चर्चा झाली त्यात बिगर आदिवासी लेखकांना आदिवासी साहित्यिक म्हणावयाची तयारी दिसली नाही. त्यांना प्रस्थापितांचे लेखक म्हणून त्यांची संभावना झाली. कॉ. गोदावरी परुळेकरही त्यातून सुटल्या नाहीत. जो जन्माने आदिवासी तो आदिवासी लेखक अशी तूर्त व्याख्या आहे.

**प्रश्न :** बिगर आदिवासींनी आदिवासींवर लिहिलेले साहित्य हे 'आदिवासी साहित्य' म्हणता येईल का ?

**शेख :** साहित्यिक हा समाजजीवनाच्या कोणत्याही विभागाला स्पर्श करु शकतो. आदिवासी हे समाजाचे घटक आहेत. त्यांच्यावर जर साहित्य निर्माण झाले व त्यात आदिवासींच्या जीवनाचे सत्य चित्रण झाले तर त्या बिगर आदिवासी साहित्यिकास 'आदिवासी जीवन साहित्यिक म्हणावे.' 'माणूस जागा झाला' या पुस्तकाने निव्वळ आदिवासीच नव्हे तर बिगर आदिवासी वाचक जागे झाले.

**प्रश्न :** बिगर आदिवासींचे साहित्य आदिवासी साहित्याशी जवळीक साधते का ?

**शेख :** 'प्रश्नात काहीतरी गफलत आहे' असे वाटते. 'आदिवासी जीवनाशी' असा शब्द अभिप्रेत असावा. आदिवासी साहित्य अद्याप निर्माणच झालेले नाही मग जवळीक साधण्याचा प्रश्न कोठे निर्माण होतो. महाराष्ट्रात मराठीत आदिवासींनी किती साहित्य निर्माण केले ? ज्या बिगर आदिवासी लेखकांनी आदिवासी जीवनावर लेखन केले ते सुध्दा २/३ लेखकच आहेत. परंतु त्यांचेवर 'प्रस्थापितांचे लेखक' म्हणून आदिवासी (तथाकथित) लेखकांकडून टीका झाली किंवा उपेक्षा झाली. ज्याच्यावर अन्याय होतो अगर जो शोषित आहे तोच (म्हणजे आदिवासी) लिहू शकतो ही भावना मूलत:च चुकीची आहे, तर जो प्रत्यक्ष पाहातो, ज्याला दु:ख होते. तो बिगर आदिवासीही समर्थपणे आदिवासींचे योग्य चित्रण करु शकतो. म्हणून आदिवासी - बिगर आदिवासी हा प्रकार कोणत्यातरी विशिष्ट हेतूने करण्यात आला आहे.

**प्रश्न :** आदिवासी साहित्य व कला, समाज, संस्कृती यांचा परस्पर संबंध आहे का ?

**शेख :** साहित्य म्हणजे लेखनरुपाने प्रसिध्द होते ते. आदिवासींचे स्वत:चे साहित्य भविष्यात निर्माण होणार आहे. कारण आदिवासीमध्ये कला आहे व त्याची वेगळी संस्कृती आहे. साहित्य समाजाच्या सर्व बाजूंना स्पर्श करू शकते. पण आज जे घडलेच नाही, त्यावर ढोल बडविण्यात काय अर्थ ? अजून आदिवासी साहित्य निर्माण झालेलेच नाही.

**प्रश्न :** आदिवासी साहित्याची चळवळ किंवा प्रवाह निर्माण होणं का आवश्याक आहे ?

**शेख :** आदिवासी शतकानुशतके शोषित आहे, दुर्बळ आहे. अत्याचाराचा बळी आहे. अजूनही प्रस्थापितांकडून, नोकरशहाकडून, शासनाकडून, राजकीय पक्षांकडून तो फसविला जात आहे.

या सर्व अन्यायांवर आदिवासींनी साहित्य निर्माण करावे. समाज जागृतीसाठी साहित्य अत्यावश्यक आहे. आदिवासी जीवन व संस्कृती वेगळी असल्याने आदिवासी साहित्याचे प्रकार म्हणजे शोषितांचे साहित्य या विचारप्रवाहात जे साहित्य येईल त्यात सावकार, कूळ, कर्ज, बलात्कार, फसवणूक, भगत, जमीन, जंगल, अत्याचार हे विषय असतील.

**प्रश्न :** दलित-आदिवासी-ग्रामीण असे संयुक्त साहित्य संमेलन होत असताना आदिवासींच्या वेगळ्या साहित्य संमेलनाची गरज आहे का ?

**शेख :** ग्रामीण, दलित यांचे प्रश्न वेगळे आहेत व आदिवासींचे प्रश्न त्याहून भिन्न आहेत. आदिवासी आज दबलेला आहे व मूकरूदन करीत आहे. त्याला खडबडून जागा करण्यासाठी अन्यायाचा, अत्याचाराचा प्रतिकार करण्यासाठी, त्याची अस्मिता जागी होण्यासाठी आदिवासींचे साहित्य संमेलन गरजेचे आहे. संयुक्त संमेलनात ग्रामीण व/दलित त्यांचेवर कुरघोडी करण्याचा धोका आहे. म्हणून आदिवासींचे वेगळेच संमेलन असावे. मात्र त्यात आदिवासी व बिगर आदिवासी लेखक असा भेद नसावा, जसा पालघर येथे करण्यात आला. आदिवासींच्या समस्यांचा अभ्यास करणारे अनेक बिगर आदिवासी आहेत. त्यांच्याही विचारांतून आदिवासींना बरेच काही स्वीकारता येईल. आफ्रिकेतल्या नेल्सन मंडेलांचे नावे 'नगर' होते, पण कॉ. गोदावरी परुळेकर, आचार्य भिसे, साने गुरूजी यांचा उल्लेख होत नाही याचे दु:ख होते. आदिवासीचे दु:ख जगाच्या वेशीवर प्रथम कोणी मांडले त्याचा विसर का पडावा ?

**प्रश्न :** आदिवासी साहित्यात कोणत्या प्रकारचे साहित्य निर्माण होणे आवश्यक आहे व त्यासाठी कोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे ?

**शेख :** आज आदिवासींना विद्रोही साहित्याची आवश्यकता आहे. प्रेमकथा नकोत. शतकापूर्वीची त्यांची गाणी आज गाऊन काय उपयोग ? विद्रोही साहित्य, काव्य, कादंबरी निर्माण झाली पाहिजे. विकास योजनांवरील आदिवासींचा पैसा प्रस्थापित वर्ग मागल्या वाटेने कसा खर्च करतो त्यावर लेखन झाले पाहिजे. ज्यांना साहित्याची आवड आहे, ज्याच्यामध्ये साहित्याचे गुण आहेत. असे तरूण हुडकून काढले पाहिजेत. अर्थात या प्रक्रियेस वेळ लागणार आहे. परंतु त्याची पूर्ण तयारी आतापासून केली पाहिजे. अशा निवडक तरूणांची शिबिरे घेऊन त्यांना मार्गदर्शन केले पाहिजे. आदिवासी-बिगर आदिवासी वादाला वाव मिळू नये. महाराष्ट्रापुरते म्हणायचे तर सर्वात मोठी जमात वारल्याची आहे, अन्यायाच्या प्रतिकारासाठी आघाडीवर वारलीच पुढे आला आहे. म्हणून वारल्यांच्या जीवनावर संघर्षमय साहित्य व काव्य निर्माण होऊ शकते. कोकण लढाऊ प्रवृत्तीचा नाही, नाच, गाणे या त्यांच्या सांस्कृतिक गुणावर लिहिता येईल. ठाकूर निरुपद्रवी आहेत. सोशीकपणावर त्यांचेवर लिहिता येईल व अगदी खालच्या थरावर कातकरी व ढोरकोळी, ज्यांचे जीवन दुर्लक्षित आहे. त्याचा अभ्यास झाला पाहिजे व जगण्याच्या त्यांच्या धडपडीवर, त्यांच्या दु:खावर लिहिण्यासारखे बरेच आहे; पण तो विषय चर्चेसही निघत नाही. साहित्याचा प्रांत तर फारच दूर आहे. कोकण्यांचा व गाडीलोहारांचा काही पूर्वसंबंध आहे काय, याचा शोध घेतला पाहिजे. कदंब राजांचेवेळी आर्यांच्या कोणत्या जाती या प्रदेशात आल्या व त्यांनी आदिवासींना जंगलात दूर कसे लोटले व आता जंगलही नष्ट करु पाहात आहेत. त्यासंबंधी अभ्यास झाला पाहिजे. ब्रिटिशांच्या वेळचे जुने गॅझेटिअर्स, त्यांनी लिहिलेली या प्रदेशावरची पुस्तके शोधून एकत्रित करून लेखकांना सहज उपलब्ध झाल्यास त्यातून पुढील साहित्यासाठी माहिती उपलब्ध होईल तो प्रश्न महत्वाचा आहे. आदिवासी संशोधन केंद्र आदिवासी प्रदेशातच असावे.

**प्रश्न :** आपल्याला आणखी काय सांगायचे आहे काय ?

**शेख :** ज्या बिगर आदिवासी कार्यकर्त्यांनी संमेलनासाठी रात्रंदिन मेहनत घेतली, मतभेदांच्यावेळी मध्यस्थ म्हणून पुढे येऊन समझोत्याचे प्रयत्न केले त्या कार्यकर्त्यांना स्वत:ला आदिवासी लेखक म्हणविणाऱ्यांनी तुच्छतेने वागविले. एका स्त्री कार्यकर्तीचा अपमान अशा पध्दतीने होताना मी समक्ष हजर होतो. अशा आगावू तथाकथित लेखकांना आवर घालावा. कारण हे कार्यकर्ते घरातला विरोध सहन करुन प्रतिकूल परिस्थितीत आदिवासींमध्ये कार्य करतात. केवळ ध्येय म्हणून. अशा अपमानामुळे त्यांच्या मनाच्या वेदनांचा विचार व्हावा.

धन्यवाद.

## लीडर

आमचे लीडर आम्हालाच 'राम-राम' करतात
आणि आमचीच संस्कृति सांगतात
प्यारे पोटभर आमचं खातात
आणि नांव त्यांचे घेतात
ज्यांनी हिसकावली भाकर
भीक त्यांनाच मागतात
रक्त आमचे जाते
नावही त्यांचेच होतात

- कृष्णकुमार चांदेकर
अमरावती

## आमची दुनिया -

आमची दुनिया निराळीच
आमच्या दुनियेची गांवेपण निराळीच
आमच्या दुनियेत,
आमची किंमत निराळीच होती
जगणं आम्हाला एक जालीम सजा होती
आमच्या दुनियेचा शब्द एक घाणेरडा वास होता
आमच्या दुनियेतल्या मरणाला
अजिबात किंमत नव्हती
मात्र त्यांची मरणे अत्यंत महागडी
सोन्याच्या धातुसारखी, किंमतीसारखी
आमच्या दुनियेवर कुणीही करावेत हल्ले
कारण संघर्षाची जाणिवच नव्हती
आंमच्या दुनियेने पाण्यासाठी 'आ' वासून उभे राहावे
परंतु पाण्याऐवजी काय पडलं तोंडात
पाण्याऐवजी मरण, परंतु आता
आमच्या रक्ताचा थेंब ना थेंब
आमच्या क्रांतीसाठी तयार आहे.

- बा. ध. गायकवाड
कासगांव ( शहापूर ) ठाणे

THE MAHARASHTRA ASSOCIATION OF ANTHROPOLOGICAL SCIENCES

# आदिवासी जीवनावरील पुस्तके / संकलन : भुजंग मेश्राम

| (अ) कविता संग्रह | कवी |
|---|---|
| १. गोधड - | वाहरु सोनवणे |
| २. ऊलगुलान - | भुजंग मेश्राम |
| ३. गोंडवन पेटले आहे. - | विनायक तुमराम |
| ४. इंद्रियारण्य - | रवि कुरसंगे |
| ५. वनवासी - | उत्तम धोंगडे |
| ६. मोहोळ - | संपा. : भुजंग मेश्राम |
| ७. आदिवासी कविता - | भुजंग मेश्राम |

| (ब) कादंबरी | लेखक |
|---|---|
| १. महानदीच्या तीरावर - | दुर्गा भागवत |
| २. भिल्लविर कलींग - | गो. नि. दांडेकर |
| ३. बळी - | मालती बेडेकर |
| ४. वाडगीन - | वा. ब. कर्णिक |
| ५. शबरी - | साने गुरुजी |
| ६. एकलव्य - | सुरेश दळवी |
| ७. जैत रे जैत - | गो. नि. दांडेकर |
| ८. पारध - | जगदीश गोडबोले |
| ९. अरण्येर अधिकार - | महाश्वेत्ता देवी ( अनु. : प्रभा श्रीनिवास ) |
| १०. आंदोलन - | दीनानाथ मनोहर |
| ११. हाकूमी - | सुरेश व्दादशीवार |
| १२. तांदळा - | सुरेश व्दादशीवार |
| १३. झेलझपाट - | मनोहर वाकोडे |
| १४. माणूस जेव्हा जागा होतो - | गोदावरी परुळेकर |
| १५. जंगलची छाया - | आचार्य भिसे |
| १६. कोसबाडच्या टेकडीवरुन - | अनुताई वाघ |
| १७. मी वनवासी - | सिंधुताई सकपाळ |

| चरित्रे | लेखक |
|---|---|
| १. नारायणसिंह ऊईके - | विनायक तुमराम |
| २. दोन क्रांतीवीर - | व्यंकटेश आत्राम |

| ( ड ) एकांकिका / नाटक | लेखक |
|---|---|
| १. औतान - | भुजंग मेश्राम |
| २. सवारी - | भुजंग मेश्राम |
| ३. मातामाय - | भुजंग मेश्राम |
| ४. सोंग - | भुजंग मेश्राम |
| ५. निष्पर्ण वृक्षावर - | रमेश कुबल |
| ६. आसाचा फेरा - | जगतकुमार पाटील |
| ७. लगोरी - | --- |
| ८. आदि-लिला - | रमेश कुबल |
| ९. कमला - | विजय तेंडुलकर |
| १०. कडेकपारी - | ( लेखक माहीत नाही ) |
| ११. लोककथा - ७८ - | रत्नाकर मतकरी |
| १२. छळ आणि विरह - | कुंडलिक केदारी |

| संशोधन ग्रंथ | लेखक |
|---|---|
| १. कोलाम - | भाऊ मांडवकर |
| २. आदिम - | भाऊ मांडवकर |
| ३. गोंडी संस्कृतीचे संदर्भ - | व्यंकटेश आत्राम |
| ४. सह्याद्रीतील आदिवासी : महादेव कोळी - | गोविंद गारे |
| ५. धर्म व लोकसाहित्य- | दुर्गा भागवत |
| ६. माडीया गोंडांची बोली - | शैलजा देवगांवकर |
| ७. चंद्रपूरचा इतिहास - | राजूरकर |
| ८. गोंडी -मराठी शब्दकोश - | पटवर्धन |
| ९. आदिवासींच्या मुलभूत समस्या - | गोविंद गोरे |
| १०. आदिवासींचे सामाजिक जीवन - | विलास संगवे |
| ११. गोंड लोक - | माधव काळे |

**टीप :**

१. यादीत केवळ मराठीतील पुस्तके दिली आहेत.
२. ही यादी सर्व समावेशक नाही.
३. अलिकडील पुस्तकांचा यात विचार झाला आहे.
४. आदिवासी साहित्यातली बरीच पुस्तके यात समाविष्ट आहेत.
५. नियतकालिकांची सूची दिली नाही ( ज्यात मोठ्या प्रभावावर हे लिखाण आले आहे. )
६. आगामी साहित्य ( कथासंग्रह, कादंबरी, इ. ) दिलेले नाही.

## रेलाँऽऽऽ रे -

पौर्णिमेच्या धुंद रात्री रानी विलसते रम्य प्रभा
उठतो ध्वनी पहाडात हा रेलाँ ऽऽऽ रे भिडतो नभा.....
सजती माझ्या माय माऊल्या फेर धरूनी नाचती
मोरपंख अन गुंजमण्यांचे हार कंठी शोभती.....
गोंदणे हा श्रृंगार त्याचा आभुषणेही रानातली
विसरताती दुःख सारे क्षणिक या जीवनातली.....
थाप पडता ढोलावरी झुंड येऊनी थिरकती
टिपऱ्यांसवे गीतलहरी निरव शांती तोडती.....
उडुनी जातसे रात्र कशी ती धुंद मैफिलीत त्या
डोंगराच्या पायथ्याशीच शांत झुडुपी पाड्यात त्या.....
या वन्य जीवन संस्कृतीची ही रीत युगे चालली
विश्व त्यांचे तेच फुलविती ही मुक्तियात्रा चालली.....

- प्रा. विनायक तुमराम

## पुरस्कार

एक आदिवासी चित्रकार कसलेला
रंगाच्या रंगात फसलेला
कलासम्राट !
फुलांच्या रंगात गंध भरण्याचे
कसब अवगत त्याला,
पानांच्या शिरातून वाहणाऱ्या
चैतन्याची सळसळ साकार करण्याची
कला अवगत त्याला.
कुंचल्याच्या घोड्यावर मांड त्याची पक्की
दऱ्याखोऱ्यांतून कुंचल्याला दौडविण्याची
त्याला मस्ती.
त्याच्या कलासूक्त बोटांवर
कुंचला फिदा झालेला,
आपल्या कुंचल्यावर त्याने
सारा निसर्ग पेरलेला
त्याच्या कॅनव्हासच्या मर्यादा अमर्याद
क्षितिज छेदून जाणाऱ्या
चितारित आला तो अनेक दृष्ये
गेली अनेक वर्षे
फिरविले ब्रश बेदरकारपणे त्याने
हिरव्या फांद्यावरून, गुलाबी संध्यावरुन
नद्यांच्या काठांवरुन
आणि मदनिकेच्या ओठांवरुनही !
चितारला त्याने निसर्ग
पाण्यातल्या नितळ प्रतिबिंबासारखा
कलेचा धर्म त्यांने इमानाने पाळला
पाहून आपले रुप त्यात निसर्गही भाळला.
रंग असे उधळले त्याने बेदरकारपणे
उचलला त्याने ब्रश एके दिवशी
आदिवासी मायीला चितारण्यासाठी
व्याकुळ भुकेचा अंधार प्यालेल्या
खचलेल्या, पिचलेल्या

प्राक्तनाच्या काठीवर टेकून चालणाऱ्या
आदिवासी मायीला चितारण्यासाठी
आदिवासी मायीच्या मुखावर जाळे सुरकुत्यांचे
असंख्य यातना भोगलेल्या
त्या प्रत्येक यातनेची
एक दर्दभरी लकेर त्या जाळ्यात
मस्तीने रंगाची उधळण करणाऱ्या
चित्रकाराची बोटं पहिल्यांदा थरथरली
चित्रकार गडबडला
बोटं त्याची बधीर
आणि कुंचला मुर्दाड स्थिर
क्षितिज छेदून जाणारा
नेहमीचा त्याचा कॅनव्हास अपुरा
मायीची व्यथा सामावण्यासाठी
चित्रकार खिन्न उदास दु:खी
पापण्यांचा बांध फोडून ओघळले
दोन अश्रू त्याचे रंगात
अश्रूंच्या स्पर्शाने रंग सद्‌गदित
पण अधिकच गडद
त्या गडद व्यथाच्या रंगाचे आव्हान
चित्रकाराच्या बोटांना
...त्याच्या बोटांत उठले तुफान
न आवरणारे
आणि अश्रूमिश्रित रंगानी मायीच्या मुखावर
उठली रेघ नि रेघ
प्रत्येक सुरकुतीची खोली अथांग समुद्राएवढी
आदिवासी मायीचे चित्र साक्षात साकार
आदिवासी चित्रकाराला हाच अमूल पुरस्कार
एक अमूल्य पुरस्कार !

प्रा. डॉ. रावसाहेब चोले
मराठवाडा कृषि विद्यापीठ
परभणी

# डिफरन्स बिटवीन टू नेशन

''खिडकीके बाहर मत देख बेटा''
चित्रपंखाच्या तांड्याने केला इशारा
सोफिस्टीकेटेड मठात दाटली काळोखी संध्या
आणि चमकले काजवे
हाडांच्या पिंजऱ्यातील खोल बुबुळांना
सापडला वाटाड्या. रातयक्षास शह देणारा.
अक्कडबाज तांड्याचा पिळवटला सूर
डोळ्यांची लेसर किरणं निघाली
अंधाऱ्या खिडकीच्या आरपार
खिडकी... ! अंधार प्रकाशामध्ये उभारलेले चिनी भिंती धरण
It is the difference between two Nations

- १ -

खोल पोट गेलेल्या भग्नमंदिराच्या गाभाऱ्यात
अजूनही तेवत आहे नंदादीप.
चंद्राने टाकलेली पिवळी कात
काळोख पाण्यात पिसाटलेल्या चांदण्या
बेगुमान किड्यांचे थिल्लर गाणे
आकाशाच्या ओठांनी छेडलेले तराणे.
मातीच्या ओठावर आलेली रक्तीमा
भोकांडणारे कुत्रे, कपटी श्वापदांची कोल्हेकुई
परकर-पोलक्याचा फडफडता डोंबाऱ्याचा पाल
या अष्टरंगी छऱ्याछऱ्याने रंगलेले
संजीवक जग.....खिडकीच्या आरपार
खिडकी..... ! अंधार प्रकाशामध्ये उभारलेले चिनी भिंती धरण
It is the difference between two Nation

- २ -

डोळ्यांनी रान तुडवले होते.
अंगाला फुटलेले लाख-लाख डोळे.
आदिमाचा वेध घेणारी दिवाणी नजर
पिंजून काढीत होती माळरान.

पूर्वेच्या चंद्राने झपाटले पश्चिमेला.
पूर्वेच्या ओठांना पडला उखाणा
अस्थिपंजर पक्षांनी केला मंत्रोच्चार
बेदरकार सूर्याने- पांगारी रंगाने
चुंबले पूर्वेचे गाल
पैलदर्यापार आस्तावला चंद्र
वेलीला फुटले गंधाचे पाय
तळ्यात विसावली गुलाबी कमळे
या अष्टरंगीछऱ्याछऱ्याने रंगलेले
संजीवक जग...खिडकीच्या आरपार
खिडकी... ! अंधार प्रकाशामध्ये उभारलेले चिनी
भिंती धरण
It is the difference between two Nations.

- ३ -

सोफिस्टिकेटेड घराच्या कुंडीतील
हिरवंकंच्च बाळसेदार झाड, आणि
उन्हात स्मृतीसंहिता जपणारा
झाडांचा सांगाडा-नागडा अमीबा-स्टारफीश
ओळखीच्या वृक्षांच्या सालींनी झालीशी
केलेले वज्रघर्षण
सूर्यस्फटिकाने चिगदाळलेली कातडी.
वळवळणारे मुळांचे आतडे.
झाडाच्या शेंड्यावर चिवचिवते पाखरू,
वांझ आभाळास विणवीत चातक चोचीने.
या अष्टरंगी छऱ्याछऱ्याने रंगलेले
संजीवक जग....खिडकीच्या आरपार
खिडकी.... ! अंधार प्रकाशामध्ये उभारलेले चिनी
भिंती धरण
It is the difference between two Nations

- ४ -

काँक्रीटच्या ढेकळात दबलेल्या पाखराची
बुभुक्षू नजर स्थिरावली भिंतीवर.
सोफिस्टीकेटेड मठाच्या भिंतींना
छेदले लेसर किरणाने.
आदिवासी जीवाचे, टपोऱ्या फुलांचे
उसवू लागले वॉलपीस....जळू लागले धागे.
सोफिस्टीकेटेड मठ पेटतच पेटला.
साव दारे. ''खिडकीके बाहर मत जाना बेटा''
भ्रमिष्ट ओरडणे, सामील झाले राखेत.
आणि फडफडला एक फिनिक्स,
जीवाची राखच प्रसवली नव्या जीवाला...बुद्धाला
डार्विन तुझा सिद्धांत विव्हळतोय खिडकीच्या
आत
खिडकी.... ! अंधार प्रकाशामध्ये उभारलेले चिनी
भिंती धरण
It is the diffefence between two Nations.

सुधाकर सरवदे
मेठलनगर, घर नं. १५१०/२
(बीडचाळ), अंबरनाथ
पिन :- ४२१५०५.

## लाजाळू-निवडुंगाचं प्रेम !

''माझं तुझ्यावर पिरेम हाय''
असं म्हणू नकोर पारे !
अग ! तुझा जन्मच मुळात हिरवळीतला.
गाव कुसाबाहेरच्या ओसाड रानात
तू पापण्यात झाकलेले इंद्रधनुष्य पाहू शकशील का ?
मला सांग....तुझी खोल नजर
विहिरीकाठी बसून...हाताची ओंजळ करून
विहिरीचं पाणी ओढू शकेल का ?
सांग पारे ! तू जगू शकशील का... ?
हे बघ पारे !
''माझं तुझ्यावर पिरेम हाय''
असं बोलणं खूप साध-सोपं असतं ग !
पण गावकुसाबाहेर जाणाऱ्या दगडी वाटेवर
दबा धरुन बसलेल्या बोरी-बाभळी
गावातले रानटी तीक्ष्ण काट्यांची जुनी खोडं
यांच्या जखमा सहन करणं
खूप अवघड गोष्ट असती पारे... !
''मी ठरीवलयं तुझ्याबरोबर जगायचं-मरायचं,
जे तुझं सुख तेच माझबी सुख''
असं बोलणं सोपं असत-पण जगणं अवघड असतं.
अग ! आम्हाला मरणही येत नाही क्षणात.
ते येतं. गिधाडांनी टोच्या मारुन
आमचं सत्व ओरबाडल्यावर-चिरडल्यावर
कारण आमचा जन्मच झाला
फाटलेल्या आभाळाखाली.
आम्ही पाहिला नाही चंद्र
उपभोगल्या नाहीत चांदण्या
पाहिली ती फक्त एक विराट पोकळी
-गरगरणारी-साचेबंध-न उघडणारी.
पारे ! जरा डोळे उघडून बघ
तूझ्या ताटात आहेत सोने-चांदी-हिरे.
आम्ही मात्र खाल्ले आजवर
उन्हाळ्यात बुरसटलेली लाकडे-तुकडे.
अग ! फुलांचा वास आमच्या शिवारात नाही
तर नाकात कुठून.... ?
सांग पारे ! ओलावा गमावलेल्या
रेताड रानी तू फुलू शकशील का... ?
ऐक माझं पारे ! असा वेडेपणा नको करु.
आम्ही पुसणार आहोत काळ्या दगडावरची रेघ.
आणि उभारणार आहोत 'निळ्या पहाटेचे' शिल्प.
पोखरणार आहोत पोकळी
उठवणार आहोत सुरुंगानं रूढीबंध गांव
त्यात तुझही घर असेल-जळत असेल.
तेव्हा विचार करुन
तुझ्या पेटत्या घराची आग माझ्या मशालीत दे.
आणि फक्त एक स्मित कर.
जेव्हा येईल याच गावात नवीन फुलोरा.
तेव्हाच हवं तर माझ्यावर प्रेम कर
आता मात्र या निवडुंगास
नव्या विचारांची साथ कर...
पारे ! नव्या विचारांची साथ कर.

सुधाकर गोविंद सरवदे
अंबरनाथ

## जन्म न देणाऱ्या मांची कथा -

ते म्हणतात माझी आई, तुझी आई
होवू शकतच नाही ?
माझी आई ती तुझी आई कशी ?
माणसा माणसाच्या वृत्तीचा हा भेद
माझी आई ती त्यांची आई,
माझी आई मात्र-माझी कशी म्हणतात ?
म्हणूनच-माझ्या आईला साप समजून
जसजसे मारता येईल तसे रठ्ठे हाणतात
बेशरम म्हणून उलटे पाय लटकवून
इज्जत, विक्रीला, गहाण ठेवतात
तिच्या सर्वांग जिंदगीवर हागतात
तिच्या ढुंगणात मिरची आग भरतात
चिलाट्या, बोराडे कमरेला बांधतात
तिच्या झिंज्याचे ते दावे वळतात
तिच्या गुप्तांगापासून स्तनाग्रापर्यंत
आग-चटक्यांची कशिदा काढतात
तिच्या बेअब्रुचे लत्करं गावोगाव फेकतात
निंदानालस्तीच्या बोंबा गल्लीपासून-दिल्लीपर्यंत मारतात
तिच्या रक्ताची, नात्याची, सख्याची जात विचारतात
ती कधी व्यालीच नाही म्हणून
भाडविक्रीचा जाहीरनामा तिच्याकुळी लावतात
ती ओरडली, बिथरली तर....
तप्त शलाखा डोळ्यापुढे दावतात
डोळे काढायला-डोळे काढूनच असतात
चिचे तोंड दाबून मुका मार-मार मारतात
चुकून माकून पेटून-अंतर्मूख होवून बोललीच तर,
खबरदार ! अक्कल हुशारीचा जाब विचारतात
कोण ? कुठली ? रक्तनात्याचे कुळ विचारतात
ती रडून म्हणते

"आकाशाएवढे पांघरुण घातले तरीही
आतून माझ्या आतड्याच दिसतात
खोबणीत साठवले तरीही दिवा लपत नाही
मनाने व्याले, जीवदान दिले
तरीही हा समाज मला आई म्हणण्यास तयार नाही
कारण मी तुझी रक्ताची आई नाही
म्हणूनच ते म्हणतात आमची आई ती तुझी आई होवू शकतच नाही
तुला जन्म न देणारी-तुझी आई होवू शकतच नाही
हे ऐकून -माझी माय रक्ताश्रू गाळत म्हणते
बा लेकरा ! माझ्या गर्भात तुला साठवता येत नाही
लेकरा ! तुझा जडलेला
लळाही-मनातून ओढून काढता येत नाही
म्हणून बेटा ! डोक्यातला पावसाला थांबता येत नाही
लेकरा ! मी कधीच तुझ्याश्वासाविना जगले नाही
तरीही ! तू मला माय म्हटलंच नाही
ह्या अतृप्तकुशीचा आक्रोश तू जाणलाच नाही
मां म्हणत-माझ्याकुशीत लपलाच नाही
जगाच्या भितीने तूही खरं मायपण मला दिलंच नाही
फाटक्या आतडीला दोरा घातलाच नाही
मायेचं गर्भारमायपणं मी भोगलंच नाही
मां म्हणून कुणी हाक मारलीच नाही
मी कधी माय झालेच नाही
मी माय कधिच झालेच नाही !
तूही माय म्हणून-धावलाच नाही
माझ्या अश्रूत तू कधी बुडलाच नाही

- उषाकिरण आत्राम

## मी वं कोणाची !

तो तडातड मारायचा थापडा
दणादण मारायचा गुद्दे
झिंज्या हालवत म्हणायचा..
तू तं पायातली वाहाण
बाय.. म्हणजी.. पायताण
दाराबाहेरची कुत्री...
तुहा काय अधिकार... ?
माय वो तूच सांग... ?
मी वं कोणाची ?
ह्याची.. त्याची मी वं कोणाची ?
जिथं जातो.. तिथं पाहतो
साऱ्यायले वाटतं..मी त्यायचीच
लहानपणी बापाचा-भावाचा कब्जा होता
शेजारी पाजारी-माय तुहाही पहारा होता
खेळण्या हसण्यापासून माझ्यावर नजरा होत्या
सारेच म्हणायचे-पोरीची जात हायेस...
दाल्ल्याच्या घरी जाशीन... कं घरी ठेवाची हाय
ढोलीत बी कराले ?
बांधून कोंडून तवाही तोंडसुख-हातसुख..
तुम्ही भोगलं माझ्या बालपणावर !
आता लगीन झालं., तं दाल्ला म्हणतो मी त्याचीच
कधीही हाणा-कधीही ताणा.. !
कधीही पाजवा-कधीही वाजवा
मी ढोलकीच त्याची... !
कष्टाले सावकार जमीनदार रेंजराकडे जातो
तवा ते बी हुंकते आजुबाजुले
त्यांना बी वाटते मी त्यांचीच..
कुणीही यावं..नि टिकली मारुन जावं..
हळदीची भुकटीच समजतात माले...
सांग वं माय तूच सांग मी वं कोणाची ?
मा-मी कोणाकोणाची नजर चुकवू
मा-मी कोणाकोणाची गरज भागवू
मा-वं मी कुठे जीवं लपवू
आताशा तं दिवस आणी रात मले काळीच वाटते
दिवसा ढवळ्याही माझा रोजच सदर फाटते
कोणत्या धडक्याने मी लाज झाकू
कोणत्या भरवशानं मी शील राखू..
मां तू तं म्हणते
लगीन झालं तू परकी झाली
मरुन जाव लेकिन-परवं माहेरी तोंड दावू नये
तो मारुन टाको-की तुकडे करुन फेको
तू माहेरी येवू नको-उंबरा तोडू नको-
माय-परणं मले रोजच नवरा बडवतो
रोजच मले पिटवतो-सांग माय मी कवरीक सोसू-
सांग माय-मी वं कोणाची
बापाची भावाची ?
नवऱ्याची-सावकार-रेंजर-पाटील-
जमीनदाराची-शिंप्याची-सोनाराची-की आणखी
सांग मी कोणाची ?
देवू वं मी भरोसा कोणाचा-
सोतालेच इचारतो-मी बापा कोणाची-
मी वं आपल्या नशीबाची-

- उषाकिरण आत्राम

## अंधारलेले एकविसावे शतक -

एकविसाव्या शतकातला आदिवासी-कातकरी
कॉम्प्युटरच्या युगात पडलांय अडकून
बाहेर पडावे कसा हा प्रश्न
एकविसाव्या शतकातली त्यांची घरे
साक्ष देतात घरबांधणी योजनांची
पांढऱ्या कागदावर नाव मात्र त्यांचेच, आदिवासींचे
पण येतात का त्यांच्या योजना त्यांच्याजवळ
कुठेतरी त्यांचा कागद काळाच होतो
या युगात पळसाची पाने गोळा करावीत
काही पानांच्या पत्रावळी शिवल्या
दुसऱ्यांच्या स्वादिष्ट जेवणासाठी
मात्र त्यांच्यासाठी उष्ट्या पत्रावळी
आदिवासी स्त्रियांच्या,
कमरेभोवती लावलेलं फाटकं-तुटकं जुनेर
अंगामध्ये चोळीचा पत्ता नाही
त्याची उघडी नागडी मुले
दाखवितात लोकशाहीचा विकास
एकविसाव्या शतकात वेठबिगारी
आयुष्यभर बंधनात जखडणारी
रखरखत्या उन्हां-तान्हांत करावे काम
आपल्या देहाचा करावा कोळसा
आधीपासूनच जीवन ज्यांचे
सर्वांगाने अंधारलेले
आशा या युगाला म्हणावे तरी काय ?
हे युग म्हणजे 'अंधारयुग' होय.

- बा. ध. गायकवाड
कासगांव ( शहापूर ) ठाणे.

## शृंगार

तिनं माळला होता गजरा
आणि गोंदत होती
उघड्या अंगावर
भुजवर मोर
माथ्यावर चंद्रकोर
दंडावर बेलपानं-पायऱ्याची विहीर
पावावर मासोळ्या, नाग
सारा निसर्गच रेखाटला होता अंगभर...
टच्च सायाळकाट्याचे टोक-
खरखरीत चामडीचे पाल पाडून
निळे गोंदण लाल रक्तात कसे पेरतांना
हास्सहूस्स करीत असतांनाच-
माय म्हणाली-
पोरी ! सोड ग जुनं
गोंदू नग अंग
नाचू नग संग
दावू नग अंग
राहू नग नंग
''माहा जमाना गेला अमावस्येत''
''जिंदगीभर नाग नाचला''
म्हणून म्हणते-पोरी !
झाक ! झाक तू अंग
घे कापड-सावर उर
ले-अंगभर कापडं
''उघड डोळ्याची झापडं''
तशी आपली काळजी समद्यालेच असते
टेलर मापतो उराले
सावकार रोखतो सळाले
पुढारी, साहेब सारेच कुचपट
भिरभिर नजरेनं टिपतात
गर्दी पाहून त मुद्याचं रेटतात
ओटातून पोटातून नजरेनं पितात

पोरी ! तू साधीसुधी आहेस
नाच म्हणाल की नाचतेस
ढोल तालावर फसतेस
गोड बोलावर भाळतेस
बये ! तुले ठावूक नाय त्यांची चाल
म्हणूनच ते करतात आपले हाल
जत्रायात्रात लयीच भावते
" तुझ्यासाठी तं भलेभले मुद्दाम रुकतेत !
तुले ठावं नाय पोरी
या जगाची न्यारी बात
तू माळू नगं गजरा
करु नगं-नाचून सण साजरा
रोखलेल्या नजरा-तोडतात गजरा
सावध हो-पोरी !
रान जळत आहे
फूल गळत आहे
" गोंदून निळी-होवू नगं काळी "
रानफुलासारखी डवरं
हो !सूर्यसळी !
हो !नागकमळी !
हो !सूर्यफूल
हो ! तांबडी पळसाची लाल अंगार
तरच उठून दिसंल-
ह्याबाजार फुक्याले तुहा-" शिणगारं "

- उषाकिरण आत्राम




THE MAHARASHTRA ASSOCIATION OF ANTHROPOLOGICAL SCIENCES

# 'हाकारा' चा १२ वा वर्धापनदिन व प्रा. सरदार स्मृती अंक प्रकाशन सोहळा

'हाकारा' च्या १२ व्या वर्धापन दिनानिमित्ताने व प्रा. गं. बा. सरदारांच्या व्दितीय स्मृतिदिनानिमित्ताने परिषदेच्या वतीने गुरुवार, दि. १० जानेवारी १९९१ रोजी पुण्यातील टिळक स्मारक मंदिरात समारंभ आयोजित करण्यात आला. यावेळी 'हाकारा' च्या प्रा. गं. बा. सरदार स्मृती विशेषांकाचे प्रकाशन, 'हाकारा-१९८० ते ९० वाङमय सूची चे प्रकाशन, प्रा. डॉ. आनंद यादवांचा सत्कार व परिसंवाद असे भरगच्च कार्यक्रम आयोजित केले होते.

सुरुवातीला परिषदेचे सचिव व 'हाकारा' चे संपादक प्रा. रा. के. मुटाटकरांनी प्रास्ताविक केले. आपल्या प्रास्ताविकात त्यांनी, ११ वर्षांपूर्वी २ जाने. १९८० रोजी टिळक स्मारक मंदिरातच कै. काका केळकरांच्या हस्ते 'हाकारा' च्या प्रथमांकाचे प्रकाशन झाले त्यावेळी प्रा. गं. बा. सरदार हे परिषदेचे व कार्यक्रमाचेही अध्यक्ष होते. हा योगायोग असल्याचे सांगून त्यांनी प्रा. सरदार परिषदेचे अध्यक्ष असताना त्यांच्या सहवासातील काही आठवणींना उजाळा दिला. तसेच परिषदेच्या व हाकारा उपक्रमांची थोडक्यात माहिती देऊन श्री. जनार्दन दळवी यांचा पुणेकरांना अल्पसा परिचय करुन दिला.

डॉ. बाबा आढाव यांचे हस्ते 'हाकारा' च्या प्रा. सरदार स्मृति अंकाचे प्रकाशन करण्यात आले व हाकाराच्या वाङमय सूचीचे प्रकाशन प्रा. आनंद यादवांनी केले. आधुनिक ग्रामीण साहित्य चळवळीचे प्रवर्तक व प्रसिध्द साहित्यिक आनंद यादव यांना 'झोंबी' या आत्मचरित्रात्मक कादंबरीबद्दल साहित्य अकादमी पुरस्कार मिळाल्याबद्दल परिषदेच्या वतीने अध्यक्ष श्री जनार्दन दळवी यांचे हस्ते आनंद यादवांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. सत्कारापूर्वी आनंद यादव यांच्या वाङ्मयीन कारकीर्दीचा ग. शां. पंडित यांनी परिचय करुन दिला.

यानंतर म. फुले स्मृतिशताब्दी व आंबेडकर जन्मशताब्दी वर्षानिमित्त प्रा. सरदारांविषयीच्या काही आठवणींना उजाळा देण्यासाठी एक परिसंवाद आयोजित केला होता. या परिसंवादात बाबा आढाव, हरि नरके, आनंद यादव, अनिल गोरे या मान्यवरांनी भाग घेतला होता. डॉ. हे. वि. इनामदार हे प्रकृती अस्वस्थामुळे येऊ शकले नाहीत. श्री. जनार्दन वळवी यांचे अध्यक्षतेखाली सुरु झालेल्या या परिसंवादात बोलताना बाबा आढाव यांनी सरदारांच्या परिवर्तनवादी विचारांबद्दल काही आठवणी सांगितल्या. हे सांगताना ते म्हणाले की, 'अण्णांचे नि माझे संबंध काही बाबतीत संघर्षमय होते. त्यांनी गांधीवाद, आंबेडकरवाद स्वीकारला पण मार्क्सवादाला दूर लोटले असा आक्षेप मी त्यांच्यावर घेतला होता हे ठामपणे त्यांना सांगायचे होते, पण त्यांच्या हयातीत हा स्पष्टपणा माझ्या अंगी नव्हता. आज जर ते असते तर कदाचित मी हे त्यांना सांगू शकलो असतो. 'पुरोगामी व परिवर्तनवादी शक्तींनी एकत्र यावे, हा अण्णांचा एक ध्यास होता' हे सांगून डॉ. आढाव पुढे म्हणाले की, 'अण्णा अतिशय स्वाभिमानी होते.

कोणतेही पद झगडून मिळविणे त्यांना मान्य नव्हते' 'जर माझ्याकडून खरोखरच काही काम झाले असेल तर ते पद आपोआप मला मिळेल' ही त्यांची विचारसरणी होती. आपले विचार अतिशय सोपेपणाने मांडण्याची कला त्यांचेकडे होती. ते स्वभावतःच सरळमार्गी होते. आपल्या लेखनातही ते अवघड किंवा जोडशब्दांचा वापर टाळत असत. 'हाकारा' नाव देतानाही त्यांनी कुठे जोडशब्दांचा वापर केला नाही. मी सुद्धा याबाबतीत त्यांचाच आदर्श ठेवला आहे.'

म. फुले वाङ्मयाचे व विचारांचे अभ्यासक हरी नरके यांनी सरदारांच्या सहवासातल्या अनेक आठवणी सांगितल्या, 'विचारांची गुंतागुंत झाली असेल तर त्याची निरगाठ अण्णा कसे सोडवून देत' हे सांगताना नरके म्हणतात की, 'मी जेव्हा भरपूर वैचारिक लेखन वाचून त्यांच्याकडे जायचो तेव्हा माझा गोंधळ व्हायचा. अण्णा म्हणायचे 'आता तू काही ललित पुस्तके वाच.' म्हणजे तारूण्याच्या जोशातील मी काहीही वक्तव्ये करुन जायचो, परंतु अण्णांनी मला आई-वडिलांचे प्रेम दिले, समजून घेतले आणि सांगितले. 'आपल्या व्यक्तिगत आठवणींबरोबर सरदारांची म. फुलेंविषयी त्यांची भूमिका स्पष्ट करताना श्री. नरके म्हणतात की, ''अण्णांनी म. फुलेंच्या नावाचा उल्लेख कधीही ज्योतिबा न करता 'जोतीराव' असा केला आहे. कदाचित 'राव' या शब्दातून म. फुलेंचा गौरवच त्यांनी केलेला असावा, नव्हे तोच त्यांचा हेतु होता. म. फुलेंच्या विचारांची वेगळ्यारीतीने मांडणी करणारे अण्णासाहेब सरदार हे महाराष्ट्रातील एकमेव विचारवंत होते, फुले-आंबेडकरांविषयी अण्णांचे जे आकलन आहे ते पहिले-वहिले व कसदार आहे.''

साहित्य अकादमी पुरस्काराबद्दल केलेल्या सत्कारानिमित्त आनंद यादव आपला आनंद व्यक्त करताना म्हणाले, 'प्रा. सरदारांच्या कार्यक्रमाच्या-वेळी माझा सत्कार झाला. याबद्दल मला विशेष आनंद वाटतो. कारण सरदारांशी कुठेतरी आपला धागा जोडला आहे, याचा हा आनंद आहे.' सरदारांविषयी बोलताना डॉ. यादव म्हणाले की, 'सर हे साहित्यिक होतेच, पण त्यापेक्षा ते एक समाजशिक्षक होते. ते गांधीवादी विचारसरणीचे जरी असले तरी त्यांनी आंबेडकरवाद व मार्क्सवादालाही तितकेच महत्व दिलेले आहे. आज खालच्या उपेक्षितांच्या सर्व वर्गांमध्ये जागृती झालेली दिसते पण त्यां नात परिवर्तन झालेले दिसत नाही. याचे कारण सांगताना सरदार म्हणतात की, 'ही जागृती अतिशय संकुचित विचारांची आहे. प्रत्येक जातीचा गट हा स्वतःपुरतेच पाहतो. जेव्हा त्यांच्यात व्यापक दृष्टीकोन निर्माण होईल व स्वतःच्या जातीपुरता विचार न करता सर्व समाजाच्या कल्याणाचा विचार केला जाईल तेव्हाच खऱ्याअर्थाने परिवर्तन झाले असे म्हणता येईल.' या अर्थाने सर हे परिवर्तनवादी विचारवंत म्हणून मला भावले.''

परिषदेचे सन्मान्य सभासद व कार्यकर्ते प्रा. डॉ. अनिल गोरे यांनीही यावेळी प्रा. सरदारांच्या सहवासातल्या काही निवडक आठवणी सांगितल्या. ते म्हणाले, 'मी मराठीचा प्राध्यापक नसलो तरी मला तीन वेगवेगळ्या संस्थांमध्ये तीन मराठीचे नामवंत प्राध्यापक भेटले. नरहर कुरूंदकर, पु. ग. सहस्त्रबुद्धे व प्रा. गं. बा. सरदार. अण्णा परिषदेचे अध्यक्ष असताना सुरुवातीला मी त्यांच्याशी बोलताना भीतभीतच बोलत असे. कारण एका मोठ्या प्रकांड पंडिताबरोबर आपल्यासारख्याने काय बोलावे ही भीती मनात होती. परंतु जसजशी त्यांच्याशी जवळीक वाढत गेली. तसतसा माझ्या वागण्या-बोलण्यात मोकळेपणा येत गेला. अण्णांशी तशी माझी अगदी शेवटी-शेवटीच ओळख झाली, पण त्यांच्याबाबतीत मला जे काही अनुभवायला मिळाले ते थक्क करण्यासारखेच आहे. अण्णांची

स्मरणशक्ती अतिशय दांडगी होती. एखाद्या दोन-तीन दिवसांच्या चर्चासत्राचा समारोप करताना त्यांना प्रत्येक गोष्ट ध्यानात असायची. समारोपाच्या भाषणात ते प्रत्येकाच्या नावानिशी उल्लेख करायचे, त्यावेळी वाटायचे की या माणसाने जे तात्पर्य सांगितले आहे ते सारे समजूनच. अण्णांकडून मला तीन गोष्टी शिकता आल्या. तर्क, जिव्हाळा व व्यासंग. जिव्हाळ्याशिवाय तर्काला जिवंतपणा येत नाही, अशी त्यांची भूमिका होती. अण्णा तर्काप्रमाणे विचारमांडणी करायचे, परंतु ते तर्ककर्कश नव्हते; तर व्यासंग व जिव्हाळा भरलेला त्यांचा विचार होता. ते समुदायाशी, माणसांशी वयाची क्षिती न बाळगता, प्रकृतीची पर्वा न करता बोलत असत. 'हाकारा' च्या यशात त्यांचे योगदान मोठे आहे.'

परिसंवादाचा समारोप अध्यक्ष श्री जनार्दन वळवी यांनी केला. या कार्यक्रमासाठी प्रा. सरदारांचे चिरंजीव व सून- अजित व वसुधा सरदार आवर्जून आले होते. तसेच सरदारांचे अनेक स्नेही व चाहते उपस्थित होते. कार्यक्रमाचे शेवटी या सर्वांचे व उपस्थित पाहुणे-वक्त्यांचे परिषदेचे उपाध्यक्ष शरद कुलकर्णी यांनी आभार मानले. या कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या सर्व श्रोत्यांना सरदार स्मृती अंक व सूचीचा अंक सप्रेम भेट म्हणून वाटण्यात आला. सर्वांना चहापान देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

- प्रतिनिधी

## गरीबी

गरीबी हा एक महारोग देशाचा
दुरूस्त ना होई औषधाने कोणत्याही
जंतू इतके प्रभावशील ज्याचे
ना पडे प्रभाव उपायांना कोणत्याही ।
गरीबी कपाळावरील डाग देशाच्या
निघे ना घासला जरी कितीही
रंग इतका पक्का आहे ज्याचा
ना निघे पदार्थाने कोणत्याही ।
गरीबी हा चिकटलेला गोंद देशाला
निघे ना ओढला जरी कितीही
चिकटला इतका पक्का जो
बाजूला होईना प्रयत्नाने कोणत्याही ।
दुरूस्त करावा लागेल हा महारोग
धुऊन काढावा लागेल हा डाग
दूर करावा लागेल हा गोंद
तेव्हाच देशात नांदेल आनंद

- जीवन गेडाम

## पुरूषार्थ

पुरूषार्थ नाकारून
नवसाने झालेल्या वांझोच्या औलादिंना
आमच्या पुरूषार्थांचं मोल काय करणार
आणि, आम्ही शासनकर्ते होतो
असे त्यांना कसे वाटणार...शिवा...शिव...
विर्याचे अस्तित्व नाकारून
थुकींने झालेल्या पोराचे विरत्व !
किंवा-योणीचे अस्तित्व नाकारुन
नाका-तोडांतून झालेल्या पोरांचे शूरत्व !
किंवा
लपत-छपवित झालेल्या
आणि नदी-नाल्यात; जंगला-झुडपात
सापडलेल्या पोरांचे राजत्व !
भूषणावह वाटणाऱ्या हिजडयांनी
जर का आमच्या राजत्वावर
थापटया वाजविल्या, तर नवल काय ?

- कृष्णकुमार चांदेकर

# संवाद

'हाकारा' च्या १२ व्या वर्धापनदिनानिमित्ताने परिषदेने १० जाने. ला आयोजित केलेल्या विविध कार्यक्रमांचे तुम्ही आवर्जून पाठविलेले निमंत्रण त्याच दिवशी संध्या. ८.३० वा. मिळाले. खूप आनंद झाला. मनाने मी पुण्यात टिळक स्मारक मंदिराच्या प्रांगणात वावरु लागलो. परिषदेच्या या महत्त्वाच्या व आवडीच्या कार्यक्रमात मी प्रत्यक्ष सहभागी होऊ शकलो नाही, यामुळे मनाला वेदना झाल्या. माझ्या भावना तुम्ही समजू शकता. ११ वर्षापूर्वी टिळक स्मारक मंदिरातच संपन्न झालेल्या कै. काका केळकरांच्या शुभहस्ते 'हाकारा'च्या प्रथमांक प्रकाशन समारंभाच्या सुखद स्मृतींना उजाळा मिळाला. (१० जाने. हा त्यांचाही वर्धापन दिन होता) १९९१ मध्ये 'हाकारा' चे १२ व्या वर्षात यशस्वी पदार्पण झाल्याने कै. काकांच्या हाताला यश असल्याची पुनर्प्रचीती आली. १० जानेवारीचे सर्व कार्यक्रम उत्तम प्रकारे संपन्न झाले असतीलच. या समारंभाचा वृत्तांत तुमचेकडून समक्ष ऐकण्यास मी उत्सुक आहे. हा योग लवकरच येत आहे.

प्रा. सरदार स्मृती विशेषांकही कालच मिळाला. रात्रीच पूर्ण वाचला. कै. अण्णासाहेबांच्या स्फूर्तीदायक व प्रेमळ सहवासातील सुवर्णक्षण डोळ्यापुढे तरळले. हा अंक नि:संशय संग्राह्य झाला आहे. कै. आण्णासाहेब व परिषदेच्या ऋणानुबंधाचे साक्षेपी विवेचन करणारे तुमचे 'संपादकीय' छान उतरले आहे. प्रा. देवदत्त दाभोळकर व डॉ. भालचंद्र फडके यांचे लेख विशेषत्त्वाने आवडले. प्रा. सरदारांचा समाजविचार हा प्रा. राम बापटांचा लेख मिळवून या अंकात समाविष्ट झाला असता तर बरे झाले असते.

प्रा. सरदार स्मृती विशेषांकाचे निमित्ताने परिषद व 'हाकारा' संबंधी काही विचार मनात आले.

★ परिषदेने दरवर्षी प्रा. सरदार स्मृतिदिनी १ डिसेंबरला प्रा. सरदार स्मृती पुरस्कार समारंभपूर्वक द्यावेत.

★ वर्षात प्रसिद्ध झालेल्या सर्वोत्कृष्ट आदिवासी साहित्यकृतीस प्रा. सरदार स्मृति आदिवासी साहित्य पुरस्कार

★ आदिवासींमधील विधायक/रचनात्मक कार्याबद्दल प्रा. सरदार स्मृति आदिवासी समाजकार्य पुरस्कार

★ आदिवासी समाज व संस्कृतीविषयक संशोधनपर मराठी ग्रंथास प्रा. सरदार स्मृति संशोधन ग्रंधपुरस्कार

★ वर्षात 'हाकारा'त प्रसिद्ध झालेल्या सर्वोत्कृष्ट लेखांना प्रा. सरदार स्मृति पुरस्कार

हे सर्व पुरस्कार मानचिन्ह/प्रमाणपत्रांच्या स्वरुपात असावेत. यामुळे परिषदेवर आर्थिक भार फारसा पडणार नाही.

प्रा. सरदार स्मृतिदिनानिमित्त महत्वाच्या प्रचलित सामाजिक विषयावर चर्चासत्र/परिसंवाद आयोजित करावा.

परिषदेच्या कार्यकारी मंडळाच्या सभेत यावर चर्चा व्हावी व तत्त्वतः ही कल्पना मान्य झाल्यास तपशील ठरविता येईल. यामुळे आदिवासी साहित्यिक, कार्यकर्ते, संशोधक/अभ्यासक यांना प्रोत्साहन मिळेल. 'हाकारा' स लेखकांचा प्रतिसाद वाढेल. परिषदेची जनमानसातील प्रतिष्ठाही त्यामुळे वाढेल.

आपला,
सुधीर जोग,
वर्धा

स. न. वि. वि.

हाकाराचा अंक (प्रा. गं. बा. सरदारस्मृति विशेषांक) फार उपयुक्त आहे. प्रा. सरदार यांचा विचार आणि कृतीविषयक मानवी-जीवन दृष्टिकोण फार मोलाचा आहे. आदिवासींचे जीवन-समस्या आणि त्यावरील उपाय यासंबंधी त्यांचे विचार व कार्य यापासून निश्चितच आमच्या सारख्या नवोदितांना प्रेरणा घेता येईल. विशेषत: आदिवासी साहित्यासंबंधी त्यांचे विचार अंत:र्मुख करणारे आहेत. एकूणच साहित्यविषयक त्यांचा दृष्टिकोण फार विशाल आहे.

'वास्तविक पाहता साहित्याची निर्मिती आणि आस्वाद हा एक शोधच आहे.' या त्यांच्या विचारातून बरेच काही शिकता येईल.

समीर पेंदाम,
नवी मुंबई.

---

## हाकारा

**[ फॉर्म ४, नियम ८ नुसार निवेदन ]**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | प्रकाशन स्थळ | : | ६४, आनंद पार्क, औंध, पुणे - ४११००७. |
| २. | प्रकाशन काळ | : | त्रैमासिक |
| ३. | मुद्रक, प्रकाशक व संपादक | : | रामचंद्र केशव मुटाटकर |
| | राष्ट्रीयत्व | | भारतीय |
| | पत्ता | : | ६४, आनंदपार्क, औंध, पुणे-४११००७ |
| ४. | स्वामित्व | : | महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद ६४, आनंद पार्क, औंध, पुणे-४११००७. |

मी रा. के. मुटाटकर जाहीर करतो की, वरील तपशील माझ्या माहितीनुसार व समजुतीनुसार खरा आहे.

३१ जानेवारी १९९१

रा. के. मुटाटकर
- प्रकाशक

# तुम्हालाही आयकर मुक्त व्हायचंय?
# मग अल्पबचतीत गुंतवणूक करा




### राष्ट्रीय बचत योजना १९८७

- गुंतविलेल्या संपूर्ण रकमेवर कलम ८० सीसीए अन्वये १००% आयकर सवलत
- गुंतवणुकीची कमाल मर्यादा आता प्रतिवर्षी रु. ४० हजार.

### १५ वर्षीय सार्वजनिक भविष्यनिर्वाह निधी

- आयकर अधिनियमाच्या कलम ८८ अन्वये प्रतिवर्षी रु. ५० हजार पर्यंतच्या गुंतवणुकीवर आयकरांत सवलत
- १२% करमुक्त चक्रवाढ व्याज.
- प्रतिवर्षी रु. १० हजार गुंतविल्यास, मुदतीअंती त्याचे ४ लाख, १७ हजार ५३२ रुपये मिळतात.

### ६ वर्षीय राष्ट्रीय बचत प्रमाणपत्रे (८वी मालिका)

- आयकर अधिनियमाच्या कलम ८८ अन्वये इतर मान्यताप्राप्त योजनांतील गुंतवणुकीसमवेत आयकरांत सवलत उपलब्ध
- वार्षिक व्याजावरही कलम ८८ अन्वये आयकरांत सवलत

## अल्पबचत संचालनालय, महाराष्ट्र शासन

नविन प्रशासकीय भवन, आठवा मजला, मुंबई-४०० ०३२

अल्पबचत सहाय्यक संचालक द्वारा: जिल्हा कलेक्टोरेट.


THE MAHARASHTRA ASSOCIATION OF ANTHROPOLOGICAL SCIENCES

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद**

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन

कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण

शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकाच व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिकशास्त्रे यांच्या शिक्षकांना व विचारवंतांना, मुख्यत: आदिवासींबाबत अभ्यासकांना, एकत्र आणणे.

मानव विज्ञानच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाने मूर्त स्वरूप म्हणून 'हाकारा' सुरू करण्यात आला आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे.

**मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व**

| | |
|---|---|
| आजीव सभासद | २५० रूपये |
| परिषद वार्षिक सभासद | २५ रूपये |

परिषद सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो.

आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (द महाराष्ट्र असोशिएशन ऑफ अँथ्रॉपॉलॉजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट किंवा मनीऑर्डरने पाठवावी. मनीऑर्डर फॉर्म मागे कृपया आपले पूर्ण नाव, पत्ता लिहिण्यास विसरू नये.

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**

रा. के. मुटाटकर सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औन्ध, पुणे ४११००७

**आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.**